(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)

पृ.शी./मु.शी.: तोंडी उत्तरे

`

सांगली जिल्ह्यातील दुष्काळी भागातील पशुधन वाचविण्यासाठी चारा डेपोऐवजी शेतकऱ्यांना चाऱ्यासाठी लागणारे थेट अनुदान देणेबाबत

(१) * २५०५८ श्री.भगवान साळुंखे , श्री.चंद्रकांत पाटील , श्री.रामनाथ मोते , श्री.नागो पुंडलिक गाणार , डॉ.रणजित पाटील : सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिलह्यातील दुष्काळी भागातील पशुधन वाचविण्यासाठी चारा डेपोऐवजी शेतकऱ्यांना चाऱ्यासाठी लागणारे थेट अनुदान द्यावे जेणेकरुन चारा वाटपामध्ये होत असलेल्या भ्रष्टाचार रोखला जाईल अशी मागणी दुष्काळग्रस्तांनी केली असल्याचे माहे डिसेंबर, २०११ च्या दुस-या आठवडयात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास सदर दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांच्या मागणीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.प्रकाश सोळंके, डॉ.पतंगराव कदम यांच्याकरिता: (१) होय.

(२) शासनाने दिनांक ३.१.२०१२ च्या शासन निर्णयान्वये अनुदानाऐवजी विशेष सवलतीच्या दराने चारा उपलब्ध करुन चारा डेपो उघडण्यास जिल्हाधिकारी यांना प्राधिकृत करण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

श्री.चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, गेल्या आठवडाभरामध्ये अनेक नेत्यांनी सांगली, सातारा जिल्ह्यांमध्ये दौरे केले असल्यामुळे या दुष्काळाची तीव्रता अधिक जाणवली आहे. ही दुष्काळी स्थिती येणार आहे असे गृहित धरुन शेतकरी आंदोलन करीत आहेत. त्यांचे असे म्हणणे आहे की, ज्या चारा छावण्या सुरु केल्या जातात त्यामध्ये भ्रष्टाचार केला जातो. त्यामुळे शेतकऱ्यांना डायरेक्ट चारा मिळाला पाहिजे. शासनाने मात्र थेट शेतकऱ्यांना चारा न देता टेंडर काढून कमी दरामध्ये चारा देण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार शासनाने टेंडर काढले आहे काय आणि टेंडर काढल्यानंतरही ठेकेदार पुढे येत नाहीत त्याची कारणे काय आहेत ?

श्री.प्रकाश सोळंके : सभापती महोदय, सांगली जिल्ह्यामध्ये एकूण 443 गावे टंचाईग्रस्त म्हणून घोषित केलेली आहेत. चाऱ्याच्या टंचाईमुळे सांगली जिल्ह्यामध्ये 24 चारा डेपो उघडलेले आहेत. जत तालुक्यामध्ये 10, आटपाडी तालुक्यात 8, कवठेमहांकाळ तालुक्यात 4, खानापूर-विटा तालुक्यात 1, तासगांव तालुक्यात 1 चारा डेपो उघडलेला आहे. आतापर्यंत 617.51 मे.टन चाऱ्याची उचल झालेली आहे.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.25058...

श्री.चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, त्या ठिकाणच्या ठेकेदारांनी टेंडरच भरलेले नाही. टेंडरच्या अटी व शर्ती कठीण व विचित्र असल्यामुळे कोणीही टेंडर भरलेले नाही. त्यामुळे शेतकऱ्यांना चारा कोठून दिला जाणार आहे ?

श्री.प्रकाश सोळंके : मी यापूर्वीच सांगितले आहे की, 24 ठिकाणी चारा डेपो चालू आहेत. त्यांच्या माध्यमातून 617 मे.टन चाऱ्याची उचल झालेली आहे.

श्री.रमेश शेंडगे : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी आता सांगितले आहे की, सांगली जिल्ह्यात 24 चारा डेपो चालू आहेत. परंतु सांगली जिल्ह्यात गावे किती आहेत, चाऱ्याची आवश्यकता असलेली गावे किती आहेत ? शासनाने गणामागे एकेक चारा डेपो चालू केला आहे म्हणजे 8-8, 10-10 गावांसाठी एक चारा डेपो सुरु केला आहे. खेड्यातील, वाड्या-वस्त्यातील शेतकरी डेपोमधून चारा कसा आणणार आणि तो चारा जनावरांना कसा देणार, या चारा डेपोंचा शेतकऱ्यांना उपयोग होत नाही. तलाठी हा सज्जा गृहित धरुन जेथे तलाठ्याचे कार्य क्षेत्र आहे, तेथे चारा डेपो सुरु केला जाईल काय ? शासनाने 75 टक्के व 25 टक्के असे प्रमाण ठेवलेले आहे. वास्तविक 1972 सालातील दुष्काळापेक्षा तेथील परिस्थिती भयाण आहे. त्यामुळे बीपीएलच्या लोकांसाठी 10 टक्के व 90 टक्के असे निकष लागू केले आहेत. ते सर्व रद्द करुन 100 टक्के अनुदानानुसार शेतकऱ्यांना चारा दिला जाणार आहे काय, जेथे पाण्याची आवश्यकता आहे तेथील टँकर्स नादुरुस्त आहेत. तेथील टँकर्स दुरुस्त करुन पाणी पुरवठा करण्याचे आदेश शासन देणार आहे काय ?

श्री.प्रकाश सोळंके : सभापती महोदय, चारा डेपो पंचायत समिती गणनिहाय सुरु करण्याचे शासनाने आदेश दिलेले आहेत. सन्माननीय सदस्यांनी दिलेल्या माहितीनुसार ज्या ठिकाणाहून चारा डेपोची मागणी येईल त्या ठिकाणी चारा डेपो उघडण्यात येतील.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, काल रात्री मी टी.व्ही.चॅनेलवर 'आज का सवाल' या कार्यक्रमामध्ये सन्माननीय मंत्री डॉ.पतंगराव कदम यांची मुलाखत नीटपणे ऐकलेली आहे.

यानंतर श्री.शिगम....

अशुद्धीत प्रत / मुद्रणासाठी नाही

चा-याच्या संदर्भात माननीय राज्यमंत्री श्री. प्रकाश सोळंके यांनी दिलेले उत्तर खरे मानले तर काल दूरदर्शन वाहिनीवर माननीय वने मंत्री डॉ. पतंगराव कदम यांनी जी माहिती दिली ती असत्य मानावी लागेल. वस्तुस्थिती काय आहे ?

श्री. प्रकाश सोळंके : काल माननीय वने मंत्र्यांनी छावण्यांच्या संदर्भात माहिती दिली. सांगली जिल्ह्यामध्ये एकही छावणी नाही. परंतु 24 ठिकाणी चारा डेपो सुरु करण्यात आलेले आहेत.

श्री. विनोद तावडे : 3.1.2012 रोजी आदेश निर्गमित करण्यात आले होते. तर मग त्या आदेशाची योग्य प्रकारे अंमलबजावणी झालेली आहे असे मंत्री महोदयांना वाटते काय, नसल्यास, कामात कसूर करणा-या अधिका-यांवर कोणती कारवाई करण्यात येणार आहे ?

श्री. प्रकाश सोळंके : पहिल्यांदा जे आदेश काढण्यात आलेले होते त्यामध्ये काही त्रुटी होत्या. त्या त्रुटी दूर करण्यात आलेल्या आहेत. प्रत्येक शेतक-याला 10 जनावरांमागे चारा उपलब्ध करुन देण्यात येईल अशी सुधारणा करण्यात आलेली आहे.

श्री दीपकराव साळुंखे : सांगली जिल्हयामध्ये जनावरांना चारा उपलब्ध करुन देण्याच्या संदर्भात किती टेंडर मंजूर करण्यात आलेले आहेत ? 100 शेतक-यांची चा-याची मागणी असेल तर 10 शेतक-यांना देखील चारा मिळत नाही. पंचायत समिती गणनिहाय चारा डेपो करण्यात आलेला आहे असे मंत्री महोदयांनी सांगितले. एकेका पंचायत समिती गणामध्ये गावे 18-18 कि.मी. अंतरावर आहेत. त्यामुळे 150 रु.चा चारा नेण्यासाठी 800 रु. भाडे द्यावे लागते. तेव्हा चारा मिळण्यासंबंधीचे जरी आदेश निर्गमित करण्यात आलेले असले तरी त्या आदेशांची नीट अंमलबजावणी झालेली नाही. तेव्हा जनावरांना चारा उपलब्ध होण्यासाठी शासन कोणती उपाययोजना करणार आहे ?

श्री. प्रकाश सोळंके :चारा डेपो सुरु करण्याबाबत जिल्हाधिका-यांना संपूर्ण अधिकार देण्यात आलेले आहेत. आवश्यकता असेल त्याप्रमाणे चारा डेपो सुरु करावेत अशा सूचना दिलेल्या आहेत. तलाठी सज्जानिहाय मागणी आली तर त्याप्रमाणे चारा डेपो सुरु करण्यात येईल.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस : सांगली जिल्ह्यातील ग्रामपंचायतींच्या ग्रामसभेमध्ये शेतक-यांनी चारा शंभर टक्के अनुदानावर उपलब्ध करुन द्यावा अशी मागणी जिल्हाधिकारी आणि पुनर्वसन मंत्र्यांकडे केलेली आहे. ही मागणी अद्याप पूर्ण झालेली नाही. ही मागणी केव्हा पूर्ण होईल ?

श्री. प्रकाश सोळंके : रोख अनुदानाची शेतक-यांची मागणी होती. रोख अनुदान देणे शक्य होणार नाही. त्यामुळे शेतक-यांची ही मागणी मान्य करता येण्यासारखी नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

बोरगाव (ता.सुरगाणा,जि.नाशिक) येथे आदिवासी विभागातर्फे चालविण्यात येणाऱ्या कळवण प्रकल्पातील शासकीय आदिवासी मुलींच्या वसतिगृहातील ६५ मुलींना जेवणातून विषबाधा झाल्याबाबत

(२) * २५९४३ श्री.रमेश शेंडगे , श्री.हेमंत टकले , ॲड. उषाताई दराडे , श्री.विक्रम काळे , श्री.किरण पावसकर , श्री.जयप्रकाश छाजेड , श्री.उल्हास पवार , श्री.मोहन जोशी , श्री. एस. क्यू. ज़मा , श्री.राजन तेली , श्री.अरुण गुजराथी , डॉ.निलम गोऱ्हे , डॉ.दीपक सावंत , श्री.परशुराम उपरकर , श्री.सुभाष चव्हाण , श्री.अमरनाथ राजूरकर , प्रा.सुरेश नवले , श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप , श्री.एम.एम.शेख , डॉ.सुधीर तांबे , श्रीमती अलका देसाई , श्रीमती शोभा फडणवीस , श्री.नितीन गडकरी , श्री.पांडुरंग फुंडकर , श्री.विनोद तावडे , श्री.जयवंतराव जाधव , श्री.संदिप बाजोरिया , श्री.अनिल भोसले , श्रीमती दिप्ती चवधरी , श्री.जैनुद्दीन जव्हेरी , श्री.चरणसिंग सप्रा : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बोरगाव (ता.सुरगाणा,जि.नाशिक) येथे आदिवासी विभागातर्फे चालविण्यात येणाऱ्या कळवण प्रकल्पातील शासकीय आदिवासी मुलींच्या वसतिगृहातील ६५ मुलींना जेवणातून विषबाधा झाली असून त्यातील काही मुली या अतिदक्षता विभागात असल्याचे दिनांक ८ जानेवारी, २०१२ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणाची चौकशी शासनाने केलेली आहे वा करण्यात येत आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणात काय आढळून आले व त्यामध्ये विषबाधा होण्याचे कारणे काय आहेत,

(४) असल्यास, संबंधित वसतीगृहातील मुलींची प्रकृती सध्या कशी आहे, तसेच दोषी आढळून येणाऱ्यांवर शासनाने कोणत्या स्वरुपाची कारवाई केली आहे,

(५) अद्याप, कोणतीच कारवाई करण्यात आली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.बबनराव पाचपुते : (१), (२), (३), (४) व (५) दिनांक ८.१.२०१२ रोजी जेवण घेतल्यानंतर ६८ विद्यार्थिनीपैकी ५१ विद्यार्थीनींना जेवणानंतर मळमळणे, चक्कर येणे, डोके दुखणे यासारखा त्रास होत असल्याने रुग्णालयात दाखल करण्यात आलेले नव्हते.

त्यामधील एकाही विद्यार्थीनीला अतिदक्षता विभागात दाखल करण्यात आलेले नव्हते.

सदर घटनेची अपर आयुक्त, नाशिक यांनी चौकशी केली असून तेथील वसतिगृहाच्या गृहपालानी कर्तव्यात कसूर केल्याने त्यांची एक वेतनवाढ कायमस्वरूपी रोखली असून वसतीगृह भोजन पुरवठाधारकाचा ठेका बंद केला आहे. वसतीगृहातील घटनेसंदर्भात अन्न व औषध प्रशासन विभागाकडून स्वंयपाक तयार करण्यासाठी वापरलेले कडधान्य व किराणा मालाचे नमुने तपासणी करण्याकरिता वरिष्ठ वैज्ञानिक, जिल्हा प्रयोगशाळा, जि.नाशिक यांचेकडे पाठविण्यात आले आहे. त्यांचेकडून अद्याप अहवाल अप्राप्त आहे. सध्या या मुलींची प्रकृती चांगली आहे.

श्री. रमेश शेंडगे : अशा प्रकारे आदिवासी वसतिगृहातील किंवा आश्रमशाळेतील मुलांना अन्नातून विषबाधा होण्याचा प्रश्न या सभागृहामध्ये अनेक वेळा चर्चिला गेला आहे. नाशिक मध्ये आदिवासी विभागातर्फे चालविण्यात येणा-या कळवण प्रकल्पातील आदिवासी मुलींच्या वसतिगृहातील

..४..

मुलींना अन्नातून विषबाधा झाल्यामुळे त्याना हॉस्पिटलमध्ये दाखल करावे लागले. या प्रकरणी अन्नधान्याचा पुरवठा करणारा जो पुरवठादार होता त्याच्यावर काय कारवाई करण्यात आलेली

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आहे ? त्या पुरवठादाराला काळ्या यादीत टाकलेले आहे काय ? तसेच या घटनेला जबाबदार असणा-या अधिका-यावर काय कारवाई करण्यात आलेली आहे ?

.....नंतर श्री. भोगले.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.बबनराव पाचपुते : सभापती महोदय, राज्यामध्ये आदिवासी मुलींना शिक्षण घेता यावे म्हणून आश्रमशाळा आणि वसतिगृहांची सोय केलेली आहे. या वसतिगृहांमध्ये त्या परिसरातील हायस्कूल व कॉलेजमध्ये शिक्षण घेणाऱ्या मुलींना प्रवेश दिला जातो. प्रत्यक्षात 464 आश्रमशाळा राज्यात सुरु आहेत. श्री.अजिज पठाण या ठेकेदाराला काळ्या यादीत टाकण्यात आले असून त्याचा ठेका काढून घेण्यात आला आहे व यापुढे त्याला ठेका द्यायचा नाही असे सांगितले आहे. तसेच त्याच्या विरोधात पोलीस केस दाखल केली आहे. लॅबचा अहवाल आल्यानंतर पुढील कार्यवाही सुरु होईल.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, उत्तरामध्ये म्हटले आहे की, वरिष्ठ वैज्ञानिक जिल्हा प्रयोगशाळा, जिल्हा नाशिक यांच्याकडे नमुने तपासणीसाठी पाठविले असून त्यांचा अहवाल अद्याप अप्राप्त आहे. जानेवारी महिन्यात ही घटना घडली होती. घटना घडल्यापासून आतापर्यंत अहवाल मिळविण्यासाठी काय प्रयत्न केले? विषबाधा जशी अन्नातून होऊ शकते तशी ती पाण्यामुळे देखील होऊ शकते. पाण्याचा सोर्स आणि स्वच्छतागृह अगदी जवळ असल्यामुळे पाणी दूषित झालेले होते का याची तपासणी केली आहे काय?

श्री.बबनराव पाचपुते : सभापती महोदय, या संदर्भात तपासणी केली आहे. प्रत्यक्षात विभागाच्या अधिकाऱ्यांना लॅबमध्ये पाठविले असून अहवाल लवकर मिळावा यासाठी पाठपुरावा केला आहे. अद्याप अहवाल मिळालेला नाही ही वस्तुस्थिती आहे. भोजन कक्षात ज्या वस्तू आहेत त्यांचे सॅम्पल घेऊन तपासणीसाठी पाठविले आहे. आज आश्रमशाळांची स्वत:ची इमारत नाही. आश्रमशाळा चालविण्यासाठी भाड्याची इमारत घ्यावी लागते. म्हणून जानेवारी महिन्यात 1.44 कोटी रुपयांच्या खर्चाला प्रशासकीय मान्यता दिली आहे. विभागातर्फे स्वतंत्र व्यवस्था करण्यासाठी बहुतेक सगळ्या वसतिगृहांसाठी जमिनी घेण्याचा कार्यक्रम सुरु आहे. आता जेवणाचा ठेका दिलेला नाही. शासकीय यंत्रणेमार्फत जेवणाची व्यवस्था केली जाते.

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, एका अतिशय चांगल्या योजनेत कसा गोंधळ होऊ शकते हे या प्रश्नाच्या निमित्ताने आपल्यासमोर उघड झालेले आहे. आश्रमशाळांमध्ये अनेक वस्तूंचा पुरवठा होत असतो. विशेषत: अन्नधान्यातील भेसळ लक्षात आल्यानंतर वैज्ञानिक प्रयोगशाळेमार्फत तपासणी करावी लागते. त्याऐवजी आदिवासी विकास विभागामार्फत राज्यातील आश्रमशाळांमध्ये

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले..... ता.प्र.क्र.25943...

ज्या वस्तू पुरविल्या जातात त्यांची तपासणी करण्यासाठी विशिष्ट अधिकाऱ्यांचे भरारी पथक नेमून वेगवेगळ्या आश्रमशाळांना त्यांनी अचानक भेटी देऊन वस्तूंची तपासणी केली तर या प्रकाराला आळा बसू शकेल. अशी प्रतिबंधात्मक उपाययोजना खात्यामार्फत राबविण्यात येईल काय?

श्री.बबनराव पाचपुते : सभापती महोदय, माननीय सदस्यांकडून चांगली सूचना आलेली आहे. ती स्वीकारली जाईल. सजेशन फॉर ॲक्शन.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, भरारी पथक नेमण्याची आवश्यकता नाही. आदिवासी प्रकल्प अधिकाऱ्यांनी महिन्यातून किती वसतिगृहांना व आश्रमशाळांना भेटी द्याव्यात याचा कार्यक्रम ठरवून दिलेला आहे. तशा प्रकारचे बंधन घातलेले असतानाही ज्या आदिवासी प्रकल्प अधिकाऱ्यांनी ठरवून दिल्याप्रमाणे वसतिगृहांना व आश्रमशाळांना भेटी दिल्या नसतील तर त्यांच्याविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली आहे?

श्री.बबनराव पाचपुते : सभापती महोदय, माननीय सदस्यांनी सांगितले ते योग्य आहे. या संदर्भात शासनाने नियमावली तयार केली आहे, जी.आर.काढले आहेत. कोणी किती भेटी द्याव्यात या संदर्भात सूचना दिलेल्या आहेत. भेटी दिल्यानंतर काय काय पाहिले याची रजिस्टरमध्ये नोंद करावयाची आहे. या आश्रमशाळेच्या रजिस्टरमध्ये नोंद आहे. घटना घडल्याच्या चार दिवसापूर्वी अधिकाऱ्यांनी या आश्रमशाळेला भेट दिली होती. त्या भेटीमध्ये काही गैर आढळले नाही. 75 वसतीगृहे नाशिक जिल्हयात कार्यरत आहेत. या प्रकरणात नेमके काय घडले हे चौकशी झाल्यानंतर समोर येईल. पुन्हा अशी घटना घडू नये यासाठी सुध्दा व्यवस्था केली जाईल.

नंतर श्री.खर्चे...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तारांकित प्रश्न क्रमांक 26263

(सन्माननीय सदस्य अनुपस्थित)

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

गोंदिया जिल्ह्यात मार्केटींग फेडरेशन आणि आदिवासी महामंडळाच्या वतीने धान खरेदी करण्यात येत असल्याबाबत

(4) *25389 श्री.केशवराव मानकर, श्री.पांडुरंग फुंडकर, श्री.संजय केळकर, श्रीमती शोभाताई फडणवीस , श्री.राजेंद्र जैन : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) गोंदिया जिल्ह्यात जिल्हा मार्केटींग फेडरेशन आणि आदिवासी महामंडळाच्या वतीने धान खरेदी करण्यात येत असून मार्केटींग फेडरेशनने 39 केंद्रावर दिनांक 30 डिसेंबर, 2011 पर्यंत 1 लाख 67 हजार 538 क्विंटल धानाची खरेदी करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, आदिवासी महामंडळांतर्गत गेल्या तीन वर्षापासून खरेदी करण्यात आलेल्या धानाची अद्यापही उचल करण्यात न आल्यामुळे तसेच आदिवासी विकास महामंडळाच्या कित्येक केंद्रावर दोन महिन्यांपासून बारदाना उपलब्ध नसल्यामुळे खरेदी थांबविण्यात आली असल्याचे माहे जानेवारी, 2012 मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(3) असल्यास, गोंदिया जिल्ह्यातील खरेदी केंद्रावर मागच्या वर्षीप्रमाणे धान उघडयावर पडले असून मागील वर्षीप्रमाणे याहीवर्षी धान सडण्याच्या मार्गावर असल्यामुळे शासनाकडून यावर कायमस्वरूपी उपाय का योजले जात नाही, गोदाम आणि बारदान्याची समस्या किती कालावधीत सुटणार आहे नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.बबनराव पाचपुते : (1) होय.

(2) व (3) वाहतूक व भरडाईचे दर कमी असल्यामुळे व भरडाईत ब्रोकनचे प्रमाण अधिक येत असल्यामुळे मागील तीन वर्षापासून खरेदी केलेल्या धानापैकी काही धान शिल्लक आहे. सदर शिल्लक धान साठा आदिवासी विकास महामंडळाने खाजगी गोदामात व उघड्यावर ताडपत्रीने झाकून दोरखंड बांधून सुरक्षित ठेवलेला आहे. खरेदी केंद्रावर नवीन व जुना बारदाना वेळोवेळी पुरविण्यात आलेला असल्यामुळे बारदाना अभावी कोणत्याही खरेदी केंद्रावर खरेदी बंद राहिलेली नाही. ज्या खरेदी केंद्रावर जागा उपलब्ध नाही तेथे कृषी उत्पन्न बाजार समिती धर्तीवर पत्र्याची शेड उभारण्याचे काम तसेच तीन नवीन गोदामे बांधण्याचे काम आदिवासी विकास महामंडळाने हाती घेतले आहे.

महोदय, लेखी उत्तरात मी आपल्या अनुमतीने पुढीलप्रमाणे दुरुस्ती करु इच्छितो :--

शेवटून तिसऱ्या ओळीमध्ये "जागा उपलब्ध नाही" ऐवजी "जागा उपलब्ध आहे" असे वाचावे. बाकी छापल्याप्रमाणे.

श्री. केशवराव मानकर : महोदय, मी विधान परिषदेत पहिल्यांदा निवडून आल्यानंतर लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून आदिवासी भागात बाजार समित्यांच्या धर्तीवर पत्र्याचे शेड्स व गोदामे बांधण्याच्या संदर्भात मंत्री महोदयांचे लक्ष वेधले असता त्यांनी दिलेल्या आश्वासनाची प्रत माझ्याकडे उपलब्ध आहे. त्यानंतर सन 2010 च्या पुरवणी मागण्यांच्या वेळेस देखील मी हीच

....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मागणी केली होती. हा प्रश्न आमच्या भागातील गंभीर स्वरुपाचा प्रश्न असून शासनाचे कोट्यवधी रुपयाचे धान सडण्याचा प्रकार होत असतो. तसेच त्या नंतरच्या काळात देखील हा प्रश्न मी वेळोवेळी चर्चेला आणत होतो पण त्याबाबत शासनाने अद्यापही उपाययोजना केली नाही. जर सन 2006 पासून शासनाने याबाबतची उपाययोजना केली असती तर शासनाचे कोट्यवधी रुपये वाचले असते, त्याच उद्देशाने हा प्रश्न आज सभागृहात उपस्थित केला आहे. या निमित्ताने माझी मागणी आहे की, धानाची वाहतूक व भरडईचे दर कमी असल्यामुळे भरडई होत नाही. हे दर वाढविण्यासाठी शासनाने आतापर्यंत कोणते प्रयत्न केले, तसेच ब्रोकनच्या संदर्भात शासनाने कोणता निर्णय घेतला आहे आणि सन 2008-09 ते 2011-12 या तीन वर्षात आदिवासी क्षेत्रात किती धान खरेदी करण्यात आले, त्यापैकी किती धानाची भरडाई केली गेली, किती धान शिल्लक राहिले आणि किती धान भरडई न झाल्याने जागेवरच सडले ?

श्री. बबनराव पाचपुते : महोदय, हा प्रश्न खरे तर अन्न व नागरी पुरवठा विभागाशी संबंधित येतो. यामध्ये धानाची जी खरेदी होत असते ती केंद्र सरकारच्या वतीने केली जाते. त्याच प्रमाणे पणन महासंघाला सुध्दा या खरेदीचे काम देण्यात आले, त्यांनी आमच्या विभागाकडे हे खरेदीचे काम दिले आहे. त्यामुळे ही संपूर्ण खरेदी केंद्र आणि राज्य शासनाच्या वतीने आमचा विभाग करीत असतो. ही खरेदी करण्यासाठी खरेदी केंद्रे उघडावयाची असतील तर त्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांबरोबर बैठक होते व त्या बैठकीत जागा ठरवून दिल्या जातात. अशा प्रकारे 45 धान खरेदी केंद्रे उघडली असून त्या माध्यमातून ही खरेदी झाली आहे. गेल्या तीन-चार वर्षात करण्यात आलेल्या खरेदीचे आकडे माझ्याकडे आहेत. खरेदी केल्यानंतर हा माल गोडाऊन मध्ये ठेवला जातो. खरेदी जास्त झाली तर ताडपत्र्यांनी झाकून दोराने बांधून ठेवले जाते. तसेच अशी खरेदी केल्यानंतर हा माल मिलपर्यंत नेण्यासाठी वाहतुकीचा खर्च केंद्र सरकारने तसेच पणन महासंघाने दिला पाहिजे पण अद्याप त्यासंबंधीचा निर्णय होत नाही. दर प्रति किलोमीटर सहा ते साडे सहा पैसे आणि 25 किलोमीटरसाठी 52 पैसे एवढा कमी आहे, तो वाढवून मिळावा यासंदर्भात केंद्रीय मंत्र्यांबरोबर एक बैठक झाली होती. तसेच केंद्रीय कृषी मंत्री श्री. शरदराव पवार यांच्या सोबतही एक बैठक झाली होती. त्यानंतर राज्याच्या अन्न व नागरी पुरवठा मंत्र्यांसोबत बैठक लावली.....

....4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 25389.....

श्री. दिवाकर रावते : महोदय, माननीय केंद्रीय मंत्री श्री. शरद पवार यांच्याबद्दल आम्हालाही कौतुक आहे, त्याबद्दल दुमत नाही पण आम्ही सभागृहात एखाद्या नेत्याचे किंवा मंत्र्याचे नाव घेतो तेव्हा आम्हाला नांव न घेण्याबाबत सांगितले जाते, आमची मुस्कटदाबी केली जाते. आता मंत्री महोदय माननीय शरद पवार साहेबांचे नाव घेत आहेत, हे चालते आणि आम्ही घेतले तर ते मात्र चालत नाही हा कोणता प्रकार आहे, हे मात्र कळत नाही.

श्री. बबनराव पाचपुते : याबाबत काय प्रयत्न केले असे मी सांगत आहे. तसेच त्यानंतर पुन्हा विधान भवनात याबाबत चर्चा करण्यात आली.

यानंतर श्री. जुन्नरे ....

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. : 25389 .....

श्री. जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांच्या उत्तरालाच माझी हरकत आहे. मंत्री महोदय, या ठिकाणी शासनाच्या वतीने उत्तर देत आहेत. या प्रश्नाच्या संदर्भात माननीय अन्न पुरवठा मंत्र्यांनी उत्तर दिले होते की, धान्यवाहतुकीचे दर वाढवून मिळणार नाही. सदर धान्याची खरेदी अन्न पुरवठा विभागाच्या माध्यमातून होत असते. मार्केटींग फेडरेशनचा डायरेक्टर म्हणून मी 20 वर्षे काम केलेले आहे. या विषयाच्या संदर्भातील पॉलीसी राष्ट्रीय पातळीवर ठरवली जात असते. त्यामुळे शासन म्हणून मंत्री महोदयांनी अशा प्रकारचे उत्तर देणे चुकीचे आहे. सन्माननीय सदस्य श्री. केशवराव मानकर यांनी मागील अधिवेशनात सदर प्रश्न अन्न पुरवठा मंत्री श्री. अनिल देशमुख यांना विचारला होता त्यावेळी त्यांनी वेगळेच उत्तर दिले होते. हा प्रश्न पूर्व विदर्भात तसेच रायगड जिल्हयामध्ये मोठया प्रमाणात आहे. धान्य खरेदी करण्याची जबाबदारी आदिवासी विभागाची नसल्यामुळे या प्रश्नाचे उत्तर अन्न पुरवठा विभागाच्या वतीने माननीय मंत्री महोदय देत आहेत की, आदिवासी विकास विभागाच्या वतीने देत आहेत याचे उत्तर माननीय मंत्री महोदयांनी प्रथम द्यावे.

श्री. बबनराव पाचपुते : सभापती महोदय, सदर प्रश्नाच्या संदर्भात आमच्या विभागाचा जेथपर्यंत संबंध येतो तसेच शासनाचा जेथपर्यंत सहभाग येतो त्या संदर्भात मी या प्रश्नाच्या संदर्भात उत्तर देत आहे.

श्री. जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, दोन्ही खात्याचे संयुक्त प्रश्न असतील तर दोन्ही विभागाने संयुक्त उत्तरे दिली पाहिजेत. आज पूर्व विदर्भात हजारो क्विंटल धान सडत पडलेले आहे. रायगड जिल्हयात किमान 10 हजार क्विंटल भात सडण्याच्या अवस्थेत आहे. या प्रश्नाच्या संदर्भात अन्न पुरवठा मंत्री तसेच आदिवासी विकास मंत्र्यांनी संयुक्तपणे उत्तर देण्याची आवश्यकता असल्यामुळे हा प्रश्न राखून ठेवण्यात यावा अशी माझी आपल्याला नम्र विनंती आहे. अनेक संस्थांना भात खरेदी करण्यासाठी जागा मिळत नाही तसेच जो भात खरेदी केलेला आहे तो ठेवण्यासाठी संस्थांकडे जागा नाही. शेतक-यांच्या दृष्टीने हा ज्वलंत प्रश्न असल्यामुळे हा प्रश्न राखून ठेवून दोन्ही खात्यांनी संयुक्त उत्तर द्यावे अशी माझी आपल्याला विनंती आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. बबनराव पाचपुते : सभापती महोदय, हा प्रश्न राखून ठेवण्याचे काहीही कारण नाही. धान खरेदीची योजना ही केंद्रसरकारची असून केंद्रसरकारच्या वतीने ही योजना राज्य सरकार राबवित असते. केवळ गोंदिया जिल्हयातील धानाचीच भरडई झालेली नाही. चंद्रपूर व भंडारा जिल्हयातील धानाची भरडई झालेली आहे. भरडई झाल्यानंतर धान एकत्र करुन ते मिलपर्यंत पोहचवले जाते. गेल्यावर्षी पाऊस कमी पडल्यामुळे धानाची भरडई करतांना धानाची फूट जास्त होत होती त्यामुळे गेल्यावर्षी या जिल्हयात धानाची भरडाई होऊ शकली नाही व यासंदर्भात माननीय मुख्यमंत्र्याकडे एक बैठक सुध्दा आयोजित करण्यात आली होती व त्या बैठकीमध्ये माननीय मुख्यमंत्र्यांनी धान भरडईच्या किमती 10 रुपयाने वाढवून दिल्या होत्या परंतु तरी सुध्दा यातून मार्ग निघू शकला नाही. धान भरडाईच्या किमती पुन्हा वाढवून द्याव्या लागणार आहेत.याची खरेदी 28 फेब्रुवारी पर्यंत होती तेथ पर्यंत ते झाले नाही त्यामुळे यासंदर्भात आपल्याला भाव वाढवून द्यावे लागणार आहे. यावर्षीची धान भरडई सुरु झाली असून केवळ गोंदिया जिल्हयाची मागील वर्षाचीच धान भरडई राहिलेली आहे. जेवढे धान बाजारात येते त्या सर्व धानाची खरेदी केली जात असल्यामुळे शेतक-यांची अडचण होते असे काहीही झालेले नाही.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, रायगड, सिंधुदुर्ग व पूर्व विदर्भात धानाच्या संदर्भात परिस्थिती गंभीर झालेली आहे. माननीय मंत्रीमहोदयांनी उत्तरात असे सांगितले आहे की, 28 तारखेपर्यंत धान खरेदी होती ती पुढे वाढवून घ्यावी लागणार आहे. आज एप्रिल महिना सुरु आहे. त्यामुळे दीड महिना होऊन गेल्यानंतरही कार्यवाही केली नाही त्याबाबत काहीही सांगण्यात आले नाही. धान खरेदीची योजना केंद्र सरकारची असली तरी धान खरेदी करण्याची जबाबदारी राज्य शासनाचीच आहे. केंद्र सरकारच्या योजनेअंतर्गत या खरेदीसाठी राज्य शासनाला निधी मिळत असल्यामुळे राज्य शासनाच्या तिजोरीवर काहीही भार येत नसल्यामुळे राज्य शासनाने अधिक चांगले काम केले पाहिजे. त्यामुळे दीड महिन्यात यासंदर्भात आपण नेमके काय काम केले आहे ते सभागृहाला सांगितले पाहिजे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. : 25389 .....

श्री. बबनराव पाचपुते : सभापती महोदय, खरेदीचे जे रेट ठरविण्यात आलेले आहेत ते बरोबर असून त्या प्रमाणे खरेदी होत आहे. एकंदर 45 केंद्रातून धानाची खरेदी केली जात असल्यामुळे शेतक-याला काहीही अडचण निर्माण झालेली नाही. खरेदी केलेल्या धानाची व्यवस्थित भरडाई करणे हे काम असून भरडाई करण्यामध्ये फूट होत असल्या कारणाने अडचणी निर्माण झालेल्या आहेत. वाहतुकीचा खर्च व भरडईचा खर्च वाढवून द्यावा याबाबत केंद्र सरकारडे मागणी करण्यात आलेली असून या संदर्भात दोन बैठकाही झालेल्या आहेत. या विषयाच्या संदर्भात माननीय मुख्यममंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेतली असून त्यामध्ये 2.5 हजार कोटी जास्त खर्च येणार असून हे पैसे राज्य सरकार देईल असा निर्णय या बैठकीमध्ये घेण्यात आला आहे. धानाची भरडई करण्यात यावी यासाठी मिल मालकांना सांगितले होते परंतु मिल मालकांनी भरडई केली नाही.

यानंतर श्री. भारवि...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.25389 ...

श्री.बबनराव पाचपुते...

परत मुदत वाढवून देण्याचा प्रस्ताव दिलेला आहे. या संबंधात माननीय मुख्यमंत्र्यांकडे मिटींग होईल. आमच्याकडून प्रस्ताव गेलेला आहे. आज शेतकऱ्यांची आणि लोकांची कोणतीही अडचण नाही.

(विरोधी पक्षातील काही माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

सभापती महोदय, हा विषय सोपा आहे. आदिवासींचे धान खरेदी करण्याची योजना केंद्र सरकारची आहे. धान खरेदी करण्यासाठी मार्केटींग फेडरेशनने आम्हाला नेमले आहे. आम्ही ते धान खरेदी करीत आहोत. घेऊन ठेवलेल्या मालाची भरडाई करणे हा विषय आहे. यासाठी त्यांनी परवानगी वाढवून दिली पाहिजे. तसा प्रस्ताव महाराष्ट्र शासनाने पाठवून दिला आहे. त्यांनी परवानगी दिल्या नंतर पुढचा कार्यक्रम सुरू होईल. सध्या कास्तकरांची, शेतकऱ्यांची कुठलीही अडचण नाही.

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, या प्रश्नाला बरोबर उत्तर येत नाही. मागच्या वर्षीचे धान तसेच पडून आहे. त्यामुळे या प्रश्नाचे उत्तर येण्याकरिता हा प्रश्न राखून ठेवावा अशी मी विनंती करीत आहे.

श्री.बबनराव पाचपुते : सभापती महोदय, हा विषय आमच्याकडे आल्या नंतर मी दोन्ही कडची माहिती घेतली आहे. मी येथे शासन म्हणूनच उत्तर देत आहे. विभाग म्हणून उत्तर देत नाही. अन्न व नागरी पुरवठा विभागाने भरडाईची मुदत वाढवून देण्यासंबंधीचा प्रस्ताव पाठवून दिला आहे. परवानगी आल्यानंतर पुढचा कार्यक्रम सुरू होईल. सध्या खरेदीची अडचण राहिलेली नाही. आहे तो स्टॉक संपविणे हा विषय आहे. त्यामुळे यामध्ये शेतकरी किंवा अन्य कोणाचीही अडचण इ ालेली नाही.

(विरोधी पक्षातील काही सन्माननीय सदस्य उभे राहून एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

उप सभापती : या प्रश्नाचे उत्तर आपल्याला अन्न व नागरी पुरवठा विभागाकडून अपेक्षित आहे ना. ?

काही सन्माननीय सदस्य : होय.

उप सभापती : आदिवासी विकास विभागाचे उत्तर आपल्याला माननीय मंत्र्यांकडून मिळाले काय ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

काही सन्माननीय सदस्य : होय.

(विरोधी पक्षातील काही सन्माननीय सदस्य उभे राहून एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

श्री.बबनराव पाचपुते : सभापती महोदय, गोंदिया जिल्ह्यात जिल्हा मार्केटींग फेडरेशन आणि आदिवासी महामंडळाच्या वतीने धान खरेदी करण्यात येत असून मार्केटींग फेडरेशनने दिनांक 30 डिसेंबर 2011 पर्यंत 1 लाख 67 हजार 538 क्विंटल धान्याची खरेदी करण्यात आली आहे, हे खरे आहे काय ? असा प्रश्न विचारला असता त्यास "होय" असे उत्तर देण्यात आले आहे. अन्न व नागरी पुरवठ्याचा विषय हा पुढचा आहे.

उप सभापती : हा प्रश्न अन्न व नागरी पुरवठा विभागाशी संबंधित असल्यामुळे सध्या मी हा प्रश्न राखून ठेवतो.

.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अहेरी (जि.गडचिरोली) येथे अतिकिंमतीचे असलेले सागवान यांची सध्या मोठ्या प्रमाणात अवैध तोड होत असल्याबाबत

(5) * 26303 श्री.जैनुद्दीन जव्हेरी , श्री.राजन तेली , श्री.एम.एम.शेख , श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप : सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) अहेरी (जि.गडचिरोली) येथे अतिकिंमतीचे असलेले सागवानाची सध्या मोठ्या प्रमाणात अवैध तोड होऊन त्याची आंध्रप्रदेशात तस्करी करण्यात येत असल्याचे माहे डिसेंबर, 2011 मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, सागवानाची होत असलेली अवैध तोड व तस्करी रोखण्याबाबत तसेच सागवानाची अवैध तोड करणाऱ्या तस्करांवर कारवाई करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(3) अद्याप, कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

डॉ.पतंगराव कदम : (1) हे अंशत: खरे आहे.

अहेरी तालुक्यात 8 वनपरिक्षेत्रांचा समावेश आहे. त्यापैकी प्राणहिता, जिमलगट्टा व देचली बनपरिक्षेत्रातील सागवानाची अवैध कत्तल व तस्करी काही प्रमाणात होत असल्याचे माहे डिसेंबर, 2011 मध्ये निदर्शनास आले आहे.

(2) व (3) प्रकरणात वनोपज जप्त करण्यात आला आहे. आरोपींची चौकशी/ शोध सुरु आहे. सागाची अवैध तोड करण्याऱ्या तस्करांवर कारवाई करण्याबाबत तसेच सागाची होत असलेली अवैध तोड व तस्करी रोखण्याबाबत शासनाकडून पुढील कार्यवाही केली जाते -

1) वनविभागातील मौल्यवान सागवानाची अवैध तोड व तस्करी होवू नये म्हणून सदरची अवैधतोड व तस्करी रोखण्याकरीता नदी किनाऱ्यावरती संरक्षण कॅम्प उभारण्यात आलेले आहेत.

2) उभारण्यात आलेल्या कॅम्पवरती वनकर्मचारी 24 तास तैनात केलेले आहेत.

3) वनपरिक्षेत्र अधिकारी, फिरते पथक व वनसंरक्षण पथक यांना अवैध तोड होणाऱ्या क्षेत्रात गस्तीचा कार्यक्रम आखून देण्यात आलेला असून त्यांचेकडून गस्तीची कामे सुरु आहे.

4) वरिष्ठ अधिकारी चोरतोड होणाऱ्या क्षेत्रात वारंवार भेटी देवून पाहणी करीत असतात.

5) गस्तीकॅम्पवर प्राणहिता, गोदावरी व इंद्रावती नदीपात्रात बोटीद्वारे गस्त करुन अवैध वृक्षतोडीचा माल हस्तगत केला जातो.

6) संवेदनशील ठिकाणी 9 MM पिस्तुल व SLR रायफलचा पुरवठा करण्यांत आलेला आहे.

7) जिल्हा पातळीवर जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली टास्कफोर्स समितीची स्थापना करुन बैठका आयोजित करुन तस्करीवर व वनगुन्हेगारांवर आळा घालणेसाठी उपाययोजनात्मक चर्चा केली जाते.

8) गडचिरोली वनवृत्तांत अवैध वृक्षतोडीच्या वाहतुकीवर नियंत्रण ठेवण्यांसाठी संवेदनशील ठिकाणी एकूण 23 तपासणी नाके स्थापन करण्यात आलेले आहेत. तसेच वन अधिकारी/ कर्मचारी यांना भ्रमणध्वनीचा पुरवठा करण्यात आलेला आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.26303...

श्री.जैनुद्दीन जव्हेरी : सभापती महोदय, माननीय मंत्र्यांनी सविस्तर उत्तर दिले आहे. माझ्या लेखी प्रश्नाला हे खरे आहे असे उत्तर देऊन सागवानाची मोठ्या प्रमाणात अवैध तोड होत असल्याचे त्यांनी कबूल केले आहे. चंद्रपूर, गडचिरोली, गोंदिया आणि खास करून गडचिरोली जिल्ह्यात सीमेवर मौल्यवान सागवानाची अवैध तोड होत आहे. या प्रकाराशी कोणकोण संबंधित आहे, असा माझा प्रश्न आहे. या अवैध सागवान वृक्ष तोडी मध्ये आपले अधिकारी कर्मचारी सामील आहेत काय, काही सागवान सायकल वर पकडण्यात आले आहे. आपण सायकल आणि गाडी जप्त केली आहे. त्यांच्या मालकांना, तस्करांना शासनाने पकडले आहे काय ? आपले अधिकारी, कर्मचारी, सुरक्षा रक्षक व त्यांच्या नातेवाईकांनी जिल्ह्याच्या आजूबाजूला घरे बांधली आहेत. यासाठी त्यांनी सागवान कुठून आणले आहे, कोणाकडून खरेदी केले आहे याची चौकशी शासन करणार आहे काय ?

यानंतर सरफरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती महोदय, माझा पहिला प्रश्न असा आहे की, आपल्या विभागाचे अधिकारी, कर्मचारी व गार्ड हे देखील या सागवानाच्या चोरीमध्ये सहभागी असून त्यांनी त्या ठिकाणी घरे बांधली आहेत. त्यांच्या संगनमताने सागवानाची वृक्ष तोड सुरु असून त्याची अवैधपणे वाहतूक केली जाते. अशाप्रकारे सागवान लाकूड चोरुन नेणाऱ्या स्मगलरांकडून पोलिसांनी सायकली जप्त केल्या आहेत. तेव्हा आपण या चोरांना केव्हा पकडणार आहात?

डॉ. पतंगराव कदम : सभापती महोदय, माननीय सदस्यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नातील विषय वेगळया स्वरुपाचा आहे. आंध्र प्रदेशच्या सीमेवर अवैधरित्या सागवानाची तोड होत आहे, त्यासाठी आपण कोणती उपाय योजना केली आहे असा प्रश्न आहे. त्या ठिकाणी वन विभागाच्या कर्मचाऱ्यांपैकी कुणी घरे बांधली आहेत हे तपासून पहावे लागेल. याकरिता माननीय सदस्यांच्या अध्यक्षतेखाली एक कमिटी नेमण्यात येईल.

श्री. जैनुद्दीन जव्हेरी : सभापती महोदय, सागवान लाकूड चोरुन घेऊन जाणाऱ्या चोरांची नावे काय आहेत? पोलिसांनी हजारो सायकली जप्त केल्या असतांना त्यांना चोर कां सापडत नाहीत?

(उत्तर देण्यात आले नाही)

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, हा प्रश्न अत्यंत गंभीर स्वरुपाचा आहे. मंत्री महोदयांनी या ठिकाणी जरी उत्तर दिले असले तरी त्या भागामध्ये प्रचंड प्रमाणात वृक्ष तोड होत आहे. वन विभागामध्ये एखाद-दुसरा माणूस स्वतंत्रपणे प्रवेश करीत असला तरी त्या ठिकाणी टोळीने स्मगलर येतात व तेथील वन विभागाच्या कर्मचाऱ्यांना मारहाण करुन त्यांना जखमी करतात. तो भाग आंध्र प्रदेशच्या सीमेला लागून असल्यामुळे आपल्या राज्यातील सागवानी लाकूड तोडून ते आंध्र प्रदेशमध्ये घेऊन जातात. त्या भागात आज 300 सॉ मिल आहेत. त्यामुळे या राज्यामधून तयार करण्यात आलेल्या सागवानी लाकडाच्या पाटया त्या राज्यामध्ये घेऊन जातात आणि त्यापासून फर्निचर तयार करुन ते बाजारात विकले जाते. याबाबतीत हायकोर्टामध्ये पी.एल.आय. दाखल करण्यात आली होती. त्या ठिकाणी केवळ अधिकाऱ्यांवर विश्वास न ठेवता त्या जिल्ह्यामध्ये प्रचंड प्रमाणात वृक्ष तोड झाल्यामुळे जंगलेच्या जंगले बोडकी व्हावयास लागली आहेत. या बाबत शासन फेर चौकशी करणार आहे काय?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. पतंगराव कदम : सभपती महोदय, फेरचौकशी करावयाची असेल तर ती जरुर करण्यात येईल. परंतु या बाबतीत शासनाने बरीचशी उपाय योजना केली आहे. या करिता आंध्र प्रदेश आणि आपल्या राज्याच्या मुख्य सचिवांची या संदर्भात एक बैठक घेण्यात आली होती.

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, हा प्रश्न अतिशय गंभीर स्वरुपाचा आहे. आपले वन अधिकारी आंध्र प्रदेशच्या त्या भागामध्ये जात नाहीत. मी त्या ठिकाणी गेले असता मला बघून तो अधिकारी पळून गेला, या भागात नक्षलवादी आहेत म्हणून मी जायला तयार नाही असे तो म्हणाला. त्या राज्यातील 18 गावे आणि या राज्यातील 20 गावे अशाप्रकारे 100 टक्के नक्षलवादी असलेला हा भाग आहे. त्यामुळे आपल्या राज्यातील आणि आंध्र प्रदेशमधील अधिकारी त्या भागात जाण्यास धजावत नाहीत. या अधिकाऱ्यांवर नक्षलवाद्यांचा मोठया प्रमाणात धाक असल्यामुळे आपले अधिकारी व कर्मचारी त्या भागात जाऊ इच्छित नाहीत. यामुळे त्या भागात स्मगलर्स आणि नक्षलवाद्यांचा मोठया प्रमाणात हैदोस सुरु आहे. मी तेथील अधिकाऱ्यांना विचारले असता आम्ही त्या भागात जाऊ इच्छित नाही, कृपया आम्हाला माफ करा, तुम्ही मरायला जा असे त्यांनी मला सांगितले. या करिता त्या ठिकाणी ते आम्हाला सांगतात की, माफ करा त्या ठिकाणी आम्हाला मरायला पाठवू नका. त्यामुळे शासनाने ही बाब गंभीरपणे घेऊन या प्रकरणी सी.बी.आय. मार्फत चौकशी करणार काय?

डॉ. पतंगराव कदम : सभापती महोदय, माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांनी या ठिकाणी सर्व वस्तुस्थिती कथन केली आहे. आंध्र प्रदेश राज्याची सीमा असल्यामुळे हे लोक लाकडे तोडून नदीमध्ये टाकून पळून जातात. त्या करिता आपण एक टास्क फोर्स नेमला असून दोन्ही जिल्ह्यांच्या जिल्हाधिकाऱ्यांवर जबाबदारी टाकलेली आहे. त्याचप्रमाणे तेथील स्थानिक लोकांना शासनाने हत्यारे दिली आहेत. त्यामुळे शासनाला जे शक्य होते ते सर्व शासनाने केले आहे. यापेक्षा माननीय सदस्यांची वेगळी सूचना असेल तर तिचाही विचार करण्यात येईल.

अशुद्धीत प्रत / शुद्धीसाठी नाही

राज्यातील अनुसूचित जातीच्या सहकारी औद्योगिक संस्थांना देण्यात आलेल्या ३७५ कोटी रुपयांचा करण्यात आलेला गैरव्यवहार

(६) * २५०७७ श्री.जयंत प्र. पाटील , श्री.कपिल पाटील , श्री.राजन तेली , श्री.अमरनाथ राजूरकर , श्री.सुभाष चव्हाण , प्रा.सुरेश नवले , श्री.एम.एम.शेख : तारांकित प्रश्न क्रमांक २३४२६ ला दिनांक १७ डिसेंबर, २०११ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात : सन्माननीय **सामाजिक न्याय व व्यसनमुक्ती कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अनुसूचित जातीच्या सहकारी औद्योगिक संस्थांना वर्षनिहाय गेल्या सात वर्षात ३७५ कोटी रुपयांचे वाटप कशाप्रकारे करण्यात आले होते,

(२) असल्यास, वाटप करण्यात आलेल्या ३७५ कोटी रुपयांचा गैरव्यवहार झाल्याचे मान्य करुन शासनाने आयुक्त समाज कल्याण विभाग, पुणे यांचेकडून माहे सप्टेंबर, २०११ मध्ये वा त्या दरम्यान मागविण्यात आलेला अहवाल आयुक्तांकडून अद्याप अप्राप्त असण्याची कारणे कोणती आहेत,

(३) असल्यास, शासनाने अहवाल सादर करण्याची मर्यादा दिली असल्यास आणि अहवाल वेळीच सादर झाला नसल्यास शासन आयुक्तांविरुध्द कोणती कारवाई करणार आहे,

(४) तसेच अहवाल सादर करण्याची कालमर्यादा शासनाने दिली नसेल तर या गंभीर प्रकरणी शासन किती दिवसात अहवाल प्राप्त करुन घेईल ?

श्री.शिवाजीराव मोघे : (१) अनुसूचित जातीच्या सहकारी संस्थांना अर्थसहाय्य या योजनेंतर्गत वर्षनिहाय मंजुरी दिलेल्या ३७२ संस्था पुढीलप्रमाणे आहेत :-

अ.क्र.	वर्ष	मंजूरी दिलेल्या संस्था
१	२००४-०५	९
२	२००५-०६	९
३	२००६-०७	२२ (+ ४ दुसरा हप्ता)
४	२००७-०८	३६ (+ २ दुसरा हप्ता)
५	२००८-०९	२४ दुसरा हप्ता
६	२००९-१०	२१२ (+ ११ दुसरा हप्ता)
७	२०१०-११	८४ (+ ४ दुसरा हप्ता)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(२), (३) व (४) "अनुसूचित जातीच्या सहकारी संस्थांना, अर्थसहाय्य" या योजनेंतर्गत सन २००९-१० या आर्थिक वर्षात मंजूरी दिलेल्या संस्थांनी त्यांना मंजूर केलेल्या रक्कमेचा गैरव्यवहार केला आहे अशा आशयाच्या तक्रारी शासनास प्राप्त झाल्या आहेत. सदर तक्रारीच्या अनुषंगाने आयुक्त, समाजकल्याण, पुणे यांना राज्यातील ३३ जिल्ह्यातील मंजुरी दिलेल्या सर्व ३७२ संस्थांची सखोल तपासणी करून अहवाल सादर करावयाच्या असल्याने विवक्षित कालमर्यादा आखून दिलेली नाही. तथापि, अहवाल लवकरात लवकर प्राप्त करून घेण्यासाठी वेळोवेळी पाठपुरावा करण्यात येत आहे.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, या ठिकाणी मंजूर करण्यात आलेल्या रकमेचा गैर व्यवहार झाला आहे या बाबत कुणी तक्रार केली? सन 2009 ते 2010 या कालावधीत 212 संस्थांमध्ये जवळ जवळ 375 कोटी रकमेचे वाटप झाले आहे. सभापती महोदय, दुसरी एक महत्वाची गोष्ट अशी की, नागपूरच्या हिवाळी अधिवेशनामध्ये ता.प्र.क्र. 23426 विचारण्यात आला होता. त्या प्रश्नाला सुध्दा "होय" असे उत्तर दिले होते. तसेच, आयुक्त समाज कल्याण, पुणे यांच्याकडून अहवाल अप्राप्त असल्यामुळे प्रश्न उद्भवत नाही असे म्हटले होते आणि आता सुध्दा शासनाने या प्रश्नाला तशाच प्रकारचे उत्तर दिले आहे. हा अहवाल प्राप्त होण्यास अजून किती कालावधी लागणार आहे. या ठिकाणी बोगस संस्था काढून 375 कोटी रुपयांची लयलूट करण्यात आली आहे. एकटया मुंबई शहरामध्ये त्यांनी शेकडो संस्था काढल्या आहेत. या ठिकाणी लोकांनी सह्या करुन 7 कोटींचे वाटप करण्यात आले आहे त्यामध्ये त्या कारखान्याचा पत्ता नाही, त्याचे रेकॉर्डसुध्दा नाही.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

अशुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

ता.प्र.क्र.25077 . . . .

श्री.जयंत प्र.पाटील . . . .

सभापती महोदय, अशोका मागासवर्गीय औद्योगिक संस्था, उस्मानाबाद यांचा प्रस्ताव मंजूर झाला असून पहिला हप्ता द्यावा असे सचिवांनी आदेशही दिलेले आहेत. पण अजूनही एकही पैसा दिलेला नाही. त्यामुळे या संस्थेला ताबडतोब पहिला हप्ता देण्याबाबत कारवाई होणार आहे काय की काही वजन ठेवल्याशिवाय संबंधितांना हप्ता मिळणार नाही असे तरी याठिकाणी शासनाने सांगावे.

श्री.शिवाजीराव मोघे : सभापती महोदय, याठिकाणी उत्तरामध्ये नमूद केल्याप्रमाणे एकंदर 372 संस्था आहेत आणि या संस्था जवळजवळ 2004-2005 पासूनच्या आहेत. ही गोष्ट खरी आहे की, या संस्थांनी पहिला हप्ता घेतल्यानंतर, दुसरा हप्ता घ्यावयास पाहिजे आणि त्यानुसार प्रोजेक्ट पूर्ण करावयास पाहिजे. परंतु प्रत्यक्षात प्रोजेक्ट फार कमी प्रमाणात पूर्ण झालेले आहेत आणि हे प्रोजेक्ट पूर्ण व्हावेत म्हणून याबाबत मुख्य सचिवांबरोबर बैठक झाली आणि त्यावेळी याबाबत आम्ही देखील सूचना दिलेल्या आहेत. त्यानुसार 52 आठवड्यांमध्ये संबंधितांनी प्रकल्प पूर्ण करावयास पाहिजे आणि तसे जर केले नाही तर त्यासंबंधातील कारणे शोधावयास पाहिजेत.परंतु जर संबधितांनी जाणुनबुजून निधी परत करण्याच्या बाबतीत टाळाटाळ केली असेल तर त्यांच्याकडून जबरदस्तीने रिकव्हरी करावी अशा प्रकारचे आदेश काढलेले आहेत. तसेच सन्माननीय सदस्यांनी एका वेगळया संस्थेबाबत सांगितले आहे.याबाबत सांगावयाचे तर आता आम्ही 272 संस्थांचे इन्स्टॉलमेंट देतो असे सांगितले तर आम्हाला जवळजवळ एकंदर 892 कोटी रुपये द्यावे लागतील. म्हणून आम्ही ठरवून अशोका मागासवर्गीय औद्योगिक संस्था, उस्मानाबाद यांना हप्ता दिलेला नाही आणि या पूर्ण वर्षामध्ये एकाही नवीन संस्थेला हप्ता दिलेला नाही. उलट दुसरे आणि तिसरे हप्ते फायनल करुन हे प्रोजेक्ट पूर्ण करण्याच्या दृष्टीकोनातून आमची तयारी आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी असे सांगितले की,नागपूर येथील अधिवेशनामध्ये हा प्रश्न उपस्थित केला होता.त्यावेळी "प्रश्न उद्भवत नाही" असेही उत्तर देण्यात आलेले आहे. परंतु आज जे उत्तर दिलेले आहे ते पाहता सरकार आणि प्रशासन नक्की काम करीत आहे की नाही याबाबतचा हा नितांत पुरावा आहे आणि त्याबाबत माननीय मंत्री महोदय काही सांगत नाहीत. याठिकाणी असे उत्तर देण्यात आलेले आहे की,"सदर तक्रारीच्या अनुषंगाने आयुक्त,समाजकल्याण, पुणे यांना राज्यातील 33 जिल्ह्यातील मंजुरी दिलेल्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सर्व 372 संस्थांची सखोल तपासणी करुन अहवाल सादर करावयाचा असल्याने विवक्षित कालमर्यादा आखून दिलेली नाही."म्हणजे काय? एकंदर 372 कोटी रुपयांचा प्रश्न निर्माण झाल्या नंतर यासाठी कालमर्यादा आखून का दिली नाही ? पुढे असे म्हटलेले आहे की,"तथापि, अहवाल लवकरात लवकर प्राप्त करुन घेण्यासाठी वेळोवेळी पाठपुरावा करण्यात येत आहे."याबाबतीत कोणी पाठपुरावा करावयाचा? माननीय मंत्री महोदयांनी अधिकाऱ्यांकडे पाठपुरावा करावयाचा काय? ही बाब अत्यंत गंभीर आहे. याबबातीत पूर्णपणे पाठपुरावा करुन याचा अहवाल एक महिन्यामध्ये किंवा दीड महिन्यामध्ये देणार आहात काय? हे मी आपल्याला अधिवेशन संपेपर्यंत विचारु शकत नाही. त्यामुळे यासंबंधातील अहवाल कधी देण्यात येईल याची आम्हाला कालमर्यादा सांगावी.

श्री.शिवाजीराव मोघे : सभापती महोदय, या संबंधातील काही अहवाल प्राप्त झालेले आहेत. बाकीचे अहवाल जुलै अखेरपर्यंत पूर्ण होतील.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी सांगितले की, संबंधितांना अर्थसहाय्याचा पहिला टप्पा देण्यात आला आहे आणि दुसरा टप्पा घेण्यासाठी संबंधित आलेले नाहीत. या संस्थांनी एकंदर किती प्रोजेक्ट प्रस्तावित केले होते आणि ते कोणकोणते होते ? तसेच यापैकी किती प्रोजेक्ट कोणत्या टप्प्यावर आहेत आणि किती प्रोजेक्ट पूर्ण झालेले आहेत ?

श्री.शिवाजीराव मोघे : सभापती महोदय, एकंदर 30 प्रकल्प पूर्ण झालेले असून आता तेथे प्रॉडक्शन होत आहेत आणि 40 प्रकल्प लवकरच सुरु होतील.कारण आता त्यांनी दुसरे इन्स्टॉलमेंटही घेतलेले आहे.एकंदर 45 संस्थांनी मागणी केलेली आहे.याबाबतीत सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारलेला आहे की, हे प्रोजेक्ट कोणकोणते आहेत? तर स्टील रि-रोलींग करणे, दाल मिल, बेकरी, ऑईल मिल, जिनिंग-प्रेसिंग, कापड प्रेसिंग युनिट, शेती मालाच्या संबंधातील प्रक्रिया इ.अशी खूप मोठी यादी आहे. यात सात कोटीच्या मर्यादेमध्ये जे प्रोजेक्ट आहेत म्हणजे काही एक कोटीचे, दोन कोटीचे असतात त्यासाठी जवळजवळ 32 कंडीशन आहेत. त्यामुळे जे 32 कंडीशन पूर्ण करतात त्यांनाच हा प्रकल्प मंजूर केला जातो. तसेच दुसरे इन्स्टॉलमेंट द्यावयाचे असेल तर कलेक्टर कमिटीची शिफारस असल्याशिवाय ते दिले जात नाही.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, मी माननीय मंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, माझा मूळ प्रश्न तसाच राहिला. 2009-2010 या एका वर्षामध्ये 212 संस्थांना पहिला हप्ता देण्यात

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आलेला आहे म्हणजे एक बेकरी तीन कोटी रुपयांची? हे सगळे मनोरंजक आहे. याठिकाणी प्रश्ना मध्ये जी माहिती दिलेली आहे, त्यानुसार 2004-2005 मध्ये 9 संस्थांना मंजुरी दिली आहे. 2005-2006 मध्ये 9 संस्थांना मंजुरी दिली आहे. 2006-2007 मध्ये 22 संस्थांना मंजुरी दिलेली आहे. 2007-2008 मध्ये 36 संस्थांना मंजुरी दिलेली आहे. 2008-2009 मध्ये 24 संस्थांना मंजुरी दिलेली आहे आणि 2009-2010 एकंदर 212 संस्थांना मंजुरी दिलेली आहे.

यानंतर श्री.अ.शिगम ....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री ता.प्र.क्र.25077...

श्री.जयंत प्र.पाटील...

माननीय मंत्री महोदयांनी आमच्या ज्ञानात भर टाकली आहे. त्यांनी आपल्या उत्तरात सांगितले की, एकूण 832 कोटी रुपये द्यावे लागणार आहेत. तरतूद नसताना इतक्या मोठ्या रकमेचे प्रोजेक्ट मंजूर कसे केले ? ज्या अधिकाऱ्यांनी हे प्रोजेक्ट मंजूर केले त्यांच्यावर कारवाई करणार काय ?

श्री.शिवाजीराव मोघे : सभापती महोदय, उत्तरामध्ये 372 संस्थाची माहिती दिलेली आहे. मी अगोदर सांगितल्या प्रमाणे जस जसा फंड उपलब्ध झाला त्याप्रमाणे वाटप केलेले आहे. जे 32 अटी पूर्ण करतात त्यांनाच वाटप करण्यात येते. प्रोजेक्टचे काम मोठ्या प्रमाणावर आहे. पहिला हप्ता दिल्यानंतर दुसरा हप्ता जिल्हाधिकारी समितीने शिफारस केल्यानंतर दिला जातो.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

गेवराई तालुक्यात (जि.बीड) पुरेशा प्रमाणात प्रगणकाची नियुक्ती करुन जातनिहाय सामाजिक सर्वेक्षणाचे काम करणेबाबत

(7) * 25927 ॲड.उषा दराडे , श्री.हेमंत टकले , श्री.विक्रम काळे , श्री.रमेश शेंडगे : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) गेवराई तालुक्यात (जि.बीड) पुरेशा प्रगणका अभावी 205 पैकी 58 गावातच जात निहाय सामाजिक सर्वेक्षणाचे काम सुरु असल्याचे माहे डिसेंबर, 2011 च्या तिसऱ्या सप्ताहात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, तालुक्यात पुरेशा प्रमाणात प्रगणकाची नियुक्ती करुन जातनिहाय सामाजिक सर्वेक्षणाचे काम करणेबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यांत येत आहे,

(3) अद्याप, कोणतीच उपाययोजना केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.जयंत पाटील : (1) प्रथमत: गेवराई तालुक्यातील 58 गावांतील 75 प्रगणक गटांत डिसेंबर-2011 मध्ये काम सुरु झाले होते.

(2) तालुक्यात 545 प्रगणक गट असून त्यासाठी 138 प्रगणकांची आवश्यकता आहे. त्याप्रमाणात प्रगणकांची नियुक्ती करण्यांत आलेली आहे.

(3) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, गेवराई तालुक्यामध्ये जात निहाय सर्वेक्षण सुरु झालेले आहे. त्यासाठी पुरेशा प्रमाणात प्रगणकांची नियुक्ती करण्यात आलेली आहे काय ? जात निहाय सर्वेक्षणाचे काम सद्या कोणत्या टप्प्यामध्ये आहे ?

श्री.जयंत पाटील : सभापती महोदय, जात निहाय सामाजिक सर्वेक्षणाचे काम करण्यासाठी पुरेशा प्रमाणात प्रगणकांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. पहिल्या टप्प्यातील काम जवळपास पूर्णत्वाला आलेले आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

वाळू उपशाच्या हराशीबाबत धोरणात्मक निर्णय घेण्यासंदर्भात

(8) * 25795 श्री.विनोद तावडे , श्री.संजय केळकर , श्री.रामनाथ मोते , श्री.चंद्रकांत पाटील : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) औरंगाबाद जिल्ह्यातील वैजापूर तालुक्यातील भालगावचा वाळू ठेका 40 लाखांना दिलेला असताना वाळू वाहतूकीमुळे खराब झालेल्या रस्त्याच्या दुरुस्तीसाठी तब्बल 2 कोटी रुपये खर्च करावे लागले, हे खरे आहे काय,

(2) तसेच पैठण तालुक्यातील वाळूपट्टयातून शासनाला 3 वर्षात 25 कोटी रुपयांचा महसूल मिळालेला असताना पैठण औरंगाबाद रस्त्याच्या दुरुस्तीसाठी 175 कोटी रुपयांची निविदा काढण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(3) असल्यास, प्रशासनाच्या संगनमताने 16 चाकी हैवासारख्या मोठया ट्रक मधून ही वाहतूक केल्याने रस्त्याची दुर्दशा झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(4) असल्यास, वाळू उपशातील भ्रष्टाचार कमी करण्यासाठी शासनाने कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे ?

श्री.प्रकाश सोळंके, श्री.बाळासाहेब थोरात यांच्याकरिता : (1) मौजे भालगांव ता.वैजापूर येथील रेतीस्थळाचा लिलाव रु.90,00,000/- इतक्या किंमतीस झाला आहे. मौजे डागपिंपळगाव ते भालगाव या 7 कि.मी. लांबीच्या रस्त्यास अंदाजे रु.3,50,000/- इतका खर्च अपेक्षित आहे.

(2) मागील 3 वर्षात पैठण तालुक्यातील वाळूपट्टयाच्या लिलावातून रु.13,19,65,000/- इतका महसूल प्राप्त असून, पैठण-औरंगाबाद रस्त्याच्या दुरुस्तीसाठी निविदा काढण्याचे काम सुरु आहे.

(3) हे खरे नाही.

(4) गौण खनिजाचे अवैध उत्खनन व वाहतूक रोखण्यासाठी जिल्हा तसेच तालुका स्तरावर महसूल, पोलीस तसेच परिवहन विभागाचे अधिकारी व कर्मचारी यांची भरारी पथके स्थापन करण्यात आली आहेत व दोषींविरुध्द कारवाई करण्याच्या सूचना वेळोवळी दिल्या आहेत.

सन 2011 ते फेब्रुवारी, 2012 अखेर औरंगाबाद जिल्ह्यात गौण खनिजाच्या अवैध उत्खनन व वाहतुकीच्या 574 प्रकरणात रु.56,45,057/- एवढा दंड वसूल करण्यात आला आहे.

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 25795....

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, ज्या रस्त्यावरुन वाळूची वाहतूक होते त्या रस्त्याच्या दुरुस्तीवरील खर्च पाहता आणि वाळूच्या वाहतुकीपोटी मिळणारे उत्पन्न याची तुलना केल्यास दुरुस्तीवरील खर्च जास्त असल्याचे दिसून येते आणि तसे पाहिले तर शासनावर ते एकप्रकारचे ओझे आहे. ज्या कोणाला वाळूचा ठेका देण्यात येईल त्यांनीच त्या रस्त्याची दुरुस्ती करावी आणि तशा प्रकारची अट टेंडरमध्ये नमूद करावी. सरकारने असे केले तर दुरुस्तीवरील अनावश्यक खर्चाचा जो बोजा वाढत आहे तो कमी होईल. तेव्हा माझा प्रश्न आहे की, ज्या ठेकेदारांना वाळूचा ठेका देण्यात येईल त्यांनीच त्या रस्त्याची दुरुस्ती करावी अशा प्रकारची अट सरकार घालणार काय ?

श्री.प्रकाश सोळंके : सभापती महोदय, सजेशन फॉर ॲक्शन.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, मी या ठिकाणी धोरणात्मक प्रश्न विचारला. माननीय मंत्री महोदयांना माझ्या प्रश्नाचे उत्तर टाळायचे असल्यामुळे "सजेशन फॉर ॲक्शन "असे सोपे उत्तर दिले आहे. आपण असे उत्तर का दिले ते मी समजू शकतो. कारण मंत्री महोदय त्या भागातील आहेत आणि मला त्यातील वास्तव माहीत आहे. सन्माननीय मंत्री महोदय श्री.छगन भुजबळ साहेब सांगत आहेत की, माझ्या विभागासाठी पैसे नाहीत. आम्ही मंत्रिमंडळापुढे जाऊन एक महिन्यात निर्णय घेऊ असे माननीय मंत्री महोदय उत्तर देतील अशी माझी अपेक्षा होती. परंतु त्यांच्याकडून तसे उत्तर मिळाले नाही.

श्री.प्रकाश सोळंके : सभापती महोदय, वाळू धोरणाच्या संदर्भात माननीय उच्च न्यायालय आणि माननीय सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल झालेल्या असून न्यायालयाकडून काही निर्देश देखील प्राप्त झालेले आहेत. या धोरणाचा फेरविचार शासन स्तरावर सुरु आहे. सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी ज्या काही सूचना केल्या आहेत त्याचा फेरविचार करताना जरुर विचार केला जाईल.

यानंतर श्री.बरवड..

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखीसाठी नाही

यवतमाळ जिल्ह्यात अवैधरित्या होत असलेल्या रेती उत्खननास आळा घालणेबाबत

(11) * 25633 **श्री.संदिप बाजोरिया , श्री.हेमंत टकले , श्री.अनिल भोसले , श्री.रमेश शेंडगे , श्री.विक्रम काळे , श्री.जयवंतराव जाधव , श्री.किरण पावसकर , श्री.दीपकराव साळुंखे , श्री.सतीश चव्हाण , ॲड.उषा दराडे** : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) यवतमाळ जिल्ह्यात अवैधरित्या होत असलेल्या रेती उत्खननास आळा घालणेबाबत शहराबाहेर जकात नाके उभारुनही रात्रीच्यावेळी रेतीची वाहतूक होत असल्याचे माहे ऑक्टोबर, 2011 च्या शेवटच्या सप्ताहात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(3) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर अवैधरित्या होत असलेल्या रेती उत्खननास जबाबदार असणाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(4) अद्याप, कोणतीच कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.प्रकाश सोळंके, श्री.बाळासाहेब थोरात यांच्याकरिता : (1) हे खरे नाही.

(2), (3) व (4) प्रश्न उद्भवत नाही.

श्री.संदिप बाजोरिया : सभापती महोदय, यवतमाळ जिल्ह्यात शहरामध्ये मोठ्या प्रमाणावर अनेक ठिकाणी रेतीच्या उपशासाठी चेक नाके उभे करण्यात आले आहेत. परंतु सदर चेक नाक्यामार्फत आतापर्यंत रेतीचा उपसा करणाऱ्यांविरुध्द कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही. शासनाने लेखी दिलेले उत्तर समाधानकारक नाही. रेती उपशाची सखोल चौकशी करुन संबंधितांविरुध्द कारवाई करण्यात येणार आहे काय, त्याचप्रमाणे या लोकांवर कारवाई करण्यास विलंब होण्याची कारणे काय आहेत ?

श्री.प्रकाश सोळंके : सभापती महोदय, यवतमाळ जिल्ह्यामध्ये अशा प्रकारे शहराच्या बाहेर जकात नाके उभे केलेले नाहीत. परंतु तालुका स्तरावर दक्षता पथके नेमलेली आहेत. या दक्षता पथकांनी एप्रिल, 2011 ते फेब्रुवारी, 2012 या कालावधीमध्ये गौण खनिजाच्या अवैध वाहतुकीच्या 472 प्रकरणांबाबत दंडात्मक कारवाई करुन 19 लाख 88 हजार 632 इतकी रक्कम वसूल केलेली आहे.

श्री.जयंत प्र.पाटील : वाळूसंबंधी सर्वांगीण विचार करुन शासन वाळूचे धोरण ठरविणार आहे काय, वाळूची जास्तीत जास्त किंमत किती घ्यावयाची याचे बंधन ठेकेदारांवर शासन घालणार आहे काय ? सध्या 8 ते 9 हजार रुपये ब्रास असा वाळूचा दर आहे. गोरगरिबांनी घर बांधू नये असे शासनाने ठरविले आहे काय, सध्याचे दर लक्षात घेता शासन वाळूच्या धोरणाचा फेरविचार करणार आहे काय ?

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.25633....

श्री.प्रकाश सोळंके : वाळूच्या धोरणाबाबत माननीय उच्च न्यायालय आणि सर्वोच्च न्यायालय यांनी शासनाला काही निर्देश दिलेले आहेत. त्या निर्देशाच्या अनुषंगाने वाळूच्या धोरणाचा शासन स्तरावर फेरविचार सुरु आहे. सन्माननीय सदस्यांनी केलेल्या सूचनेचा वाळूच्या धोरणाचा फेरविचार करताना निश्चित विचार केला जाईल.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी अतिशय महत्वाचा प्रश्न विचारला होता. कोकणामध्ये पूर्वी 500 रुपये एक ब्रास या दराने वाळू मिळत होती. 5 वर्षानंतर हा दर 8 ते 9 हजार पर्यंत पोहोचलेला आहे. वाळूच्या वाढलेल्या दरामुळे सर्वसाधारण माणूस आपले घर बांधू शकत नाही. वाळूचा ठेका घेणारे ठेकेदार 10 कोटी रुपये, 20 कोटी रुपये, 50 कोटी रुपये देऊन वाळूचा ठेका घेतात. हे ठेकेदार पैसेवाले आहेत. त्यांचे संबंध कोणापर्यंत असतात त्याबाबत मी बोलणार नाही. परंतु मोठ्या रकमेची बोली लावून ठेका घेतात आणि ते पैसे गरिबांच्या खिशातून वसूल करण्याचे प्रकार सुरु आहेत. कालपर्यंत गरिबांना कमी दरामध्ये वाळू उपलब्ध होत होती त्याबाबत शासन नेमका काय विचार करणार आहे, कोकणातील माणसांना दिलासा मिळण्यासाठी, वाळूचे दर कमी करण्यासाठी शासन या ठेकेदारांवर कोणते निर्बंध घालणार आहे ?

श्री.प्रकाश सोळंके : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांनी वस्तुस्थिती सांगितलेली आहे. पूर्वीपेक्षा आता वाळूचे दर वाढलेले आहेत. कारण वाळूची बोली मोठ्या रकमेची असते. त्यामुळे महाग दराने गोरगरिबांना वाळू घ्यावी लागते ही वस्तुस्थिती आहे. त्यामुळे शासन स्तरावर वाळूच्या धोरणाचा फेरविचार सुरु आहे. सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांनी केलेल्या सूचनेचा फेरविचारामध्ये निश्चित समावेश केला जाईल.

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय, वाळूचे लिलाव केले जातात. हे लिलाव ठेकेदार घेतात आणि लिलाव घेतलेल्या किंमतीपेक्षा दुप्पट किंमत वसूल करतात. कधी ना कधी वाळू संपण्याचा दिवस उजाडणार आहे. त्यामुळे शासन वाळूला दुसरा पर्याय शोधून काढणार आहे काय, त्याचप्रमाणे वाळूमध्ये दोन प्रकार असतात. खाडीतील वाळू खराब असते. ही वाळू

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

इमारतीसाठी वापरली असता इमारतीचे आयुष्यमान कमी होते. हा धोका आहे. त्यामुळे वाळूचे धोरण ठरवित असताना वाळूला दुसरा पर्याय शोधण्यात येणार आहे काय, वाळूचे धोरण किती दिवसामध्ये आणले जाणार आहे ?

श्री.प्रकाश सोळंके : सभापती महोदय, वाळूचे धोरण लवकरात लवकर निश्चित केले जाईल.

यानंतर श्री.शिगम....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संदिप बाजोरिया : मूळ प्रश्न यवतमाळ जिल्ह्याच्या संदर्भातील आहे. मागील वर्षी अवैधरित्या उत्खनन केलेली 10 हजार ब्रास वाळू जप्त करण्यात आली होती. ती वाळू लिलाव करण्यासाठी ठेवली होती. ज्या ठेकेदाराने हा अवैध वाळू उपसा केला त्याच्यावर कोणती कारवाई करण्यात आलेली आहे ? सदर वाळूचा लिलाव झालेला आहे काय, नसल्यास तो केव्हा करण्यात येईल ?

श्री. प्रकाश सोळंके : जी दंडात्मक कारवाई करण्यात आली त्याचा तपशील मी दिलेला आहे. वाळू जप्त करण्यात आल्याची माहिती माझ्याकडे उपलब्ध नाही. त्या बाबतीत सन्माननीय सदस्यांनी माहिती दिली तर चौकशी करुन योग्य ती कारवाई करण्यात येईल.

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

राज्यात वन सदृश क्षेत्राचे पुनर्विलोकन करून सुधारित आकडेवारी दर्शविणारे प्रतिज्ञापत्र

(१२) * २७६७३ श्री.विजय सावंत : सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात वन सदृश क्षेत्राचे पुनर्विलोकन करून सुधारित आकडेवारी दर्शविणारे प्रतिज्ञापत्र दिनांक २ जून, २००८ रोजी केंद्रीय सशक्तता समितीपुढे दाखल करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रतिज्ञापत्रात सिंधुदुर्ग जिल्ह्यातील वन सदृश क्षेत्राची आकडेवारी ४२२४२.३०२६ हेक्टर क्षेत्रावरून १८७५.६९८१ हेक्टर अशी सुधारित करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी केंद्रीय सशक्तता समितीकडून पुढील निर्देश प्राप्त झाले आहेत काय,

(४) असल्यास, या निर्देशांचे स्वरूप काय आहे,

(५) अद्याप, हे निर्देश प्राप्त झाले नसल्यास, राज्य शासन याबाबींचा कोणत्या प्रकारे पाठपुरावा करीत आहे ?

डॉ.पतंगराव कदम : (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) केंद्रीय सशक्तता समितीकडून अद्याप कोणतेही निर्देश प्राप्त नाहीत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) याप्रकरणी लवकरात लवकर निर्णय प्राप्त होण्यासाठी मा.सर्वोच्च न्यायालयात स्वतंत्र इंटरलॉक्युटरी ॲप्लीकेशन दिनांक १३/०५/२०११ रोजी दाखल करण्यात आले आहे. त्यावर निर्देश अप्राप्त आहेत. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर तसेच राज्य शासनाकडूनही केंद्रीय सशक्तता समितीस पत्राद्वारे विनंती करण्यात आली आहे.

श्री. विजय सावंत : या मूळ प्रश्नासंबंधी मी माननीय मंत्री महोदयांना नागपूरच्या हिवाळी अधिवेशनामध्ये पत्र दिले होते. त्या पत्रानुसार माननीय मंत्री महोदयांनी चौकशी करण्याचे निदेश दिलेले आहेत. त्यानुसार चौकशी अहवाल प्राप्त झालेला आहे काय ?

डॉ. पतंगराव कदम : सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये हा प्रश्न मोठ्या प्रमाणावर आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यातील वन सदृश क्षेत्राची आकडेवारी ४२२४२.३०२६ हेक्टर क्षेत्रावरुन १८७५.६९८१ हेक्टर अशी कमी करुन द्यावी असे सर्वोच्च न्यायालयाला कळविलेले आहे. या बाबतीत अंतिम निर्णय झालेला नाही. या बाबतीत तहसीलदारांचा अहवाल पाहून कार्यवाही केली जाईल.

..३..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विजय सावंत : जी.आर.प्रमाणे चौकशी करुन अहवाल सादर करण्यास सर्व तहसीलदारांना आदेश देण्यात आले होते. या संदर्भात मी नागपूर अधिवेशनामध्ये पत्र दिले होते. ते पत्र देऊन ५ महिन्याचा कालावधी लोटलेला आहे. हा अहवाल शासनाला केव्हा प्राप्त होणार आहे ?

डॉ. पतंगराव कदम : सन्माननीय सदस्यांनी उद्या मला माझ्या दालनात भेटावे. त्यांना सर्व निर्णय समजतील.

डॉ. नीलम गो-हे : उत्तरामध्ये जी आकडेवारी दिलेली आहे त्यानुसार सिंधुदुर्ग जिल्ह्यातील वन सदृश आकडेवारी ४२२४२.३०२६ हेक्टर क्षेत्रावरुन १८७५.६९८१ हेक्टरवर आलेली आहे. हा बदल किती वर्षाच्या कालावधीत घडून आलेला आहे ? याचे निकष काय आहेत ?

डॉ. पतंगराव कदम : दिनांक २०.८.१९९७ ला पहिला आकडा ठरलेला होता. त्यानंतर दिनांक २३.५.२००८ला १८७५.६९८१ हेक्टर अशी सुधारणा करण्याबाबत सर्वोच्च न्यायालयाला कळविलेले आहे.

श्री. परशुराम उपरकर : या वनसंज्ञेमुळे ग्रामस्थाना घर बांधण्यासाठी कोणतेही झाड तोडता येत नाही. वनसंज्ञा काढण्यासाठी या सभागृहामध्ये वारंवार प्रश्न उपस्थित करण्यात आलेले आहेत. ही वनसंज्ञा काढण्याच्या बाबतीत शासनाने सर्वोच्च न्यायालयात अपिल केलेले आहे. या बाबतीत लवकरात लवकर निर्णय होण्याच्या दृष्टीने शासन काय पाठपुरावा करीत आहे ?

डॉ. पतंगराव कदम : या विषयाचा शासनाकडून सातत्याने पाठपुरावा केला जात आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अमरावती जिल्ह्यातील अनुसूचित जाती-जमातीसाठी निंभोरा परिसरात बांधण्यात आलेल्या शासकीय वसतिगृहात विद्यार्थ्यांना कोणत्याच मूलभूत सुविधा मिळत नसल्याबाबत

(१३) * २६८१८ श्री.सुभाष चव्हाण , श्री.एम.एम.शेख , प्रा.सुरेश नवले , श्री.चरणसिंग सप्रा : सन्माननीय **सामाजिक न्याय व व्यसनमुक्ती कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्ह्यातील अनुसूचित जाती-जमाती समाजातील गरीब विद्यार्थ्यांच्या सुविधेसाठी कोट्यवधी रुपये खर्च करुन निंभोरा परिसरात बांधण्यात आलेल्या शासकीय वसतिगृहात विद्यार्थ्यांना कोणत्याच मूलभूत सुविधा मिळत नसल्यामुळे त्यांच्यात तीव्र असंतोष पसरला असल्याचे माहे जानेवारी, २०१२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार विद्यार्थ्यांना मूलभूत सुविधा पुरविण्याबाबत तसेच विद्यार्थ्यांना सुविधांपासून वंचित ठेवणाऱ्या दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप, कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.शिवाजीराव मोघे : १), २) व ३) अमरावती येथे विभागीय स्तरावरील २५० क्षमतेच्या ४ अशा एकूण १००० क्षमतेचे मुला-मुलींचे शासकीय वसतिगृहास शासन निर्णय दि.२४ मार्च, २००७ अन्वये इमारत बांधकामासाठी मंजुरी देण्यात आलेली आहे. त्यानुसार सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत इमारत बांधकामाचे काम करण्यात आले. चार इमारतींपैकी इमारत क्र.२, ३ व ४ चे काम पूर्ण झाल्याने अपूर्ण राहिलेल्या इमारत क्र.१ चा विचार न करता विद्यार्थ्यांची गैरसोय होऊ नये व त्यांना शैक्षणिक लाभ मिळविण्याच्या हेतूने सहायक आयुक्त, समाजकल्याण, अमरावती यांनी बांधकाम पूर्ण झालेल्या इमारतीचा ताबा घेऊन त्या ठिकाणी वसतिगृहातील प्रवेशित ३०० विद्यार्थ्यांसाठी वसतीगृह सुरु केले.

विद्यार्थ्यांच्या भोजन नाश्ता संदर्भात वसतिगृह भेटीच्या वेळी विद्यार्थ्यांनी दर्शविलेल्या त्रुटी संदर्भात भोजन ठेकेदार यांचा ठेका रद्द करुन नव्याने दुसऱ्या पुरवठा धारकास ठेका देण्यात आलेला आहे. यानंतर विद्यार्थ्यांनी तक्रार केलेली नाही. तसेच वसतिगृह व वसतिगृह परिसरात स्वच्छतेबाबत दक्षता घेण्यात येत आहे. वसतिगृहातील बांधकाम पूर्ण न झाल्याने सौर यंत्रणा अद्यापि कार्यान्वित करण्यांत आलेली नाही. वसतिगृहातील एकूणच त्रुटीबाबत तेथील गृहपाल यांना समज देण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

श्री. सुभाष चव्हाण : राज्यात जेवढी वसतिगृहे आहेत त्या सर्व वसतिगृहातील सुविधाबाबत तक्रारी आहेत. ठेकेदार नेमला जातो त्याला ताबडतोब बदलण्यात येते.

...नंतर श्री. भोगले...

अशुद्धीत प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.26818..... श्री.सुभाष चव्हाण..

आताही उत्तरात म्हटले आहे की, वाईट दर्जाचे अन्न तेथे शिजवले गेले. ज्यासाठी ठेकेदार नेमला होता त्याची पूर्तता त्याने केली नाही याबद्दल त्याच्याविरुध्द कारवाई केली नाही. गृहपाल यांना समज देण्यात आली. संबंधित अधिकाऱ्यांविरुध्द कारवाई करुन त्यांना सस्पेंड केले जाईल काय?

श्री.शिवाजीराव मोघे : सभापती महोदय, या वसतिगृहाच्या तीन विंग आहेत. तेथे पाणी पुरवठा योजना नव्हती. ठेकेदाराने निकृष्ट दर्जाचे अन्न देणे आणि ते वेळेवर न देणे यामुळे ठेका बदलण्यात आला आहे. राज्यामध्ये मागासवर्गीय विद्यार्थ्यांना चांगल्या सवलती द्याव्यात म्हणून विभागीय स्तरावर दरमहा 800 रुपये, जिल्हा स्तरावर दरमहा 600 रुपये व तालुका स्तरावर दरमहा 400 रुपये प्रती विद्यार्थी अनुदान दिले जाते व मुलींना स्वच्छतेसाठी 100 रुपये जादा अनुदान दिले जाते. अशा प्रकारची व्यवस्था आपण केलेली आहे.

उप सभापती : प्रश्नोत्तराचा तास संपला आहे.

..2.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : लेखी उत्तरे

मु.शी.: तारांकित प्रश्नोत्तराची अकरावी, बारावी, तेरावी, चौदावी, पंधरावी, सोळावी, सतरावी, अठरावी, एकोणीसावी व विसावी यादी सभागृहासमोर ठेवणे

सह सचिव : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने अतारांकित प्रश्नोत्तराची अकरावी, बारावी, तेरावी, चौदावी, पंधरावी, सोळावी, सतरावी, अठरावी, एकोणीसावी व विसावी यादी सभागृहासमोर ठेवतो.

उप सभापती : अतारांकित प्रश्नोत्तराच्या याद्या सभागृहासमोर ठेवण्यात आल्या आहेत.

(प्रेस : येथे सोबत जोडलेल्या याद्या छापाव्यात.)

--

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: औचित्याचा मुद्दा

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, काल या सभागृहाचे सन्माननीय सदस्य व विधानसभेचे माजी विरोधी पक्षनेते श्री.रामदास कदम यांनी औचित्याच्या मुद्याद्वारे कॅगचा अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवण्याची मागणी केली होती. त्यांची ही मागणी संयुक्तिक होती. कारण शासनाने हा अहवाल दिनांक 16 एप्रिल, 2012 रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्याचे जाहीर केले आहे. म्हणजे अधिवेशनाच्या शेवटच्या आठवड्यात अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवून त्यावर चर्चा होऊ नये अशा प्रकारची शासनाची भूमिका असल्याचे दिसून येते. माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांचे वक्तव्य संपल्यानंतर माननीय उद्योगमंत्री श्री.नारायण राणे यांनी विधानसभेचे विरोधी पक्षनेते श्री.एकनाथराव गणपतराव खडसे (पाटील) व विधानसभा सदस्य श्री.देवेंद्र फडणवीस यांच्या नावाचा व माझ्याही नावाचा उल्लेख करुन आम्ही कमी दरात शासकीय भूखंड लाटल्याचे वक्तव्य केले.

सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांनी विधानसभा सदस्य श्री.कृपाशंकर सिंह यांच्याबद्दलचा मुद्दा सभागृहात उपस्थित करण्यासाठी नियम 35 अन्वये नोटीस दिली होती. नियम 35 अन्वये नोटीस दिल्यानंतर त्यांनी सभागृहात मुद्दा उपस्थित करण्याची परवानगी मागितली होती. त्यावेळी सचिवांकडून आपल्याला असे सांगण्यात आले की, अशा पध्दतीची नोटीस देता येत नाही आणि त्याबद्दल बोलण्याची परवानगी मिळू शकत नाही. कारण श्री.कृपाशंकर सिंह हे विधानसभेचे सदस्य आहेत. त्या प्रकरणी जो न्याय दिला गेला तोच न्याय काल सन्माननीय उद्योगमंत्री श्री.नारायण राणे यांनी या ठिकाणी वक्तव्य करताना का लावला गेला नाही? त्यांना असे वक्तव्य करण्यापासून रोखण्यात आले नाही. नियम 35 अन्वये नोटीस देऊन त्यांनी विधानसभेचे विरोधी पक्षनेते श्री.एकनाथराव गणपतराव खडसे (पाटील) व विधानसभा सदस्य श्री.देवेंद्र फडणवीस यांचे व माझे नाव घेणे अपेक्षित होते. नियम 35 अन्वये नोटीस न देता त्यांनी आमच्याविरुध्द आरोप केले. ते आरोप निराधार आहेत. त्यांचे वक्तव्य कामकाजातून काढण्यात आले नाही. माझ्या नावाचा उल्लेख माननीय उद्योगमंत्र्यांनी केला असल्यामुळे मी खुलासा करु इच्छितो.

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर....

सभापती महोदय, ज्या प्राथमिक शाळेला मैदानासाठी जमीन दिली गेली त्या शैक्षणिक संस्थेचा मी कोणताही सदस्य नाही, माझा त्या संस्थेशी काही संबंध नाही. त्या शाळेला मैदानासाठी भूखंड मिळावा म्हणून मी शिफारस केली आहे. उजाळ गावामध्ये पडीक जमीन आहे. तेथील ले-आऊटमध्ये क्रीडा संकुलासाठी जागा राखीव ठेवण्यात आली होती. त्या जागेला लागूनच ही प्राथमिक शाळा आहे. त्या शाळेतील विद्यार्थ्यांना खेळण्यासाठी मैदानाची आवश्यकता होती. त्यामुळे त्या शाळेला जागा द्यावी अशा प्रकारची माझी शिफारस होती. रेडी रेकनरच्या दराप्रमाणे किंमत भरुन ती जागा देण्यात आली आहे.

उप सभापती : माननीय सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर यांना मी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी दिली. काल सभागृहात या ठिकाणी जी चर्चा झाली.....

नंतर श्री.खर्चे...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उप सभापती .....

त्यावेळेस हा आक्षेपार्ह भाग वगळण्याच्या सूचना मी दिल्या होत्या व तो तसा वगळलेला आहे. आपण म्हणता ती कदाचित वर्तमान पत्रांची चूक असू शकते. पण मी या दोघांच्याही संभाषणामध्ये जो आक्षेपार्ह भाग आहे तो कामकाजातून काढून टाकावा अशा स्पष्टपणे सूचना दिल्या होत्या.

श्री. विनोद तावडे : महोदय, काल आम्ही हीच बाब पत्रकारांना सांगितली होती की, हा मजकूर काढण्याच्या सूचना माननीय सभापतींनी दिलेल्या आहेत तेव्हा ते म्हणाले की, फक्त सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम व मंत्री महोदय श्री. नारायण राणे या दोघांची "तू-तू, मै-मै" एवढाच भाग वगळण्याच्या सूचना दिल्या होत्या.

उप सभापती : सभागृहात जे पीठासीन अधिकारी आसनावर असतात त्यांनी दिलेले निर्देश लागू असतात. मी काल सुस्पष्टपणे सांगितले होते की, या सभागृहात सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम व मंत्री महोदय श्री. नारायण राणे या दोघांच्या चर्चेत जो आक्षेपार्ह भाग आहे तो वगळण्यात यावा. तसेच या सूचना दिल्या तेव्हा माननीय विरोधी पक्षनेते श्री. विनोद तावडे व ज्येष्ठ सदस्य माननीय श्री. दिवाकर रावते हे सदस्य देखील सभागृहात उपस्थित होते.

श्री. दिवाकर रावते : महोदय, ज्यावेळेस सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम यांनी नियम 35 ची नोटीस देऊन मुंबई काँग्रेसचे अध्यक्ष व खालच्या सभागृहाचे सदस्य श्री. कृपाशंकर सिंह यांचा विषय उपस्थित केला होता त्यासंदर्भात आपण पाच-सहा पानांचे जज्मेंट दिले होते, अशा प्रकारचे जज्मेंट देणे योग्य आहे यात शंका नाही. तेव्हा सचिवांनी जी भूमिका घेतली होती तीच भूमिका काल सभागृहात माननीय मंत्री श्री. नारायण राणे हे बोलत असताना सभागृहात कागद फडकावित होते तेव्हा का घेतलीत नाही ? तेव्हा आम्ही ओरडून सांगत होतो की, मंत्री महोदयांचा संबंध नसतांना ते आकांड-तांडव करुन बोलत आहेत, जणू काही आम्ही भ्रष्टाचार केला आहे. पण भ्रष्टाचार खरोखरच कसा व कोठे आहे हे सर्व दुनियेला माहीत आहे. यासंदर्भात मी सारखे आपल्याशी झुंजत होतो आणि सांगत होतो की त्यांना खाली बसवावे, तरी देखील आपण ऐकले नाही आणि तेव्हा सचिवांनी उठून आपल्याला सल्ला दिला नाही. अशा प्रकारे एकाला एक न्याय आणि दुसऱ्याला वेगळा न्याय देऊन पीठासीन अधिकाऱ्यांची दिशाभूल करण्याचा प्रयत्न होत असेल तर तो योग्य नाही. याबाबतचा निर्णय आपल्याला घ्यावा लागेल. आता जसे सचिवांनी आपल्याला

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ....

तत्परतेने सांगितले तीच त्यांची भूमिका आहे पण काल हीच तत्परता त्यांनी का दाखविली नाही, की विधान मंडळावर मंत्री महोदय श्री. नारायण राणे यांचा दबाव आहे काय ?

उप सभापती : ही चर्चा सभागृहात पुन्हा करणे योग्य नाही अशी माझी विनंती आहे.

श्री. विनोद तावडे : महोदय, आपण सांगितले की, कालची संपूर्ण चर्चा कामकाजातून काढून टाकली पण काल जो प्रकार मंत्री महोदय श्री. नारायण राणे यांनी केला तो त्यांच्यासाठी काही नवीन नाही. गेल्या अधिवेशनात देखील त्यांनी माननीय श्री. उध्दवजी ठाकरे यांच्यावर गदारोळात आरोप केले होते, ते आम्हाला ऐकायला येत नव्हते पण मंत्री महोदयांनी मात्र खाली सांगितले की, मी रेकॉर्डवर बोललो, तसेच त्यासंबंधीची कागदपत्रे संसदीय कार्य विभागाकडे वाटली आणि खाली जाऊनही सांगितले होते, असा प्रकार घडला होता. मुख्यमंत्र्यांच्या रेसमध्ये असलेले डॉ. पतंगराव कदम सभागृहात बसलेले आहेत. तसेच आज मंत्री महोदयांचा वाढ दिवस असल्याने आम्हाला बोलण्यासाठी मर्यादा आहेत. पण माननीय संसदीय कामकाज मंत्र्यांनी ही बाब लक्षात घ्यावी की, एवढे ज्येष्ठ मंत्री असताना केवळ सभागृहातील संरक्षणाचा फायदा घेऊन समोरच्यांना ऐकायला येत नाही हे पाहून ते आरोप करीत असतात हे योग्य नाही. आमचे तर असे म्हणणे आहे की, त्यांच्यात हिंमत असेल तर त्यांनी यासंदर्भात पत्रकार परिषद घ्यावी आणि असे आरोप करावेत. तसे काल खालच्या सभागृहाचे सन्माननीय सदस्य श्री. देवेंद्र फडणवीस यांनी त्यांना आव्हान दिलेलेच आहे, त्याला उत्तर त्यांनी दिले पाहिजे. कारण शिक्षण संस्थांना भूखंड देण्याबाबतचा जो विषय आहे त्याला कॅगने ऑब्जेक्शन घेतलेच नव्हते, मग त्या भूखंडाचा विषय कसा आला, त्याचे ऑडिट कसे झाले पण अशा प्रकारचा हातखंडा अवलंबिला जातो. म्हणून ही बाब माननीय संसदीय कामकाज मंत्र्यांनी लक्षात घ्यावी व त्यांना समज द्यावी तसेच त्याबाबतची माहिती सभागृहात सांगितली पाहिजे, अशी आमची मागणी आहे.

अशुद्धीत प्रत / शोधनासाठी नाही

यानंतर श्री. जुन्नरे ....

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, काल माझ्यावर जो आरोप करण्यात आला होता त्यासंदर्भात मला खुलासा करावा लागणार आहे. माननीय मंत्रीमहोदयांनी 35 ची नोटीस न देता माझ्या नावाचा उल्लेख केला होता. त्यामध्ये त्यांनी विधानसभा विरोधी पक्ष नेते माननीय खडसे, माननीय सदस्य देवेंद्र फडणवीस तसेच माझ्या नावाचा उल्लेख 35 ची नोटीस न देता केलेला आहे. खालच्या सभागृहाच्या सदस्याचा या सभागृहाशी काही संबंध नसतांना त्यांच्या नावाचा उल्लेख या सभागृहात करण्यात आलेला आहे. आमच्यावर आरोप होत असतांना संबंधित मंत्र्यांना रोखण्यात आले नाही. सन्माननीय सदस्य श्री. भाई जगताप यांचा विषय उपस्थित झाला त्यावेळेस मात्र संबंधितांना रोखण्यात आले. ही चर्चा संपत असतांना मी सभागृहात आलो होतो व त्यामुळे मला या विषयावर विचार मांडता आले नाही. नाहीतर मी कालच यासंदर्भात खुलासा केला असता.

उजाळ गावातील प्रायमरी शाळेच्या क्रीडांगणासाठी 5-7 हजार चौरस फुट जागा राखीव असून त्यासंदर्भात संस्थेने अर्ज केल्यामुळे मी त्यांच्या अर्जाला शिफारस केली होती. मी या संस्थेचा सदस्य, अध्यक्ष, उपाध्यक्ष तसेच सेक्रेटरी सुध्दा नाही असे असतांना शाळेच्या संदर्भात माझ्या नावाचा उल्लेख करण्यात आलेला आहे. मी केवळ शाळेच्या क्रीडांगणासाठी शिफारस केली होती. अशी परिस्थिती असतांना मी भूखंड लाटले असा आरोप करणे चुकीचा आहे. या संस्थेने क्रीडांगणाच्या जागेच्या संदर्भात रेडीरेकनर प्रमाणे सर्व पैसे भरले असून त्यांनी त्या ठिकाणी फाईव्ह स्टार हॉटेल बांधले नाही. अजूनही या क्रीडांगणावर विद्यार्थी खेळतात. हा भाग काही शहरी भाग नाही. असे असतांना दोन दोन लाख रुपये हॉटेलचे भाडे घेऊन तुम्ही ब्रिच ऑफ कॉन्टॅक्ट केलेले असल्यामुळे तुमच्यावर कॅगने ताशरे ओढले आहेत. या कॅगच्या ताशेऱ्यामध्ये आमच्या संस्थांचा उल्लेख किंवा आम्ही रिकमेंड केलेल्या संस्थांचा उल्लेख कॅगच्या अहवालात आला नाही तर तुमच्याच संस्थांचा उल्लेख कॅगच्या अहवालामध्ये आलेला आहे. असे असतांना आम्हाला निष्कारण बदनाम केले जात आहे. नियम 35 ची नोटीस दिल्याशिवाय कोणावरही आरोप केले जाऊ नये व असे प्रकार पुढील काळात घडता कामा नये. कालचा विषय रेकॉर्डवरुन काढला जाईल असे निर्देश आपण दिलेले असतांना सुध्दा सर्व वर्तमानपत्रात यासंदर्भात माहिती छापून आलेली आहे. सत्ताधारी पक्षाकडून अशा प्रकारचा मेसेज देण्याचा जो प्रयत्न चालला आहे तो योग्य

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर...

नाही. कोंबडे झाकून दिवस उगवावयाचा राहणार नाही. सभागृहात दोन तीन सदस्यांची नावे घेऊन आपले पाप झाकण्याचा प्रयत्न करणे हे काही बरोबर नाही हे सांगण्यासाठीच माझे या संदर्भातील विचार मी व्यक्त केलेले आहेत.

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, या विषयाच्या संदर्भात या सभागृहात जी चर्चा झाली होती ती कामकाजातून काढून टाकण्याच्या संदर्भात आपण निर्देश दिले होते. आता जे मुद्दे उपस्थित झालेले आहेत त्यासंदर्भात आपण कालच निर्देश दिलेले आहेत. हा विषय आता रेकॉर्डवर राहिलेला नाही. कॅगचा अहवाल सभागृहाला सादर झालेला नसतांना सुध्दा कॅगच्या अहवालाच्या संदर्भात या सभागृहात काही वक्तव्ये केली गेली आहेत व त्यासंदर्भात आपण निर्देशही दिलेले असल्यामुळे आता सभागृहाचा अधिक वेळ न घेता पुढील कामकाज पुकारण्यात यावे अशी माझी आपल्याला विनंती आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. माननीय संसदीय कामकाज मंत्र्यांच्या कामाचे कसब आम्हाला पहावयाचे आहे. कॅगच्या अहवालावर आम्हाला चर्चा करावयाची असल्यामुळे कॅगचा अहवाल सभागृहात कधी सादर केला जाणार आहे अशी माननीय सदस्य श्री. रामदास कदम यांनी काल विचारणा केली होती. त्यावेळी संबंधित सन्माननीय मंत्री उभे राहिले ....

उप सभापती : आता आपण जे काही सांगत आहात त्यापेक्षा वस्तुस्थिती वेगळी आहे. काल सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम यांनी बोलावयास सुरुवात केली ती मुळात हे भ्रष्ट मंत्री, हे भ्रष्ट मंत्री अशी केली होती. त्यामुळे शासनाचे जे काही मंत्री आहेत ते यावर बोलणारच. आपण जेव्हा भ्रष्ट मंत्री, भ्रष्ट मंत्री असा उल्लेख केला त्याच वेळेस मी आपले वक्तव्य कामकाजातून काढून टाकणार होतो परंतु सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम यांचे भाषण पुढे सुरु राहिले व त्यानंतर ख-या अर्थाने वादाला तोंड फुटले. दोन्ही बाजूने वादाला तोंड फुटल्यानंतर येथे कोणीच कोणाचे ऐकून घेण्यास तयार नव्हते. अशा परिस्थितीत मी उठून उभा राहिलो व सांगितले की, "सभागृहाच्या कामाकाजातील हा आक्षेपार्ह भाग काढून टाकण्यात यावा". आता सभागृहाचा अधिकचा वेळ न घालवता आपण पुढील कामकाजास सुरुवात करु नाही तर हा विषय कधीच संपणार नाही. आता नियम 97 अन्वयेच्या चर्चेला सुरुवात करण्यात येत आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, लोकशाहीमध्ये आमच्यावर अन्याय होत आहे.

उप सभापती : मी नियम 97 अन्वयेची चर्चा पुकारलेली आहे.

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, माझ्यावर अन्याय झालेला आहे.

उप सभापती : मी पुढील विषय पुकारलेला आहे.

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, वर्तमानपत्र हा लोकशाहीचा चौथा स्तंभ आहे.

यानंतर श्री. भारवि...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मला संसदीय कार्य मंत्र्यांकडून उत्तर पाहिजे आहे. तो प्रश्न संपला होता. पण माननीय मंत्री श्री.नारायण राणे मध्ये उभे राहिले आणि त्यांनी कागद फडकवायला सुरूवात केली. त्यावेळी त्यांनी सन्माननीय सदस्य श्री.देवेंद्र फडणवीस यांचे नाव घेतले. सन्माननीय सदस्य श्री.देवेंद्र फडणवीस हे विधान सभेचे सदस्य आहेत. त्यामुळे मंत्री महोदयांनी खाली जाऊन सगळे सांगायला हवे होते. तो कागद खाली फडकवायला पाहिजे होता. त्यांचा आमच्या सभागृहाशी काय संबंध आहे.? तसेच त्यांच्या खात्याशी याच्याशी काहीही संबंध नव्हता. काल त्यांचे नाव पण कोणी घेतले नव्हते. त्यामुळे हे तुमच्या कामकाज पद्धतीमध्ये बसते काय ? ज्यांचा या सभागृहाशी संबंध नाही त्यांच्या नावाने या सभागृहात उभे राहून बोलायचे मारायची हे कुठल्या कार्यपद्धतीमध्ये बसते ? हे आम्हाला जाणून घ्यायचे आहे.

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, या विषयावर आपण स्पष्ट रूलिंग दिले आहे. मला असे वाटते की, हा विषय वारंवार काढून सभागृहाचा वेळ घेऊ नये. हे सर्व कामकाजातून काढले आहे, अशा प्रकारचे आपण निदेश दिले आहेत. सिक्वेन्स कोणत्या माध्यमातून घडला याचाही उल्लेख आपण आपल्या वक्तव्यात केला आहे. त्यामुळे मला असे वाटते की, आपण पुढची चर्चा घ्यायला कोणतीही हरकत नाही.

.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: राज्यात निर्माण झालेली दुष्काळी परिस्थिती

मु.शी.: राज्यात निर्माण झालेली दुष्काळी परिस्थिती या विषयावर सर्वश्री विनोद तावडे,दिवाकर रावते,पांडुरंग फुंडकर, रामदास कदम,जयंत प्र.पाटील,संजय केळकर,डॉ.दीपक सावंत, सर्वश्री प्रीतमकुमार शेगावकर,चंद्रकांत पाटील,डॉ.नीलम गोऱ्हे, श्रीमती शोभा फडणवीस,सर्वश्री परशुराम उपरकर,केशवराव मानकर,रामनाथ मोते, सय्यद पाशा पटेल,डॉ.रणजित पाटील, वि.स.स.यांनी उपस्थित केलेली अल्पकालीन चर्चा.

उप सभापती : या अल्पकालीन चर्चेसबंधी औपचारिक प्रस्ताव मांडता येणार नाही. सूचना देणारे सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.विनोद तावडे आपली सूचना वाचतील आणि भाषण करतील.

श्री.विनोद तावडे (विरोधी पक्ष नेता) : सभापती महोदय, मी नियम 97 अन्वये आपल्या अनुमतीने पुढील विषयावर अल्पकालीन चर्चा उपस्थित करतो :-

"विदर्भ, मराठवाडा, खान्देश, कोकण व पश्चिम महाराष्ट्रात, बहुतांशी भागांमध्ये परतीचा पाऊस न पडल्याने नोव्हेंबर, 2011 मध्येच निर्माण झालेली पाणीटंचाई व दुष्काळजन्य परिस्थिती निर्माण होणे, शासनामार्फत अशा परिस्थितीत योग्य ते नियोजन व उपाययोजना करण्याची आवश्यकता असताना त्याकडे झालेले दुर्लक्ष, दीर्घकालीन उपाययोजना न करता टँकरसारख्या तात्पुरती मदत मिळणाऱ्या बाबीवर विसंबून राहिल्याने संपूर्ण महाराष्ट्रातील जनतेला पाण्यासाठी मैलोन मैल भटकावे लागणे, तसेच, अर्थसंकल्पात देखील पाणीटंचाईबाबत कोणतीही घोषणा न करणे, संपूर्ण राज्यातील पाणीटंचाईवर मात करण्यासाठी त्वरित उपाययोजना करण्याची व संपूर्ण राज्यात दुष्काळ घोषित करण्याची कोट्यावधी जनतेकडून होत असलेली मागणी याबाबत तातडीने करावयाची उपाययोजना"

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती महोदय, काल विरोधी पक्षाच्या वतीने नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावाची सूचना दिली होती. या सूचनेद्वारे महाराष्ट्रात निर्माण झालेल्या दुष्काळी परिस्थितीवर चर्चा केली पाहिजे अशी आम्ही मागणी केली होती. ज्यावेळी सदर सूचना दिली त्यावेळी सन्माननीय सदस्य श्री.विनायक मेटे यांनी आक्षेप घेतला होता. एका वरिष्ठ सन्माननीय सदस्यांनी, ज्यांना मंत्री केले नाही त्यांनी आक्षेप घेतला होता. जे मंत्री होण्याच्या रांगेत आहेत अशांनी आक्षेप घेतला होता की, आम्ही सत्ताधारी पक्षाने या विषयावर चर्चा घडवून आणली होती. मग आताच विरोधी पक्षाला जाग का आली ? त्या वरिष्ठ सन्माननीय सदस्याना श्री.अजितदादा पवार आपल्याला कधी तरी मंत्री करतील असे वाटते. पण ते कधीच मंत्री होत नाहीत. त्यांना मला सांगावयाचे आहे की, तुम्ही झोपला नसता तर आम्हाला जाग आणण्याची गरज पडली नसती. ज्यावेळी हा प्रस्ताव आला होता त्यावेळी चर्चा झाली होती. त्यास माननीय मुख्यमंत्र्यांनी उत्तर दिले होते. त्यावर श्री.पतंगराव कदम साहेबांनी अजून जोरात सांगितले. ते तेथे प्रत्यक्षात जाऊन आले. काल आम्ही चॅनेलवर पाहिले की, जेथे माननीय मंत्र्यांनी रोजगार हमी योजनेच्या कामाची पाहणी केली तेथे काहीच काम सुरू नाही. आम्ही स्टार माझा, आयबीएन लोकमत चॅनेलवर पाहिले. मंत्री जेथे गेले तेथे काम सुरु होते. पण त्यांची पाठ फिरल्यानंतर संगळे काम बंद झाले. तेथील शुटींग पाहिले आहे. असे प्रत्यक्ष पहायला मिळाल्यामुळे आम्ही सदर चर्चा उपस्थित केली आहे. त्यामुळे मंत्री होण्याच्या रांगेत उभे असणाऱ्या सन्माननीय सदस्यांनी अशा प्रकारे आक्षेप घेण्याचे कुठलेही कारण नाही.

माननीय मुख्यमंत्र्यांनी सातारा जिल्ह्यात 29, सांगली जिल्ह्यात 17, कोल्हापूर जिल्ह्यात 4 असे एकूण 50 चारा डेपो सुरू झाल्याचे उत्तरात सांगितले. काल श्री.पतंगराव कदम यांनी सांगितले की, अजून चारा डेपो सुरू झालेले नाहीत. छावण्या सुरू झालेल्या नाहीत. माननीय मुख्यमंत्री काय बोलले याचे प्रोसिडींग माझ्याकडे आहे. त्यांनी सांगितले आहे की, दुष्काळ असल्यामुळे आम्ही ताबडतोब 50 चारा डेपो सुरू केले आहेत. हे उत्तर माननीय मुख्यमंत्र्यांनी विधान सभेत दिले आहे. काल आम्ही भावी मुख्यमंत्र्यांचे आयबीएन वर उत्तर ऐकले. ते म्हणाले की, असे काहीच झालेले नाही. .

यानंतर सरफरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे ....

माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी जनावरांच्या छावण्यांचे फोटो दाखविले. शासनाने जनावरांच्या छावण्यांचा जी.आर 3 जानेवारी रोजी काढला. मघाशी आम्ही प्रश्न विचारला असता ते चित्र चारा डेपोचे आहे छावण्याचे नाही असे सांगण्यात आले. परंतु मला आपल्याला सांगितले पाहिजे की, जनावरांच्या छावण्यांकरिता 3 जानेवारीला शासनाने जी.आर. काढला आहे हे आपल्याला माहीत आहे. मघाशी उत्तर देतांना चारा डेपोचा निर्णय आहे छावणीचा निर्णय नाही असे सांगितले आहे. तुम्ही 3 जानेवारीला छावण्या सुरु करण्याचा निर्णय घेतला असतांना आपण अद्यापि त्या सुरु कां केल्या नाहीत? त्यामुळे आम्हाला या सभागृहामध्ये चर्चा उपस्थित करावी लागली आहे. माननीय मुख्यमंत्री व माननीय ज्येष्ठ मंत्री डॉ. पतंगराव कदम हे प्रामाणिकपणे काम करण्याचा प्रयत्न करीत असतात आणि त्यांना माननीय मंत्री श्री. आर.आर. पाटील व माननीय मंत्री श्री. जयंतराव पाटील हे देखील साथ देत असतात. परंतु ज्यावेळी ही परिस्थिती निर्माण झाली त्यावेळी या विषयावर पुन्हा चर्चा उपस्थित केली पाहिजे असे आम्हाला वाटले. ही चर्चा उपस्थित करतांना माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते आणि आम्ही सर्व सदस्यांनी आवर्जून म्हटले होते की, आम्हाला या विषयाचे राजकारण करावयाचे नाही. माननीय मुख्यमंत्र्यांनी घोषणा केल्यानंतर आम्हाला मीडियाच्या प्रतिनिधींनी फोन करुन विचारले की, अधिवेशन सुरु असतांना बाहेर घोषणा करणे योग्य आहे काय? अधिवेशन सुरु असतांना बाहेर घोषणा करणे योग्य नाही. तरी देखील आम्ही असे म्हटले की, मागील आठवडयात सतत चार दिवस अधिवेशन नसल्यामुळे जे काही तत्काळ निर्णय घ्यावयाचे असतील त्या संदर्भातील घोषणा बाहेर केली तर त्याला आमची हरकत असणार नाही व त्या संदर्भात आम्ही हक्कभंगाची सूचना दाखल करणार नाही. शेवटी दुष्काळी परिस्थिती लक्षात घेता त्यावेळी शासनाला काही पावले तत्काळ उचलणे आवश्यक असतील तर विरोधी पक्षाच्या वतीने सुध्दा सामंजस्याची भूमिका घेतली गेली आहे. अशावेळी समोरच्या बाकावरुन काही वक्तव्ये केली जात असतात त्यावेळी माननीय सदस्य श्री. हेमंत टकले सुध्दा गप्प बसतात. त्यावेळी मला असे वाटते की, विरोधी पक्षाकडून राजकारण बाजूला ठेवून एखादी भूमिका स्वीकारली जाते त्यावेळी सत्ताधारी पक्षाकडून त्याचे राजकारण कां केले जाते याचे मला आश्चर्य वाटते.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ D/ KTG/

श्री. विनोद तावडे....

सभापती महोदय, राज्यामध्ये हे दुष्काळ व टंचाईचे संकट आले आहे ते येणार असल्याची जाणीव आपल्याला अगोदर होती काय? महाराष्ट्राच्या आर्थिक पाहणीमधील निष्कर्ष् समोर आले आहेत. हा अहवाल जर आपण नीटपणे वाचला असेल तर त्यामधून असे स्पष्ट चित्र दिसते की, राज्यामध्ये सद्याची स्थिती कशी आहे आणि त्यामधून पुढे संभाव्य येणाऱ्या अडचणी कोणत्या आहेत या सर्व गोष्टी आर्थिक पाहणीमध्ये आल्या आहेत. त्यामध्ये प्रामुख्याने ग्रामीण पाणी पुरवठा योजना, राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम, महाराष्ट्र सुजल निर्माण योजना, शिवकालीन पाणी साठवण योजना, जलस्वराज्य योजना इत्यादी सर्व योजनांची स्थिती दर्शविण्यात आलेली आहे. अशाप्रकारे राज्याची या पुढील काळातील स्थिती कशी असणार आहे हे या अहवालावरुन शासनाच्या लक्षात येईल.

सभापती महोदय, मागे एकदा विधानसभेमध्ये माननीय कृषी मंत्र्यांनी एका प्रश्नाला उत्तर देतांना सांगितले होते की, खरिपाच्या काळात परतीचा पाऊस झालेला नाही त्यामुळे खरिपाच्या पिकावर परिणाम झाला, त्याचप्रमाणे सुरुवातीला पाऊस न झाल्यामुळे रब्बी पिकावर परिणाम झाला. यामुळे राज्यावर हे संकट येणार आहे हे जर शासनाच्या मंत्री महोदयांना माहीत होते तर मग ग्रुप ऑफ मिनिस्टर्सनी वेळीच निर्णय कां घेतले नाहीत? आणि घेतलेल्या निर्णयाची अंमलबजावणी तत्काळ कां केली नाही असे अनेक प्रश्न या चर्चेच्या निमित्ताने आम्हाला उपस्थित करावयाचे आहेत.

सभापती महोदय, महाराष्ट्राच्या दौऱ्यावर माननीय मुख्यमंत्री गेले, माननीय उप मुख्यमंत्री गेले, माननीय श्री. आर.आर. पाटील गेले, माननीय डॉ. पतंगराव कदम केले, माननीय मंत्री श्री. जयंतराव पाटील हे सुध्दा गेले, माननीय मंत्री श्री. लक्ष्मणराव ढोबळे आपण त्यामध्ये नव्हता. त्या ठिकाणी दुष्काळाची भयानकता या सर्व मंत्री महोदयांनी अनुभवली आहे. दुष्काळाचा वणवा पेटला असतांना तुम्हाला आमच्याकडे बघायला वेळ नाही. आमची जनावरे आणि माणसे मेल्यानंतर तुम्ही आम्हाला चारा आणि पाणी देणार काय? असे जत तालुक्यातील लोकांनी आपल्याला विचारले. इतकेच नव्हे तर जत तालुक्यातील एका गावामध्ये लोकांनी मंत्री महोदयांचे भाषण मध्येच थांबविले. आम्हाला तुमचे भाषण ऐकायचे नाही असे त्यांनी सांगितले. त्यानंतर रोजगार हमी योजनेची कामे जोरात सुरु झाली आहेत असे त्या सभेमध्ये मंत्री महोदयांनी सांगितल्यानंतर माननीय मंत्री श्री. आर.आर. पाटील यांनी त्या ठिकाणीच आपल्या सरकारचा पर्दाफाश केला.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे . . ..

त्यांनी पटपडताळणी सारखे वास्तव दाखविल्यानंतर लिपापोती केली की काय हे मला माहिती नाही. पण त्याठिकाणी सन्माननीय मंत्री डॉ.पतंगराव कदम साहेब, माननीय गृहमंत्री श्री.आर.आर. पाटील यांनी एक्सपोज केले की नाही? आता ते कोणाला अडचणीमध्ये आणण्यासाठी केले हे मला माहिती नाही. तुमचे आपसात काय आहे ते माहिती नाही पण केवळ जनतेच्या हिताचे म्हणून .....

(काही सन्माननीय सदस्य खाली बसून बोलतात.)

सभापती महोदय, त्यावेळी माननीय गृह मंत्री श्री.आर.आर. पाटील यांनी जॉब कार्डची पहाणी केली. त्यामध्ये काही आढळून आले नाही. पगार कधी मिळणार, ठेकेदार किती घेतो हे माननीय मुख्यमंत्र्यांसमोर माननीय पालक मंत्र्यांच्या उपस्थितीत ग्रामविकास मंत्री असताना गृह विभागाचे कर्तव्यदक्ष मंत्री श्री.आर.आर.पाटील यांनी सगळे एक्सपोज केले. हे केल्यानंतर त्या ठिकाणच्या सामान्य लोकांची मागणी काय आहे? सांगली जिल्ह्यामध्ये आटपाडी जवळ शेटफळ प्रादेशिक पाणी पुरवठा योजना कचरेवस्ती तलावावर घेण्यात आलेली आहे. परंतु सध्या तलाव कोरडा आहे. आता अर्जुनवाडी तलावाचे पाणी जर या तलावामध्ये सोडले तर आटपाडी मधील शेटफळासह पाच गावांना बारा महिने पाणी मिळेल ही वस्तुस्थिती माननीय मंत्री डॉ.पतंगराव कदम साहेब आपण जाणता. अर्जुनवाडी तलावामध्ये 20 द.ल.घ.फू.पाणी आहे असे जेव्हा पत्रकारांनी तेथील कलेक्टर श्री.वर्धने यांना विचारले तेव्हा ते म्हणाले की, तेवढे पाणी नाही. परंतु सध्या तेथे टँकरव्दारे जो पाणी पुरवठा होत आहे, तो त्या तलावातूनच होत आहे आणि कलेक्टर माहिती नाही असे सांगतात. तुम्ही त्याठिकाणी पाण्याचा पुरवठा तलावातून करीत आहात आणि माननीय गृहमंत्री श्री.आर.आर.पाटील म्हणतात की, आम्हाला केवळ 70 लाखाचे अधिकार आहेत आणि यासाठी जास्त खर्च येणार आहे.काल आपण अधिकार वाढवून दिले आहेत.माझे असे मत आहे की, परतीचा पाऊस झाल्यानंतर असे होणार हे गृहीत धरुन अधिकार वाढवून द्यावयास हवे होते. पण तसे तुम्ही केले नाही. मात्र ते आता केले आहे.

सभापती महोदय, ज्यावेळी लोकांनी जळजळीत प्रश्न विचारला की, आम्ही आणि जनावरे मेल्यानंतर तुम्ही चारा व पाणी उपलब्ध करुन देणार आहात काय? त्या नंतर आपण त्या-त्या ठिकाणी योजनांसाठी निधी दिला. अर्जुनवाडी तलावातून रोज टँकर भरले जात आहेत. तेथील तहसीलदार श्री.भोसले सांगतात आणि जिल्हाधिकारी याबाबतीत माहिती नाही असे म्हणतात. मी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे . . ..

याठिकाणी एकेक नावे घेऊन का सांगत आहे ? यामध्ये असे बरेच किस्से आहेत पण त्यामध्ये जास्त वेळ घेत नाही कारण आपण सगळेजण प्रत्यक्षात तेथील परिस्थिती पाहून आला आहात. पण अर्जूनवाडीमध्ये पाणी नाही एवढा तेथे बेफिकीरपणा आहे. त्यामुळे पाण्याची व्यवस्था करण्यासाठी जो आवश्यक खर्च करावा लागणार आहे तो करणार आहात काय आणि तसे जर केले तर किमान मे महिन्यापर्यंत पुढे बारमाही पाणी मिळेल यादृष्टीने माननीय मंत्री महोदयांनी आपल्या उत्तरामध्ये घोषणा करावी अशी मी अपेक्षा करतो आणि सदरहू काम लवकर पूर्ण होईल असेही मी गृहीत धरतो.

सभापती महोदय, खरे म्हणजे 2000 सालपासून आपल्या शासनाची तहान लागल्यावर विहीर खोदण्याची परंपरा असल्याचे मी सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले यांना सांगू इच्छितो. महाराष्ट्रामध्ये आपल्याला 2000 पासून चार ते पाच वेळा प्रखर पाणी टंचाईला सामोरे जावे लागले. तसेच दिवसेंदिवस पाण्याची पातळी खाली जात आहे. पण शासनाने याबाबतीत काही ठोस कामगिरी केली आहे काय? अर्थसंकल्पाच्या संबंधात बोलत असताना सुध्दा मी याबाबत विषय मांडला होता आणि तो आपण ऐकला असेल की, 3 वर्षात 70 हजार शेततळ्यांचे लक्ष्यांक असताना केवळ 49 हजार शेततळी पूर्ण झाली आणि यावेळेस आपण 3 हजाराचे टार्गेट ठरविले आहे. त्यावेळी आपल्याला आर्थिक पाहणी अहवालामध्ये ही स्थिती दिसत असताना बजेटमध्ये यासाठी व्यवस्था केली पाहिजे होती,योजना केली पाहिजे होती.पण माननीय वित्त मंत्री श्री.अजितदादा पवार यांचा माननीय मंत्री श्री.पतंगराव कदम आणि माननीय मंत्री श्री.लक्ष्मणराव ढोबळे यांच्यावर राग आहे काय ? आपल्याला राज्यात दुष्काळी स्थिती असल्याचे दिसते आणि कायद्याच्या शब्दात सांगावयाचे तर "टंचाईग्रस्त स्थिती" म्हणता येईल.परंतु तुम्ही "टंचाईग्रस्त स्थिती" असे का म्हणत आहात ? तुम्हाला "दुष्काळ" असे म्हणण्यामध्ये काय संकोच आहे? यामुळे किती खर्च वाढेल आणि आपण असे का करीत आहोत हे मला माहिती नाही.पण परतीचा पाऊस पडला नाही आणि त्यामुळे महाराष्ट्रामध्ये पाण्याची टंचाई जाणवणार आहे ही स्थिती नोव्हेंबर 2011 मध्ये लक्षात आली. परंतु ती शासनाच्या लक्षात आली नाही. मग ॲग्रो-1 मध्ये या विषयाबाबत भरभरुन लिहून आले होते. माननीय मंत्री श्री.श्री.लक्ष्मणराव ढोबळेसाहेब आपण तर "सकाळ" हे वृत्तपत्र वाचतच असाल असे मी गृहीत धरतो. कारण तो काही पक्षांसाठी जी.आर.मानला जातो. त्यामध्ये सगळे आलेले आहे. त्यामुळे गतवर्षी काही भागामध्ये नोव्हेंबर-डिसेंबर कोरडा गेला, त्यामुळे आपल्याला पुढच्या काळा

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे . . ..

मध्ये या सगळया योजना कराव्या लागतील हे माहिती असताना अर्थसंकल्पामध्ये यासाठी काहीतरी निधीची तरतूद करण्यात येईल अशी मला अपेक्षा होती. पण या विषयाच्या बाबतीत खरेच काही मिळालेले नाही.

यानंतर श्री.अ.शिगम . . ..

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे..

सभापती महोदय, पश्चिम महाराष्ट्रातील काही तालुक्यांची अवस्था फार वाईट आहे. त्यांची स्थिती शिपायासारखी झालेली आहे. सेनापती शिपायाला विचारतो, तू लढत का नाहीस ? शिपाई सांगतो माझ्या एका हातात तलवार आहे आणि दुसऱ्या हातात ढाल आहे, तर मी लढणार कसा ? तशी स्थिती पश्चिम महाराष्ट्रातील काही तालुक्यांची झालेली आहे. त्या भागात इतके मंत्री झालेले आहेत की, त्यांचे ओझे वाटायला लागले आहे. कारण त्या भागातील एवढे मंत्री असताना सुध्दा त्या तालुक्यांमध्ये बळ वाढताना दिसत नाही. माननीय श्री.आर.आर.पाटील यांच्याकडे गृह विभाग आहे. परंतु त्यांच्या येथे अफूची शेती होत असल्याच्या बातम्या येत आहेत. डॉ.पंतगराव कदम यांच्याकडे पुनर्वसन आणि मदत कार्य विभाग आहे. इतके मातब्बर मंत्री असताना तेथे कोणतीही योजना होताना दिसत नाही.

सभापती महोदय, मागील काही दिवसांमध्ये "स्टार माझा" या हिंदी वाहिनीवर राहुल गांधी अमेठीतील एका गरिबाच्या घरी गेल्याचे दाखविण्यात आले. ज्या घरावर नीट छप्पर नाही अशा घरात ते आपल्या एका मित्रासोबत जेवले व तेथे राहिले. श्री.राहुल गांधींना गरिबांचा किती कळवळा आहे हे दाखविण्यात आले होते. ती बातमी सर्व वर्तमानपत्रात तसेच सर्व वाहिन्यांवर दाखविण्यात आली. त्या बातमीला जगभर प्रसिध्दी मिळाली. माझी मुलगी सहावी इयत्तेमध्ये शिकत आहे. आठवी-नववी इयत्तेतील मुलांनी ती बातमी पाहिली. त्यांनी मला प्रश्न केला की, ते स्वत: खासदार, त्यांची आई खासदार, त्यांचे वडील खासदार, आजी खासदार म्हणजे 40-50 वर्षे त्यांच्या घरात खासदारकी आहे शिवाय त्यांच्या घरातील सदस्यांच्या नावाने आवास योजना, गृह योजना आहेत. परंतु मागील 50 वर्षात त्या गरिबाला साधे घर मिळाले नाही आणि राहुल गांधी तुटक्या घरामध्ये जाऊन राहिले त्याची बातमी होते. अशी काहीशी अवस्था पश्चिम महाराष्ट्राची झालेली आहे. इतके मातब्बर मंत्री असूनही त्या भागातील दुष्काळ दूर होत नसेल तर आश्चर्य आहे.

सभापती महोदय, सोलापूर जिल्ह्याची काय स्थिती आहे ते कळतच नाही. दोन मातब्बर व्यक्ती केंद्रात मंत्री आहेत. माननीय श्री.शरद पवार साहेब आणि माननीय श्री.सुशीलकुमार शिंदे साहेब आणि माननीय प्रा.लक्ष्मण ढोबळे, पाणी पुरवठा मंत्री फ्री दिलेले आहेत. म्हणजे एकूण तीन

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.विनायक मेटे)

श्री.विनोद तावडे..

मंत्री असताना सुध्दा त्या तालुक्यातील पाणी टंचाई दूर झालेली नाही. कोकणातील मंत्री नाहीत म्हणून कोकणाकडे दुर्लक्ष होत आहे असे निदान आम्हाला सांगता तरी येते. परंतु त्या भागातील मंत्री असूनही तेथील जनतेचे प्रश्न सुटू शकत नसतील तर आम्ही काय म्हणायचे ?

सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्री सातारा विभागातील आहेत. नगर जिल्ह्यामध्ये माननीय बाळासाहेब थोरात साहेब, माननीय श्री.राधाकृष्ण विखे-पाटील साहेब या सारखी मातब्बर मंडळी आहेत. असे असूनही त्या भागातील जनतेला कोणतीही राहत मिळालेली नाही, याचे काय कारण असेल ते मला माहीत नाही.

सभापती महोदय, "भाकरी-ठेचा खाऊन पाण्याचा प्रश्न सुटणार नाही" असे जाणत्या राजांनी माननीय मुख्यमंत्री महोदयांना सुनावले. माननीय राज्यपालांना सुनावले. मला वाटले ही बातमी असत्य असेल. कारण ती बातमी मी चॅनेलवर पाहिली नव्हती. मी इशा न्यूजमधून क्लिपिंग मागवून ती न्यूज पाहिली. माननीय श्री.शरद पवार साहेब तसे बोलले होते. माननीय राज्यपालांना दुष्काळाचे गांभीर्य नाही. ते सिनिअर आहेत, बोलू शकतात. बोलावे की बोलू नये हा त्यातील वेगळा भाग आहे. "शेतकऱ्यांबरोबर भाकरी ठेचा खाऊन पाणी टंचाईचा प्रश्न सुटणार नाही" असे माननीय मुख्यमंत्री महोदयांना सुनावले गेले होते.

यानंतर श्री.बरवड..

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री. विनोद तावडे ...

मला हे मान्य आहे की, ठेचा-भाकरी खाऊन पाणी टंचाईचा प्रश्न सुटणार नाही परंतु साहेब ज्यांचे नेतृत्व करतात, त्यांच्या हाताखालील जे मंत्री महोदय आहेत...

श्री. रमेश शेंडगे : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. माननीय विरोधी पक्ष नेते आता जो विषय सांगत आहेत त्याबाबत आदरणीय श्री. शरदचंद्र पवार साहेबांनी नंतर आपला खुलासा दिलेला होता की, मी जे बोललो होतो त्याचा विपर्यास करुन ते छापले गेले आहे. एकदा आदरणीय श्री. पवार साहेबांनी खुलासा दिल्यानंतर परत-परत तोच विषय सांगणे बरोबर नाही.

श्री. दिवाकर रावते : आम्ही नाव घ्यावयाचेच नाही का ? श्री. पवार साहेब खुलासा करतील.

श्री. रमेश शेंडगे : सभापती महोदय, महाराष्ट्रातील दुष्काळी भागातील जनता होरपळून निघलेली आहे. त्यांच्या बाबतीत या चर्चेच्या माध्यमातून काही तरी चांगले बाहेर येईल आणि जे आता मिळालेले आहे त्यापेक्षा जास्त काही तरी मिळेल ही संपूर्ण दुष्काळी भागाची अपेक्षा आहे. केवळ राजकारण करावयाचे आणि टीका-टिप्पणी करावयाची हे बरोबर नाही. आदरणीय विरोधी पक्ष नेते अगदी उत्साही आहेत आणि त्यांच्या भाषणाच्या माध्यमातून शासन आम्हाला आणखी काही तरी देईल अशी आमची अपेक्षा आहे. त्यामुळे असे वादाचे मुद्दे काढून त्यामध्ये राजकारण करावयाचे असे होऊ नये अशी मला आपल्याला विनंती करावयाची आहे.

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, मला हरकतीच्या मुद्याबाबत स्पष्टीकरण विचारावयाचे आहे की, आदरणीय श्री. शरद पवार साहेबांनी...

तालिका सभापती (श्री. विनायक मेटे) : आपण कशावर बोलत आहात ? हरकतीच्या मुद्यावर आपली हरकत आहे का ?

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, वस्तुस्थिती अशी आहे की, आदरणीय श्री. शरद पवार साहेबांनी स्पष्टीकरण दिल्याचे सन्माननीय सदस्य श्री. रमेश शेंडगे यांनी सांगितले पण त्यांनी परत आयबीएन वाहिनीच्या मुलाखतीमध्ये तेच रिपीट केले हे सन्माननीय सदस्यांनी पाहिले की नाही ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तालिका सभापती : आपण दुष्काळावर आणि पाणी टंचाईवर चर्चा करीत आहोत. सन्माननीय सदस्यांनी कृपया खाली बसावे. सन्माननीय सदस्यांनी दुष्काळ आणि पाणी टंचाईच्या संदर्भात बोलावे.

प्रा. लक्ष्मण ढोबळे : सभापती महोदय, माझा छोटासा हरकतीचा मुद्दा एवढाच आहे की, फुले रेशीमबागेतील असो किंवा मोतीबागेतील असो, ती फुलेच असतात. त्यांना सुगंध फुलांचाच असतो. असे असताना भेगाळलेल्या जमिनीला पाणी देण्याबद्दलची चर्चा करीत असताना बाकीच्या राजकारणाबद्दलच अधिक बोलले जात आहे याचे वाईट वाटते. आम्ही दुष्काळी भागातील आहोत.

श्री. विनोद तावडे : त्यापेक्षा आम्हाला वाईट वाटते की, दुष्काळी भागातील असणारे काही करीत नाहीत. मी ते प्रत्यक्ष ऐकलेले आहे.

श्री. दिवाकर रावते : रेशीम बागेमध्ये आणि मोतीबागेमध्ये कोण कोण जातात हे आपल्याला कळले पाहिजे.

तालिका सभापती : कोण कोठे जातो हे आपण खाजगीमध्ये एकमेकांना विचारावे. माननीय विरोधी पक्ष नेते आणि इतर सर्व सन्माननीय सदस्यांनी ज्या तळमळीने हा विषय या ठिकाणी उपस्थित केलेला आहे ते गांभीर्य टिकविण्याचे काम करुन आपण ही चर्चा पुढे नेऊ या. यामध्ये राजकारण न आणता ही चर्चा पुढे करु या.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, मला गांभीर्य टिकवावयाचे नसते तर माननीय राज्यपालांच्या विरोधातील तसेच माननीय मुख्यमंत्र्यांच्या विरोधातील वक्तव्याबद्दल मी अधिक कडक भाषेमध्ये बोलू शकलो असतो परंतु मला त्यामध्ये जावयाचे नाही. परंतु याचा अर्थ आम्ही संदर्भ सुध्दा द्यावयाचा नाही का ? तसे असेल तर मग आम्ही चर्चा कशाला करावयाची, आम्ही खाली बसतो. सन्माननीय मंत्री महोदय श्री. ढोबळे साहेब यांना सांगू इच्छितो की, रेशीमबाग की मोतीबाग की संभाजी बाग याची चर्चा आपण बाहेर करु. माननीय श्री. विखे-पाटील समोर बसलेले असताना आपण संभाजीबाग कसे विसरता ? हे संभाजीबाग विसरत आहेत याची जाणीव आपण करुन दिली पाहिजे. आपण त्यांना जाणीव करुन देत नाही याचा अर्थ आपण

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तालिका सभापती : माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी पाणी टंचाईच्या संदर्भात बोलावे. ही चर्चा झाल्यानंतर त्यांना बागेमध्ये सोबत घेऊन जावे.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, हे खरे आहे की, राज्यातील दुष्काळी भागातील लोकांना टंचाईचे चटके बसत असताना असे एकमेकांवर आरोप करणे योग्य नाही असे जे सन्माननीय सदस्य श्री. रमेश शेंडगे साहेबांनी मला सांगितले त्यामध्ये बहुतेक माझ्या माध्यमातून ते दिल्लीपर्यंत जावे अशी त्यांची इच्छा असेल. ती त्यांची इच्छा सफल झालेली आहे. एकदम हायकमांडला आपण बोलू शकत नाही त्यामुळे अशा माध्यमातून बोलणे चांगले असते.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे...

पश्चिम महाराष्ट्रातील काही तालुक्यांमध्ये प्रचंड टंचाई, दुष्काळ, पाण्याचे दुर्भिक्ष्य आहे. हे आम्हाला मान्य आहे. पण अशी परिस्थिती तेथेच आहे असे नाही. मी विभागीय वाद निर्माण करीत नाही. परंतु मराठवाडा, विदर्भ, कोकण व उत्तर महाराष्ट्र या भागांमध्ये सुध्दा भयानक परिस्थिती निर्माण झालेली आहे. शासनाने पश्चिम महाराष्ट्रासाठी लगबग दाखविली, पळापळ केली ती आवश्यकच आहे. कारण सन्माननीय महसूल राज्यमंत्री श्री.प्रकाश सोळंके यांच्या भागातही तशीच परिस्थिती आहे. त्यांच्याकडेही लोक तशाच अडचणींना सामोरे जात आहेत, काही ठिकाणी तर त्यापेक्षा अधिक अडचणी आहेत. विदर्भातील अमरावती विभागातील 56 तालुक्यांपैकी 12 तालुक्यांमध्ये 1 मीटरपेक्षा खोल पाण्याची पातळी गेलेली आहे. 3 तालुक्यांमध्ये 2 मीटरपेक्षा खोल पाण्याची पातळी गेलेली आहे, एका तालुक्यात 3 मीटरपेक्षा खोल पाण्याची पातळी गेलेली आहे. ही माहिती 'महाराष्ट्राची आर्थिक पाहणी' या पुस्तिकेत आलेली आहे. त्यामुळे मी वेगळे काही सांगत आहे अशातील भाग नाही. नागपूर विभागामध्ये तशीच परिस्थिती आहे. मराठवाड्यातील जिल्हे पाहिले तर 8,000 खेड्यांपैकी 1500 खेड्यांना टंचाईची झळ यापूर्वीच लागलेली आहे. उस्मानाबाद जिल्ह्याला पाणी टंचाई या शब्दालाच जणू काही बधीरपणा आलेला आहे. गेल्या 7 वर्षापासून केवळ नियोजनाअभावी त्या शहराला 8 दिवसातून एकदा कधी दोनदा पाणी पुरवठा केला जातो. हिंगोली जिल्ह्यातील टंचाईच्या गावांमध्ये दिवसेंदिवस वाढ होत आहे. लातूरमध्ये यापेक्षा वेगळी स्थिती नाही. कोकणामध्ये 1500 ते 2000 मि.मी.पाऊस पडूनही 29 गावांमध्ये, वाड्या-वस्त्यांमध्ये मार्च महिन्यातच टँकरने पाणी पुरवठा सुरु झालेला आहे. या गावांची संख्या मे महिन्यामध्ये आणखी वाढणार आहे. पश्चिम महाराष्ट्राच्या बरोबरीने संपूर्ण महाराष्ट्रामध्ये दुष्काळी स्थिती पहावयास मिळत आहे. 50 पैशापेक्षा कमी आणेवारी असलेल्या गावांसाठी, टंचाईचे निवारण करण्यासाठी उपाययोजना जाहीर केलेली आहे. ही आणेवारी घोषित करण्याची पध्दत अवलंबताना प्रत्यक्षात शेतामध्ये जाऊन पाहणी केली जाते काय किंवा कागदोपत्री दाखविली जाते का असा प्रश्न मला पडलेला आहे. आणेवारी जाहीर करण्याची पध्दत योग्य की अयोग्य हा वेगळा भाग आहे. शासनाने दिनांक 18 जानेवारी, 2012 रोजी खरिपाच्या हंगामाची पैसेवारी जाहीर

2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/ KTG/

श्री.विनोद तावडे...

केलेल्या गावांची संख्या पाहिली तर त्यामध्ये नगर जिल्ह्यातील 580 गावे आहेत. त्यापैकी 431 गावांमध्ये 50 पैशापेक्षा कमी आणेवारी आहे. 149 गावांमध्ये 50 पैशापेक्षा अधिक आणेवारी आहे. सांगली जिल्ह्यात 640 गावांपैकी 340 गावांमध्ये 50 पैशापेक्षा कमी आणेवारी आहे. अमरावतीमध्ये 1985 पैकी सर्वच्या सर्व गावांमध्ये 50 पैशापेक्षा कमी आणेवारी दाखविली आहे. अमरावती जिल्ह्याला लागून असलेल्या अकोला, यवतमाळ, बुलढाणा, वाशिम या जिल्ह्यांमध्ये 50 पैशापेक्षा कमी आणेवारी असलेल्या गावांची संख्या शून्य आहे. बुलढाणा जिल्ह्यामधील काही गावांचा उल्लेख करण्यात आलेला आहे. हा एक अपवाद झाला आहे. अमरावती जिल्ह्यामधील 100 टक्के गावांमध्ये 50 पैशापेक्षा कमी आणेवारी आहे. त्याच्या बाजूला असलेल्या जिल्ह्यातील गावांची संख्या मात्र शून्य दाखविली जाते. हे कसे शक्य आहे ? आणेवारीचे कसे मोजमाप केले जाते ते मला समजत नाही.

अमरावती जिल्हा हा व्हीव्हीआयपीचा असल्यामुळे महसूल खाते तेथे नीट काम करीत आहे असे शासनाला म्हणावयाचे आहे काय, की सन्माननीय महसूल मंत्री नगर जिल्ह्यातील असल्यामुळे तेथील कमी आणेवारी असलेल्या गावांची संख्या अधिक दाखविली जाते ? सन्माननीय मंत्री डॉ.पतंगराव कदम हे दबंग असल्यामुळे तेथील गावांची संख्या अधिक दाखविली जाते. बाकीच्या गावांचे काय ? या विशिष्ट लोकांच्या जिल्ह्यातच महसूल खाते काम करीत आहे, हे कशासाठी ? आता मी गावांची आकडेवारी सांगितली आहे ती काय सांगते ? या लोकांकडे पावसाचे यंत्र आहे काय, असेल तर ते कदाचित रिमोटवर चालणारे असावे.

यानंतर श्री.शिगम....

अशुद्धीत प्रत / शुद्धीसाठी नाही

श्री. विनोदे तावडे...

मला हे सांगायचे आहे की, आणेवारी काढण्याची ही पध्दत चुकीची आहे. या बाबतीत सीआयडी चौकशी झाली पाहिजे. श्री. पी.साईनाथ यांनी म्हटल्याप्रमाणे "दुष्काळ आवडे सर्वांना" अशी तर परिस्थिती नाही ना ? हे रॅकेट आहे.

सांगली जिल्ह्यामध्ये टँकरने पाणी पुरवठा होतो. पण हा टँकर कधी येईल याची शाश्वती नसते. लोक बाहेर ड्रम आणून ठेवतात आणि प्रत्येक ड्रममागे 30 रुपये दिल्या शिवाय ड्रममध्ये पाणी टाकले जात नाही, ही वस्तुस्थिती आहे. या ठिकाणी माननीय मंत्री महोदय घोषणा करतात की लोकांना फुकट पाणी दिले जाते. परंतु वस्तुस्थिती वेगळी आहे. ग्रामस्थ बापुडे कामधंदा सोडून पाण्याचा टँकर कधी येईल याची वाट पहात घरी राहातात. माझे म्हणणे एवढेच आहे की, दुष्काळ पडल्यानंतर त्याचे निवारण करण्यासाठी शासनाकडून प्रामाणिकपणे प्रयत्न होतात का ? तर याचे उत्तर "नाही" असेच द्यावे लागेल. पाण्याचे दुर्भिक्ष्य असलेल्या ठिकाणी जेव्हा पाण्याच्या योजना केल्या जातात त्यावेळी गरजवंतांच्या वाट्याला त्या योजनांचा लाभ क्वचितच मिळतो. त्या प्रदेशातील गरिबांना हे उमजते म्हणून अवर्षणातील उपाययोजनांना ते तिसरी फसल, तिसरे पीक असे म्हणतात. फक्त त्या सुगीमध्ये त्यांचा वाटा नसतो. तो वाटा अधिकारी आणि पाणी माफियांचा असतो. या पाणी माफियांची देखील चौकशी झाली पाहिजे. यामध्ये कुणाकुणाचे उखळ पांढरे होते ? सर्वसामान्य माणसाला काय मिळते ? म्हणून जेव्हा जेव्हा अवर्षणाची परिस्थिती निर्माण झाली त्या त्या वेळी ज्यानी ज्यांनी त्या परिस्थितीचा गैरफायदा घेतलेला आहे त्या सर्वांची चौकशी होण्याची गरज आहे.

मी अवर्षणग्रस्त तालुक्यांची माहिती घेतली तेव्हा मला आश्चर्य वाटले. कोकणामध्ये पाऊस जास्त पडतो. कोकणामध्ये डीपीएपी तालुके किती आहेत ? तर एकही नाही. पण कोकणामध्ये पाणी टंचाई आहे. मी जी माहिती घेतलेली आहे त्यानुसार राज्यात पिकणा-या एकूण ऊसापैकी 73 टकके ऊस हा डीपीएपी भागामध्ये पिकविला जातो. ऊसाच्या पिकाला सर्वात जास्त पाणी लागते. हे कसे होऊ शकते ? तेव्हा डीपीएपी क्षेत्र ठरविण्याचे निकषच मुळात चुकीचे आहेत. डीपीएपी क्षेत्र ठरविताना त्या भागामध्ये पाऊस किती पडतो, पाणी साठा किती आहे, सिंचनाखालील क्षेत्र

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे...

किती आहे या सर्व गोष्टी विचारात घेणार की नाही ?..(अडथळा)... आता मंत्री महोदय डॉ. पतंगराव कदम यांनी सांगितले की, हे केन्द्र शासनाचे निकष आहेत. मला माहीत आहे की, मंत्री महोदय, डॉ. पतंगराव कदम आणि मंत्री महोदय श्री. लक्ष्मणराव ढोबळे यांचा केन्द्रामध्ये दबदबा आहे. त्यांनी त्याचा उपयोग करुन डीपीएपीचे निकष बदलून घ्यावयास पाहिजेत. डीपीएपीचे निकष बदलण्यासाठी राज्य शासनाने केन्द्राकडे मागणी करावयास पाहिजे. डीपीएपीसाठीचे जे निकष आहेत त्यामध्ये पडणारा पाऊस, भूगर्भातील पाण्याची पातळी, सिंचन क्षमता इत्यादी निकषांचा समावेश करावयास पाहिजे. आता डीपीएपीमध्ये लोणावळा देखील येतो. हा भाग डीपीएपीमध्ये कसा काय येऊ शकतो ? म्हणून डीपीएपीच्या संदर्भातील निकष तपासले पाहिजेत.

...नंतर श्री. भोगले...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे....

सभापती महोदय, मला आग्रहाने एवढीच विनंती करावयाची आहे की, या निमित्ताने तीन महिने संपूर्ण यंत्रणा काम करेल अशी व्यवस्था झाली पाहिजे. केवळ सभागृहात घोषणा करुन चालणार नाही. या घोषणांच्या माध्यमातून योजना राबवित असताना प्रत्यक्षात सामान्य माणसाला यातून काय मिळणार आहे हे महत्वाचे आहे. त्याला प्यायला पाणी मिळाले पाहिजे, जनावरांना चारा मिळाला पाहिजे.

सभापती महोदय, खालच्या सभागृहाचे सत्ताधारी पक्षातील एक सदस्य मला म्हणाले, "विनोद, जनावरे कापायला जायला कधीच सुरुवात झालेली आहे. आता शासनाने कितीही घोषणा केल्या तरी उपयोग नाही. आम्ही सत्ताधारी पक्षातील असल्यामुळे आम्हाला बोलता येत नाही." जनावरे कत्तलखान्याकडे जायला सुरुवात झालेली आहे. जनावरांना चारा किती ठिकाणी उपलब्ध झाला हे आपण जाणता. हे जर खरे असेल तर हे अस्मानी वा सुलतानी संकट नसून मानवनिर्मित संकट महाराष्ट्रामध्ये निर्माण झालेले आहे. ज्या भागातील अधिकाधिक मंत्री आहेत, स्वत:ला जे कार्यक्षम म्हणवतात, वरिष्ठ म्हणवतात त्यांनी आपल्या भागातील सामान्य माणसांना पिण्याचे पाणी उपलब्ध होईल, जनावरांना चारा उपलब्ध होईल यासाठी लक्ष दिले पाहिजे. ते काम त्यांनी केलेले नाही. राज्यपालांच्या नावाने बोटे मोडण्याचे काम केले जात आहे. अनुशेष असल्याचे सांगितले जाते. इतकी वर्षे सत्तेवर असताना पावले का उचलली नाहीत?

सभापती महोदय, मी जे काही बोलत आहे त्यामुळे माननीय सदस्य श्री.रमेश शेंडगे खूश आहेत. कारण मी जे बोलत आहे ते त्यांच्या मनातील विचार आहेत. सभापती महोदय, नेहमी हिवरेबाजार ग्रामपंचायतीचे कौतुक केले जाते. माजी राष्ट्रपती श्री.अब्दुल कलाम यांनी त्या ग्रामपंचायतीला भेट दिल्याचे सांगितले जाते. त्या ग्रामपंचायतीच्या सरपंचांनी ज्या योजना राबविल्या आहेत त्या मॉडेलची अंमलबजावणी राज्य शासन इतर ठिकाणी का करु इच्छित नाही? ते मॉडेल राज्यात सर्वत्र राबविले पाहिजे. आज एका बाजूला शेतकऱ्यांच्या आत्महत्या होत आहेत, दुसऱ्या बाजूला जनावरांना पाणी व चाऱ्याअभावी कत्तलखान्याकडे पाठवावे लागत आहे. अशा वेळी त्या भागातील राजकीय नेत्यांनी गप्प बसणे कितपत योग्य आहे? या सगळ्या स्थितीमध्ये आपण मूकदर्शक प्रेक्षक बनून राहणे योग्य नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे....

सभापती महोदय, मी पी.साईनाथ यांचे भाषण ऐकले होते. रोम जळत होता तेव्हा निरो फिडेल वाजवित होता एवढीच गोष्ट आपल्याला माहिती आहे. पी.साईनाथ यांनी त्या गोष्टीतील पुढचा भाग आपल्या भाषणात सांगितला होता. त्यांनी सांगितले की, रोम जळत असताना निरोच्या महालामध्ये जंगी पार्टी सुरु होती. त्या गावामध्ये वीज नव्हती. त्याने ख्रिश्चन धर्माच्या लोकांना बंदीवान करुन आणले होते. पार्टी सुरु होती. लोक मद्य प्राशन करीत होते, खात पीत होते. अशा वेळी उजेडाची व्यवस्था व्हावी म्हणून बंदीवानांपैकी एका-एका माणसाला उभे करुन जाळण्यात येत होते आणि त्या उजेडात पार्टीचा आनंद लुटला जात होता.

सभापती महोदय, आज राज्यात शेतकरी आत्महत्या करीत आहेत. सामान्य माणसे संतापली आहेत. आपण राज्यकर्ते आहात. आम्ही राजकीय व्यवस्थेतील कार्यकर्ते आहोत. अंतर्मुख होऊन पी.साईनाथ यांनी सांगितलेल्या गोष्टीप्रमाणे आपण वागत नाही ना याचा विचार केला पाहिजे. अशा प्रकारच्या वेदना मनाला होत असतात. त्यामुळे या गोष्टीचे राजकारण करायचे नाही. परंतु तुम्ही जर चुकत असाल तर आम्ही ते निदर्शनास आणण्याचे काम करणार आहोत. या विधिमंडळाच्या सभागृहाकडे साऱ्या महाराष्ट्राचे लक्ष लागलेले आहे. या सभागृहात शासनाच्या वतीने घोषणा होतील आणि त्या घोषणांप्रमाणे सर्व काही अंमलात येईल असे सर्वसामान्य जनतेला वाटते. शासनाने अनेक जी.आर.काढले आहेत. 50 पैशापेक्षा कमी आणेवारीचा जी.आर. आहे, चारा टंचाई, चारा डेपो उघडण्याबद्दलचा जी.आर. आहे. या व्यवस्थेची जबाबदारी ज्यांच्यावर होती त्यांच्या चुकीबद्दल किमान चार अधिकाऱ्यांवर कारवाई केली तर सगळे ठीक होईल. अधिकारी वर्गाला माहिती आहे की, मंत्री हेलिकॉप्टरमधून येतील, पाहणी करतील आणि निघून जातील. निवेदनाच्या आधारे सभागृहात उत्तर दिले जाईल. सर्वसामान्य माणसाला यातून काही मिळणार नाही. किमान पाणी माफियांची चौकशी झाली पाहिजे. राजकीय लोक असतील, लॉबीमधील लोकांमार्फत कट करुन पैसे मिळविण्याचा प्रयत्न केला जातो. त्यांच्यावर अंकुश ठेवण्याचे काम सरकारकडून होणार आहे की नाही? या गोष्टीची स्पष्टता झाली तर शासनाने केलेल्या घोषणांमुळे लोकांच्या काहीतरी पदरात पडेल. अन्यथा पाठ फिरली की लोक दुसरीकडे वळतात असे या चर्चेतून होऊ नये. जे जाणवते ते आम्ही मांडण्याचा प्रयत्न करीत आहोत. सरकारने ठोस भूमिका स्पष्ट केली पाहिजे.

नंतर श्री.खर्चे...

अशोधित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे .....

शब्दांचा फुलोरा खूप घेतात. मंत्री महोदय श्री. लक्ष्मणराव ढोबळे यांनाही माझी विनंती आहे की, आपण साहित्यिक आहात त्यामुळे हा फुलोरा आणखी वाढवा पण पाण्याचा फवाराही द्या, कारण त्याची गरज आहे ते पाणी आपण राज्याला देणार की नाही, तहानलेल्यांना पाणी देणार की नाही याकडे राज्य डोळे लाऊन बसलेले आहे, आपल्या उत्तरातून वाट पाहत आहे अशी जाणीव करुन देतो आणि माझे भाषण संपवितो.

तालिका सभापती (श्री. विनायक मेटे) : या प्रस्तावावर अजून 23-24 सन्माननीय सदस्यांना बोलावयाचे आहे, आता फक्त माननीय विरोधी पक्षनेत्यांचे भाषण संपलेले आहे. अजून बऱ्याच सन्माननीय सदस्यांना बोलावयाचे आहे.....

श्री. जयंत प्र. पाटील : महोदय, आजच्या कामकाज पत्रिकेवरील इतर कामकाज बाजूला ठेवून या विषयावर मुबलक चर्चा व्हावी अशी माझी विनंती आहे.

तालिका सभापती : नियम 97 अन्वयेची चर्चा तीन तासात होऊ शकते.

श्री. पांडुरंग फुंडकर : महोदय, दुष्काळसारख्या विषयावर चर्चा आहे आणि राज्याचे शासन मात्र झोपलेले आहे, त्यामुळे या विषयावर चर्चा करण्यासाठी वेळ द्यावा.

श्री. रामदास कदम : महोदय, दुष्काळावरील चर्चेला आपण कोणत्याही प्रकारचे बंधन ठेवू नये, पाच-सहा तास ही चर्चा झाली पाहिजे, एवढा वेळ आपण द्यावा.

तालिका सभापती : सन्माननीय सदस्यांनी कृपया खाली बसावे. मी काय बोलतो ते प्रथम ऐकून घ्यावे. मला असे सांगावयाचे आहे की, नियम 97 अन्वये जी चर्चा सुरु झाली त्या चर्चेत 24 सन्माननीय सदस्यांना भाग घ्यावयाचा आहे, आता फक्त माननीय विरोधी पक्षनेत्यांचेच भाषण संपलेले आहे, अजून 23 सदस्यांना आपले विचार व्यक्त करावयाचे आहेत. या सर्व गोष्टींचा विचार करता या चर्चेसाठी वेळ किती लागेल याचे नियोजन आपल्याला करावे लागेल. माननीय सभापतींनी देखील सांगितले की, दुष्काळावरील चर्चा आहे तरी देखील सन्माननीय सदस्यांनी थोडे बंधनात राहून आणि मुद्यांची पुनरावृत्ती होणार नाही याचे भान ठेवून आपले विचार मांडावेत. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते आता आपले विचार व्यक्त करतील.

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, राज्यातील दुष्काळी परिस्थितीबाबत नियम 97 अन्वये उपस्थित केलेल्या चर्चेत भाग घेण्यासाठी मी उभा आहे.

महोदय, पाण्यासाठी चातकासारखी वाट बघणारे दुष्काळी भागातील गावकरी आणि ते मिळण्याची खात्री नसताना तडफडून मरणारी जनावरे यांची चर्चा करण्याकरिता खाऊन-पिऊन, पाणी पिऊन मी उभा आहे. या चर्चेसाठी आम्हाला किती वेळ लागतो पण येथे वेळेचा विषयच येत नाही, म्हणून तरतरीत भावनेने त्यांच्या व्यथा मांडण्यासाठी मी उभा आहे. तसेच या विषयावर बोलत असताना ओघाने जे संदर्भ समोर येतील ते दुर्दैवाने वेगळ्या अर्थाने सत्ताधाऱ्यांनी घेऊ नये, कारण ते त्यांनीच निर्माण केलेले आहेत, आम्ही त्यांच्यावर लादलेले हे संदर्भ नाहीत. राज्यात दुष्काळसदृश्य परिस्थिती खरे तर नोव्हेंबर, 2011 पासूनच लक्षात आली होती पण दूरदर्शीपणा हा नेतृत्वामध्येच असायला पाहिजे, दूरदर्शीपणाची शासनाची इच्छाशक्ती असली पाहिजे आणि त्याचाच अभाव जाणवला हे उघडे-नागडे सत्य समोर आणण्यासाठी मी उभा आहे.

मी आताच सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांच्याशी बोलत असताना त्यांना विचारले की, "सोनाराने कान टोचले" या म्हणीचा अर्थ काय होतो, त्यावर त्या म्हणाल्या की सोनाराकडून योग्य पध्दतीने कान टोचले जातात आणि मुलाचे रडणे सुध्दा कमीच असते. पण या सुस्त झालेल्या शासनाला जाग आणण्यासाठी देशाच्या कृषी मंत्र्यांना यावे लागले. मंत्री महोदय, श्री. लक्ष्मणराव ढोबळे साहेबांच्या मतदारसंघात शेतकऱ्यांच्या कार्यक्रमासाठी ते आले असता त्यांना ही व्यथा बोलावी लागली. त्यानंतर खडबडून जागे झालेल्या शासनाला संपूर्ण महाराष्ट्राने पाहिले ते यापूर्वी कधीच पाहिले नव्हते. पण मंत्री महोदयांना वाटले की आपलेच सरकार आहे, आपलेच लोक आहेत म्हणून जास्त न बोलता काम केले पाहिजे. पण ज्यावेळी दत्तासारखी तीन तोंडे एका बाजूला असतात त्यावेळी नाईलाजास्तव त्यांना माढा मतदारसंघात सरकारचे कान टोचावे लागले. त्यानंतर आज पाहतो तर हे सरकार अत्यंत गंभीर असल्याचे जाणवले. संपूर्ण राज्याने या घटनेची दुर्दैवी नोंद घ्यावी अशी आज शासनाची परिस्थिती झालेली आहे.

आम्ही सुरुवातीला काही गोष्टी सांगितल्या जातात पण आजच्या "सामना" दैनिकात बातमी आली आहे ती बातमी दूरदर्शनवर सुध्दा पाहिली आहे. कारण माननीय राज्यपालांकडून ज्यावेळेस सरकार मधील मंत्री पटापट बाहेर पडत होते त्यावेळेस आमचे दूरदर्शनवाले बाहेर उभ्ेच होते. पण नक्की काय सांगावे हे ठरले नव्हते. 3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .....

माननीय राज्यपालांकडे जात असताना खरे तर कॅबिनेटची छोटी बैठक होणे आवश्यक असते व त्या आधारे राज्यासंबंधीचे निश्चित मुद्दे मांडावेत असे असते.

यानंतर श्री. जुन्नरे ....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

माननीय राज्यपाल महोदयांनी काय अपेक्षा व्यक्त केली होती व त्यावर सरकार काय उपाययोजना केल्या जाणार आहेत. हा भाग महत्वाचा असतो.

काल माननीय राज्यपाल महोदयांकडून निघाल्यानंतर मिडीयाने मंत्र्यांना जे विचारले होते ते सर्व जनतेने पाहिले आहे. दुष्काळाच्या संदर्भात शासन काय उपाययोजना करणार आहे याबाबत माननीय मुख्यमंत्र्यांना माध्यमाने विचारले तेव्हा आदरणीय मुख्यमंत्री असे म्हणाले की, "माननीय राज्यपालांच्या आमंत्रणावरुन मी बैठकीला गेलो होतो. दुष्काळाविषयी मी आता काही सांगू शकत नाही. यासंदर्भातील निर्णय मदत व पुनर्वसन मंत्री आदरणीय श्री. पतंगराव कदम घेतील." त्यानंतर माननीय पतंगराव कदम यांना माध्यमाने विचारले असता ते असे म्हणाले की, "माननीय मुख्यमंत्री बुधवारी विधिमंडळात दुष्काळाच्या संदर्भात राज्य सरकारकडून घेतल्या जाणा-या निर्णयाच्या संदर्भात माहिती देणार आहेत. दुष्काळाचे पॅकेज जाहीर करावयाचे असतील तर त्यासंदर्भातील निर्णय तेच जाहीर करतील. जनतेने हे सर्व पाहिलेले आहे. मगरीचे आश्रू कसे असतात हे जनतेने पाहिलेले आहे. रानफुलाला वास नसतो परंतु त्याच्या रंगाची मजा सुगंधी फुलातही नसते व रान फूल फक्त जंगलातच सापडते. माननीय पतंगराव सभागृहात आल्या आल्या त्यांनी मला खुणावले. खरे म्हणजे आपणच आपल्या हाताने दगड मारुन घेण्यासारखा जो प्रकार असतो तो हा होता.

माननीय डॉ. पतंगराव कदम यांनी माझ्या हातात जी माहिती दिलेली आहे त्यामध्ये 1 फेब्रुवारी, 2012 रोजी पिण्याच्या पाण्याची टंचाई दूर करण्यासाठी हाती घेतलेल्या आकस्मिक निधीचा शासन आदेश आहे. त्यानंतर 3 जानेवारी रोजीचा चारा डेपो व जनावरांच्या छावण्या उघडण्याबाबतचा शासन आदेश आहे. 18 जानेवारी, 2012 रोजीचा शासन आदेश हा ज्या गावामध्ये 50 पैशापेक्षा कमी आणेवारी असणाऱ्या गावांमध्ये टंचाई परिस्थिती जाहीर करण्याबाबतचा आहे. खरीपाच्या संदर्भातील शासन आदेश 20 मार्च, 2012 रोजीचा आहे. दुष्काळाच्या संदर्भात शासनाने जानेवारी महिन्यातच शासन आदेश जाहीर केलेले होते. 19 सप्टेंबर, 2011 रोजी या पावसाळयात कमी पाऊस झाल्यामुळे गावांमध्ये दुष्काळी कामे तातडीने सुरु करण्याबाबतचा हा शासन आदेश आहे. दुष्काळ पडणार आहे याची शासनाला कल्पना आली होती. आपल्याच निवडणुकीत मश्गूल असलेले, जिल्हा परिषद व नगरपालिकेच्या निवडणुकीत

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

पैशानिशी सर्व ताकद लावणारे मंत्री-संत्री, व पुढाऱ्यांना या दुष्काळाची जाणीव नसल्यामुळे माननीय शरद पवार साहेबांनी जेव्हा कान टोचले तेव्हा हे खडबडून जागे झाले आणि धावाधाव करण्यास सुरुवात केली. या दुष्काळामध्ये जनता टाचा घासतच पुढे चालली आहे. दुष्काळी भागाच्या परिस्थितीचे आम्ही जे अवलोकन केलेले आहे ते फार गंभीर आहे.

यानंतर श्री. भारवि...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

जानेवारी, नोव्हेबर महिन्यामध्ये आदेश निघालेत. काल आमची आयबीएन लोकमत वर मुलाखत होती. त्यावेळी माननीय मंत्री श्री.पतंगराव कदम देखील उपस्थित होते. त्यांनी काल जनतेला सांगितले की, चारा डेपो अजून सुरूच झाले नाहीत.

श्री.पतंगराव कदम : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते हे अनुभवी आहेत,अभ्यासू आहेत. छावण्या आणि चारा डेपो या मधील फरक त्यांच्या लक्षात आलेला नाही असे दिसते. त्यामुळे तो फरक मी त्यांच्या लक्षात आणून देतो. डेपो सुरू झाले आहेत. मी कालही सांगितले होते आणि आताही सांगणार आहे की, छावण्या सुरू झालेल्या नाहीत.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, त्यांनी माझ्या अनुभवाबद्दल सांगितल्या बद्दल मला खूप कौतुक वाटले. मागच्या दुष्काळामध्ये या शासनाने जनावरांसाठी ज्या छावण्या काढल्या होत्या त्याची मी स्वत: पाहणी केली आहे. मी बीड पासून पश्चिम महाराष्ट्रातल्या छावण्या बघितल्या होत्या. जवळ जवळ 25 छावण्या बघितल्या नंतर मी सहजपणे विचारले की, जे शेण पडते त्याचे करता काय ? त्यावेळी श्री.नितीन गडकरी हे माननीय विरोधी पक्ष नेते होते. त्यांच्याशी मी चर्चा केली. त्यांनी मग याचा हिशोब काढला व शासनाने 3 कोटीचे शेण खाल्ले असे ते वर्षभर सांगत होते. तीन कोटीचे शेण या सरकारने खाल्ले हा कौतुकाचा विषय होता. त्यामुळे छावण्यांबद्दल मला आपण काहीही सांगू नका. मी स्वत: सगळीकडे फिरलो आहे. मी स्वत: जाऊन छावण्या बघितल्या आहेत. छावण्यांमध्ये जन्माला येणारे बछडे कुठे आहेत ? हा ही प्रश्न त्यावेळी निर्माण झाला होता. आज किती चारा येतो आहे, असा प्रश्न मी आपल्याला विचारणार आहे. आताच मला एसएमएस आला आहे की, सांगली मध्ये पाऊस पडला आहे. आटपाडीमध्ये मध्ये 76 हजार पशुधन असल्याचा पहिला एसएमएस आला आहे. सरकारने फक्त 5500 पशुधनांची व्यवस्था केली आहे. हे एमएमएस तेथून आले आहेत. जत मध्ये दर महिन्याला 1700 ते 1800 टन चाऱ्याची आवश्यकता आहे. आपण फक्त 320 टन चाऱ्याची व्यवस्था केली आहे. चाऱ्याचा दर प्रतिकिलो 27 रूपये आहे. मोठ्या म्हशीला 15 किलो आणि बछड्याला 7 किलो चारा लागतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

शेतकरी हा चारा घेऊ शकत नाही. 75 टक्के आणि 25 टक्क्यांसंबंधी आपले आदेश आहेत. सांगली जिल्हा टॅन्कर मुक्त करण्याची घोषणा आदरणीय श्री.पतंगराव कदम आपल्या उपस्थितीत दोन वर्षापूर्वी झाली. त्यावेळी आपण पालक मंत्री होतात. ही वस्तुस्थिती आपण नाकारू शकत नाही. आज गाव टॅन्कर शिवाय चालू शकत नाही अशी स्थिती आहे. त्यामुळे पालक मंत्री म्हणून आपण कोणती जबाबदारी स्वीकारणार आहात हे देखील सांगितले पाहिजे. आपण पालक मंत्री असताना जनतेवर पाण्यासाठी तडफडण्याची पाळी येत आहे. दोन वर्षापूर्वी झालेल्या घोषणेची अंमलबजावणी अजून होत नाही. ती का झाली हे आपणास सांगावे लागेल.

आज 20 तास लोड शेडींग आहे. त्यामुळे आपले टॅन्कर कसे काय भरून येणार आहेत ? मी शासकीय यंत्रणेला आणि आमच्या पक्षाच्या कार्यकर्त्यांना न सांगता भेट दिलेली आहे. कारण मला यात राजकारण आणावयाचे नव्हते. सत्य परिस्थिती जाणून घ्यायची होती. लोकांचे अश्रू पुसत असताना राजकीय अभिनिवेश असता कामा नये. शासन कमी कुठे कमी पडते आहे ते सांगण्यासाठी आम्ही उभे आहोत. आम्ही टीका करायला उभे नाहीत. हे शासन हतबल होणार असेल तर ते विरोध पक्षाने सहनही करता कामा नये, हा लोकशाहीचा संकेत आहे. जरा टीका केली की, उठायचे हे चालत नाही.

मी दुष्काळ बघितला आहे. दुष्काळामध्ये मी स्वत: छावण्या चालविल्या आहेत. 1986-87 च्या दुष्काळामध्ये मराठवाड्यामध्ये दोन रूपये किलोने जनावरे कापली जात होती. ते मांस हैद्राबादला जात होते. हे सगळे आम्ही पाहिलेले आहे. त्या दुष्काळामध्ये आम्ही काम केले आहे. मी काल जे उदाहरण दिले ते मी येथे मुद्दाम देतो. मला येथे व्यक्तिगत टीका करायची नाही. सरकारला जाणीव असली पाहिजे. मंत्र्याला जाणीव असली पाहिजे. कामगारांमध्ये जाऊन झुणका भाकर खायली आणि सांगायचे बघा मी कसा लोकांमध्ये मिसळतो आहे. याला लोकांमध्ये मिसळणे म्हणत नाही. त्याने लोकांना कणवपण येत नाही. मुख्यमंत्री माझ्या बाजूला बसले एवढाच आंनद त्या लोकांना होतो. त्या निमित्ताने त्यांचा एक दिवस फुकाचा आनंदाचा जातो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

भूकंप झाल्यानंतर मी तीन वर्षे काम केले आहे. पण प्रसिद्धी केली नाही. मला त्यावेळचे श्री.शरद पवार साहेब आठवतात. त्यावेळचे श्री.रामराव आदिक साहेब आठवतात. त्यावेळी ते उप मुख्यमंत्री होते. श्री.शरद पवार साहेबांनी एक महिनाभर तेथून मंत्रालय चालविले. ते महिनाभर तेथे बसून होते. आम्ही शिवसैनिक व पदाधिकारी त्यांना भेटत होतो. गाव विकसित करण्यासाठी योजना मांडत होतो. त्यावेळी आमचा सहभाग मागितला होता. त्यावेळी टीका केली नाही. शिवसेनेने एक गाव उभे केले. तुम्ही तेथे बसलात. तेथे गेलात.

यानंतर श्री.सरफरे...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते....

हे सांगण्यास मला अत्यंत कमीपणा वाटतो की मी कवठेमहाकाळ आणि जत तालुक्यामध्ये स्वत: गेलो. आमचे माननीय मंत्री श्री. आर.आर. पाटील साहेबांचा हा मतदारसंघ आहे. सर्वात दुर्दैवी परिस्थिती त्या मतदारसंघामध्ये आहे की नाही हे आपण मला सांगावे? तेथील लोकांनी आपल्या नेत्यांना विचारल्यानंतर आपले नेते सांगतात की, मी देशाचा नेता असल्यामुळे मला महाराष्ट्रामध्ये बघायला वेळ नाही. हे मी स्पष्टपणे ऐकले आहे, विनाकारण मला कुणावरही टीका करावयाची नाही. माननीय मंत्री श्री. आर.आर. पाटील साहेबांवर तर बिलकुल टीका करावयाची नाही. या राज्याच्या मंत्री मंडळातील तीन प्रमुख मंत्री म्हणजे माननीय मंत्री डॉ. पतंगराव कदम साहेब आपण स्वत:, दुसरे माननीय मंत्री श्री. आर.आर. पाटील साहेब आणि तिसरे मंत्री माननीय श्री. जयंतराव पाटील साहेब हे सांगली जिल्ह्यातील आहेत. आपली ज्याच्यावर श्रध्दा असेल त्याच्यावर हात ठेवून मला सांगा की, आपण निवडणुकीमध्ये किती पैसा खर्च केला? त्यापैकी 10 टक्के रक्कम खर्च करुन आपण "डॉ. पतंगराव कदम" या नावाने एखादी गुरांची छावणी सुरु केली असती तर हजारो जनावरांना चारा आणि पाणी मिळाले असते. त्या शेतकऱ्याला समाधान वाटले असते. माझे ढोर जगत आहे तर मग मी सुध्दा जगेन असा त्याला विश्वास वाटला असता. तुम्ही हे काम केले कां? मी तुम्हाला तुमच्या साखर कारखान्याबद्दल विचारले, माननीय मंत्री श्री. जयंतराव पाटील साहेबांच्या कारखान्याबद्दल विचारले. तुम्ही कारखाने विकत घेतले त्याबद्दल माझी तक्रार नाही. तो विषय वेगळया स्वरुपाचा आहे. त्या भागातील शेतकऱ्यांनी करोडो रुपयांची हमी तुमच्याकडे देऊन हे साखर कारखाने उभे केले आहेत. ज्यावेळी हे तालुके मरणासन्न परिस्थितीत येतात त्यावेळी मदत करण्यासाठी यापैकी एक तरी कारखाना पुढे आला काय, एखाद्या तरी कारखान्याने जनावरांची जबाबदारी घेतली काय, आम्ही पाच हजार जनावरे दत्तक घेतो, आम्ही दोन हजार जनावरे दत्तक घेतो, ही पाचशे जनावरे मी घेतो आणि पावसाळा सुरु झाला की आपण आपली जनावरे घेऊन जा, त्या जनावरांकरिता डॉक्टरपासून सर्व व्यवस्था करतो असे आपल्याला किती कारखाने म्हणाले हे मला सांगा मी त्या बाबत खुलासा करतो. तिजोरीतील पैसा कसा उपसायचा आणि दुष्काळाच्या नावाने कसा वाटायचा एवढे जर तुम्ही करणार असाल तर त्याला दुष्काळाचे नियोजन म्हणत नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते....

सभापती महोदय, आता माननीय विरोधी पक्षनेत्यांनी सांगितले की, मिरज तालुक्यापासून 10 कि.मी.वर असलेल्या भोसेगाव येथे 40 रुपयांनी पाण्याचे बॅरल विकत आहेत. यामध्ये खराब पाण्याच्या बॅरलला 50 रुपये आणि पिण्याच्या पाण्याच्या 5 लिटरच्या कॅनला 40 रुपये या भावाने पाण्याची विक्री केली जात आहे. आपण म्हणालात की, 5 लिटर पाण्याची किंमत एक रुपया आणि दीड रुपया ठेवली आहे. परंतु तुमच्या आदेशामध्ये स्पष्ट केलेले सर्व कागदावरच राहिले आहे. अशाप्रकारे पाण्याची विक्री करणारे धनदांडगे कोण आहेत, दुष्काळी परिस्थितीचा फायदा घेऊन अशाप्रकारचा धंदा कोण करीत आहेत, त्यांच्यावर शासन म्हणून तुमचे नियंत्रण आहे काय, तुम्ही अशाप्रकारची कोणती व्यवस्था निर्माण केली आहे जेणेकरुन या दुष्काळी परिस्थितीचा गैरफायदा घेऊन लुटालूट होणार नाही? एका बाजूला गावातील शेतकरी दुष्काळी परिस्थितीमुळे त्रस्त झाले असतांना दुसऱ्या बाजूला त्या परिस्थितीचा गैरफायदा घेणारे लोक निर्माण होत आहेत.

सभापती महोदय, त्या नंतर मी कडब्याच्या संदर्भात मुद्दा मांडणार आहे. आपल्या जनावरांना सुका कडबा लागतो, तो आपण कां आणीत नाही, आमची जनावरे कसायाकडे गेल्यानंतर कडबा आणणार काय? शेवटच्या पाच मिनिटांमध्ये मी अनुभवलेली दुष्काळातील जनावरांची परिस्थिती नक्की मांडणार आहे. त्या जनावराला दोन किलो कडबा खायला घातला तर ते स्वतःच्या पायावर उभे रहाते. आपल्याला जनावरे जगवायची आहेत की फक्त त्यावर झालेला खर्च दाखवायचा आहे असा प्रश्न निर्माण झाला आहे. सभापती महोदय, मजुरांची संख्या 12 हजार 86 असल्याचे या ठिकाणी सांगण्यात आले आहे. परंतु माननीय श्री. आर.आर. पाटील यांनी तर सर्वांच्या समोर तुमची हजामतच करुन टाकली आहे. "तू कशाला गेली होतीस, ती म्हणते मी गेलेच नव्हते, तर मग तुझे नाव छापून कसे आले?" हे दृश्य संपूर्ण महाराष्ट्राने पाहिले आहे. मी परवाच्या दिवशी सभागृहात उभा राहिलो परंतु तो माझा विषय नव्हता. त्यावेळी आमचे पुण्याचे सन्माननीय सदस्य श्री. जोशी साहेब बोलले. ज्या कै. वि.स.पागे यांनी महाराष्ट्रासाठी रोजगार हमी योजना निर्माण केली त्या योजनेचे कौतुक करतो असे सांगता, संपूर्ण देशाने ती योजना स्वीकारल्याचे सांगता त्यावेळी आपल्या पुणे जिल्ह्यामध्ये रोजगार हमी योजनेचा बट्टयाबोळ
झाल्याचे संपूर्ण महाराष्ट्र पहातो. असे असतांना आपण कोणती जन्मशताब्दी साजरी करीत आहात?

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते . . . .

या ढोंगाला माझा विरोध असतो. आम्ही बोलतो त्या मागे आमच्या विरोधाच्या वेगळया धारा नसतात. आजही हे घडत आहे. तुम्ही आज देंखील तेथे जाऊन पाहिल्यावर दिसेल की, तेथे रोजगार हमी योजनेची कामे नाहीत आणि हे तुम्हाला माहिती आहे, दादांना माहिती आहे तसेच सन्माननीय सदस्य श्री.विक्रम काळे यांनाही माहिती आहे.

सभापती महोदय, आम्ही मराठवाड्यामध्ये कामे करतो तेव्हा तेथे कार्यकर्ते जातात, तेथे पक्षाचे सर्व कार्यकर्ते कामाला लागतात. उद्ध्वस्त नागरिकांसाठी रोजगार हमी योजना काढलेली आहे त्याठिकाणी ते नियंत्रण करतात. पण यांच्या पक्षाचा कार्यकर्ता हा मला काम कसे मिळेल याकरता हजर आहे. पण त्याठिकाणी काय परिस्थिती आहे आणि तेथील उद्ध्वस्त शेतकऱ्यांना वाचविण्यासाठी कोण धावत येतात? तुमच्या पक्षाची यंत्रणा काम करीत आहे का ते सांगावे आणि मी अधिकाराने सांगतो की, तुमच्या पक्षाची यंत्रणा काम करीत नाही. या वेळेला आम्ही तिकडे शिवसेनेची यंत्रणा मुद्दाम लावलेली नाही. कारण तुमची याबाबतीत काय धावपळ सुरु आहे ते आम्हाला पहावयाचे आहे. आम्ही जेव्हा त्या मैदानामध्ये उतरु तेव्हा त्या पध्दतीनेच उतरु. अशा प्रकारे तुम्ही काम करीत आहात काय ? आम्ही ते करतो हे तुम्हालाही माहिती आहे. पण तुम्ही काय करीत आहात? केवळ सरकारी माध्यमातून निधी कसा येईल आणि त्यातला अर्धा कसा उद्ध्वस्त करता येईल यासाठी टपून बसलेल्या डोम कावळयांकरता दुष्काळाच्या संबंधातील योजना राबविणार आहात काय ? हा प्रश्न आहे.

सभापती महोदय, मी येथे नाव घेतले तर पंचाईत होईल पण मी त्यांना भेटलो. वेळू गावातील काँग्रेसचे जत येथील माजी सभापती यांनी मला सांगितले की, जानेवारीमध्ये सचिव स्तरावरील समिती आली होती पण ती गावापर्यंत गेलीच नाही आणि जर ते सत्य असेल तर ते मान्य करावे लागेल. माननीय मंत्री डॉ.पतंगराव कदमसाहेब, हा तुमचा दोष नाही.पण हे सचिव तेथे जाऊन आणि कुठेतरी बैठक घेऊन, त्या गावामध्ये न जाताच काहीतरी अहवाल तयार करणार असतील आणि ही बाब निवडून आलेले पदाधिकारी जर सांगत असतील तर या बाबतीत त्या लोकांच्या व्यथा काय आहेत हे तुम्ही जाणून घेणार आहात काय? मग माननीय मुख्यमंत्र्यांचा दौरा झाला. कवठे-महांकाळच्या पूर्व भागामध्ये पाणी आहे, त्यामुळे सुबत्ता आहे. परंतु पश्चिमेला संपूर्ण दुष्काळ आहे.एका डोळ्यामध्ये अश्रू आहेत आणि एका डोळ्यामध्ये तप्त अशी आग आहे अशी कवठे-महांकाळची परिस्थिती आहे. 11 नोव्हेंबरपासून अशी परिस्थिती असताना सुध्दा याबाबतीत

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते . . . .

एम.एस.सी.बी.च्या उजेडाचे काय झाले याचे वर्णन कसे करावयाचे हा प्रश्न पडतो. गावकऱ्यांनी बोअर मारल्या. पाणी लागले पण तेथे विजेचे खांब टाकण्यासाठी एवढा प्रचंड खर्च येणार आहे म्हणून आकडे टाकले तर त्यांचे पंप जप्त करीत आहेत. याबाबतीत माहिती मागितली तर कोणकोणते पंप जप्त करण्यात आले आहेत याची मी नावानिशी आकडेवारी देईन. ही तुमची यंत्रणा आहे काय ? लोकांना पाणी मिळाले आणि त्यासाठी लोकांनी आकडे टाकले. कारण तुम्ही पाच-पाच नवीन पोल टाकण्यासाठी जो खर्च मागता, तो त्यांना परवडत नाही. म्हणून ते आकडे टाकून पाणी उपलब्ध करुन घेत आहेत तर त्यांच्यावर गुन्हे दाखल केले, त्यांचे पंप जप्त केले आणि मग एम.एस.ई.बी.चे महावितरणचे अधिकारी त्यांच्यावर दंडात्मक कारवाया करीत आहेत.

सभापती महोदय, वीज बिलामध्ये 30 टक्के सवलत दिलेली आहे आणि माननीय मुख्यमंत्र्यांनी विजेच्या बाबतीत असे आदेश दिलेले आहे की, दुष्काळी परिस्थितीमध्ये वीज कापू नये. हे बरोबर आहे आणि सध्या विजेच्या वसुलीला स्थगिती दिलेली आहे. याठिकाणी "स्थगिती" असा शब्द वापरला आहे. याचा अर्थ आता त्यांच्याकडून वसुली करु नका पण नंतर बडगा उगारुच. शासनाच्या सरकारी आदेशात काय म्हटले आहे तर टंचाई सदृश्य परिस्थिती आणि दुष्काळी परिस्थिती सारखीच आहे. विजेच्या संदर्भात, शाळेतील मुलांच्या संदर्भात ही परिस्थिती आहे आणि आता तेथील वसुली माफ करणार आहात काय असा प्रश्न आहे. तसेच तेथे डाळींबांच्या बागा आणि द्राक्षाच्या बागांची जी परिस्थिती निर्माण झालेली आहे, ती अत्यंत गंभीर असून ही फळे कुजत चालली आहेत. तेव्हा माननीय मंत्री डॉ.पतंगराव कदम आपण आज घोषणा करुन धुळे, नाशिक येथील जे फळबागवाले आहेत त्यांना एकरी किती नुकसान भरपाई देण्यात येणार आहे हे जाहीर करणार आहात काय ? कारण तेथील बागा सुकून गेल्या आहेत. तसेच तुमच्या भागातील खिल्लारी जोडी आणि आमच्याकडे देवणी गाय, मी जनावरांचे नाव कुठेच घेत नाही. कारण जनावरांचे नाव घेतले की कोणाच्या तरी भावना दुखावतात. मग माशीही उडवता येत नाही आणि अब्रूही राखता येत नाही अशी सगळी गडबड होते. म्हणून मी हल्ली जनावरांची नावे घेणे बंद केले आहे.

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखीसाठी नाही

यानंतर श्री.अ.शिगम . . . .

श्री.दिवाकर रावते..

जेथे खिल्लाऱ्या जोडीची पैदाईश होते तेथील परिस्थिती अतिशय गंभीर झालेली आहे.

सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी येथे छावणी संदर्भात जरुर सांगावे. मी काही छावण्यांचे फोटो काढलेले आहेत. मी विचारले छावणी का काढली आहे, तर मला सांगण्यात आले की, आम्हाला अनुदान मिळते तेव्हा आम्ही आतापासून त्याची तयारी करीत आहोत. व्हिडिओ शुटींग करुन ठेवत आहोत. योजना जाहीर झाली की, आम्ही ते व्हिडिओ शुटींग दाखवून किती जनावरांना चारा देण्यात आला हे दाखवून त्या प्रमाणे अनुदान मिळविणार. मला तेथील आमदारांनी विचारले की, "आम्ही तुम्हाला तेथे पाहिले नाही." मी माझ्या पध्दतीने जातो आणि काम करुन येतो. हा प्रसिध्दीचा विषय नाही. लोकांच्या डोक्यावर भीषण संकट असताना त्यांना धीर देणे हे कार्यकर्त्याचे कामे असते. परंतु यातून काही निंदानालस्ती निर्माण करावी आणि आपण काही तरी निर्माण करीत आहोत असे जो करतो तो कार्यकर्ता नसतो. दुष्काळी भागातील जनावरे मरायला लागली आहेत. तेव्हा छावण्यांच्या संदर्भात कोणता निर्णय घेणार आहे हे शासनाने जाहीर करावे.

सभापती महोदय, डळफळी कारखाना 65 कोटी रुपयांना कोणी विकत घेतला हे माननीय मंत्री महोदयांनी सांगावे. हा दुष्काळी भागातील कारखाना आहे. 200 कोटी रुपयांची प्रॉपर्टी आहे.

डॉ.पतंगराव कदम (बसून) : 48 कोटी रुपयांना घेतला.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, म्हणजे माझी चुकीची माहिती आहे. या कारखानदारांनी नक्की काय निर्माण केले ? वर्तमानपत्रात वाचले की, शासनाने एक नवीन आदेश काढलेला आहे. या ठिकाणी वार्ताहर कशासाठी बसतात ते आम्हाला कळत नाही. कारण वार्ताहर काय लिहितात ते ऐकायचे नाही, बोलायचे नाही. पुढारी वर्तमानपत्रात "बाबा, तुमचे मंत्री काय करतात ?" असा जाहीरपणे प्रश्न विचारलेला आहे. त्या मंत्री महोदयांमध्ये डॉ.पतंगराव कदम आपण सुध्दा आहात काय हे मला माहीत नाही. त्यांना अभिप्रेत असलेल्या मंत्री महोदयांनी काय केले असा प्रश्न निर्माण झालेला आहे.

सभापती महोदय, मी या ठिकाणी जो मुद्दा मांडणार आहे तो अतिशय दुर्दैवी आहे. मनाला वेदना देणारा आहे. माननीय राज्यपाल पश्चिम महाराष्ट्रावर अन्याय करीत असल्याचे चित्र कालच्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते..

चर्चेत दिसले. दुष्काळी भागातील जनतेला पाणी देणे, जनावरांना चारा देणे, त्यांना रेशन देणे, त्यांची इतर व्यवस्था पाहणे आणि पावसाळ्यापर्यंत त्यांना आधार कसा द्यायचा ही चर्चा नाही, उपाय योजनांचे सोयरसुतक नाही. पश्चिम महाराष्ट्रातील फक्त पाच-सहा तालुक्यांमध्ये दुष्काळ आहे. परंतु महाराष्ट्रातील इतर दुष्काळी तालुक्यांची चर्चा नाही, ही अतिशय खेदाची गोष्ट आहे. माननीय राज्यपालांनी आमचा निधी पळविला म्हणून दुष्काळ पडला असे सांगण्यात आले. मी कुणाचे नाव घेतले तर आपणास ॲलर्जी होते.

सभापती महोदय, गुजरातचे मुख्यमंत्री श्री.नरेंद्र मोदी यांनी नर्मदा नदीचे पाणी आणून ज्या भागात वाळवंटासारखी परिस्थिती होती तेथे नंदनवन फुलविले. पश्चिम महाराष्ट्रामध्ये हजारो कोटी रुपये देण्यात आले म्हणून अनुशेष निर्माण झाला. मराठवाडा आणि विदर्भामध्ये आताच अनुशेष निर्माण झालेला नाही. युती शासनाने कृष्णा खोरे प्रकल्प राबविला कारण ते काम सन 2000 पर्यंत पूर्ण करणे आवश्यक होते. परंतु त्यातील काही निधी या चार-पाच दुष्काळी तालुक्यांसाठी आपण का वापरला नाही ? आपण टनेल काढून पाणी पुढे नेले. परंतु या दुष्काळी तालुक्यांना ते पाणी दिले नाही. कळंबोली उंचावर आहे. परंतु तेथे लिफ्ट करुन पाणी दिलेले आहे. मराठवाड्यातील नांदेडला टनेल मधून पाणी नेले. टेंभू हा पाच लिफ्टचा प्रकल्प आहे. परंतु त्यासाठी केवढी वीज खर्च होणार आहे ? पण आपणास पाणी पाहिजे ना ? परंतु डॉ.पंतगराव कदम आपणास हा प्रकल्प अजून पूर्ण करता आलेला नाही. हा आपला दोष नाही. पश्चिम महाराष्ट्रातील चार-पाच तालुके कायम दुष्काळी आहेत. हे तालुके कायम दुष्काळी आहेत , परंतु आज त्या ठिकाणी भीषण परिस्थिती निर्माण झालेली आहे. त्या ठिकाणी आपणास पाणी लिफ्ट करता आले नाही.

यानंतर श्री.बरवड..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .....

आपण टनेल काढून काल कराडमध्ये पाणी आणले. आमच्या भगिनींनी ओवाळून पाण्याचे कसे स्वागत केले हे आपण पाहिले. त्या ठिकाणी जंगी कार्यक्रम केला. त्या ठिकाणी टनेलमधून 400 क्सुसेक्स पाणी आले. भीमा-कृष्णा योजनेच्या बाबतीत मी या सभागृहामध्ये भाष्य केलेले आहे. 1200 कोटी रुपयांच्या नद्या जोड प्रकल्पातून काम घेतलेले आहे. थेट बारामतीपर्यंत टनेलच्या माध्यमातून 80 किलोमीटर वेगाने पाणी येणार आहे. त्या ठिकाणी 200 कारखाने उभे राहणार, बारमाही शेती उभी राहणार. असे असताना या चार-पाच तालुक्याने काय केले ? म्हैसाळ योजनेचे पाणी पुढे नेत आहेत. काल साताऱ्यामधून टनेलच्या माध्यमातून सांगलीमध्ये 400 क्युसेक्स पाणी गेले. ते पाणी कोठे गेले ? पाण्याच्या बाबतीत ही परिस्थिती असताना आपण विदर्भ आणि मराठवाड्याच्या माथ्यावर दोष देत आहात हे मला अत्यंत खेदाने नमूद करावेसे वाटते. काल ते सर्व पाहिल्यानंतर कालपासून आम्ही विदर्भ-मराठवाड्यातील लोक कर्मदरिद्री आहोत असे आम्हाला वाटावयास लागले आहे.

सभापती महोदय, अतिदुष्काळ पडलेला असताना मी स्वत: जाऊन पाहिलेले आहे. सन्माननीय सदस्य श्री. पांडुरंग फुंडकर यांनी जाऊन पाहिलेले आहे. आम्हाला दोघांनाही आठवते. आम्ही शेतातील चिखल तुडविलेले आहेत. अवकाळी पावसाने वाटोळे केले तेव्हा आम्ही शेतामध्ये जाऊन पाहणी केली. आम्ही शेतकऱ्यांच्या घरांमध्ये गेलेलो आहोत. ज्या ज्या वेळी त्या ठिकाणी पाऊस पडला नाही आणि उजाडपणा आला त्या त्या वेळी आम्ही शेतकऱ्यांच्या दरामध्ये उभे राहिलेलो आहोत. एकही मंत्री फिरकला नाही. पालकमंत्री फिरकले नाहीत. परंतु या ठिकाणी चार तालुके दुष्काळग्रस्त झाल्याबरोबर संपूर्ण मंत्रिमंडळ, मंत्र्यांचे जथ्थे त्या ठिकाणी धावतात आणि विदर्भ, मराठवाड्यातील लोक एवढे कर्मदरिद्री आहेत की, त्या ठिकाणी कोणीही येत नाहीत. हा संताप आहे. कोकणाच्या बाबतीत सुध्दा तसेच आहे. मला संताप अनावर होत आहे. त्या ठिकाणी मंत्री कधीही कसे येत नाहीत ? मी कधीही त्यांची फेरी बघितलेली नाही. पालकमंत्र्यांच्या बैठका बघितलेल्या नाहीत. कधी तरी नागपूरला यावयाचे, कधी तरी अमरावतीला यावयाचे दुष्काळग्रस्तांच्या संदर्भात बैठक घ्यावयाची, काहीही योजना करावयाच्या नाहीत, तिकडच्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .....

शेतकऱ्यांनी आत्महत्या करुन मरावयाचे आणि या 4 तालुक्यांसाठी मुख्यमंत्री तसेच आदरणीय श्री. शरद पवार साहेब तसेच संपूर्ण मंत्रिमंडळ धावत आहे आणि ते सगळे आपण दाखवित आहात. आम्ही विदर्भ-मराठवाड्यातील लोक एवढे कर्मदरिद्री आहोत का ? अनुशेषाच्या नावाने कंठ फोडत आहात. चार तालुक्यांवर राज्यपालांनी अन्याय केला म्हणून घोषणा करीत आहात.

सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्र्यांनी सांगितले की, 2 हजार कोटी रुपयांपैकी 700 कोटी रुपये येणे बाकी आहे. कोणी पैसे खाल्ले ? या 700 कोटी रुपयांपैकी 200 कोटी रुपये सोडले तर बाकीचे पैसे वर्ध्यातील प्रकल्पाचे आहेत. ते का दिले नाहीत ? भ्रष्टाचार केला म्हणून केंद्र सरकारने 700 कोटी रुपये अडवून ठेवले. मला वाईट वाटते की, या दुष्काळग्रस्त परिस्थितीत विदर्भ-मराठवाड्याला माननीय राज्यपालांच्या माध्यमातून सोलून काढून इकडे पैसे वळवून विदर्भ-मराठवाड्याला आपण कायमस्वरुपी शापित ठेवलेले आहे. त्यामध्ये कोकण सुध्दा आहे. कोकणामध्ये पाणी भरपूर आहे. सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम हे कोकणाच्या संदर्भात बोलणार आहेत. काल माननीय मंत्री महोदय श्री. सुनील तटकरे पाणी वळविणार आहोत असे जे म्हणाले त्या संदर्भात ते बोलणार आहेत. मी ज्या भागात काम केले आहे त्या भागाबद्दल बोलतो. मी खरोखरच कोकणातील कोणत्याही प्रकल्पाची पाहणी केलेली नाही. मला जी माहिती आहे तेवढ्यापुरतेच मी बोलतो. या सदनामध्ये अज्ञानातून एखादी चुकीची गोष्ट सांगणे बरोबर होणार नाही.

सभापती महोदय, मला या गोष्टीचा खूप संताप आला. या माध्यमातून दुष्काळग्रस्त उद्ध्वस्त शेतकऱ्यांना वाचविण्याकरिता शासन काय उपाययोजना करणार हे ऐकण्याकरिता आम्ही बसलेलो आहोत. त्यांच्या लेकरांच्या तोंडामध्ये चार घास कसे जातील यासाठी दोन महिन्यात रेशनची काय व्यवस्था करणार हे ऐकण्यासाठी आम्ही बसलेलो आहोत. तेथील गुरे-ढोरे, पशुधन कसे टिकेल यासाठी शासन काय करणार आहे हे ऐकण्यासाठी आम्ही बसलेलो आहोत. या चार जिल्ह्यांचा फायदा घेऊन विदर्भ आणि मराठवाड्याच्या अनुषेशाच्या बाबतीत, तेथील शेतकऱ्यांच्या आत्महत्येच्या संदर्भात आपण आधीच बरेच लुटून घेतलेले आहे आणि त्यांना आपण अशा प्रकारे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .....

आणखी बदनाम करणार असाल तर ते आम्ही कोणत्याही परिस्थितीमध्ये सहन करणार नाही असा इशारा मी या निमित्ताने देतो. आपण संपूर्ण दुष्काळी भागाकरिता ज्या उपाययोजना कराल त्यासाठी विरोधी पक्ष म्हणून आपल्याला आमचे जे सहकार्य पाहिजे ते मोकळ्या मनाने आणि कोणतीही आडकाठी न आणता देऊ एवढे मी आपल्याला निक्षून सांगतो आणि माझे भाषण संपवितो.

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रभाकर घार्गे (सांगली-सातारा स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, महाराष्ट्रातील काही विभागात मग विदर्भ असेल, मराठवाडा असेल, खानदेश असेल आणि विशेषकरुन पश्चिम महाराष्ट्रामध्ये जो भीषण दुष्काळ पडलेला आहे त्यामुळे अनेक प्रश्न निर्माण झालेले आहेत. त्यामध्ये प्रामुख्याने पिण्याच्या पाण्याचा प्रश्न निर्माण झालेला आहे. जर आपण पिण्याच्या पाण्याच्या बाबतीत विचार केला तर पश्चिम महाराष्ट्रातील सांगली, सातारा, सोलापूर, बीड अशा सहा सात जिल्ह्यांमध्ये दोन्ही वेळचा पाऊस पडलेला नाही.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रभाकर घार्गे...

मान्सूनचा पाऊस पडलेला नाही आणि परतीचाही पाऊस पडलेला नाही. काही विभागात परतीचा पाऊस पडलेला नाही. त्यामुळे त्या विभागामध्ये पाण्याची अतिशय भीषण टंचाई निर्माण झालेली आहे. पाण्याची टंचाई दूर करण्यासाठी शासनामार्फत टँकरने पाणी पुरवठा केला जात आहे. टंचाईच्या संदर्भात अनेक बैठका झालेल्या आहेत, अनेक मंत्री महोदयांनी टंचाईग्रस्त भागात दौरे केले आहेत. तरी सुध्दा पिण्याच्या पाण्यासाठी परिपूर्ण व्यवस्था झालेली नाही. मी सांगली व सातारा या विभागाचे प्रतिनिधीत्व करतो. सातारा जिल्ह्यातील खटाव, माण, फलटण, कोरेगाव हे तालुके आणि सांगली जिल्ह्यातील जत, आटपाडी, कवठेमहांकाळ व खानापूर या तालुक्यांमध्ये पिण्याच्या पाण्याची अतिशय टंचाई निर्माण झालेली आहे. या तालुक्यातील गावांमध्ये टँकरने पाणी पुरवठा सुरु असला तरी टँकर्सची संख्या खूप कमी आहे. खटाव तालुक्यामध्ये 140 गावे आहेत, 50 वाड्या वस्त्या आहेत. परंतु या सर्व गावांसाठी केवळ 30 ते 35 टँकर्सने पाणी पुरवठा सुरु आहे. त्यामुळे शासनाच्या निकषाप्रमाणे माणसी 20 लिटर पाणी मिळू शकत नाही. लोकांना पुरेसे पाणी मिळणे आवश्यक आहे. माण तालुक्यामध्ये तशीच परिस्थिती आहे. या तालुक्यात 105 गावे व 1 वाडी आहे. तेथे केवळ 40-45 टँकर्सद्वारे पाणी पुरवठा सुरु आहे. मला आपल्या माध्यमातून शासनाला असे सांगावयाचे आहे की, ज्या गावांमध्ये पिण्याच्या पाण्याची टंचाई आहे ती दूर करण्यासाठी आवश्यक असलेली साधनसामग्री व योग्य नियोजन करणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, या विभागांमध्ये जनावरांच्या चाऱ्याचाही प्रश्न निर्माण झालेला आहे. सन 2003-04 मध्ये दुष्काळ पडला होता. त्यावेळी जनावरांना जगविण्यासाठी छावण्या उभ्या करण्यात आल्या होत्या. या वेळच्या दुष्काळी परिस्थितीत छावण्यांचा चांगला वाईट अनुभव आला असेल. सध्या शासनाने जनावरांच्या चाऱ्यासाठी चारा डेपो सुरु केले आहेत. परंतु हे चारा डोपो गावापासून 20 ते 25 कि.मी.अंतरावर सुरु केले आहेत. इतक्या लांबच्या अंतरावरुन चारा आणणे शेतकऱ्यांना अवघड झालेले आहे. त्यामुळे जनावरे जगवावी कशी असा त्यांच्यासमोर प्रश्न निर्माण झालेला आहे. त्यामुळे माझी शासनाला विनंती आहे की, 4-5 कि.मी.अंतरावर चारा डेपो सुरु केले पाहिजेत किंवा 4-5 गावांसाठी एक चारा डेपो सुरु करावा. आज कारखान्याच्या माध्यमातून चारा म्हणून ऊस दिला जातो. एप्रिल महिन्यामध्ये साखर कारखाने बंद झाल्यानंतर पुढच्या काळात जनावरांना तो चारा सुध्दा मिळणार नाही.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रभाकर घार्गे....

सभापती महोदय, माणसांना लागणाऱ्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न निर्माण झालेला आहे. तसेच जनावरांना लागणाऱ्या पाण्यासाठी कसलेही नियोजन करण्यात आलेले नाही. या विभागांमध्ये दोन्ही वेळचा पाऊस पडलेला नसल्यामुळे प्रती जनावरासाठी 40 लिटर देण्यासाठी नियोजन करणे आवश्यक आहे. हे दुष्काळी तालुके आहेत ते मग विदर्भातील असतील, मराठवाड्यातील असतील, पश्चिम महाराष्ट्रातील असतील, खान्देशातील असतील, या सर्व दुष्काळी तालुक्यांमध्ये अनेक प्रश्न निर्माण झालेले आहेत. सातारा जिल्ह्याचे उदाहरण घेतले तर महाबळेश्वर या तालुक्यामध्ये 250 मि.मी.250 इंच पाऊस पडतो, दुसऱ्या बाजूला खटाव या तालुक्यामध्ये केवळ 15 इंच पाऊस पडतो. सातारा जिल्ह्याची सरासरी जास्त दिसत असली तरी तशी वस्तुस्थिती नाही. त्यामुळे दुष्काळी तालुक्यांचा अनुशेष काढण्यासाठी तालुका हा घटक गृहित धरला पाहिजे. दुष्काळावर चर्चा करीत असताना विदर्भ व मराठवाड्यात अनुशेष आहे, या भागांचा विकास झालेला नाही असे म्हटले जाते. पण पश्चिम महाराष्ट्रातील सर्वच भागात आलबेल आहे अशातील भाग नाही. पश्चिम महाराष्ट्रात सुध्दा खटाव, माण, फलटण, जत, कवठेमहांकाळ, खानापूर, आटपाडी हे कायम दुष्काळी तालुके आहेत. तालुका हा घटक मानून अनुशेष काढला तर सर्वांच्या निदर्शनास येईल. हा अनुशेष रस्त्यांच्या कामासंबंधी आहे, पिण्याच्या पाण्यासंबंधी आहे, विकासासंबंधी आहे. त्यामुळे या दुष्काळी तालुक्यांचा व्यापक दृष्टीकोनातून विचार होणे आवश्यक आहे. त्यामध्ये विभागीय वाद न आणता महाराष्ट्रात जे दुष्काळी तालुके आहेत त्यांचा विचार होणे आवश्यक आहे. यापूर्वी राज्यात 85 दुष्काळी तालुके आहेत असे म्हटले जात होते. या तालुक्यांसाठी दुष्काळी महामंडळ स्थापन करण्याचा निर्णय घेतल्यावर दुष्काळी तालुक्यांची संख्या 190 वर गेली. म्हणून शासनाने प्रत्येक तालुका हा घटक मानून अनुशेष काढला तर दुष्काळावर मात करता येईल.

सभापती महोदय, राज्यावर अनेकदा निसर्गामुळे संकटे येतात. मागील वेळी अवकाळी पावसाचे संकट आल्यामुळे शेतीचे नुकसान झाले होते. या वर्षी कापसाला व धानाला भाव नसल्यामुळे शासनाने 1 हजार कोटी रुपयांची मदत दिली आहे, गेल्या वर्षी 2 हजार कोटी रुपयांची मदत केली होती. मी आपल्याला विनंती करतो की, या दुष्काळी तालुक्यातील पाणी पुरवठा योजना पूर्ण करण्यासाठी प्राथम्याने विचार करावा. अनेक मोठी धरणे सातारा जिल्ह्यात

3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रभाकर घार्गे...

आहेत. कृष्णा, कोयना, उरमोडी, तारळी अशा अनेक नद्यांचा उगम महाबळेश्वर येथून होतो. या धरणांमधून सांगली जिल्ह्याला पाणी पुरवठा केला जातो. सांगली जिल्ह्याला पाणी देण्याला आमचा विरोध नाही. परंतु सातारा जिल्ह्याला हक्काचे पाणी मिळाले पाहिजे, दुष्काळी तालुक्यांना पाणी मिळाले पाहिजे असे आमचे म्हणणे आहे. सातारा जिल्ह्यात धरणे झाल्यामुळे लोकांचे पुनर्वसन करावे लागले. दुष्काळी पट्टयावर जो अन्याय झाला आहे तो दूर करण्यासाठी प्रामुख्याने विचार करणे आवश्यक आहे. जी वैधानिक विकास मंडळे निर्माण झालेली आहेत त्याचा शासनाने पुनर्विचार केला पाहिजे. दुष्काळी तालुके लक्षात घेऊन विचार केला पाहिजे.

सभापती महोदय, देशाला स्वातंत्र्य मिळून 60 वर्षे होत आली आहेत. या कालावधीत पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सातत्याने भेडसावत आहे. खटाव व माण सारख्या तालुक्यांमध्ये 100 कि.मी.अंतरावरुन पाणी आणावयाचे कोठून ?

यानंतर श्री.शिगम....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रभाकर घार्गे...

टँकरने पाणी पुरवठा करण्याबाबत या सभागृहामध्ये अनेक वेळा चर्चा झालेली आहे. दुष्काळ पडतो त्यावेळी टँकरने पाणी पुरवठा केला जातो. अनेक ठिकाणी टँकरने पाणी पुरवठा करण्याबाबत टेंडर काढण्यात येतात. परंतु त्यास फारसा प्रतिसाद मिळत नाही. टँकरमध्ये पाणी भरण्यासाठी पंपाला वीज लागते ती नसेल तर डिझेल पंपाचा वापर करावा लागतो. 10 वर्षापूर्वी डिझेलचे दर किती होते आणि आताचे डिझेलचे दर किती आहेत हे लक्षात घेऊन डिझेल पंप चालवून टँकर पाण्याने भरण्यासाठी किती खर्च येईल याचा देखील शासनाने विचार केला पाहिजे, हा विचार केला तरच ही यंत्रणा सुरळीत काम करु शकेल.

सभापती महोदय, ऑक्टोबर महिन्यापासून पाण्याची टंचाई निर्माण झालेली आहे. टंचाई निवारणार्थ केलेल्या उपाययोजनांना काही प्रमाणात यश आलेले आहे. आता एप्रिल महिना सुरु झालेला आहे. टंचाई निवारणार्थ जेवढ्या उपाययोजना व्हायला पाहिजे होत्या तेवढ्या त्या झालेल्या नाहीत. 2003 साली दुष्काळ पडला होता त्यावेळी देखील अशीच परिस्थिती निर्माण झालेली होती. दर 4-5 वर्षानंतर राज्यात दुष्काळ पडतो. ही परिस्थती लक्षात घेऊन दुष्काळाच्या संदर्भात शासनाने कायमस्वरुपी उपाययोजना केली पाहिजे.

सभापती महोदय, रोजगार हमी योजनेवरील मजुरीचे दर 31 मार्च पर्यन्त 127 रुपये होते ते आता 145 रुपये करण्यात आलेले आहेत. तरी देखील मजुराला अन्यत्र जास्त मजुरी मिळत असल्यामुळे त्याला रोजगार हमी योजनेच्या कामावर काम करणे परवडत नाही. दुसरे असे की, या दुष्काळी परिस्थितीमध्ये जनावरांना चारा देण्यासाठी फार जाचक अशा अटी लादलेल्या आहेत. ज्याच्याकडे 5 एकरा पेक्षा कमी जमीन असेल आणि जो रोजगार हमी योजनेवर काम करीत असेल अशा शेतक-याला 90 टक्के अनुदानावर चारा दिला जातो आणि इतरांना 75 टक्के अनुदानावर चारा दिला जातो. मग प्रत्येक शेतक-याने आपली 10-10 जनावरे सांभाळण्याचे सोडून रोजगार हमी योजनेच्या कामावर काम करावे असे शासनाचे म्हणणे आहे काय ? म्हणून जनावरांना चारा उपलब्ध करुन देताना रोजगार हमी योजनेच्या कामावर काम करणारा शेतकरी आणि रोजगार हमी योजनेच्या कामावर काम न करणारा शेतकरी असा भेदभाव न करता सर्वांना 90 टक्के अनुदानावर चारा उपलब्ध करुन द्यावा आणि चार-पाच कि.मी. अंतरावर चारा डेपो सुरु करावेत अशी मी या निमित्ताने शासनाला विनंती करीत आहे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रभाकर घार्गे...

सभापती महोदय, पश्चिम महाराष्ट्रातील शेतकरी कष्टाळू आहे. तो द्राक्षे, डाळिंब, सिताफळ, बोरे अशा फळबागायती करुन उत्पन्न घेत असतो. फळरोपे लावल्यानंतर प्रत्यक्षात उत्पादन येण्यासाठी 5-6 वर्षाचा कालावधी जातो. परंतु 4-5 वर्षानंतर राज्यामध्ये पुन्हा दुष्काळ पडतो आणि त्या चक्रव्यूहात तो अडकून पडतो. दुष्काळी परिस्थितीमध्ये माणसांना, पिण्याचे पाणी उपलब्ध व्हावे, जनावरांना पाणी, चारा उपलब्ध व्हावा यासाठी अनेक उपाययोजना केल्या जातात. पण त्याच बरोबर फळबागायतीना देखील पाणी उपलब्ध करुन त्या जगविल्या पाहिजेत. या दुष्काळामध्ये द्राक्ष, डाळिंब, बोरे या फळबागायतींना पाणी उपलब्ध झाले नाही तर त्या बागा करपून जातील आणि शेतक-याचा सर्व खर्च वाया जाईल. तेव्हा या फळबागा वाळून जाऊ नयेत म्हणून फळबागायत करणा-या शेतक-याला देखील या दुष्काळी परिस्थितीमध्ये आधार दिला जाईल अशा प्रकारच्या उपाययोजना कराव्यात अशी विनंती करुन मी माझे भाषण संपवितो.

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, राज्यात निर्माण झालेल्या दुष्काळी परिस्थितीच्या संदर्भात नियम 97 अन्वये उपस्थित करण्यात आलेल्या अल्पकालीन चर्चेमध्ये भाग घेण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री. विनोद तावडे यांनी या चर्चेच्या निमित्ताने अतिशय महत्वाचे मुद्दे उपस्थित केलेले आहेत. राज्यामध्ये दरवर्षी किती पाऊस पडतो, पावसाचे किती पाणी किती वेळ आपल्याला उपलब्ध होऊ शकते, राज्यात पीक आणेवारी किती आहे, चारा किती उपलब्ध आहे या सर्व गोष्टींची नोंदणी होत असते. राज्यामध्ये दुष्काळ पडणार आहे हे आपल्याला पाऊस गेल्यानंतर कळले होते. मी माननीय मंत्री महोदयांना विचारु इच्छितो की, जर आपल्या राज्यामध्ये पाऊस अपुरा पडला, पीक अपुरे आले, चारा अपुरा पडणार आहे हे माहीत होते तर मग त्यानुषंगाने शासकीय पातळीवर काय नियोजन करण्यात आले ? दुष्काळ पडल्यानंतर विविध प्रकारच्या मागण्या सभागृहामध्ये केल्या जातात. या चर्चेच्या निमित्ताने मला माननीय मंत्री महोदयांना सांगायचे आहे की, जसे मुंबईच्या पाणी पुरवठ्या बाबत नियोजन केले जाते, सांगितले जाते की, 15 जुलै पर्यन्त धरणातील पाणी पुरेल. त्या प्रमाणे या दुष्काळाचे निवारण करण्याच्या संदर्भात राज्य शासनाच्या सर्व यंत्रणांनी काय काय उपाययोजना केलेल्या आहेत याची माहिती माननीय मंत्री महोदयांनी प्रथम या सदनाला द्यावी.

...नंतर श्री. भोगले...

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील.....

चर्चा केल्यानंतर शासन नियोजन करणार का? आम्ही मोर्चे काढले, मागणी केली की मग शासन नियोजन करणार आणि मदतीची घोषणा करणार आहे का? ज्यावेळेला शासनाच्या टंचाई निदर्शनास येते त्याच वेळेला मदतीचे धोरण जाहीर केले पाहिजे.

सभापती महोदय, मी काल सभागृहातून घरी परत गेल्यानंतर टी.व्ही.पहात होतो. स्टार माझा या चॅनेलवर "मुख्यमंत्री आले, मुख्यमंत्री गेले" हा कार्यक्रम दाखविला जात होता. माननीय मुख्यमंत्री सांगली येथे रोजगार हमी योजनेच्या कामाची पाहणी करण्याकरिता गेले होते त्यावेळी त्या ठिकाणी पुनर्वसन मंत्री डॉ.पतंगराव कदम, ग्रामविकास मंत्री श्री.जयंत पाटील हे देखील उपस्थित होते. मुख्यमंत्र्यांनी दिलेल्या भेटीच्या ठिकाणी रोजगार हमी योजनेचे काम सुरु होते. तेथे कामाचा बोर्ड लावण्यात आला होता. मजूर कामावर काम करीत होते, मजुरांमार्फत माती टाकली जात होती. मजुरांच्या सोयीसाठी मंडप उभारला होता. पिण्याच्या पाण्याची सोय केली होती. माननीय मुख्यमंत्री त्या ठिकाणाहून गेल्यानंतर मंत्रीमंडळातील मंत्रीगण देखील निघून गेले. तेथे मजूर देखील थांबले नाहीत. तेथील मंडप उतरविण्यात आला. जे काम सुरु होते ते बंद केले गेले. मजुरांनी जे काम केले त्याचा कोणताही लवलेश तेथे शिल्लक नव्हता. मी स्टार माझा या चॅनेलचे अभिनंदन करतो. त्यांनी वस्तुस्थिती निदर्शनास आणून देण्याचे काम केले.

सभापती महोदय, श्री.पृथ्वीराज चव्हाण यांनी मुख्यमंत्री म्हणून पदभार स्वीकारल्यानंतर या राज्यात एक वेगळया प्रकारचे वातावरण निर्माण झाले. कोणतेही नियमबाह्य काम करु शकत नाही असा एक संदेश अधिकारी वर्गामध्ये पसरला होता. परंतु काल टी.व्ही.वरील घटना पाहिल्यानंतर हे अधिकारी एवढे निगरगट्ट झाले आहेत की त्यांना कोणाची भीती वाटत नाही. दुष्काळ म्हणजे काय? दुष्काळ म्हणजे अधिकाऱ्यांची दिवाळी असते. दुष्काळात दिवाळी साजरी करण्याचे काम सुरु होते. आम्ही या सभागृहात चर्चा करतो. परंतु अधिकारीवर्ग खोटी कामे दाखवून बिले काढण्याचे काम करतात.

सभापती महोदय, मी वयाच्या 56 व्या वर्षात पदार्पण केले आहे. वयाच्या 22 व्या वर्षापासून मी या विधिमंडळाच्या उभय सभागृहातील प्रेक्षक गॅलरीमध्ये, वार्ताहर गॅलरीमध्ये बसून सभागृहाचे कामकाज पाहिले आहे. माननीय मंत्री श्री.लक्ष्मणराव ढोबळे हे त्या काळात तरुण तडफदार आमदार होते. त्यांच्या सभागृहातील भाषणात काव्य, साहित्य शैलीचा प्रभाव दिसून येत

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील.....

असे. ते म्हणतात की, आम्ही दुष्काळी भागातून निवडून येतो. त्यांना या सभागृहात बसण्याचा नैतिक अधिकार नाही. 25-30 वर्षे सत्तेमध्ये सहभागी होऊनही आपल्या भागातील जनतेला पाणी पाजू शकले नाहीत, जनावरांना चारा देऊ शकले नाहीत अशा मंत्र्यांना या सभागृहात बसण्याचा नैतिक अधिकार उरलेला नाही. सत्तेत राहून त्यांनी काय परिवर्तन केले?

सभापती महोदय, मी माझ्या मतदारसंघाचे उदाहरण देऊ इच्छितो. माझ्या मतदारसंघातील 202 गावांमध्ये 20 वर्षांपूर्वी आम्ही डांबरी रस्ते तयार केले. आमच्या गावातील घराघरामध्ये 30 वर्षापूर्वी आम्ही नळाद्वारे पाणी पुरविण्याचे काम केले. गावातील नळ पाणीयोजना आम्ही फायद्यात आणल्या आणि होणाऱ्या फायद्यातून गावांचा विकास करण्याचे काम केले. हा आदर्श मानला पाहिजे. तुम्हाला कोणीही तालुका उपलब्ध करुन देतो, तुम्ही त्या ठिकाणाहून निवडून येता. आम्हाला निवडून येण्यासाठी कष्ट करावे लागतात, घाम गाळावा लागतो. या सभागृहामध्ये सत्ताधाऱ्यांनी आम्ही दुष्काळी भागातील आहोत असे म्हणायचे आणि आम्ही ते ऐकायचे. दुष्काळ म्हणजे काय? माननीय सदस्य श्री.प्रभाकर घार्गे यांना पहिल्यांदा मी सभागृहात भाषण करताना पाहिले. त्यांची उत्तम वक्तृत्वशैली आहे. त्यांना बोलण्याची संधी का दिली जात नाही? त्यांच्या भागात पाणी मिळत नाही म्हणून ते बोलायला उभे राहिले ही वस्तुस्थिती आहे. त्यांनी आपल्या भाषणात सांगितले की, साताऱ्यामध्ये धरणे आहेत. परंतु आम्हाला कोणी पाणी देत नाही. स्व.यशवंतराव चव्हाणाचा फोटो असलेला बिल्ला छातीवर लावून फिरता, राज्य तुमच्याच ताब्यात आहे, पश्चिम महाराष्ट्राकडे राज्याची सत्ता केंद्रीत झालेली आहे, तिजोरीच्या किल्ल्या माझ्याकडे आहेत म्हणून पश्चिम महाराष्ट्रातील राज्यकर्ते सांगतात.

नंतर श्री.खर्चे...

अशुद्धीत प्रत / शुद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील.....

राज्यात पाण्याचे कोणत्याही प्रकारचे नियोजन नाही असे अनेक मुद्दे आहेत पण यापूर्वी माननीय विरोधी पक्षनेते श्री. विनोद तावडे व ज्येष्ठ सदस्य माननीय श्री. दिवाकर रावते यांनी त्यांचा उल्लेख केला असल्याने त्यांची पुनरावृत्ती मी करणार नाही. पण एवढे मात्र जरुर सांगण्याचा प्रयत्न करणार आहे की, शासनाने माननीय राज्यपालांकडे या दुष्काळाच्या निमित्ताने 75 हजार कोटी रुपयांची मागणी करुन राज्यात अपुरी कामे पूर्ण करण्याची संधी द्यावी, अशी मागणी केली. म्हणजे आणखी राज्याचे दिवाळे निघणार, खोटी बिले काढण्याची संधी मिळणार असा या शासनाचा प्रयत्न दिसतो. राज्यात कोणती अपुरी कामे आहेत आणि कोणत्या कामांसाठी पैसा पाहिजे याचा विचार करुनच खास बाब म्हणून परवानगी द्यावी अशी मी मागणी करतो. पण यावर माझा आक्षेप असा आहे की, जो पैसा आहे तो कोणत्याही परिस्थितीत सिंचनासाठीच वापरला गेला पाहिजे. कारण मुळात राज्यात सिंचनाचे नियोजन नाही म्हणूनच दुष्काळ आहे. पश्चिम महाराष्ट्रात दुष्काळ आहे असे ज्यावेळी आपण म्हणतो तेव्हा सिंचनावर जास्त पैसा राज्याच्या स्थापनेपासून याच भागात खर्च झालेला आहे तरी देखील याच भागातील लोक म्हणतात की आमच्याकडे पाणी नाही, पण आहे त्या पाण्याचे नियोजन असले पाहिजे हेही तितकेच खरे आहे.

महोदय, प्रश्नोत्तराच्या तासामध्ये मी प्रश्न विचारणार होतो पण संधी मिळाली नाही म्हणून आता मांडण्याचा प्रयत्न करणार आहे. दुष्काळाच्या निमित्ताने चारा टंचाई हा भाग महत्वाचा असतो आणि "चारा" हा एक वेगळा धंदाच झाला आहे. दुष्काळाच्या नावाने चाऱ्याचे टेंडर द्यायचे आणि बोगस बिले काढून अधिकाऱ्यांनी पैसे कमवावयाचे असे प्रकार सतत चालत असतात, म्हणून शासनाने यावर्षी चारा कसा पुरविला जाणार यासंबंधीचे नियोजन उत्तरातून सांगितले पाहिजे. हा चारा किती किलोमीटरवरुन आणणार व चारा आणणार तेथे चाऱ्याच्या छावण्या उघडणार काय, ज्या गावातून चारा आणणार त्या गावात चारा शिल्लक आहे की नाही याची माहिती अधिकाऱ्यांकडे आहे काय, यासंबंधीचे नियोजन आणि अभ्यास शासनाने केलेला आहे काय अशा सर्व गोष्टींचा खुलासा या चर्चेच्या निमित्ताने झाला पाहिजे अशी मी मागणी करतो. त्याचे मुख्य कारण म्हणजे कडेगांवला पलूसवरुन चारा घेणार की कुंडलवरुन घेणार आणि पलूसला चारा नाही म्हणून सरकार पुन्हा कडेगांववरुन चारा आणणार असा प्रकार चालत असतो. 2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील.....

खरे तर राज्यात चाऱ्याची टंचाई आहे हे मंत्री महोदयांकडे बघून वाटतच नाही, त्यांचे सर्वांचेच गाल वगैरे व्यवस्थित आहेत, त्यांना कोणतीही काळजी दिसत नाही तर केवळ आपणच चर्चा करीत आहोत अशी परिस्थिती आहे, अशा सर्व गोष्टींची उत्तरे मिळाली पाहिजे. भलेही या चर्चेच्या उत्तराची तयारी करण्यासाठी आणखी एक तास थांबण्याची आमची तयारी आहे पण सर्वच प्रश्नांची उत्तरे मिळाली पाहिजेत, जेणेकरुन शेतकऱ्याला दिलासा मिळू शकेल.

या चर्चेच्या निमित्ताने दुष्काळी भागातील जनतेला कळले पाहिजे की, शासन आमच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहे. सिंचनाच्या बाबतीत सभागृहात अनेक वेळा मी बोललो आणि आपले सुध्दा तेच विचार आहेत पण येथे बोलू शकत नाही म्हणून आपण संबंधित ते लॉबीमध्येच आपण व्यक्त करता. खरे तर या चर्चेत ज्या ज्या विषयांचा संबंध आहे त्या खात्याच्या सबंध मंत्र्यांनी उपस्थित राहणे आवश्यक होते पण दुर्दैवाने कृषी विभाग, जलसंपदा विभाग या दोन महत्वाच्या विभागांचे मंत्री महोदय सभागृहात दिसत नाहीत. केवळ ज्येष्ठ मंत्री महोदय डॉ. पतंगराव कदम हेच एकटे उपस्थित आहेत आणि त्यांनी उत्तर दिल्यानंतर मात्र आम्ही जास्त बोलू शकत नाहीत हा आमचा वीक पॉईंट आहे. अर्थात ते जे बोलतात, ठरवितात ते करुन दाखवितात म्हणून आमच्या मनात त्यांच्याबद्दल सन्मान आहे. या सर्व विषयांची उत्तरे डॉ. पतंगराव कदम हेच देणार आहोत काय हे देखील समजले पाहिजे.....अडथळा.....कदाचित आपण राज्याचे मुख्यमंत्री म्हणून विराजमान झाल्यानंतर मात्र या राज्यात वेगळेच चित्र निर्माण झालेले दिसेल...

यानंतर श्री. जुन्नरे .....

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री. जयंत प्र.पाटील ...

सभापती महोदय, कोकणामध्ये दुष्काळाची परिस्थिती फार वाईट आहे. या सभागृहाचे सन्माननीय सदस्य श्री. परशुराम उपरकर हे आम्हाला दर वर्षी आंब्याच्या पेट्या देत असतात. परंतु त्यांनी या वर्षी आम्हाला आंब्याची पेटी दिली नाही त्यामुळे त्यांना मी विचारले की, "तुम्ही आमच्यावर नाराज आहात काय." त्यावेळेस माननीय उपरकर साहेब म्हणाले की, साहेब आंब्याच्या झाडाला आंबेच आलेले नसल्यामुळे या वर्षी मी तुम्हाला आंब्याची पेटी देऊ शकलो नाही. कोकणातील आंब्याचे या वर्षी संपूर्ण नुकसान झालेले आहे. 15 दिवसापूर्वी कोकणामध्ये गारा पडल्या होत्या व त्या गारांमुळे आंबा पिकाचे प्रचंड नुकसान झाले. गेल्यावर्षी सुध्दा अवकाळी पावसामुळे कोकणातील आंबा पिकांचे प्रचंड नुकसान झाले होते त्या संदर्भात शासनाने नुकसान भरपाई सुध्दा जाहीर केली होती परंतु ही नुकसान भरपाई कोकणातील आंबा उत्पादकांना आजपर्यंत मिळालेली नाही. मागील वर्षीच्या नागपूर येथील हिवाळी अधिवेशनात नुकसानग्रस्त शेतकऱ्यांसाठी शासनाने 2 हजार कोटी रुपयांची मदत जाहीर केली होती परंतु ही मदत कोणाला मिळाली, किती शेतक-यांना मिळाली व अजून किती शेतकऱ्यांना ही मदत द्यावयाची बाकी आहे याची माहिती आम्हाला आजपर्यंत मिळू शकली नाही त्यामुळे ही माहिती शासनाने देण्याची आवश्यकता आहे. ज्या गोष्टी आपल्याला करता येणे शक्य नाही अशा गोष्टींच्या घोषणा शासनाने करु नयेत अशी माझी शासनाला सूचना आहे. जी नुकसान भरपाई आपल्याला द्यावयाची आहे ती नुकसान भरपाई त्याच वर्षी शेतकऱ्यांना दिली गेली पाहिजे. नाही तर या वर्षी नुकसान भरपाई जाहीर करावयाची व दुसरे वर्ष संपत आले तरी ती नुकसान भरपाई द्यावयाची नाही असे कृपा करुन या पुढे तरी करु नका.

सभापती महोदय, शेतक-यांच्या मालकीची असलेली कारखानदारी, शेतीसाठी असलेले पूरक उद्योग, शेतीची अवजारे निर्माण केली जात होती ते कारखाने आज बंद पडत आहेत. हे कारखाने राज्यकर्तेच विकत घ्यावयास निघाले आहे. संपूर्ण सहकार चळवळ मोडीत निघालेली आहे. त्यामुळे आम्ही माननीय सदस्य श्री. विक्रम काळे यांना सांगितले की, तुम्ही मा. यशवंतराव चव्हाणांचा बिल्ला लावून नका, कारण हा बिल्ला लावण्याचा तुम्हाला नैतिक अधिकार नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र.पाटील ...

मा.यशवंतराव चव्हाणांनी ख-या अर्थाने सहकार फुलवला, ज्यांनी कारखाने शेतक-यांच्या मालकीचे केले व त्यासाठी राज्य सरकारने करोडो रुपये खर्च केले ही सर्व चळवळ, ही यंत्रणा मोडीत काढण्याचे काम राजरोस सुरु आहे. माननीय पंतगराव म्हणतात की, आम्ही बँकेवर ताबडतोब प्रशासक आणला त्यावर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे मंत्री म्हणतात की, काय करणार, आम्ही हतबल आहोत. पैसे खाल्ले म्हणून प्रशासक आणला जातो त्यामुळे हा प्रकार कोठे तरी थांबला गेला पाहिजे. विरोधी पक्षाचे आमदार काही बोलत नाही तर राष्ट्रवादी व काँग्रेस पक्षाचे मंत्रीच एकमेकांच्या विरोधात बोलत आहेत असा भयानक प्रकार या राज्यामध्ये चालला आहे.

यानंतर श्री. भारवि...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील...

त्यामुळे दुष्काळात सापडलेल्या जनतेला मदत करण्यासंबंधीचे वेगळे वातावरण या राज्यामध्ये दिसत नाही. पाऊस गेल्यानंतर आपल्या शासकीय यंत्रणेने कोणकोणते नियोजन केले हे आम्हाला कळले पाहिजे. या दुष्काळी परिस्थितीवर मात करण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली आहे हे आम्हाला कळले पाहिजे.

स्टार माझाने अधिकारी कशी फसवणूक करीत आहेत त्याचे चित्र दाखविले आहे. त्या अधिकाऱ्यांवर शासन कुठली कडक कारवाई करणार आहे हे देखील आम्हाला कळले पाहिजे. मुख्यमंत्री येणार म्हणून ज्या अधिकाऱ्यानी खोटी कामे दाखविली त्याच्यावर कारवाई झाली पाहिजे. माननीय मुख्यमंत्री गेल्यावर ती कामे बंद झाली आहेत. मी कडक या शब्दावर जोर देऊन सांगतो की, त्या अधिकाऱ्यावर कडक कारवाई झाली पाहिजे. सभागृहात झालेल्या चर्चेवरून त्या अधिकाऱ्यावर कडक कारवाई झाल्याचे आम्हाला उद्या स्टार माझा वरून दिसले पाहिजे. ....(अडथळा)... मी सभागृहात अनेक वेळा सांगितले आहे की, ठराविक जण असले की, चॅनेल लावतो. ....(अडथळा).... सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे दिसल्या की, मी लगेच बटन ऑन करतो. सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांची चर्चा वैचारिक असते. दुष्काळात सापडलेल्या जनतेची फसवणूक करण्याचे काम राज्य शासन करीत आहे. ते थांबविण्याचे काम झाले पाहिजे, ही मागणी करून माझे विचार संपवितो.

....

तालिका सभापती (श्री.विनायक मेटे) : आता सभागृहाची बैठक मध्यंतरासाठी स्थगित होईल आणि दुपारी 2.30 वाजता पुन: भरेल.

(दुपारी 2.57 ते 2.30 वाजे पर्यंत स्थगित)

.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

स्थगितीनंतर

सभापतीस्थानी - माननीय तालिका सभापती (श्री.विनायक मेटे)

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, याठिकाणी दुष्काळाच्या संबंधात चर्चा होत आहे आणि हा विषय अतिशय गंभीर आहे. या चर्चेसाठी वेळ लागला तरी लागू द्या. आपण सर्व सन्माननीय सदस्यांना आपले विचार मांडण्यासाठी संधी द्यावी.

तालिका सभापती : या विषयाच्या बाबतीत किती वेळ चर्चा करावी आणि त्यामध्ये किती सन्माननीय सदस्यांनी भाग घ्यावा या संदर्भात मघाशी चर्चा झालेली आहे. सदरहू चर्चेसाठी कालावधी जास्त लागला तरी हरकत नाही. मात्र तीन तासामध्ये ही चर्चा पूर्ण करण्याचा आपण प्रयत्न करणार आहोत. यानंतर सन्माननीय सदस्य श्री.एस.क्यू.जमा यांनी आपले भाषण सुरु करावे.

. . . .2 के-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री एस. क्यू. जमा : (विधानसभा द्वारा निर्वाचित) सभापति महोदय, दुष्काल और पानी की कमी से संबंधित प्रस्ताव पर हमारे वरिष्ठ साथियों की बातें हमने यहां पर सुनीं. हमारे विरोधी पक्ष नेता माननीय विनोद तावडे साहब ने तथा माननीय सदस्य श्री दिवाकर रावते साहब ने भी समाचार पत्रों के बारे में यहां पर बताया कि पेपर्स में किस-किस तरह की न्यूज छपीं. उसी के बारे में उन्होंने यहां पर चर्चा की.

सभापति जी, मुझे लगता है कि हम इस बारे में ज्यादा गंभीर नहीं हैं. क्योंकि महाराष्ट्र के अंदर एक परंपरा है कि सरकार यहां पर सक्षम तरीके से काम करने की योजना जरुर बनाती है लेकिन जब उस योजना पर अमल करने की बात आती है तो हमारी सरकार अमलीकरण के मामले में फेल हो जाती है.

मैं यह भी कहना चाहूंगा कि टीवी चॅनलों में तथा समाचार पत्रों में अपने-अपने ढंग से न्यूज दी जाती हैं. उस न्यूज को आधार बनाकर हम यदि अपनी बात यहां पर रखेंगे तो हम कहीं न कहीं पर ज्यादा राजनीतिक हो जाएँगे. सचाई से हम थोड़ा दूर हो जाएँगे.

सभापति महोदय, यहां पर कुछ सर्कुलर हमें दिए गए हैं. सरकार ने अभी तक टंचाई से संबंधित जितने भी सर्कुलर निकाले हैं, उन सभी सर्कुलरों को एक साथ इकट्ठा करके उन सर्कुलरों की कॉपी हमें दी गई हैं. इसमें अंतिम सर्कुलर 31 मार्च 2012 का दिया गया है. यह सर्कुलर हमारे चीफ सेक्रेटरी साहब ने निकाला है. उस सर्कुलर के साथ ही बाकी सर्कुलरों की कॉपी भी एक साथ लगाई गई हैं.

सभापति महोदय, इन सर्कुलरों को पढ़ते हुए मैंने देखा कि चीफ सेक्रेटरी साहब ने जो आदेश 31 मार्च 2012 को निकाला है, उसमें एक रेफरेंस 1999 का दिया हुआ है. जब मैंने उस 1999 के आदेश को पढ़ा तो उसमें एक रेफरेंस 1980 का दिया हुआ है. मेरा कहना है कि जो आदेश 1980 को निकाले गए थे, उस आदेश की कन्टीन्युटी की आवश्यकता आज सन् 2012 में भी पड़ रही है. इसमें एक एनेक्सचर दिया हुआ है कि महाराष्ट्र में विभाग वाइज कितने गाँवों में टंचाई है, चाहे वह खरीप की हो या रबी की हो. उसकी लिस्ट मैं यहां पर देख रहा था.. मैं माननीय सदस्य कदम साहब का ध्यान इस ओर दिलाना चाहूंगा. मैं बताना चाहूंगा कि सरकार ने

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री एस. क्यू. जमा....

जो लिस्ट निकाली है, उसमें बताया गया है कि कोंकण विभाग के एक भी गांव में टंचाई नहीं है. यहां पर बताया गया है कि वर्धा में टंचाईग्रस्त गांवों की संख्या जीरो है, भंडारा में भी यह संख्या जीरो बताया गयी है, गोंदिया में सिर्फ 50 गांवों को टंचाईग्रस्त बताया गया है. चंद्रपुर में भी टंचाईग्रस्त गांवों की संख्या जीरो बतायी गयी है. यह लिस्ट देखने के बाद मुझे लगा कि आणेवारी निकालने का जो तरीका है, इस पर कई बार चर्चा हो चुकी है. लेकिन सरकार इस बारे में कोई ठोस कदम नहीं उठा रही है. गोंदिया, चंद्रपुर और भंडारा जिले में पानी की कमी नहीं है, वहां पर चारे की कमी नहीं है तथा वहां के जानवरों को खाने के लिए पर्याप्त मात्रा में चारा मिल रहा है, इस तरह की बात सही मान लेने का मतलब यही है कि हम सचाई से बहुत दूर जा रहे हैं.

दुष्काल का सामनना करने के लिए जो कदम हमारी सरकार ने उठाए हैं, उनसे हमारे विरोधी पक्ष के माननीय सदस्य तो संतुष्ट हैं ही नहीं, साथ ही मुझे भी लगता है कि सरकार को इस बारे में और ज्यादा कड़े कदम उठाने की आवश्यकता है. सूखे का सामना करने के लिए संपूर्ण सरकारी मशीनरी को पूरी ताकत से काम करना होगा, तभी हम इस मुसीबत का सामना अच्छी तरह से कर सकते हैं. परिस्थिति के अनुसार संबंधित विभाग में काम करने का ज्यादा अधिकार वहां के अधिकारियों को हमें देना होगा.

मेरा कहना है कि हमारा जो पुराना सिस्टम चला आ रहा है, इसमें हमें बदलाव लाना होगा. पानी और चारे की व्यवस्था हमें करनी होगी. बेरोजगारों को काम मुहैया कराना पड़ेगा. वह काम चाहे हम एम्पालॉयमेंट गारंटी स्कीम के माध्यम से मुहैया करायें या महात्मा गांधी नेशनल रुरल एम्पपलॉयमेंट गारंटी स्कीम के माध्यम से मुहैया करायें. लेकिन हमें वहां पर लोगों को रोजगार देना पड़ेगा. वर्धा जिले के बारे में हमें जानकारी मिली है कि वहां पर एनआरइजीएस के माध्यम से कुएं बनाने का प्रावधान किया गया था. किंतु फंड खत्म हो जाने की वजह से किसी भी किसान का कुआँ वहां पर पूरा नहीं हुआ. उन्होंने अपने पैसे लगाकर कुएँ बनाने का काम शुरु कर दिया तथा उन्होंने वहां पर पानी की व्यवस्था करने की कोशिश की. लेकिन फंड खत्म हो

अशुद्धित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री एस. क्यू. जमा ....

जाने की वजह से वहां पर कोई भी कुआँ पूरी तरह से नहीं बन पाया. वर्धा जिले की इससे संबंधित पूरी लिस्ट हमारे पास है. लेकिन शासन की लिस्ट से ऐसा मालूम पड़ता है कि वहां के किसी भी गांव में पानी की कमी नहीं है.

इस समस्या को हल करने के लिए कुछ पैसे केंद्र सरकार से मिलते हैं तथा कुछ पैसे हमारी राज्य सरकार अपनी ओर से भी खर्च करती है. लेकिन मेरा कहना है कि हमारे यहां पर आपसी समन्वय की बहुत कमी है. जिसकी वजह से हमारे राज्य की ग्रामीण जनता और खासकर हमारे किसानों को बहुत तकलीफ का सामना करना पड़ता है.

सभापति महोदय, हम बजट के बारे में बहुत चर्चा करते हैं, और इन समस्याओं से निपटने के लिए बजट में प्रावधान भी किया गया है. लेकिन मैं एक माननीय सदस्य की बात से सहमत हूं कि दुष्काल की परिस्थिति तो हमें बहुत पहले से दिखाई दे रही थी. सितम्बर- अक्तूबर 2011 से ही हमें लग रहा था कि इस साल दुष्काल पड़ेगा. परंतु जितनी तत्परता से हमारी सरकार को कदम उठाने चाहिए थे, उतनी तत्परता से दुष्काल का सामना करने के लिए हमारी सरकार कदम नहीं उठा पाई है. इसीलिए मुझे लगता है कि हमारे सरकारी अधिकारियों को हर जिले में जाकर हर जगह की वास्तविक स्थिति की जानकारी लेनी चाहिए. यह काम हमें अगले दो-चार दिनों के अंदर ही पूरा कर लेना चाहिए तथा इस समस्या को हल करने के लिए जल्द से जल्द कदम हमें उठाने चाहिए.

इस समस्या का सामने करने के लिए हमें केंद्र सरकार से भी सहायता मिल सकती है. दुष्काल की परिस्थिति का मुआयना करने के लिए हमारे यहां पर केंद्र सरकार की टीम भी आने वाली है. मेरा कहना है कि माननीय मुख्यमंत्री जी और हमारे माननीय उप मुख्यमंत्री जी तथा माननीय विरोधी पक्ष के नेता एक साथ मिलकर एक ज्वाइंट डेलीगेशन लेकर केंद्र सरकार के पास जाएं और यहां की कठिन परिस्थिति की जानकारी माननीय प्रधानमंत्री जी को दें ताकि केंद्र सरकार से ज्यादा से ज्यादा फंड हमें प्राप्त हो सके.

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री एस.क्यू. जमा...

इस वर्ष का दुष्काल बहुत ही भयानक है. इस साल की कठिन परिस्थिति की तो अभी यह शुरुआत है. आने वाले समय में जैसे-जैसे गर्मी बढ़ेगी वैस-वैसे यह परिस्थिति और भी गंभीर होती चली जाएगी. केंद्र सरकार से जो मदद रुटीन वे में हमें मिलेगी, उसमें तो काफी समय लग जाएगा. इसलिए हमारे महाराष्ट्र से सभी पक्षों का एक ज्वाइंट डेलीगेशन यानी सरकारी पक्ष और विरोधी पक्ष के माननीय सदस्यों का एक ज्वाइंट डेलीगेशन दिल्ली जाना चाहिए तथा इस समस्या को हल करने के लिए जल्द से जल्द तथा ज्यादा से ज्यादा अनुदान प्राप्त करने की कोशिश हमें करनी चाहिए ताकि दुष्काल की समस्या हल करने के काम में कुछ गति आ सके.

अपनी बात समाप्त करने से पहले मैं यही कहना चाहता हूं कि हमारे यहां पर आणेवारी निकालने का जो तरीका है, इस तरीके को थोड़ा साइंटिफिक बनाया जाना बहुत जरुरी है. इस सिस्टम को अप टू डेट किया जाना बहुत जरुरी है. यह काम करने की अत्याधुनिक तकनीक हमारे यहां पर मौजूद है. 50 पैसे आणेवारी का जो कॉंसेप्ट है, यह बिल्कुल अंदाज से निकाला जाता है. एक अधिकारी जो जानकारी दता है उसी आधार पर यह आणेवारी तय कर दी जाती है. मेरा कहना है कि इसको ज्यादा रेशनालाइज करने की आवश्यकता है. मैं यह भी कहना चाहूंगा कि दुष्काल की समस्या से निपटने के लिए जितने जीआर सरकार ने अभी तक निकाले हैं, उनको आपने एक साथ इकटठा तो किया है, लेकिन मेरा कहना है कि इस सब जानकारी को अब टू डेट करना चाहिए. क्योंकि इसमें 1980 से लेकर 2012 तक का रेफरेंस दिया गया है. ये सर्कुलर अलग-अलग विभाग के हैं. दुष्काल का सामना करने में इस जानकारी की सहायता तो हम सबको जरुर मिलेगी लेकिन इस जानकारी को और भी ज्यादा अप टू डेट करने की आवश्यकता मुझे महसूस हो रही है.

हमारी सरकार की जो आलोचना होती है वह चाहे प्रिंट मीडिया में हो या इलेक्ट्रॉनिक मीडिया में हो, मेरा कहना है कि इस बारे में सरकार को और ज्यादा कोहिरंट होना चाहिए. यदि हम सब एक साथ मिलकर इस दुष्काल की समस्या से निपटने के लिए कटिबद्ध होंगे तो मुझे लगता है कि महाराष्ट्र की जनता को कुछ राहत अवश्य मिलेगी. इतना ही मुझे कहना है, धन्यवाद.

-0-

(इसके बाद श्री बरबड...

अशोधित पाठ / शीघ्रलेखी नोंदी

श्री. पांडुरंग फुंडकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी महाराष्ट्रातील टंचाईग्रस्त परिस्थितीच्या संदर्भात जी चर्चा उपस्थित केलेली आहे त्यावर बोलण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, टंचाई आणि दुष्काळ हे जणुकाही महाराष्ट्राच्या पाचवीलाच पूजलेले आहेत. मला आठवते की, 1972 ला महाराष्ट्रामध्ये प्रचंड दुष्काळ पडलेला होता. त्यावेळी श्री. वसंतराव नाईक राज्याचे मुख्यमंत्री होते. त्यावेळी त्यांनी संपूर्ण महाराष्ट्रामध्ये पडलेल्या प्रचंड दुष्काळाला कसे समर्थपणे तोंड दिले होते हे अजूनही माझ्या स्मरणात आहे. या राज्याला दुष्काळ नवीन नाही. परंतु ज्या ज्या वेळी दुष्काळी परिस्थिती निर्माण होते त्या त्या वेळी आपण त्यासंबंधी उपाययोजना जाहीर करीत असतो आणि त्या दुष्काळापुरती, त्या टंचाईपुरती उपाययोजना या ठिकाणी केली जाते आणि ते वर्ष कसे तरी निभावून नेले जाते. परंतु या राज्यामध्ये दुष्काळासंबंधी दीर्घकालीन उपाययोजना अजूनही आखली गेलेली नाही. आता सुदैवाने माननीय मंत्री डॉ. पतंगराव कदम साहेब हे या खात्याचे मंत्री आहेत. मी त्यांना विनंती करणार आहे की, दुष्काळाचे संकट या महाराष्ट्रात दर तीन वर्षाने येते हा जर या महाराष्ट्राचा इतिहास असेल तर भविष्याचा वेध घेऊन आपण या बाबतीत या राज्यामध्ये दीर्घकालीन नियोजन करण्याची गरज आहे.

सभापती महोदय, खरे म्हणजे या वर्षीच्या दुष्काळाची चाहूल जानेवारी-फेब्रुवारी महिन्यामध्येच जाणवली असे नाही तर सप्टेंबर महिन्यामध्ये ज्यावेळी शेवटच्या पावसाने पाठ दाखविली तेव्हापासूनच या संकटाची चाहूल लागली होती. आपला जो आर्थिक पाहणी अहवाल आहे त्यामध्ये असे म्हटले आहे की, या राज्यातील उत्पन्न जवळपास 30 टक्के घटलेले आहे.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर..

का तर परतीचा पाऊस राज्यामध्ये पडला नाही त्यामुळे खरिपाच्या पिकावर त्याचा परिणाम झाला आणि येणाऱ्या रब्बीच्या पिकावर सुध्दा परिणाम झाला. त्यामुळे राज्यात दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली आहे. सभापती महोदय, सप्टेंबर महिन्यामध्ये ही स्थिती निर्माण झाल्यानंतर राज्य सरकारने 12 जी.आर.काढले आहेत. परंतु जी.आर.मध्ये नमूद केल्याप्रमाणे नियोजन करण्यात आलेले नाही. एक कागद खालच्या स्तरावर पाठविला म्हणजे काम संपले असे शासनाने समजता कामा नये. जिल्हा स्तरावर किंवा तालुका स्तरावर दुष्काळाच्या संदर्भात किती बैठका झाल्या हे पाहिल्यावर लक्षात येईल. दुष्काळाची खळखळ कधी झाली ? माननीय केंद्रीय कृषी मंत्री श्री.शरद पवार हे त्यांच्या मतदार संघातील दुष्काळी भागाचा दौरा करण्यासाठी गेले होते. त्यावेळी त्यांनी जे वक्तव्य केले ते कोणत्या उद्देशाने केले त्याच्या कारणामध्ये मला जाण्याचे कारण नाही. त्यावेळी ते असे म्हणाले आहेत की, भाकरी-ठेचा खाऊन राज्यातील दुष्काळाची स्थिती सावरता येणार नाही. त्यांनी राज्यपालांच्या संदर्भात सुध्दा वक्तव्य केलेले आहे. राज्यपालांना दुष्काळाचे गांभीर्य समजलेले नाही असे म्हटले आहे. त्यांच्या वक्तव्यानंतर राज्य सरकार खडबडून जागे झाले आहे. त्यांच्या वक्तव्याचा आम्ही देखील हाच अर्थ काढला आहे. त्यांनी वक्तव्य करेपर्यंत राज्यात सर्व काही आलबेल आहे असे सरकारला वाटले असावे.

सभापती महोदय, सप्टेंबर महिन्यामध्ये राज्यात टंचाईची परिस्थिती निर्माण झाल्यावर मार्च महिन्यात राज्याचा अर्थसंकल्प मांडण्यात आला आहे. तोपर्यंत सरकारला या संकटाची चाहूल लागली होती. जनावरांच्या चाऱ्याचे, पिण्याच्या पाण्याचे संकट येणार आहे, शेत मजुरांच्या हाताला काम द्यावे लागणार आहे, शेतकऱ्यांना सवलती द्याव्या लागणार आहेत या सर्व गोष्टी नजरेसमोर ठेवून अर्थसंकल्पात विशेष तरतूद करणे आवश्यक होते. परंतु ती खबरदारी शासनाने घेतलेली नाही.

सभापती महोदय, भूजल सर्वेक्षण विभागाने ऑक्टोबर महिन्यामध्ये पाहणी करुन शासनाला अंतिम अहवाल सादर केलेला आहे. सदर अहवाल माननीय मदत व पुनर्वसन मंत्री डॉ.पतंगराव कदम यांच्याकडेही आला असेल. या अहवालामध्ये असे नमूद केले आहे की, "जून ते सप्टेंबर या

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KTG/

श्री.पांडुरंग फुंडकर...

कालावधीत पडलेल्या पावसाच्या पार्श्वभूमीवर राज्यातील 1531 पाणलोटमधील 3920 विहिरींचे निरीक्षण करण्यात आले आहे. वर्धा, चंद्रपूर, अमरावती, लातूर, हिंगोली, नांदेड, बीड, औरंगाबाद, जालना, कोल्हापूर, सिंधुदुर्ग या जिल्ह्यात भूजल वाढल्याचे आणि उर्वरित 22 जिल्ह्यात भूजलाची पातळी खालावली आहे. राज्यात जून ते सप्टेंबर या कालावधीत सरासरीच्या तुलनेत 4 तालुक्यात 50 टक्क्याहून कमी, 38 तालुक्यात 50 ते 80 टक्के, 50 तालुक्यात 50 ते 70 टक्के पाऊस पडला. तब्बल 117 तालुक्यात 20 टक्क्याहून कमी पाऊस पडला आहे. या 209 तालुक्यांना रब्बीच्या हंगामासाठी परतीच्या पावसाची तीव्र गरज होती. मात्र परतीच्या पावसाने पूर्णत: पाठ फिरविल्यामुळे हे तालुके संकटात सापडले आहेत." हा अहवाल ऑक्टोबर महिन्यातील आहे. या अहवालात पुढे असेही नमूद केलेले आहे की, "याच तालुक्यापैकी 122 तालुक्यात भूजलाची स्थिती मोठ्या प्रमाणात खालावली आहे. रब्बी हंगाम सुरु होण्यापूर्वी झालेल्या या पाहणीत 38 तालुक्यांतील भूजलाची स्थिती बिकट होती. यानंतर गेल्या तीन महिन्यात झालेल्या पाणी वापरामुळे भूजलाच्या पातळीत मोठ्या प्रमाणात घट झाल्याचा अंदाज आहे. प्रत्येक तालुक्याची भौगोलिक विविधता असल्यामुळे अनेक ठिकाणी भूजलाच्या अहवालावरुन अधिक भूजल घट झाल्याची शक्यता या सूत्रांनी सांगितली आहे."

या अहवालात असेही नमूद केले आहे की, "गेल्या वर्षी ऑक्टोबर महिन्यामध्ये 76.2 मि.मी. व नोव्हेंबर महिन्यात 45.1 मि.मी.पाऊस पडला या उलट या वर्षी ऑक्टोबर महिन्यात 39.1 मि.मी.पाऊस पडला आहे." म्हणजे मागील वर्षी व या वर्षीच्या पावसात तफावत दिसून आली आहे.

यानंतर श्री.शिगम....

अप्रमाणित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर...

आधीच कमी पाऊस पडला आणि त्यात ऑक्टोबर, नोव्हेंबर आणि डिसेंबर हे तीन महिने पूर्णपणे कोरडे गेले. पर्जन्य दुष्काळाचे सावट अधिक गडद झाले. या अहवालामध्ये पुढे असे म्हटलेले आहे की, सरासरी पेक्षा 2 मीटरहून अधिक भूजल पातळी घटलेले तालुले, पारनेर, संगमनेर, पुरंदर, (जिल्हा पुणे), सांगोला, मंगळवेढा (जिल्हा सोलापूर), आटपाडी, मिरज, तासगाव, कवठेमहांकाळ, जत,(जिल्हा सांगली), माण आणि खटाव, (जिल्हा सातारा) भूम, (जिल्हा उस्मानाबाद) हे आहेत. सरासरीहून 2 मीटरपर्यन्त भूजल पातळी घटलेले जिल्हे 22 आहेत. त्यामध्ये ठाणे, रायगड, रत्नागिरी, नाशिक, धुळे, नंदूरबार, जळगाव, अहमदनगर, पुणे, सोलापूर, सातारा, परभणी, उस्मानाबाद, बुलढाणा, यवतमाळ, नाशिक, भंडारा, गोंदिया, गडचिरोली हे जिल्हे आहेत. या जिल्हयातील भूजल पातळी सरासरी पेक्षा 2 मीटरने घटलेली आहे. म्हणजे या जिल्ह्यांमध्ये देखील पाण्याची तीव्र टंचाई निर्माण झालेली आहे. सिंचन प्रकल्पातील पाण्याची पातळी देखील घटलेली आहे. या राज्यात एकूण 83 मोठे प्रकल्प आहेत. या प्रकल्पामध्ये आज असलेला पाणीसाठा फक्त 43 टक्के आहे. मागील वर्षातील पाणीसाठा 61 टक्के होता. 2010मध्ये हा पाणीसाठा 41 टक्के होता. यावेळी हा पाणीसाठा 43 टक्के आहे. राज्यात 223 मध्यम प्रकल्प आहेत. या प्रकल्पातील पाणीसाठा 39 टक्के आहे. राज्यातील 2116 लघु प्रकल्पांमध्ये आज असलेला पाणीसाठा फक्त 28 टक्के आहे. इतक्या मोठ्या प्रमाणावर पाणीसाठ्यामध्ये घट झालेली आहे.

सभापती महोदय, दुष्काळी परिस्थितीमध्ये करावयाच्या उपाययोजनांसंबंधी शासनाने काढलेला जी.आर. मी वाचलेला आहे. या जी.आर.मध्ये काही विशेष उपाययोजना करण्यात आलेल्या आहेत असे मला वाटले नाही. नेहमीच्या दुष्काळाच्या जी.जार.प्रमाणेच हा जी.आर. काढण्यात आलेला आहे. जी.आर.मध्ये असे म्हटलेले आहे की, राज्यामध्ये सन 2011-12 या वर्षात खरीप व रब्बी पिकाच्या हंगामात 50 पैशापेक्षा कमी पैसेवारी असलेल्या गावामध्ये प्रचलित उपाययोजना व सवलती उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने प्रथम हंगामी पैसेवारीच्या आधारे व तद्नंतर अंतिम पैसेवारीच्या आधारे अनुक्रमांत 7 व 10 मधील आदेशाद्वारे 6201 खरीप गावात आणि 1552 रब्बी गावात टंचाई सदृश परिस्थिती जाहीर करण्यात आलेली आहे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर...

सभापती महोदय, माझे मित्र सन्माननीय सदस्य श्री. एस.क्यू.जमा यांनी आणेवारीचा मुद्दा या ठिकाणी मांडला. ही पैसेवारीची पध्दत किती काळ चालू ठेवण्यात येणार आहे ? इंग्रजांच्या काळापासूनची आणेवारीची पध्दत बंद झाली पाहिजे. मी 1978 ते 1980 या काळात विधानसभा सदस्य होतो. त्यावेळी स्व. वसंतदादा पाटील हे राज्याचे मुख्यमंत्री होते. आम्ही त्यावेळी ही आणेवारीची पध्दत बदलण्याची मागणी केली होती. ही मागणी स्व. वसंतदादा पाटील यांनी मान्य केली आणि भगवंतराव गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली. त्या समितीने आपला अहवाल राज्य शासनाला सादर केला. त्यानंतर ही आणेवारीची पध्दत बदलण्याच्या संदर्भात आणखी तीन समित्या शासनाने नेमल्या. त्याही समित्यांनी शासनाला आपला अहवाल सादर केला. परंतु या समित्यांचे अहवाल शासन दरबारी धूळ खात पडलेले आहेत. मग शासनाने या समित्या कशासाठी नेमल्या होत्या ? केवळ शेतक-यांना दाखविण्यासाठी या समित्या नेमण्याचे नाटक शासनाने केलेले होते काय ? आज आपण 21व्या शतकामध्ये आहोत. शेतीमध्ये नवनवीन प्रयोग आपण करीत आहोत. शेतीचे उत्पादन वाढण्यासाठी, शेतमालाची निर्यात होण्यासाठी आपण प्रयत्न करीत असताना ही जुनी आणेवारीची पध्दत बदलली पाहिजे. या निमित्ताने मी अशी मागणी करतो की, ही जुनी आणेवारीची पध्दत बदलून व्यवहार्य अशी पध्दत अवलंबिली जावी.

...नंतर श्री. भोगले...

अशुधारित प्रत / शुद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर.....

अन्यथा या राज्यातील शेतकऱ्यांवर अन्याय होणार आहे. 50 पैशाच्या आत आणेवारी कशी ठरविणार आहात? 50 पैशाच्या आत आणेवारीची गावे निश्चित केली आहेत. नजरअंदाज आणेवारी काढली जाते. ती कशी काढतात हे आम्हाला आजही समजलेले नाही. पटवारी जातात आणि नजरअंदाजे आणेवारी निश्चित करतात. नंतर अंतिम आणेवारी काढली जाते. अंतिम आणेवारी निश्चित करण्यासाठी पटवारी, ग्रामसेवक यांची समिती असते. ते शेतापर्यंत न जाता आणेवारी निश्चित करतात. हे सर्व लक्षात घेता शासन दुष्काळ कसा घोषित करणार?

सभापती महोदय, आता नवीन काळ सुरु झालेला आहे. पिण्याच्या पाण्याची कितीही टंचाई निर्माण झाली, चाऱ्याची किती टंचाई निर्माण झाली, मजुरांच्या हाताला काम नसेल, हजारो मजुरांनी स्थलांतर केले असले तरी त्या परिस्थितीला दुष्काळ म्हटले जात नाही. शासनाला भीती का वाटते? एकदा दुष्काळ जाहीर करावा. 6102 खरीप आणि 1500 रब्बी गावांच्या ठिकाणी दुष्काळ जाहीर करावा. फार फरक पडणार नाही. परंतु का घाबरता?

सभापती महोदय, "टंचाईसदृश परिस्थिती"हा नवीन गोंडस शब्द शोधून काढला आहे. 50 पैशाच्या आत आणेवारी असेल तर त्या ठिकाणी दुष्काळ जाहीर केला पाहिजे. पश्चिम महाराष्ट्रातील चार जिल्हयात प्रचंड संकट आले असे म्हटले जाते. ते काही प्रमाणात खरे आहे. आम्ही राजकीय भाषण करु इच्छित नाही. परंतु मंत्री महोदयांनी समतोल दृष्टी बाळगली पाहिजे. पश्चिम महाराष्ट्रात दुष्काळ पडला आहे तसे कोकण, खानदेश, विदर्भ आणि मराठवाड्यात देखील ही स्थिती निर्माण झाली आहे. सांगली, सातारा, सोलापूर आणि पुणे जिल्हयात गंभीर परिस्थिती निर्माण झाली असे शासनाचे म्हणणे आहे. नगर, नंदूरबार, बुलढाणा, अकोला, वाशिम, गोंदिया, कोकणातील जिल्हयांमध्ये देखील दुष्काळ पडला आहे हे कोणी मानायला तयार नाही. 50 पैशाच्या आत आणेवारी असलेली गावे जाहीर करावीत म्हणजे हा विषय संपून जाईल. चाऱ्यांचा, छावणीचा विषय विदर्भ आणि मराठवाड्यात आवश्यक नाही का?

सभापती महोदय, पिण्याच्या पाण्याच्या संदर्भात शासनाने 12 जी.आर.काढले आहेत. सप्टेंबरपासून आमची यंत्रणा कामाला लागली आहे, पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण झालेली गावे शोधून काढली आहेत, छावणीची स्थाने निश्चित केली आहेत, रोजगार हमी योजनेच्या कामांचे पूर्ण नियोजन तयार आहे, 10 हजार मजुरांनी जरी कामाची मागणी केली तर काम देण्याची तयारी

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर.....

केलेली आहे अशी स्थिती आहे का? असल्यास मंत्री महोदयांनी उत्तराच्या भाषणात सभागृहाला माहिती द्यावी अशी मी विनंती करतो. ही स्थिती राज्यात कुठेही नाही. तहान लागल्यानंतर विहीर खणण्यास सुरुवात केली जाते अशी खेडेगावात म्हण आहे. त्या म्हणीप्रमाणे शासनाने तहान लागल्यानंतर विहीर खणण्यास सुरुवात केली आहे.

सभापती महोदय, शासनाने 31 मार्च, 2012 रोजी जी.आर.निर्गमित केला आहे. हा जी.आर. जिल्हाधिकाऱ्यांकडे 1 किवा 2 एप्रिल, 2012 पर्यंत पोहोचला असेल. मुळात जिल्हाधिकाऱ्यांकडे एवढ्या कामांची जबाबदारी सोपविली आहे की, त्यांना या विषयाबाबत बैठक घेण्यास वेळ नाही. आठवड्यातील तीन दिवस जिल्हाधिकाऱ्यांना मुंबईला किंवा आयुक्त कार्यालयात वेगवेगळ्या बैठकांसाठी जावे लागते. अशा परिस्थितीत दुष्काळाच्या विषयाकडे पहायला त्यांना वेळ आहे का? तहसीलदार, प्रांत अधिकारी हे रोज अर्धा दिवस कार्यालयात नसतात. कोण लक्ष देणार आहे? शासनाला प्रामाणिकपणे दुष्काळाचा मुकाबला करावयाचा असेल तर यंत्रणा सक्षम करण्याची गरज आहे. त्यासाठी केवळ जी.आर.काढून चालणार नाही.

सभापती महोदय, जमीन महसुलात सूट देण्याची शासनाने घोषणा केली. सहकार कर्जाचे रुपांतर करण्याची घोषणा केली. कर्जाचे रुपांतर म्हणजे काय? कर्जाची रक्कम या वर्षी न भरता पुढील वर्षी भरण्याची सवलत देण्यात आली. परंतु व्याजाचे काय? पुढील वर्षापर्यंत कर्ज भरण्याची मुभा दिली, दीर्घ मुदतीचे हप्ते पाडून दिले तरी त्या रक्कमेवरील व्याज त्याच्या डोक्यावर बसणारच आहे.

नंतर श्री.खर्चे...

अशुद्धीत प्रत / शीघ्रलिपीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर .....

या वर्षाचे कर्ज हा प्रश्न शिल्लकच राहतो. या वर्षी तर जमिनीतील पीक गेले, पुढील वर्षी नव्याने शेती करावी लागणार पण त्याचा उल्लेख मात्र या शासन निर्णयात केलेला दिसत नाही. म्हणजे पुढील वर्षी पुन्हा जून-जुलै महिन्यात पेरण्या कराव्या लागणार, त्यासाठी खते व बी-बियाणे लागणार, जमिनीची मशागत करावी लागणार, मग हे सर्व कशातून करणार, त्यासाठी नव्याने कर्ज दिले पाहिजे, शेतकऱ्याला मदत केली पाहिजे. जर शेतकऱ्याला आपण खते व बी-बियाणे दिले नाही तर शेतकरी उभा राहू शकणार नाही म्हणून केवळ कर्जाचे रुपांतर करुन भागणार नाही तर त्याला पुन्हा नव्याने कर्ज द्यावे लागणार आहे आणि सरकारने हे केले नाही तर पुन्हा आत्महत्यांमध्ये प्रचंड प्रमाणात वाढ होणार इतकी भयानक स्थिती राज्यातील शेतकऱ्यांची आहे.

महोदय, शासनाने शेतकऱ्याच्या वीज बिलामध्ये 33 टक्के सूट दिली आहे. हा 31 मार्च, 2012 चा जी.आर. असून माझ्याकडे लोकमतचे कात्रण आहे. त्यात म्हटले आहे की, कृषी पंपांचे फिडर्स बंद करण्याचे निदेश एमएसईबीने दिले आणि शासनाने काढलेल्या जी.आर. ची ऐशीतैशी केली. श्री. अजय मेहता हे वीज वितरण कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक आहेत व त्यांनी असे निदेश दिले आहत की, वीज कंपनीने अशा प्रकारचा कायदा केला असल्याने कृषी संजीवनी योजनेची मुदत संपताच कृषी पंपांचे वीज कनेक्शन्स कपात केले जाणार आहे आणि त्यासाठी शासनाच्या कोणत्याही आदेशांची गरज नाही. याचा फटका राज्यातील साडे तीन लाख शेतकऱ्यांना बसणार आहे. शासन मात्र एका बाजूला जी.आर. काढून मोकळे होणार आणि दुसऱ्या बाजूला राज्यातील साडे तीन लाख शेतकऱ्यांच्या कृषी पंपांचे कनेक्शन्स कपात करण्याचे आदेश दिले हा एक प्रकारे राज्यातील जनतेला मूर्ख बनविण्याचाच प्रकार दिसतो यात शंका नाही. त्याप्रमाणे राज्यात कनेक्शन्स कपात करणे देखील सुरु आहे, दुष्काळाचे सरकारला काहीही देणे-घेणे नाही

महोदय, शासनाने शेतकऱ्याला दिलेल्या कर्जाच्या वसुलीला स्थगिती दिल्याचेही या जी.आर. मध्ये म्हटले आहे. पण ही स्थगिती सहकारी बँकांपुरती मर्यादित आहे की, नॅशनल बँकांसाठी सुध्दा लागू आहे याचा खुलासा होणे आवश्यक आहे. मागील वेळेस आपण सहकारी बँकेच्या कर्जाला स्थगिती दिली होती, त्यावरील व्याज माफ केले होते पण सहकारी बँकांनी शासनाच्या

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर .....

आदेशांचे पालन केले मात्र नॅशनलाईज्ड बँकांनी मात्र कर्जाची वसुली थांबविली नाही, उलट 10 टक्के व्याज आकारुन वसुली केली होती, शेतकऱ्यांच्या जमिनीवर जप्त्या आणून त्यांच्या शेतीची हराशी केली म्हणून याबाबतीत स्पष्टता झाली पाहिजे अन्यथा अशा प्रकारे पुन्हा गोंधळ होण्याची शक्यता आहे, याचा विचार शासनाने करावा.

महोदय, तसेच यामध्ये चारा डेपो उघडण्यात येतील, पिण्यासाठी पाटबंधारे प्रकल्पातील पाणी अग्रक्रमाने राखून ठेवले जाईल असेही नमूद केले आहे. पण प्रकल्पांमध्ये मुळातच पाणी इतके कमी आहे की, त्याची आकडेवारी मी वाचून दाखविली त्यावरुन लक्षात येईल. हा साठा फक्त पुढील महिन्यापुरताच टिकू शकतो पण एप्रिल महिन्यातच विदर्भ व खान्देशमध्ये इतके प्रचंड ऊन असते की, आताच 42 ते 44 अंशापर्यंत उन्हाचा पारा गेलेला आहे. मे महिन्यात तर या पाण्याच्या साठ्याचे मोठ्या प्रमाणात बाष्पीभवन होऊन साठा कमी होणार व आणखी भयानक पाणी टंचाई निर्माण होणार आहे आणि या राखीव साठ्यावर अवलंबून राहिलात तर आपले सर्व गणित बिघडण्याची शक्यता आहे म्हणून याबाबत पर्यायी व्यवस्था काय केली आहे त्याचा खुलासा होणे आवश्यक आहे. पिण्याच्या पाण्याची टंचाई दूर करण्यासाठी टँकर्स व बैलगाड्यांच्या मार्फत पाणीपुरवठा करणे व इतर तत्सम तातडीच्या उपाययोजना करणे असेही यात नमूद केले आहे.

यानंतर श्री. जुन्नरे .....

अशुधारित प्रत / शीघ्रलिपी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर ....

आपल्याजवळ पाणी पुरवठा करण्यासाठी किती टॅन्कर्स आहेत ? दिनांक 31 मार्च, 2012 रोजीच्या जी.आर.मध्ये पुढे असे म्हटले आहे की, "सरकारी जे टॅन्कर्स आहेत त्यातील जे टॅन्कर्स नादुरुस्त आहेत, जुने आहेत ते टॅन्कर्स विकून टाकण्यात येतील व त्या ऐवजी नवीन टॅन्कर्स घेण्यात येतील. जुने टॅन्कर्स कधी विकले जातील, त्याचे टेंन्डर कधी काढले जातील, नवीन टॅन्कर घेण्यासाठी परवानग्या लागतील व नंतर नवीन टॅन्कर्स येईपर्यंत पाऊस येईल. आपल्याला जर खरोखर टॅन्कर्स घ्यावयाचे होते तर यासंदर्भातील आदेश डिसेंबर महिन्याच्या अगोदरच काढावयास पाहिजे होते परंतु ते निघाले नाहीत ही वस्तुस्थिती आहे.

सभापती महोदय, पाण्याच्या नियोजनाच्या संदर्भात असे म्हटले आहे की, "राष्ट्रीय रोजगार हमी योजनेअंतर्गत या आदेशाच्या दिनांकापासून 20 जून 2012 पर्यंत प्रत्येक महिन्याला 15 दिवसापेक्षा जास्त काम करणाऱ्यांना तसेच दारिद्रय रेषेखालील भूमिहीन व्यक्तींना 90 टक्के सवलतीच्या दराने चारा उपलब्ध करुन द्यावा". त्यामुळे हा चारा कोण उपलब्ध करुन देणार आहे ? ज्याची .प्रॅक्टिकल अंमलबजावणी करणे शक्य आहे असेच जी.आर. शासनाने काढले पाहिजेत. शेतकऱ्यांना चारा उपलब्ध करुन दिला पाहिजे हे सत्य आहे. परंतु हे शासन केवळ 30 जून, 2012 पर्यंतच जनावरांना चारा उपलब्ध करुन देणार आहे परंतु 30 जून पर्यंत पाऊस पडला नाही तर शेतकऱ्याने काय करावयाचे ? दिनांक 30 जून, 2012 च्या पुढे शेतकऱ्यांच्या जनावरांना चारा उपलब्ध करुन दिला जाणार नाही. पाऊस पडल्यानंतर गवत उगवण्यासाठी 20 ते 25 दिवसाचा काळ जावा लागत असतो व त्यानंतरच गवत उगवत असते. तसेच रोजगार हमी योजनेत जे मजूर 30 जून पर्यंत महिन्यात 15 दिवसापेक्षा जास्त काम करतील त्यामध्ये केवळ दारिद्रय रेषेखालील व भूमिहीन व्यक्तींनाच फायदा होणार आहे परंतु बाकीच्या व्यक्तींनी काय करावयाचे ? शासन केवळ सवलतीच्या दराने भूमिहीन व द्रारिद्रय रेषेखालील लोकांच्या जनावरांनाच चारा देणार आहे परंतु बाकीच्या लोकांच्या जनावरांसाठी आपण काय उपाययोजना केलेली आहे ?

सभापती महोदय, शासनानने पाणी टंचाईच्या संदर्भात जो जी.आर काढला आहे त्या जी.आर.मध्ये असा उल्लेख केलेला आहे की, "पिण्याच्या पाण्याची टंचाई लक्षात घेऊन जिल्हा

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर ....

अधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद तसेच वरिष्ठ भूवैज्ञानिक व भूजल संरक्षण व विकास यंत्रणा यांच्याशी विचार विनिमय करुन". आज पाण्याविना लोक तडफडून मरत आहेत. माननीय पतंगराव आपण एकदा छातीवर हात ठेवून सांगा की, आपण जे बोलला आहात तशी परिस्थिती खरोखर आहे काय ? खरे म्हणजे या सरकारला आत्मपरीक्षण, आत्मचिंतन करण्याची गरज आहे.

उप सभापती : दुष्काळाच्या संदर्भातील नियम 97 अन्वये ही चर्चा सुरु असून ही चर्चा बरीच लांबली आहे. आपल्याला अजून विचार मांडण्यासाठी किती वेळ लागणार आहे ?

यानंतर श्री. भारवि...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर : या व्यतिरिक्त "क" वर्ग नगरपालिकेच्या क्षेत्रात दरडोई 20 लिटर पेक्षा कमी पाणी पुरवठा होत असेल आणि दीड कि.मी.च्या परिसरात पाण्याचा उद्भव नसेल तर तेथे आकस्मिक उपाययोजना म्हणून विविध कालावधीकरिता खालील आकस्मिक योजना प्राधान्याने घेण्याचे अधिकार जिल्हाधिकारी यांना देण्यात आले आहेत, असे आपण नमूद केले आहे. आता 20 ऐवजी 10 लिटर पाणी मिळते. हे पाणी 15 ते 20 दिवसांनी मिळते. अशा प्रकारे जी.आर.काढून योजना अडचणीत आणल्या जात आहेत. जी.आर.मध्ये मेख मारून त्या गावामध्ये योजनाच होणार नाही हे पाहिले जात आहे. हे चांगले नाही. जी.आर.स्पष्ट असला पाहिजे. "क" वर्ग नगरपालिकेकडून 20 लिटर पेक्षा कमी पाणी पुरवठा होत असेल असेल दीड कि.मी.परिसरामध्ये पाण्याचा उद्भव नसेल तर करता येणार नाही हा शब्द कशाला टाकतो. ज्याला पाणी पाहिजे त्याला ते दिले पाहिजे. देशाला स्वातंत्र्य मिळून 65 वर्ष झाली आहेत. आपण 65 वर्षात जनतेला पाणी देऊ शकत नाही. त्याबद्दल आपल्याला काहीच वाटत नाही. याचे आपण आत्मपरीक्षण करावे. आज जनता पाणी द्यावे एवढेच मागत आहे. ते देखील आपण देऊ शकत नाही. आज आपले लोकांना भुलवण्याचे काम सुरू आहे. हे चांगले नाही. हा खूप मोठा जी.आर.आहे. टॅन्कर्स नादुरूस्त झाले आहेत. जुन्या टॅन्कर्स ऐवजी नवीन टॅन्कर्स खरेदी करावेत. उपलब्ध असलेल्या नियतव्ययातून टॅन्कर्स खरेदी करावी व या संबंधीचा प्रस्ताव नियोजन विकास समितीकडे पाठवावा असे या जी.आर.मध्ये काही काही लिहून ठेवलेले आहे.

वीज बिलाचा विषय मांडून मी माझे भाषण संपविणार आहे. ग्रामीण भागामध्ये नळ पाणी पुरवठा योजना आहेत. मी ग्रामीण भागामध्ये फिरणारा कार्यकर्ता आहे. आज ग्रामीण भागात 15 ते 20 तास लोडशेडींग आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील नळ पाणी पुरवठा योजनेतील टाक्या सुद्धा भरत नाही. 10-10 दिवस खेड्यांमध्ये पाणी येत नाही. त्यासाठी आपण काय करणार आहात ? टॅन्कर देऊ असे आपण सांगतात. पण टॅन्करच भरला नाही तर काय करणार आहात ? वीज नसल्यामुळे तलावावर 15 तास टॅन्कर्स उभे आहेत. सांगली जिल्ह्यातील चित्र आम्ही काल पाहिले. लोक घागरी घेऊन 4-5 तास रांगेमध्ये उभे आहेत. त्या लोकांना विचारले तेव्हा त्यांनी सांगितले की, साहेब आम्ही 4-5 तासापासून टॅन्करची वाट पहात आहोत, पण टॅन्कर अजून आला नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर...

आपलीच चर्चा काल टी.व्ही.चॅनेलवर सुरू होती. ती मी ऐकत होतो. आपल्या जिल्ह्यात टॅन्कर का आला नाही ? त्याचे कारण वीज आहे. तेव्हा विजेचे आपण काय करणार आहात ? सर्व खेळ विजेवर चालणार आहे. पिण्याच्या पाण्याची गंभीर परिस्थिती आहे. त्यासाठी आपण जितकी उपाय योजना करणार आहात त्यासाठी वीज नसेल तर आपला सगळा कार्यक्रम फेल होणार आहे. त्यामुळे माझी विनंती आहे की, आताच आपण युद्ध पातळीवर नियोजन करावे. सर्व कामे आपण बाजूला ठेवा. आपण केंद्राकडे मदत मागितली आहे. केंद्राची टीम केव्हा येईल व जाईल हे सांगता येणार नाही. आताच येथे कोणी तरी सुचविले की, माननीय पंतप्रधानांकडे शिष्टमंडळ घेऊन जाऊ या व त्यांना सांगू या की, आम्हाला अशी अशी गरज आहे. त्यासाठी आम्हाला पॅकेज द्यावे. आज शासन पॅकेज जाहीर करणार होते. विधान सभेमध्ये जाहीर केले की नाही हे मला माहीत नाही. काल माननीय राज्यपालांकडे सांगितले होते की, विधान सभेत उद्या पॅकेज जाहीर करतो. त्यामुळे आपले नवीन काही पॅकेज आहे काय, हे पहावे लागणार आहे.

आपण जो जी.आर.काढला आहे, त्यामध्ये कापूस उत्पादक शेतकऱ्याला डिसेंबरच्या अधिवेशनामध्ये जे पॅकेज जाहीर केले होते त्याचा उल्लेख केला आहे म्हणून मला त्याचे दु:ख होते. दुष्काळाचा आणि कापूस उत्पादक शेतकऱ्यांचा काय संबंध आहे.? कापूस उत्पादक, सोयाबीन उत्पादक व धान उत्पादक शेतकऱ्याचा या दुष्काळाच्या जी.आर.शी काय संबंध आहे. हा जी.आर.सन्माननीय सदस्य श्री.जामा यांनी वाचावा. शासनाने शेतकऱ्यांसाठी 2 हजार कोटींचे पॅकेज दिले. 15 एप्रिल पर्यंत सर्व पैसा शेतकऱ्यांच्या खात्यामध्ये वळता करणार आहे असे सांगितले. आज 10 एप्रिल आहे. अजून त्यांना पैसे मिळालेले नाहीत.

श्री.सरफरे.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर....

सभापती महोदय, मी परवा माझ्या जिल्ह्यात जाऊन आलो. त्या ठिकाणी कोणत्याही शेतकऱ्याला पॅकेजचे पैसे अजून मिळाले नाहीत. अशा प्रकारे कासवाच्या गतीने हे सरकार चालले असल्यामुळे लोकांना आत्महत्त्या करण्याशिवाय पर्याय राहिलेला नाही. त्यांना शहराकडे स्थलांतरीत व्हावे लागेल. चारा आणि पाण्याअभावी या राज्यातील जनावरे, पशुधन हे मेल्याशिवाय राहणार नाही. कालच शासनाने राज्यात ठिकठिकाणी चारा डेपो उघडल्याचे सांगितले. या सभागृहातील काही माननीय सदस्यांनी चारा डेपो सुरु झाल्याचे सांगितले. परंतु मराठवाडा आणि विदर्भामध्ये चारा डेपो उघडल्याचे कुठे दिसत नाही. तुम्ही चारा डेपोसाठी पंचायत समिती गणाचे पॉईंट फिक्स केले काय? त्याचप्रमाणे पिण्याच्या पाण्यासाठी आपण काहीही व्यवस्था केलेली नाही. त्यामुळे या सभागृहामध्ये अशाप्रकारे आपण वांझोटी चर्चा करुन काहीही उपयोग होणार नाही. हे अधिवेशन संपल्यानंतर आपण यंत्रणेला कामाला लावले पाहिजे.लोकप्रतिनिधी, आमदार, खासदार, पंचायत समितीचे सभापती, जिल्हा परिषद-पंचायत समितीचे सदस्य या सर्वंना आपण कामाला लावले पाहिजे. या चर्चेच्या निमित्ताने मला राजकीय भाषण करावयाचे नाही. परंतु या आलेल्या संकटावर मात करण्याकरिता आपण गांभीर्याने विचार करणार आहात की नाही? आपण या ठिकाणी तत्कालीन उपाय सांगितले. परंतु या राज्यामध्ये पुन्हा दुष्काळी परिस्थिती निर्माण होऊ नये या करिता दीर्घकालीन उपाय योजना करणार आहात की नाही? या महाराष्ट्रामध्ये दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाली, टंचाईसदृश परिस्थिती निर्माण झाली तरी या राज्याचे काहीही बिघडणार नाही अशाप्रकारची व्यवस्था आपण निर्माण केली पाहिजे.

सभापती महोदय, सिंचनाच्या प्रश्नावर ज्यावेळी चर्चा होईल त्यावेळी मी त्यावर सविस्तरपणे बोलणार आहे. शासनाने आर्थिक पाहणी अहवाल सादर केला त्यामध्ये हजारो कोटी रुपये सिंचनासाठी खर्च केल्याचे म्हटले आहे. आपण 70 हजार कोटी रुपये खर्च केल्यानंतर फक्त एक टक्का सिंचन वाढले आहे. हे लक्षात घेता आपण आज कुठे आहोत काय करीत आहोत? या बाबत आत्मपरिक्षण, चिंतन करण्याची गरज आहे. या राज्यामध्ये 70 हजार कोटी रुपये खर्च केल्यानंतर फक्त एक टक्का सिंचन वाढणार असेल तर आपले कुठे तरी चुकत आहे, आपण चुकीच्या दिशेने चाललो आहोत. त्यामुळे त्याचे दूरगामी परिणाम महाराष्ट्राला सहन करावे लागतील हे राज्य चुकीच्या दिशेने भरकटल्याशिवाय राहणार नाही अशाप्रकारचा इशारा मी आपल्याला देतो. आपण

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ MMP/

श्री. पांडुरंग फुंडकर....

जर दुष्काळी परिस्थिती, टंचाईसदृश परिस्थितीबाबत वेळीच गांभीर्याने पावले टाकली नाही आणि आपली यंत्रणा आपण हलविली नाही, त्यां यंत्रणेला कामाला लावले नाही तर या राज्यातील जनता तुम्हाला कदापि क्षमा करणार नाही एवढेच या निमित्ताने सांगतो. माननीय सभापतींनी दिलेल्या निर्णयाचा मान ठेवून मी माझे भाषण वेळेमध्ये संपवितो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, मला बोलण्याची संधी द्यावी...

उप सभापती : नियम 97 अन्वये प्रस्तावावरील चर्चा तीन तास सुरु आहे. अशाप्रकारे या चर्चेमध्ये प्रत्येक माननीय सदस्यांना बोलण्यास दिले तर ही चर्चा वेळेत संपणार नाही.

डॉ. पतंगराव कदम : सभापती महोदय, या चर्चेचे ठरविण्यात आलेले टाईम टेबल आपण आम्हाला सांगावे.

उप सभापती : नियम 97 अन्वये गेले तीन तास चर्चा सुरु आहे. सुरुवातीलाच माननीय सदस्यांनी आपल्याप्रमाणे इतर माननीय सदस्यांना देखील बोलावयाचे आहे याचे भान ठेवून बोलणे आवश्यक होते. परंतु या बाबत मी दिलेल्या निर्णयाचे पालन माननीय सदस्यांकडून होत नाही. त्यामुळे आपण जर वेळेचे बंधन ठेवून बोलला तर ही चर्चा उत्तराच्या भाषणासहीत चार वाजेपर्यन्त संपविता येईल. माननीय विरोधी पक्षनेत्यांनी सुध्दा ही चर्चा एक तासामध्ये संपविण्याचे मान्य केले आहे.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, राज्यामध्ये पाणी टंचाई आहे, चारा टंचाई आहे आता सभागृहामध्ये बोलण्याची सुध्दा टंचाई करणार काय?

उप सभापती : सभागृहामध्ये नियम 289 अन्वये प्रस्तावाची सूचना मांडतांना असतांना आपण हा विषय वारंवार उपस्थित केलेला आहे.

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, ही दुष्काळावर चर्चा सुरु असल्यामुळे आपण मला थोडा अधिक वेळ दिला पाहिजे...

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, खरे म्हणजे सत्ताधारी पक्षाकडून देण्यात आलेल्या प्रस्तावावर बरेच माननीय सदस्य बोलले, तो प्रस्ताव बराच वेळ चालला त्यावेळी आम्ही काहीही बोललो नाही. त्यामुळे या प्रस्तावावर चार वाजेपर्यन्त माननीय सदस्यांना बोलण्याची संधी देण्यात यावी आणि प्रस्तावावरील चर्चेला मंत्री महोदयांचे उत्तर सकाळी ठेवण्यात यावे.

उप सभापती : आता माननीय सदस्य श्री. रामदास कदम हे 5 मिनिटे बोलतील त्यानंतर माननीय सदस्या श्रीमती विद्याताई चव्हाण 5 मिनिटे बोलतील व त्यानंतर मंत्री महोदयांचे उत्तराचे भाषण सुरु होईल.

(गोंधळ)

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलतात.)

उप सभापती : माझी सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम साहेबांना विनंती आहे की, त्यांनी पाच मिनिटे भाषण करावे. त्यानंतर सन्माननीय सदस्या श्रीमती विद्या चव्हाण यांनी पाच मिनिटे भाषण करावे आणि त्यानंतर माननीय मंत्री महोदयांचे उत्तराचे भाषण सुरु होईल.

(अनेक सन्माननननीय सदस्य एकाच वेळी बोलतात.)

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, मी पाच मिनिटांमध्ये बोलणार नाही.

(अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलतात.)

उप सभापती : सन्माननीय सदस्य खाली बसणार आहेत काय ? आज याठिकाणी ज्या विषयाबाबत चर्चा होत आहे, ती उद्या सकाळी 10.00 वाजता घेण्यात येईल. आता मी पुढील कामकाज पुकारतो.

श्रीमती विद्या चव्हाण : सभापती महोदय, ...

उप सभापती : मी मघाशी जाहीर केलेले आहे की, या प्रस्तावावरील चर्चा ही उद्या सकाळी 10.00 वाजता सुरु होईल.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, माझ्यावर कशासाठी अन्याय करीत आहात? माझे भाषण होऊ द्यावे.

उप सभापती : आता पहिली लक्षवेधी सूचना चर्चेसाठी घेण्यात येईल. मी मघाशी जाहीर केले आहे की, सदरहू प्रस्तावावरील चर्चा उद्या सकाळी 10.00 वाजता घेण्यात येईल.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, आपण माझे नाव पुकारले आहे आणि मला भाषण करण्यासाठी परवानगी दिलेली आहे म्हणून मी उभा आहे.

उप सभापती : मी कोणाचेही नाव घेतले नाही, सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम, आपण थांबा असे सांगण्यासाठी नाव घेतले होते. आता पहिली लक्षवेधी सूचना चर्चेसाठी घेण्यात येईल.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, आपण येथे नसताना तालिका सभापतींनी असे जाहीर केले होते की, सदरहू चर्चेचा वेळ वाढवून देऊ.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, मला याबाबतीत महत्वाचे मांडावयाचे आहे.

उप सभापती : मी सन्माननीय सदस्यांना बोलण्याची संधी देतो.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, प्रत्येक वेळेला आमच्यावर अन्याय . . ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उप सभापती : मी मघाशी सन्माननीय सदस्यांना सांगितले की, सन्माननीय सदस्यांनी उद्या नाही तर परवा भाषण करावे, हरकत नाही.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, तसे होत नाही.

(काही सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलतात.)

उप सभापती : जर सन्माननीय सदस्यांना सभापतींनी सांगितलेले काही ऐकावयाचे नसेल तर मी तरी येथे कशासाठी बसू ?

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, आम्हाला विनंती करावयाची आहे.

उप सभापती : मी मघाशी लक्षवेधी सूचना पुकारलेली आहे. ती मांडण्यात यावी. तसेच आज नियम 93 अन्वये देण्यात आलेल्या सूचना घेण्यात येणार नाहीत. मी सकाळीच सांगितले होते की, आज नियम 93 अन्वये देण्यात आलेल्या सूचना येणार नाहीत.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, माझ्यावर अन्याय होत आहे. मी भाषण करण्यासाठी उभा राहिलो की मला थांबविले जाते.....

उप सभापती : सन्माननीय सदस्यांना भाषण करावयाचे नाही काय ? मी पुढील कामकाज पुकारु काय ? आता सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी पहिली लक्षवेधी सूचना मांडावी. सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम . . ..

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, माझ्यावर प्रत्येक वेळी अन्याय होत आहे. त्यामुळे मी निषेध करुन सभात्याग करतो.

(यानंतर सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांनी सभात्याग केला.)

. . . .2यु-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सावरेवाडी येथील धरण पूर्ण होऊनही त्याचा सिंचना साठी उपयोग न होणे.

मु.शी: : राजापूर तालुक्यातील (जि.रत्नागिरी) कशेळी-राजापूर-सावरेवाडी येथील धरण पूर्ण होऊनही त्याचा सिंचना साठी उपयोग न होणे यासंबंधी सर्वश्री दिवाकर रावते, रामदास कदम, डॉ.नीलम गोऱ्हे वि.प.स.यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

(सन्माननीय सदस्य अनुपस्थित)

. . . .2 यु-4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : मुंबई महानगर विकास प्राधिकरणाच्या धर्तीवर पुणे महानगर विकास प्राधिकरणाची निर्मिती करणे

मु.शी. : मुंबई महानगर विकास प्राधिकरणाच्या धर्तीवर
पुणे महानगर विकास प्राधिकरणाची निर्मिती करणे
यासंबंधी सर्वश्री मोहन जोशी, जयप्रकाश छाजेड,
उल्हास पवार, वि.प.स.यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.उल्हास पवार (विधानसभेव्दारा निर्वाचित) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे अशी विनंती करतो.

"मुंबई शहराच्या नियोजित विकासासाठी निर्माण केलेल्या मुंबई महानगर विकास प्राधिकरण (MMRDA) च्या धर्तीवर दिवसेंदिवस वाढत असलेल्या पुणे शहराच्या नियोजित विकासासाठी पुणे महानगर विकास प्राधिकरण (PMRDA) ची निर्मिती करण्यासाठी, तसेच त्याचे स्वरुप, कार्यकक्षा व अधिकार ठरविण्याबाबत शासनाने नियुक्त केलेल्या कार्यगटाने सादर केलेल्या प्रारुप अहवालावर शासनाने तत्काळ निर्णय घेण्याची आवश्यकता, पुणे शहरातील लोकप्रतिनिधींनी वारंवार याबाबत शासनाचे लक्ष वेधलेले असतानाही यासंबंधात शासन स्तरावरुन अद्याप कोणतीही कारवाई केली नसणे, पुणे शहराचा वाढता विस्तार विचारात घेता शासनाने अग्रक्रमाने सदर निर्णय घेण्याची जनतेतून सातत्याने केली जात असलेली मागणी, याबाबत शासनाने तत्काळ करावयाची कारवाई व शासनाची प्रतिक्रिया."

श्री.पृथ्वीराज चव्हाण (मुख्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उप सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

<u>निवेदन</u>

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

. . . .2 यु-5

श्री.उल्हास पवार : सभापती महोदय, मुंबई शहराच्या नियोजित विकासासाठी एमएमआरडीएची स्थापना केली आहे. पुणे शहरातील वाढती लोकसंख्या, रहदारीचे प्रश्न, इतर अनेक प्रश्न आणि यामध्ये आसपासची समाविष्ट केलेली गावे आणि वगळलेली गावे या सर्व गोष्टींचा

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आणि याशिवाय पुणे महानगरपालिका, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका आणि त्यामध्ये समाविष्ट झालेली गावे आणि उपनगरांची झालेली अवस्था या सर्व गोष्टींचा साकल्याने विचार केला तर मुंबईला अनेक प्रश्नांनी भेडसावलेले असून त्यासाठी येथे एमएमआरडीए ची स्थापना करण्यात आली. पुणे शहर व पिंपरी-चिंचवड महानगरपालिका आणि तेथील परिसरासाठी त्याच धर्तीवर अशाच प्रकारचे विकास प्राधिकरण स्थापन करावे अशी मागणी या लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून करण्यात आलेली आहे.

सभापती महोदय, या सर्व प्रश्नांचा चर्तुसीमा हद्द आणि तेथील प्रश्न हे सर्व लक्षात घेता आपण याबद्दल काही योजना आखली आहे काय ? याबाबतीत काही निर्णय घेतला आहे काय किंवा याबद्दल राज्य शासनाच्या काही संकल्पना आहेत काय ? तर त्याबाबत येथे खुलासा व्हावा.

श्री.पृथ्वीराज चव्हाण : सभापती महोदय, ज्याप्रमाणे एमएमआरडीए ची स्थापना झाली. त्या प्रमाणेच पुणे,पिंपरी-चिंचवड,पुणे ग्रामीण भागासाठी प्राधिकरण स्थापन करण्याच्या बाबतीत कल्पना पुढे आली आहे.

यानंतर श्री.अ.शिगम . . . .

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पृथ्वीराज चव्हाण..

त्या माध्यमातून पुणे-पिंपरी-चिंचवड व पुणे ग्रामीण या भागाकरिता प्राधिकरण करावे ज्याचे एकूण क्षेत्र 2 हजार 943 कि.मी. असेल तर जिल्ह्याच्या एकूण अठरा ते साडे अठरा टक्के असेल, यामध्ये 54 लाख लोकसंख्या आणि 397 गावांचा विस्तार असेल अशा प्रकारे पीएमआरडीएची स्थापना करावी असा प्रस्ताव आहे. या प्राधिकरणासाठी निधी कोठून उपलब्ध होईल, ऑर्गनायझेशनल स्ट्रक्चर कशा प्रकारे असेल, मुख्यालय कोठे असावे या बाबतचा अभ्यास सुरु आहे. त्यासाठी एक अभ्यास गट स्थापन करुन लवकर निर्णय घेण्याची योजना केलेली आहे. या प्राधिकरणाचे रिसोर्स मोबिलायझेशन, त्याची रचना कशी असेल, अधिकारी कोण असतील आणि त्याचे मुख्यालय कोठे असेल या तीन गोष्टींचा आपणास विचार करावा लागणार आहे. पुणे महानगरामध्ये रिंग रोड कसा असावा, नवीन विकास केंद्रे कोठे असावीत, नगर रचना विभागाच्या माध्यमातून सुनियोजित विकास कसा साधता येईल या सर्व बाबींचा विचार करावयाचा आहे. परंतु या बाबत अजून अंतिम निर्णय झालेला नाही.

श्रीमती दीप्ती चवधरी : सभापती महोदय, पुणे शहराचा झपाट्याने विस्तार होत आहे. पीएमआरडीएचा निर्णय निश्चित स्वागतार्ह आहे. माझा प्रश्न आहे की,पीएमआरडीएमध्ये पिंपरी-चिंचवड प्राधिकरणाचे विलीनकरण होणार की त्याचे अस्तित्व स्वतंत्र राहणार ?

श्री.पृथ्वीराज चव्हाण : सभापती महोदय, या प्राधिकरणामध्ये पिंपरी-चिंचवडचा समावेश करुन एकच प्राधिकरण करण्याचा विचार आहे. परंतु या संदर्भात तेथील स्थानिक लोकप्रतिनिधींनी उलटसुलट मत प्रदर्शित केलेले आहे. पिंपरी-चिंचवड प्राधिकरणाचे वेगळे अस्तित्व ठेवावे अशी त्यांनी भूमिका मांडलेली आहे. म्हणून त्यासाठी एक अभ्यास गट तयार करुन या सर्व प्रश्नांची उत्तरे शोधून पुढील मार्ग काढला जाईल.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्री स्वत: उत्तर देण्यासाठी सभागृहात आले त्याबद्दल मी त्यांचे आभार मानते. माननीय मुख्यमंत्री महोदयांच्या स्मरणात नसेल तर मला त्यांना आठवण करुन द्यायची आहे की, या संदर्भात गेल्या वर्षी 16 फेब्रुवारीला सह्याद्री अतिथीगृहावर एक बैठक झाली होती. त्या बैठकीत पीएमआरडीए करणार असे त्यांनी जाहीर केले

.2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे..

होते. दोन्ही शहरांची मिळून एक नियोजन समिती गठीत केलेली आहे. या समितीवर दोन्ही बाजूकडील नगरसेवक घेतलेले आहेत. या नियोजन समितीच्या बैठका होत नाहीत अशा आमदार आणि नगरसेवकांच्या तक्रारी आहेत. या समितीमध्ये कोणते निर्णय घेतले ते स्पष्ट होत नाहीत. पुणे शहर तसेच पिंपरी-चिंचवड या दोन्ही महानगपालिकांमध्ये तेथील वाहतुकीच्या प्रश्नावर एकमत नाही. विकास आराखड्यावर एकमत नाही. बीडीपीवर एकमत नाही. दारे उजवीकडे असावीत की डावीकडे असावीत या बाबत एकमत नाही. आता माननीय मुख्यमंत्र्यांनी सांगितले की, आम्ही एक अभ्यास गट नेमणार आहोत. पीएमआरडीए जाहीर करणे हा काही राजकीय निर्णय नाही तर विकास समोर ठेवून घेतलेला हा निर्णय आहे. तेव्हा माझा प्रश्न आहे की, समिती कोणता अभ्यास करणार आहे आणि त्याची अंमलबजावणी कशा प्रकारे होणार आहे ?

श्री.पृथ्वीराज चव्हाण : सभापती महोदय, या संदर्भात लोकप्रतिनिधींची वेगवेगळी मते आलेली आहेत. तेव्हा त्या सर्वांना एकत्र करुन पुढे कसा मार्ग काढायचा आहे याचे रिर्सोस मोबिलायझेशन कशा प्रकारे होईल, त्याची रचना कशी असेल, ऑर्गनायझेशनल स्ट्रक्चर कसे असेल या आणि इतर काही बाबींचा अभ्यास करण्यासाठी काही वेळ लागेल. हे प्राधिकरण करावे किंवा करु नयेत असे मतभेद आहेत. तेव्हा एकमत करुन निर्णय घ्यावा लागेल. याबाबत तीन महिन्यात निर्णय घेण्यात येईल.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्री महोदयांनी सांगितले की, या संदर्भात काही मतभेद आहेत. या प्राधिकरणाचे अध्यक्ष हे माननीय मुख्यमंत्री असले पाहिजेत अशी मागणी स्थानिक खासदारांनी केली आहे,

यानंतर श्री.बरवड..

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री. विनोद तावडे .....

आणि स्थानिक पालकमंत्र्यांनी अशी मागणी केली आहे की, त्याचे अध्यक्ष पालकमंत्री असले पाहिजेत. अशी काही वेगवेगळी मते आलेली आहेत का ? जर आली असतील तर त्यावर आपण काही निर्णय दिला आहे का ? निर्णय दिला असेल तर चांगले आहे. परंतु निर्णय दिला नसेल तर तो कधीपर्यंत देणार ? कारण निर्णय दिला की पुढच्या सर्व व्यवस्था होतील आणि पुणे शहर ज्याची बरीच वर्षे वाट पाहात आहे ते पीएमआरडीए चालू होईल. म्हणून असा काही निर्णय आपण लगेच देणार का ?

श्री. पृथ्वीराज चव्हाण : सभापती महोदय, महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियमामध्ये डिसेंबर, 2009 मध्ये जो काही बदल करण्यात आला होता त्यामधील कलम 42(सी) मध्ये क्षेत्र विकास प्राधिकरण म्हणजे एरिया डेव्हलपमेंट ॲथॉरिटी स्थापन करण्याची तरतूद समाविष्ट करण्यात आलेली आहे. त्या तरतुदीनुसार आपल्याला कोठलेही शहर विकास प्राधिकरण किंवा एरिया डेव्हलपमेंट ॲथॉरिटी स्थापन करता येईल. पुण्याचे सुध्दा करता येईल. त्या अनुषंगाने हे प्राधिकरण निर्माण करण्याची कल्पना पुढे आलेली आहे. त्या कायद्यामध्ये पालकमंत्री अध्यक्ष असतील अशी तरतूद केलेली आहे. परंतु नागपूरची एन.आय.टी. वेगळ्या धर्तीवर आहे हे आपल्याला माहीत आहे. त्याचप्रमाणे मुंबईचे एमएमआरडीए वेगळ्या धर्तीवर आहे. त्यामुळे याबद्दल निश्चितच वेगवेगळी मते आहेत हे मी सुरुवातीलाच सांगितले. त्याची रचना कशी असावी या बाबत काही लोकप्रतिनिधींची वेगवेगळी मते आहेत. त्याचबरोबर दोन्ही महानगरपालिकांच्या महापौरांचे स्थान काय असावे, आयुक्तांचे स्थान काय असावे, ज्या नगरपरिषदा असतील त्यांच्या मुख्याधिकाऱ्यांचे स्थान काय असावे, जिल्हाधिकाऱ्यांचे स्थान काय असावे, मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांचे स्थान काय असावे, या सर्व अधिकाऱ्यांचे काय स्थान असेल आणि त्यांचे इंटरॲक्शन कसे होईल अशा बऱ्याच प्रश्नांच्या बाबतीत निर्णय घ्यावयाचा आहे. अर्थातच हे प्राधिकरण जर स्थापन झाले तर त्यानंतर पुणे महानगर विकास प्राधिकरणाचा जो प्रदेश असेल त्यामध्ये पुणे महानगर नियोजन समितीने म्हणजे पीएमपीसीने तयार केलेल्या ज्या विकास योजना असतील त्या अनुषंगाने पुढचा विकास आपल्याला करावयाचा आहे. त्यामध्ये इंटिग्रेटेड रोड डेव्हलपमेंट असेल

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MMP/

श्री. पृथ्वीराज चव्हाण ....

किंवा रींग रोड असेल. मी आपल्याला सांगितले की, एरिया डेव्हलपमेंट ॲथॉरिटीच्या कायद्यामध्ये पालकमंत्री अध्यक्ष असावेत अशी तरतूद आहे. त्या बाबतीत काही मते प्रदर्शित करण्यात आलेली आहेत. कारण एमएमआरडीएचे अध्यक्ष मुख्यमंत्री आहेत तसेच एन.आय.टी. वेगळ्या पध्दतीने केलेली आहे. या सगळ्या गोष्टींचा विचार करुन पुढे निर्णय घ्यावयाचा आहे.

श्री. हेमंत टकले : सभापती महोदय, एकूणच नागरीकरणामुळे अशी जी मोठी शहरे महाराष्ट्रामध्ये आहेत त्यापैकी मुंबई आणि नागपूरच्या ठिकाणी अशा प्रकारची प्राधिकरणे आज काम करीत आहेत. पुण्याची सुध्दा संभाव्य किंवा आताच्या स्थितीत असलेली लोकसंख्या आपण यामध्ये गृहीत धरलेली आहे परंतु आताच्या नियोजनाच्या टप्प्यावर असताना यापुढील 10 वर्षामध्ये पुणे महानगर विकास प्राधिकरणाच्या एकूण कार्यक्षेत्रात एकूण किती लोकसंख्या येणार आहे, दहा वर्षानंतर जी एकूण लोकसंख्या अपेक्षित असेल त्यादृष्टीने या प्राधिकरणामध्ये काय निश्चित उपाययोजना आपल्याला आताच करुन ठेवता येतील याचा विचार करणे आवश्यक आहे.

यामध्ये निश्चितपणे एक भाग असा आहे की, वाढत्या नागरीकरणामुळे तेथील जे प्रश्न आहेत ते प्रश्न प्रत्येक वेळी पुण्याला भेट दिली तर मागच्या भेटीपेक्षा या भेटीत अधिक तीव्र झालेले आहेत. मग रस्त्याचा प्रश्न असेल, पाण्याचा प्रश्न असेल, सुरक्षिततेचा प्रश्न असेल, या सगळ्या बाबतीत परिस्थिती हाताबाहेर जात चाललेली आहे. याला कोठे तरी पायबंद घालण्यासाठी हा सगळा जो त्याच्या प्रक्रियेचा भाग आहे तो लवकरात लवकर पूर्ण होण्याची आवश्यकता आहे. कारण आज आपण महाराष्ट्रामध्ये आय. टी. सेक्टर असेल किंवा दुसरे सेक्टर्स असतील त्यामध्ये परदेशी गुंतवणूक येऊन किंवा विद्येचे माहेरघर असलेल्या पुण्यामध्ये परदेशातून शिक्षणासाठी येणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या लक्षात घेऊन त्या ठिकाणी असलेल्या शिक्षण संस्था, तेथील औद्योगिक वाढ त्याच बरोबर एवढ्या मोठ्या समुहासाठी लागणारा पाणीपुरवठा या सगळ्या बाबींमधील जी प्रक्रिया आहे त्यामध्ये थोडा अधिक वेग येण्याची आवश्यकता आहे. कारण आताच जर ते झाले नाही तर कदाचित हे प्राधिकरण जेव्हा स्थापन होईल त्यावेळी त्या ठिकाणी नवीन प्रश्न उभे राहिलेले दिसतील. त्यामुळे या बाबतीत शासन तातडीने कार्यवाही करण्याबाबत विचार करील का ?

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पृथ्वीराज चव्हाण : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले यांनी प्रामुख्याने या पुणे महानगर विकास प्राधिकरणाच्या अंतर्गत लोकसंख्येबाबत प्रश्न विचारलेला आहे. दिनांक 29.6.1999 रोजीच्या अधिनियमानुसार पुणे, नागपूर व मुंबई असे तीन महानगर प्रदेश घोषित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्याची घोषणा दिनांक 23.6.1999 साली झाली. त्यावेळी पुणे महानगर प्रदेशाची एकूण लोकसंख्या 53 लाख 87 हजार 929 एवढी होती. एकूण क्षेत्रफळ 2,943 चौ.कि.मी. आणि त्यामध्ये 397 गावे असणार आहेत. पुणे महानगर नियोजन समिती दिनांक 17.12.2008 रोजी गठित करण्यात आली होती. पुणे व पिंपरी-चिंचवड महानगरपालिकांचा त्यात समावेश आहे. लोणावळा, तळगाव-दाभाडे, आळंदी या नगरपरिषदांचा समावेश आहे. पुणे शहर व मावळ तालुक्याचे संपूर्ण क्षेत्र तसेच हवेली, भोर, दौंड, शिरुर, मुळशी आणि खेड या तालुक्यांचा काही भाग या क्षेत्रात प्रस्तावित केलेला आहे. या भागांमध्ये वाढत्या नागरिकरणामुळे गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत. पुणे शहरामध्ये पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर झालेला आहे. त्याचप्रमाणे सांडपाण्याचा, नदीच्या प्रदूषणाचा, घन कचऱ्याचा असे प्रश्न निर्माण झालेले आहेत. महानगर प्रदेश घोषित झाला तर नागरिकरणामुळे निर्माण झालेल्या समस्यांबाबत एकत्रित विचार करता येईल. त्यात मेट्रो रेल्वेचा विचार असेल, असे सर्व प्रश्न एकत्रितपणे सोडविता येतील. म्हणून ही कल्पना 1999 मध्ये मांडण्यात आली होती.

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : विलेपार्ले येथील अनेक झोपड्या व चाळीतील रहिवाशांना झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्यासाठी बिल्डरने स्थानिक गुंडांना हाताशी धरुन रहिवाशांना केलेली मारहाण

मु. शी. : विलेपार्ले येथील अनेक झोपड्या व चाळीतील रहिवाशांना झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्यासाठी बिल्डरने स्थानिक गुंडांना हाताशी धरुन रहिवाशांना केलेली मारहाण यासंबंधी किरण पावसकर ,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.किरण पावसकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"विलेपार्ले मुंबई येथील शिवाजीनगर मधील सर्व्हे क्र.325,295,297,299, 296,294,387,386 येथील झोपड्या व चाळी शासनाने गलिच्छ वस्ती म्हणून घोषित करणे, या ठिकाणी चामुंडा बिल्डर्स यांनी झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्याचा निर्णय घेणे, यासाठी चाळीतील रहिवाशांच्या बनावट सह्या करून त्याचप्रमाणे काही रहिवाशांना स्थानिक गुंडाकडून धमकावून बेदाम मारहाण करून त्यांच्या जबरदस्तीने सह्या घेणे, अशा गुंडाविरूध्द अंधेरी, विलेपार्ले पोलीस स्टेशनमध्ये अनेक गुन्हे दाखल असणे, अशा गुंडाकडून बिल्डर्सच्या संगनमताने बोगस कागदपत्रे सादर करून गोर-गरिबांची घरे बळकावली जात असणे, मात्र पात्र असणाऱ्या लोकांना ती न मिळणे, तसेच मुंबईतील सात रस्ता येथे साईबाबा नगर झोपडपट्टी पुनर्विकास योजनेत झालेला गैरप्रकार, या भागातील जागेचे भाव रु.30,000/- प्रती चौ.फू असल्यामुळे लोखंडवाला बिल्डर्सने साईबाबा नगर को.ऑ.हौसिंग सोसायटीच्या सभासदांच्या अंगठ्याचे बनावट ठसे व सह्या करुन या मोक्याच्या जागी झोपडपट्टी पुनर्विकास योजना राबवण्याचा घेतलेला निर्णय, तेथील रहिवाशांनी याबाबत आर्थिक गुन्हे विभागाकडे तक्रारी दाखल करणे, तसेच सदर प्रकल्प जबरदस्तीने आणि गैरप्रकाराने राबवला जात असल्याची तक्रार झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.किरण पावसकर...

करणे, परंतु प्राधिकरणाकडे दिनांक 5 सप्टेंबर, 2005 मध्ये तक्रार करुन सुध्दा अद्याप प्राधिकरणाने यावर कोणतीही कार्यवाही न करणे, दिनांक 5 मार्च, 2012 रोजी मा.मुख्यमंत्र्यांनी या योजनेला दिलेली स्थगिती, परिणामी या प्रकरणाची त्वरित चौकशी करण्याची तेथील रहिवाशांची होत असलेली मागणी यावर शासनाने केलेली वा करावयाची उपाययोजना"

श्री.सचिन अहिर (गृहनिर्माण राज्य मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो. तसे करीत असताना मी आपल्या अनुमतीने या निवेदनामध्ये दुरुस्ती करु इच्छितो. निवेदनाच्या शेवटच्या परिच्छेदामध्ये दि.29.2.2011 ऐवजी दि.29.2.2012 असे वाचावे.

उप सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

अशुधारित प्रत / शुद्धीसाठी नाही

NTK/ MMP/

श्री.किरण पावसकर : सभापती महोदय, विलेपार्ले, मुंबई येथील शिवाजीनगरमधील सर्व्हे क्र.325, 295, 297, 299, 296, 294, 387 व 386 येथील झोपड्या व चाळी शासनाने गलिच्छ वस्ती म्हणून घोषित केलेली आहे. हे घोषित केल्यानंतर तेथील रहिवाशांनी माननीय मुख्यमंत्री व माननीय गृह मंत्र्यांना निवेदने दिल्यानंतरही तेथील झोपडपट्टीचा विकास करुन घेण्यासाठी बिल्डरने स्थानिक गुंडाना हाताशी धरुन रहिवाशांच्या बायका, मुलांना मारहाण झाल्याच्या प्रकरणांबाबत एफ.आय.आर. दाखल झालेले आहेत. उत्तरामध्ये असे नमूद केले आहे की, 2010 या वर्षात एक एफ.आर.आर.नोंदविला असून त्याबाबत कारवाई करण्यात आलेली आहे. यातील गंभीर बाब अशी आहे की, दिनांक 30.10.2011 रोजी एक एफ.आय.आर.नोंदविण्यात आला होता, त्याचा उल्लेख या निवेदनात आलेला नाही. दिनांक 14.2.2010 रोजी विलेर्पो पोलीस ठाण्यामध्ये एफ.आय.आर.नोंदविलेला आहे त्याचा उल्लेख निवेदनात केलेला आहे. या गुन्ह्यात मयुर ठाणगे, निलेश ठाणगे, राजू ठाणगे हे तीन बंधू व अमरनाथ उपाध्याय यांची नावे आलेली आहेत. झोपडपट्टी पुनर्वसन योजना आल्यानंतर जे लोक 1964 पासून ज्या घरांमध्ये रहात आहेत त्यामध्ये विधान भवनात काम करणारे काही कर्मचारी आहेत. त्यांच्याही बायका मुलांना मारहाण करण्यात आलेली आहे. 2010 मध्ये नोंदविण्यात आलेल्या एफ.आय.आर.संबंधी कोणतीही कारवाई करण्यात आली नाही. 2012 मध्ये एफ.आय.आर.नोंदविण्यात आला आहे त्यासंबंधी संबंधितांवर कारवाई करण्यात आली आहे.

माझ्याकडे एक पुस्तक आहे. एका घरामध्ये त्याच गुंडांकडून निवडणुकीसाठी ओळखपत्रे तयार करण्यात आली आहेत. एका घराची 4 कार्डे तयार केलेली आहेत आणि त्या कार्डाच्या आधारे प्रत्येकाला एक घर देण्यात आले आहे. म्हणजे एका झोपडीच्या 5 झोपड्या देण्यात आल्या आहेत. त्याचा पुरावा मी आपल्याकडे पाठवित आहे. हे लोक 2005 सालापासून शासन दरबारी तक्रारी करीत आहेत.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

यानंतर श्री.शिगम....

श्री. किरण पावसकर ...

तेथील गोरगरिबांची घरे काढून घेण्यात आलेली आहेत आणि 6-7 स्थानिक गुंडांना नव्याने घरे देण्यात आलेली आहेत. या गुडांचा तेथील रहिवाशांना वारंवार त्रास होतो. या गुंडांवर केसेस दाखल झालेल्या आहेत, 2009मध्ये या गुंडांना तडीपार करण्यात आलेले होते...(अडथळा) मी माननीय विरोधी पक्ष नेत्यांना सांगू इच्छितो की, हा अतिशय महत्वाचा प्रश्न आहे. मुंबईमध्ये घर होण्यासाठी लोक स्वप्न पहात असतात. मग जर कोणी वडिलांपासूनचे घर काढून घेत असेल तर त्याची तक्रार कुठे करायची ? या पुनर्वसन योजनेशी ज्या बिल्डर आणि राजकीय व्यक्तींचा संबंध आहे त्यासंबंधी निवेदनामध्ये नमूद केलेले आहे. परंतु किती अधिका-यांचा संबंध आहे याचा उल्लेख लक्षवेधीच्या निवेदनामध्ये केलेला नाही. तसेच सर्व्हे क्रमांक 388 संबंधी निवेदनामध्ये उल्लेख केलेला नाही. तेथील गरीब लोकांची घरे अशा त-हेने काढून घेण्यात येणार असतील, निवडणुकीची खोटी ओळखपत्रे तयार करुन एसआरए योजनेमध्ये गुंड गैरफायदा घेत असतील तर त्यांच्या बाबतीत शासन कोणती कारवाई करणार आहे ? हा 388 विस्तारित सर्व्हे क्रमांक रद्द करण्यात येणार आहे काय ? एवढया तक्रारी केल्यानंतर एसआरए स्कीम किंवा अनेक्चर-2मध्ये जी बोगस नावे टाकण्यात आलेली आहेत त्या बाबतीत संबंधित अधिका-यांवर काय कारवाई करण्यात येणार आहे ?

श्री. सचिन अहिर : उत्तरामध्ये स्पष्टपणे नमूद केलेले आहे की, 98 टक्के लोकांनी या स्कीमला सहमती देण्याचे काम केलेले आहे. तरीही सन्माननीय सदस्यांनी ज्या तक्रारींचा उल्लेख केला त्याचे गांभीर्य पहाता त्याचा या स्कीमशी काही संबंध आहे काय, असा प्रश्न निर्माण होतो. सन्माननीय सदस्यांनी सांगितलेली बाब योग्य की अयोग हे नंतर तपासून पाहिले जाईल. त्याआधी ॲडिशनल कमिशनर यांच्या स्तरावर पात्रता तपासण्याच्या बाबतीत काही दिरंगाई झालेली आहे किंवा कसे, पात्रता तपासणी योग्य झालेली आहे किंवा नाही याची फेर तपासणी करण्यात येईल.

श्री. किरण पावसकर : त्या ठिकाणी विस्तारीत सर्व्हे क्रमांक 388मध्ये विधान भवनात काम करणारे काही कर्मचारी रहात आहेत. त्यांनी माननीय मुख्यमंत्र्यांना निवेदने दिलेली आहेत. त्या निवेदनाच्या प्रती मी माननीय मंत्री महोदयांना देतो. त्यासंदर्भात माझा प्रश्न असा आहे की, सर्व्हे क्रमांक 388 हा त्या सोसायटीमधून रद्द करण्यात येईल काय ?

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सचिन अहिर : सन्माननीय सदस्यांनी जो सर्व्हे क्रमांक सांगितला त्याचे ॲक्विझिशन करण्याचे काम झालेले आहे. 1977 मध्ये स्लम घोषित झाली. या योजनेतून एक सर्व्हे नंबर वेगळा काढता येत नाही. सन्माननीय सदस्यांनी सांगितल्या प्रमाणे एखादी नवीन योजना झाली असेल, ती योजना या सिटी सर्व्हे क्रमांकाच्या बाहेर असेल, ती नवीन योजना असेल आणि त्यांना वेगळया पध्दतीने सब्मिशन करुन घ्यायचे असेल तर ती बाब निश्चितपणे तपासून पाहून पुढच्या काळात ते सब्मिट करण्याचा प्रयत्न केला जाईल.

श्री. उल्हास पवार : सन्माननीय सदस्यांनी महत्वाचा प्रश्न उपस्थित केलेला आहे. बनावट सह्या घेऊन निवडणुकीची खोटी ओळखपत्रे तयार केलेली आहेत आणि बिल्डर व अधिकारी यांच्या संगनमताने हे घडलेले आहे असे सन्माननीय सदस्यांनी सांगितलेले आहे. ही बाब अतिशय गंभीर आहे. या प्रकाराची शासन गांभीर्याने दखल घेणार आहे की नाही ?

श्री. सचिन अहिर : होय.

--

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>लक्षवेधी सूचना क्रमांक 4 व 5 संबंधी</u>

उप सभापती : लक्षवेधी सूचना क्रमांक 4 व 5 पुढे ढकलण्यात आलेल्या आहेत.

...नंतर श्री. भोगले..

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: औचित्याच्या मुद्यासंबंधी

श्री.संजय केळकर : सभापती महोदय, योगायोगाने नगरविकास राज्यमंत्री आणि माननीय मुख्यमंत्री देखील सभागृहात उपस्थित आहेत. मी त्यांना निवेदन दिलेले आहे. महाराष्ट्रामध्ये ज्या महापालिका आहेत त्या महापालिकांच्या क्षेत्रात मालमत्ता कर आकारणीच्या संदर्भात नवीन पध्दत लागू करण्याचा प्रस्ताव शासनातर्फे पाठविला गेला आहे. ठाणे महापालिकेमध्ये देखील प्रशासनाने अशा प्रकारचा प्रस्ताव महासभेपुढे आणल्यानंतर तेथील लोकप्रतिनिधींनी तो प्रस्ताव नामंजूर केला. निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींनी नामंजूर केलेल्या प्रस्तावाची अंमलबजावणी आयुक्त कोणत्या अधिकारात करु शकतात? असा प्रश्न तेथील लोकप्रतिनिधी आणि सर्वसामान्य जनतेच्या मनात निर्माण झाला आहे.

सभापती महोदय, लोकप्रतिनिधींच्या हक्कावर गदा आणण्याचे काम आयुक्तांनी सुरु केले आहे. महासभा मोठी की प्रस्तावाची अंमलबजावणी करु पाहणारे आयुक्त मोठे असा विषय त्या महापालिकेमध्ये सुरु झालेला आहे. महासभेमध्ये हा प्रस्ताव नामंजूर केल्यानंतर आयुक्तांनी त्या प्रस्तावाची अंमलबजावणी करण्यास सुरुवात केली आहे. त्यामुळे त्या भागातील नागरिकांना वेठीस धरण्याचा प्रकार सुरु झाला आहे. महासभेमध्ये लोकप्रतिनिधींनी मंजूर केल्यानंतर प्रस्तावाची अंमलबजावणी करणे हे समजू शकते. परंतु आयुक्तांच्या लहरीपणामुळे, आग्रहामुळे आणि दडपशाहीमुळे महासभेने नामंजूर केलेल्या प्रस्तावाची अंमलबजावणी करण्याचा प्रयत्न होत आहे. तातडीने हा प्रकार थांबला पाहिजे. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींच्या चर्चेविना महापालिका क्षेत्रात एवढा महत्वाचा निर्णय नामंजूर होऊनही अंमलात आणणे योग्य नाही. या प्रस्तावाच्या अंमलबजावणीला तातडीने स्थगिती द्यावी अशी मी आपल्या माध्यमातून शासनाला विनंती करीत आहे.

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी एका सेकंदापूर्वीच माझ्या हाती निवेदनाची प्रत दिलेली आहे. आजच्या कामकाज पत्रिकेत दर्शविण्यात आलेले सन 2012 चे वि.स.वि.क्रमांक-5 हे प्रॉपर्टी टॅक्सची आकारणी करण्यासंबंधीचे आहे. प्रॉपर्टी टॅक्स कॅपिटल व्हॅल्यू बेसवर आकारावा की रेटेबल व्हॅल्यू बेसवर आकारावा या संदर्भात हे विधेयक आहे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय केळकर : हा विषय वेगळा आहे. लोकप्रतिनिधींनी एखाद्या प्रस्तावावर चर्चा न करता तो प्रस्ताव नामंजूर केल्यानंतर देखील प्रशासन त्या प्रस्तावाची अंमलबजावणी करु पहात असेल तर त्याला शासनाने स्थगिती दिली पाहिजे.

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, तोच विषय आहे. आपण अनुमती दिली तर मी आता उत्तर देण्यास तयार आहे. अन्यथा वि.स.वि.क्रमांक-5 या विधेयकावर बोलताना मी शासनाची भूमिका मांडणार आहे.

उप सभापती : माननीय मंत्री महोदयांनी दोन दिवसात सर्वंकष माहिती घेऊन याबाबत उत्तर द्यावे.

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: माननीय उद्योगमंत्री श्री.नारायण राणे यांचे वाढदिवसाबद्दल अभिष्टचिंतन

उप सभापती : आज माननीय उद्योगमंत्री श्री.नारायण राणे यांचा वाढदिवस आहे. त्यांनी आज 61 व्या वर्षात पदार्पण केले आहे. त्यांच्या वाढदिवसानिमित्त सभागृहाच्या वतीने मी त्यांना शुभेच्छा देतो. पुढील राजकीय वाटचालीसाठी त्यांना आमच्या हार्दिक शुभेच्छा.

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>विशेष उल्लेख</u>

पृ.शी./मु.शी.: धामापूर, ता.मालवण, जि.सिंधुदुर्ग येथे कृषी चिकित्सालय, फळ रोपवाटिका, कृषी पर्यटन केंद्र स्थापन करणे याबाबत श्री.सुभाष चव्हाण, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

श्री.सुभाष चव्हाण (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

सभापती महोदय, कृषी पर्यटनाच्या माध्यमातून पर्यटकांच्या आकर्षणासाठी व स्थानिक शेतकऱ्यांच्या मार्गदर्शनासाठी अद्यावत कृषी चिकित्सालय, फळ रोपवाटिका, कृषी पर्यटन केंद्र धामापूर, ता.मालवण, जि.सिंधुदुर्ग येथे स्थापन करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे. कृषी विभागाने कृषी पर्यटनाच्या माध्यमातून रु.401 लाख इतक्या रक्कमेचा प्रस्ताव नियोजन व वित्त विभागाच्या मान्यतेसाठी सादर करण्याच्या सूचना दिल्या आहेत. सध्या कृषी विभागाच्या अखत्यारितील त्या ठिकाणी फलोद्यान केंद्र कार्यान्वित आहे. कोकणाला लाभलेली विस्तीर्ण किनारपट्टी आणि रमणीय निसर्ग सौंदर्य याचा वापर करुन पर्यटनाच्या माध्यमातून कृषी पर्यटन केंद्र स्थापन करण्यात यावे अशी मी विशेष उल्लेखाच्या सूचनेद्वारे शासनाला विनंती करीत आहे.

नंतर श्री.खर्चे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: विद्यापीठाच्या टी.वाय.बी.एस्सी.च्या पेपरमध्ये आढळून आलेला गोंधळ याबाबत श्रीमती शोभाताई फडणवीस, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्रीमती शोभा फडणवीस (विधानसभेने निवडलेले) : महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडते

"राज्यात टी.वाय. बी.कॉम. च्या पेपर फुटीचे प्रकरण गाजत असतानाच सोमवारला टी.वाय. बी.एस्सी. जिऑलॉजीच्या पेपरमधील प्रश्न क्र. 3 मध्ये "अ" आणि "ब" असे 10 मार्कांचे उपप्रश्न असणे, आणि "अ" अंतर्गत आणखी दोन उपप्रश्न देण्यात येणे, त्यामुळे प्रश्न क्र. 3 मध्ये विद्यार्थ्यांना तीन प्रश्नांची उत्तरे लिहावी लागणे, 10 मार्कांचा प्रश्न अतिरिक्त असल्याने विद्यार्थ्यांना प्रश्न सोडविण्यास निर्माण झालेला गोंधळ, विद्यापीठाच्या चुकांमुळे विद्यार्थ्यांचे होणारे नुकसान, शासनाचे याकडे होत असलेले दुर्लक्ष, शासनाने यावर करावयाची कारवाई, सदर विषय विद्यार्थ्यांच्या हिताचा असल्याने मी या माध्यमातून शासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न करीत आहे.

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: मराठवाड्यात मुख्याध्यापकांची रिक्त असलेली पदे याबाबत श्री. रामनाथ मोते, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री. रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक मतदारसंघ) : महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

"शाळेचे व्यवस्थापन, प्रशासन व शैक्षणिक विकास साधण्याचे सर्वात महत्वाचे माध्यम म्हणजे त्या शाळेचे मुख्याध्यापक आहे. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासात, उपक्रमांची अमलबजावणी करण्यात मुख्याध्यापकाची भूमिका महत्वाची असते, मुख्याध्यापक हा शाळेचा "कणा" आहे. मराठवाड्यात जिल्हा परिषदेच्या शेकडो प्राथमिक व माध्यमिक शाळा आहेत. जिल्हा परिषदेच्या सुमारे 350 माध्यमिक शाळा असून त्यापैकी सुमारे 200 शाळा या नियमित मुख्याध्यापकाशिवाय सुरु असून प्रभारी मुख्याध्यापक शाळा चालवित आहेत. अनेक शाळांमध्ये इंग्रजी, गणित व विज्ञान विषयांसाठी तज्ज्ञ शिक्षकही उपलब्ध नाहीत. त्यामुळे ग्रामीण भागातील गोर गरिबांची मुले गुणवत्ता पूर्ण शिक्षणापासून वंचित आहेत. मराठवाड्यातील जिल्हा परिषदांच्या शाळांमधील मुख्याध्यापकांची सुमारे 200 रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने तातडीने कार्यवाही करावी ही विनंती या विशेष उल्लेखाच्या माध्यमातून मी शासनाला करीत आहे.

.....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: बेस्ट बसचे वाढत असलेले अपघातांचे प्रमाण याबाबत श्री. रमेश शेंडगे, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री. रमेश शेंडगे (विधानसभेने निवडलेले) : महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

" मुंबई आणि उपनगरात रिक्षा-टॅक्सी यापेक्षा बेस्टचा प्रवास बरा असे नेहमी नागरिकांकडून बोलले जात असणे, मात्र सन 2010-11 या वर्षात बसचे अपघात होऊन तब्बल 42 पादचाऱ्यांचा मृत्यू ओढवणे, तसेच डबल डेकर बस उलटत नसल्याचा दावा करीत असतानाच दि. 6 एप्रिल, 2012 रोजी वांद्रे कलानगर येथे बस उलटून एका मोटर सायकलस्वाराला स्वत:चे प्राण गमवावे लागणे, तसेच प्रवाशांची काळजी घेणाऱ्या बसपासून अपघाताची शृंखला वाढत असणे, बेस्टचे बस चालक अनेक वेळा निष्काळजीपणे व नियमांचे पालन न करता बस चालविणे याचा अनुभव सर्व मुंबईकरांना येणे, याकडे प्रशासनाचे अक्षम्य दुर्लक्ष असणे, याबाबत सखोल चौकशी करुन अपघातात मृत झालेल्या मृतांच्या कुटुंबीयांना व जखमींना आर्थिक सहाय्य देण्यात यावे, तसेच बस वाहतुकीसाठी कडक नियम करण्यात यावेत, अशी शिफारस मी या विशेष उल्लेखाद्वारे करीत आहे.

.....4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: औचित्याचा मुद्दा

डॉ. नीलम गोऱ्हे : महोदय, मी आपल्या अनुमतीने औचित्याचा मुद्दा उपस्थित करीत आहे.

सभापती महोदय, दुष्काळाच्या प्रश्नावर सभागृहात आज चर्चा झाली व ती चर्चा अजून चालू राहणार आहे. या औचित्याच्या माध्यमातून मी शासनाचे लक्ष वेधण्याचा प्रश्न करणार आहे की हजारो ठिकाणी रोजगार हमी योजनेची कामे चालू असल्याचा दावा शासन करीत आहे. स्वत: माननीय मुख्यमंत्र्यांनी 8 एप्रिल, 2012 रोजी सांगली जिल्ह्यातील आटपाडी तालुक्याला भेट दिली होती. त्यानंतर लगेच स्टार माझाच्या प्रतिनिधींनी सुध्दा त्याच ठिकाणी भेट दिली असता तेथे प्रत्यक्षात एकही मजूर कामावर दिसला नाही, काम बंद आढळून आले तर केवळ रोजगार हमी योजनेचा बोर्ड लावल्याचे आढळून आले. याचा अर्थ माननीय मुख्यमंत्र्यांना जे काम बंद होते तेच दाखविण्यात आले अशी स्पष्टता "स्टार माझा" या चॅनलने समोर आणलेली आहे. मी शासनाकडून अपेक्षा करते की, ज्या तहसीलदारांनी अशा प्रकारचे कोणतेही काम सुरु नसताना मुख्यमंत्र्यांना खोटे काम दाखवून माननीय मुख्यमंत्री व जनतेची फसवणूक केली त्यांची चौकशी करुन निलंबित करावे व त्यांच्यावर कारवाई सुध्दा झाली पाहिजे. हा काय प्रकार आहे की, भेट देण्यासाठी गेलेल्या माननीय मुख्यमंत्र्यांचा अशा प्रकारे अधिकाऱ्यांनी अवमान करणे याबाबत उचित कारवाई होणे आवश्यक आहे.

(सन्माननीय सदस्य श्री. रमेश शेंडगे हे जागेवरुन हरकत घेत असतात)

उप सभापती : सन्माननीय सदस्यांनी परवानगी मागितली पण त्यांच्या मुद्यातील कन्टेन्ट्स काय आहेत याची मला कशी माहिती होणार आहे, याचाही सन्माननीय सदस्यांनी हरकत घेताना विचार करावा.

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

विशेष उल्लेख

(पुढे चालू....)

पृ.शी./मु.शी. : मराठवाडयात जीवित हानी टाळण्यासाठी प्रत्येक गावात वीजरोधक बसविण्याबाबत श्री. धनंजय मुंडे, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

श्री. धनंजय मुंडे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

मराठवाडयात गेल्या काही वर्षात वीज पडून मृत्युमुखी पडणाऱ्यांची संख्या मोठी असणे, विशेषत: बीड जिल्हयात वादळ-वारा आणि अवकाळी पावसाच्या वेळी वीज पडल्याने गेल्या 6 वर्षात मोठी जीवित हानी झालेली असणे, 2006 पासून बीड जिल्हयात 112 जणांच्या अंगावर वीज पडल्याने जीव गमवावा लागणे, तर 37 जण गंभीर जखमी झालेले असणे, वीज पडून होणारी ही जीवित हानी टाळण्यासाठी प्रत्येक गावात वीज रोधक मनोरे उभारण्याची गरज असणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही यासाठी मी विशेष उल्लेखाची सूचना मांडलेली आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी. : प्रत्येक शिक्षकास सेवापुस्तकाची दुय्यम प्रत, भविष्य निर्वाह निधीच्या पावत्या तसेच इतर तत्सम माहितींपासून वंचित ठेवणे याबाबत श्री.भगवान साळुंखे, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

श्री. भगवान साळुंखे (पुणे विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

सभापती महोदय, प्रत्येक शिक्षकास सेवापुस्तकाची दुय्यम प्रत मिळणे, भविष्य निर्वाह निधीच्या पावत्या अर्षअखेरीस मिळणे, वैयक्तिक मान्यतेची प्रत मिळणे, नेमणूक आदेशाची प्रत मिळणे, सेवा ज्येष्ठताक्रमाची यादी मिळणे, याबाबत शासनाने वेळोवेळी आदेश देऊन देखील शालेय प्रशासनाच्या दासीन्यतेतून शिक्षक व शिक्षकेतरांना लाभापासून वंचित रहावे लागत आहे. तसेच शिक्षणाधिकाऱ्यांकडे कोणाताही प्रस्ताव दाखल केला असल्यास अनेक त्रुटी काढणे, उलटसुलट टिपण्या ठेवणे, विविध सबबी सांगणे इत्यादी मार्गाचा अवलंब करुन सर्व संबधितांना वारंवार हेलपाटे मारावयास भाग पाडणे, दमछाक झाल्यावर अर्थपूर्ण व्यवहाराची अपेक्षा करणे इत्यादी निंद्य प्रकार सध्या सर्रासपणे सुरु आहेत. या विशेष उल्लेखाद्वारे मी शासनास अशी विनंती करीत आहे की,अशा बेजबाबदार अधिकाऱ्यांची चौकशी करावी व त्यांच्यावर कठोर कारवाई करावी.

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी. : निवडणूक आयोगाने जातीचे प्रमाणपत्र एका कुटुंबाला एक या प्रमाणे देण्याबाबत श्री.सतीश चव्हाण, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

श्री. सतीश चव्हाण (औरंगाबाद विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

राज्यातील सेतू कार्यालयाकडून देण्यात येणारी जात प्रमाणपत्रे शाळकरी मुले, नोकरदार आणि अन्य नागरिकांना कोणत्या ना कोणत्या कारणासाठी आवश्यक असणे, मात्र प्रमाणपत्रधारकांची वैधता सादर करतांना मोठया प्रमाणात गैरसोय होत असणे, या बाबत निवडणूक आयोगाने जातीचे प्रमाणपत्र प्रत्येक व्यक्तीला देण्यापेक्षा एका कुटुंबाला एक या पध्दतीने देण्याची सूचना नुकतीच करण्यात येणे, सदर सूचनेमुळे नागरिक व विद्यार्थी यांचा वेळ व नाहक होणारा त्रास वाचणार असल्याने जात प्रमाणपत्र कुटुंबाला एक या प्रमाणे ही योजना राबविण्यात यावी, अशी शिफारस या विशेष उल्लेखाद्वारे मी करीत आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी. : पुणे महानगर परिवहन मंडळात रिक्त असलेली पदे तातडीने भरण्याबाबत श्री. अनिल भोसले, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

श्री. अनिल भोसले (पुणे स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

सभापती महोदय, पुणे महानगर परिवहन मंडळाकडे (पीएमपीएमएल) सुमारे 450 वाहक आणि 250 चालक कमी असणे, परिणामी डेपोत सुमारे 450 ते 500 बसेस वाहन चालकाअभावी पडून राहणे, शहराचा वाढता विस्तार आणि वाढती लोकसंख्या याचा विचार करता पुणे महानगर परिवहन मंडळाकडे असलेल्या सर्व बसेस बंद न ठेवता चालू ठेवण्याची आवश्यकता, याबाबत पुणे परिवहन मंडळाकडे चालका अभावी आणि वाहकाअभावी बंद असलेल्या बस गाडया पूर्ण क्षमतेने चालविण्यात येण्याबाबत वाहक, चालकाची पदे तातडीने भरुन नागरिकांची होत असलेली गैरसोय दूर करण्यात यावी अशी शिफारस मी या विशेष उल्लेखाद्वारे करीत आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी. : सिंधुदुर्ग जिल्हयात वार्षिक योजनेतून विहिरींच्या संदर्भात लेखाशीर्षक वगळल्यामुळे ग्रामपंचायती व मक्तेदार संकटात सापडणे याबाबत श्री.राजन तेली, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

श्री. राजन तेली (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

सभापती महोदय, सिंधुदुर्ग जिल्हयात सन 2009-2010 या जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत सार्वजनिक विहीर बांधणे या योजनेतून जवळपास 40 ग्रामपंचायतीनी 50 विहिरींची कामे पूर्ण केली आहेत. परंतु सन 2010 मध्ये जिल्हा वार्षिक योजनेतून सार्वजनिक विहीर हे लेखाशीर्षक वगळले गेले आहे. त्यामुळे सदरहू कामे पूर्ण झालेल्या विहिरीसांठी निधी अद्याप उपलब्ध करुन दिला नसल्याने संबंधित ग्रामपंचायती/मक्तेदार आर्थिक संकटात सापडले आहेत. सदर कामे ही ग्रामपंचायतीने मक्तेदार नेमून केली असल्याने सदर मक्तेदार ग्रामपचायंतीकडे देयकाची मागणी करीत आहेत. कार्यकारी अभियंता (ग्रा.पा.पु.)जिल्हा परिषद सिंधुदुर्ग यांनी कक्ष अधिकारी (पा.पु.) पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्याकडे पाठपुरावा करुन देखील कोणतीच कार्यवाही झालेली नाही. तसेच याबाबत जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत ठराव मान्य करुन तो प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांच्याकडे दि. 5 जानेवारी, 2012 रोजी पाठविण्यात आला आहे. सदरहू मक्तेदारांची देयके अदा करण्यासाठी खास बाब म्हणून निधी उपलब्ध करुन देण्यात यावा व सदरचा निधी जमा होण्यासाठी लेखाशीर्षक आवश्यक असल्यास ते परत निर्माण करण्याबाबत संबंधितांना निर्देश देण्यात यावेत, अशी मागणी मी या विशेष उल्लेखाद्वारे करीत आहे.

यानंतर श्री. भारवि...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: मुंबई महानगरपालिका आणि महाराष्ट्र (नागरी क्षेत्रे) झाडांचे संरक्षण व जतन (सुधारणा) विधेयक.

L.A. BILL NO. V OF 2012

(A BILL FURTHER TO AMEND THE MUMBAI MUNICIPAL CORPORATION ACT AND THE MAHARASHTRA (URBAN AREAS) PROTECTION AND PRESERVATION OF TREES ACT, 1975.)

AND MOTION FOR REFERRING THE BILL TO JOINT COMMITTEE.

श्री.भास्कर जाधव (नगरविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने विधान सभेने संमत केल्याप्रमाणे सन 2012 चे वि.स.वि.क्रमांक 5 - मुंबई महानगरपालिका अधिनियम आणि महाराष्ट्र (नागरी क्षेत्रे) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम, 1975 या मध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक मांडतो.

उप सभापती : विधेयक मांडण्यात आले आहे.

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2012 चे वि.स.वि.क्रमांक 5 - मुंबई महानगरपालिका अधिनियम आणि महाराष्ट्र (नागरी क्षेत्रे) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम, 1975 या मध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक विचारात घेण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

सभापती महोदय, आताच येथे महत्त्वाचा मुद्दा उपस्थित केला होता. हे विधेयक मालमत्ता कर आकारणी संबंधातील आहे. सन 2009-2010 मध्ये आपण एक कायदा संमत केला होता. यापूर्वी प्रॉपर्टी टॅक्सची, रेटेबल व्हॅल्यू बेसवर आकारणी होत होती. परंतु, नवीन कायद्याच्या द्वारे कॅपिटल व्हॅल्यू बेसवर कर आकारणी करण्याचा निर्णय झाला. हे नगरपालिका, महानगरपालिका यांच्या ऐच्छिक सहमतीवर अवलंबून राहणार आहे. या करिता या सभागृहात अनेक वेळा चर्चा झालेली आहे. दोन्ही सभागृहाच्या सन्माननीय सदस्यांची संयुक्त चिकित्सा समिती नेमली गेली. याबाबत याच सभागृहात सर्वात जास्त चर्चा झालेली आहे. या विधेयकावर सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी मोठ्या प्रमाणावर चर्चा घडवून आणली होती व त्याचे आपण कायद्यात रूपांतर केले. शिवसेनेच्या माझ्या सहकारी मित्रांना असे वाटत होते की, हे विधेयक मुंबई महानगरपालिकेला अडचणीत आणण्याकरिता आणले जात आहे. परंतु,चर्चेअंती त्यांचा जो गैरसमज होता तो दूर झालेला आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भास्कर जाधव....

. पहिल्यांदा या विधेयकानुरूप कॅपिटल व्हॅल्यू बेसिसवर महानगरपालिकेला अडचणीत आणण्याकरिता विधेयक आणले जात आहे. परंतु,चर्चेअंती त्यांचा समज गैरसमज होता तो दूर झालेला आहे. पहिल्यांदा या विधेयकानुरूप कॅपिटल व्हॅल्यू बेसिसवर कर आकारणी करण्याचे मुंबई महानगरपालिकेने मान्य केले. दोन वर्षा पूर्वी त्यांनी सदर कर आकारणी करण्याचे मान्य केले. परंतु, त्यांच्याकडे जुन्या जवळ जवळ एक लाख प्रॉपर्टीज आहेत. त्याचा संपूर्ण डाटा कलेक्ट करणे त्यांना थोडेसे अवघड जात आहे. त्यांनी यास तत्वत: मान्यता दिली आहे. त्यांनी याला काही नाकारलेले नाही. कारण ही अत्यंत पारदर्शक कर प्रणाली आहे.

आताच येथे सन्माननीय सदस्य श्री.संजय केळकर यांनी ठाण्या संबंधीचा मुद्दा उपस्थित केला होता. त्यासंबंधातील माहिती मी दोन दिवसात पटलावर ठेवणार आहे. यापूर्वी रेटेबल बेसिस व्हॅल्यूवर कर आकारण होत होती. समजा माझे घर आहे व तेथील स्थानिक स्वराज्य संस्थेशी मी संबंधित असेन किंवा माझे लोक असतील तर माझी ज्या भागामध्ये मालमत्ता आहे, ज्या आकारमानाची मालमत्ता आहे, वयोमानाची मालमत्ता आहे, त्यानुसार कर न आकारण्याची सूचना मी त्यांना करायचो. मला वार्षिक कर दहा हजार रूपये यायचा. माझे मित्र श्री.नितीनजी राऊत हे सत्तेशी संबंधित नसल्यामुळे त्यांची त्याच भागात तेवढ्याच आकारमानाची मालमत्ता असेल तर त्यांना मात्र 15 हजार रूपयांचा कर भरावा लागतो. सदर कर कमी करण्यासाठी त्यांना लवादा कडे जावे लागेल किंवा कोणाला तरी हाताशी धरून आपला टॅक्स कमी करण्याचा प्रयत्न करावा लागेल. त्यामध्ये यश आले नाही तर त्यांना काही तरी तडजोड करावी लागायची. पण आता असे ा होणार नाही. मालमत्तेचे आकारमान, वयोमर्यादा, घराचा प्रकार आणि झोन कळला तर किती कर बसू शकतो हे आपण येथे बसल्या बसल्या सांगू शकतो. अशा प्रकारे अत्यंत पारदर्शक अशी ही कर प्रणाली आहे. ती स्वीकारण्याचे मुंबई महानगरपालिकेने मान्य केले आहे. मुंबई 3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भास्कर जाधव...

महानगरपालिकेला ही कर प्रणाली लागू करण्यासाठी मागच्या दोन वर्षामध्ये आपण मुदत वाढ दिलेली आहे म्हणून त्यांना आता सुद्धा आणखी एक वर्षाची म्हणजे 31 मार्च 2013 पर्यंत सदर कर प्रणाली लागू करण्याकरिता मुदतवाढ देण्या पुरताच या विधेयकाचा उद्देश आहे. त्यामुळे सभागृहाने हे विधेयक एकमताने विनाचर्चा पारित करावे अशी माझी विनंती आहे.

प्रश्न प्रस्तुत झाला.

उप सभापती : विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सन्माननीय सदस्या श्रीमती शोभा फडणवीस, सन्माननीय सदस्य डॉ.रणजित पाटील यांचा प्रस्ताव आहे. त्यांच्यापैकी कोणीही एकाने तो मांडावा.

(प्रस्ताव मांडण्यात आला नाही.)

..4

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, मघाशी आम्ही तालिका सभापतींना विचारले तेव्हा त्यांनी सांगितले की, ही नियम 97 ची चर्चा झाल्यानंतर नियम 260 अन्वयेच्या प्रस्तावावरील चर्चा घेण्यात येईल. सदर बिल उद्या येईल असे सांगितले होते.

यानंतर श्री.सरफरे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे....

या विधेयकावर उद्या चर्चा होईल असे सांगितले गेल्यामुळे ही चर्चा उद्या होईल असे माननीय सदस्यांनी गृहीत धरले होते. आमचे म्हणणे एवढेच आहे की, आपल्याला जर घाई-घाईत हे विधेयक संमत करावयाचे असेल तर ते करु शकता. त्यावर आम्हाला आमचे विचार व्यक्त करावयाचे असल्यामुळे आपण ते आता संमत करु नये. उप सभापती महोदय, आपण नेहमी माननीय सभापतींना विचारुन निर्णय घेतल्याचे सांगत असता. त्याप्रमाणे माननीय तालिका सभापतींनी आपणास विचारुन निर्णय घेतला असेल असे आम्हाला वाटले आणि त्या प्रमाणे आम्ही सभागृहाच्या कामकाजाचे नियोजन केले. माझी आपणास विंनंती आहे की, सत्ताधारी पक्षातर्फे आज नियम 260 अन्वये प्रस्ताव देण्यात आलेला आहे. त्या प्रस्तावावर आजच चर्चा होणे आवश्यक आहे. या विधेयकावर चर्चा होऊन ते पारित करण्यामध्ये काहीही अडचण नाही त्यासाठी एक संपूर्ण आठवडा आपल्याकडे आहे.

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, माझी माननीय विरोधी पक्षनेत्यांना विनंती आहे की, हे विधेयक यापूर्वी आपण पारित केले आहे. या विधेयकामध्ये तसे विशेष काही नाही, फक्त मुंबई महानगरपालिकेला नवीन करप्रणाली लागू करण्यासाठी आपण मुदतवाढ देत आहोत. त्यापेक्षा फार काही वेगळे या विधेयकामध्ये आहे अशातला भाग नाही. चर्चा करण्याकरिता अशाच प्रकारचे दुसरे विधेयक क्रमांक तीन या सभागृहामध्ये उद्याच येत आहे. त्या विधेयकावर चर्चा करण्याची मोठी संधी आपणास मिळणार आहे. त्यामुळे मुंबई महानगरपालिकेतील आपल्या सत्तेला मुदतवाढ देण्याव्यतिरिक्त दुसरे काहीही या विधेयकामध्ये नाही एवढे मला सांगावयाचे आहे.

श्री. विनायक मेटे : सभापती महोदय, सभागृहाच्या इतिवृत्तामध्ये चुकीची नोंद होऊ नये या करिता मी खुलासा करु इच्छितो. मघाशी माननीय विरोधी पक्षनेत्यांनी तालिका सभापतींच्या संदर्भात उल्लेख केला. या विधेयकावरील चर्चेच्या संदर्भात त्या आसनावरुन एकही अक्षर उच्चारण्यात आलेलेनाही व त्यासंबंधीचा विषय सभागृहापुढे आलेला नव्हता. त्यामुळे त्यासंबंधी या सभागृहामध्ये कॉमेंट्स करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

उप सभापती : या ठिकाणी एकमेकांच्या परस्पर सामंजस्यावर आपण बोलत असतो. आता माननीय सदस्य श्री. अरुण गुजराथी साहेब बोलतील.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरुण गुजराथी (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सभागृहापुढे मुंबई महानगरपालिका आणि महाराष्ट्र (नागरी क्षेत्रे) झाडांचे संरक्षण व जतन (सुधारणा) विधेयक विचारात घेण्याकरिता मांडण्यात आले आहे त्या संदर्भात मी माझे विचार व्यक्त करु इच्छितो.

सभापती महोदय, माननीय नगर विकास राज्यमंत्र्यांनी आता सांगितले की, हे विधेयक मुंबई महानगरपालिकेला मुदतवाढ देण्यासंदर्भातील आहे. तसे नसून हे विधेयक संपूर्ण महाराष्ट्रासाठी आहे. मुंबई महानगरपालिका अधिनियम आणि महाराष्ट्र (नागरी क्षेत्रे) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम, 1975 यांमध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक मांडण्यात आले. त्याचप्रमाणे या विधेयकाच्या उद्देश व कारणे यामध्ये स्पष्ट केले आहे की, निवडणुक असल्यामुळे स्थायी समितीने निर्णय घेतला नाही याकरिता एक वर्षाची मुदतवाढ देण्यास अडचण येत नाही. परंतु आपण या विधेयकाचे उद्देश व कारणे स्पष्ट करीत असतांना असे वक्तव्य केले की, केवळ मुंबई महानगरपालिकेसाठी ही मुदतवाढ आहे. परंतु या ठिकाणी हा कायदा नागरी क्षेत्रातील झाडांचे जतन करण्यासंदर्भातील आहे. त्याचप्रमाणे पृष्ठ क्र. 5 वरील प्रकरण 3 मध्ये "महाराष्ट्र (नागरी क्षेत्रे) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम, 1975 याची सुधारणा" असे म्हटले आहे. त्यात असे म्हटले आहे की "भारत सरकारने तशी मान्यता दिलेल्या विदेशी राष्ट्राच्या महा वाणिज्यदूत,वाणिज्यदूत, उप वाणिज्यदूत, वाणिज्यिक अभिकर्ता, प्रति-वाणिज्यदूत अशा नावाने किंवा अन्य कोणत्याही नावाने संबोधण्यात येणाऱ्या कोणत्याही कॉन्स्यूल द कॅरिअर यांच्याकडे, अथवा अशा अधिकाऱ्यांच्या कर्मचारी वर्गाच्या (भारतीय नागरिक नसलेल्या) कोणत्याही सदस्यांकडे, निहित असलेल्या किंवा ते भोगवटा करीत असलेल्या इमारती व जमिनी किंवा त्यांचे भाग यांना आणि नफ्याच्या प्रयोजनाव्यतिरिक्त अन्य कोणत्याही प्रयोजनासाठी वापरण्यात येणाऱ्या किंवा वापरण्याचा उद्देश असलेल्या इमारती व जमिनी किंवा त्यांचे भाग यांच्या बाबतीत पोट कलम (1) किंवा (1क) अन्वये कोणताही वृक्ष उपकर बसविण्यायोग्य असणार नाही" अशाप्रकारे या ठिकाणी नमूद करण्यात आले आहे. या विधेयकाला विरोध करण्यासारखे यामध्ये काहीही नाही परंतु आपण केवळ एकाच मुद्यासंदर्भात वक्तव्य केल्यामुळे मी या ठिकाणी आपले लक्ष वेधले आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, माननीय नगर विकास राज्यमंत्र्यांनी या ठिकाणी मुंबई महानगरपालिकेला नवीन कर प्रणाली लागू करण्यासाठी मुदतवाढ देण्याबाबत वक्तव्य करुन सभागृहाची दिशाभूल केली. परंतु माननीय सदस्य श्री. अरुण गुजराथी यांनी त्यामध्ये दुरुस्ती केली आहे.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, मला पुन्हा एकदा माननीय नगर विकास राज्यमंत्र्यांना विनंती करावयाची आहे की, विधेयकावर चर्चा करीत असतांना त्यामधील तरतुदींना अनुसरुन काही गोष्टी आम्हाला मांडावयाच्या असतात. अधिवेशन तोंडावर असतांना आपण 12 मार्च रोजी घाई-घाईने अध्यादेश काढण्याचे कारण काय असे आपल्याला विचारावयाचे आहे? या विधेयकावर चर्चा झाल्यानंतर त्याचे उत्तर जनतेपर्यंत जाईल, हे विधेयक सभागृहामध्ये पारित होणार आहे. याकरिता पुढील एक आठवडा आपल्याकडे शिल्लक आहे. त्यामुळे या विधेयकावरील चर्चेमध्ये भाग घेऊ इच्छिणाऱ्या माननीय सदस्यांनासुध्दा बोलण्याची संधी मिळाली पाहिजे. आता माननीय सदस्य श्री. अरुण गुजराथी यांचे भाषण झाले असून ही चर्चा आता ऑन लेग ठेवून उद्या सकाळी पुन्हा चर्चा सुरु करु या.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उप सभापती : ठीक आहे. आता मी सदरहू विधेयकावरील चर्चा ऑन लेग ठेवतो. परंतु सन्माननीय सदस्यांनी या विषयाच्या संबंधात मर्यादित स्वरुपामध्ये आपले विचार मांडावेत, नाहीतर मग तीन-तीन, चार-चार तास चर्चा सुरु रहाते हे बरोबर नाही. प्रत्येक चर्चेला काही मर्यादा असतात.

सन 2012 चे वि.स.वि.क्रमांक 5 - मुंबई महानगरपालिका आणि महाराष्ट्र (नागरी क्षेत्रे) झाडांचे संरक्षण व जतन (सुधारणा) विधेयक, 2012 हे संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबतचा प्रस्ताव याठिकाणी मांडलेला नाही. मी सदरहू विधेयक ऑन लेग ठेवतो.

. . . .3 ई-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी. : कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे

श्री.भास्कर जाधव (नगरविकास मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्यादित, नाशिक यांचा सन 2006-2007 या वर्षाचा आठवा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

उप सभापती : आठवा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला.

. . . .3ई-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण

समितीचा अहवाल सादर करणे

श्री.जैनुद्दीन जव्हेरी (समिती सदस्य) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समितीचा दुसरा व तिसरा अहवाल सभागृहाला सादर करतो.

उप सभापती : विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समितीचा दुसरा व तिसरा अहवाल सभागृहाला सादर झाला आहे.

. . . .3 ई -4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : केंद्र व राज्य शासनाच्या योजनांच्या अंमलबजावणीत

सुसूत्रीकरण आणि सुनियोजित समन्वय राखण्यासाठी दिल्ली येथे एक स्वतंत्र विभाग स्थापन करण्याची आवश्यकता.

मु.शी.: केंद्र व राज्य शासनाच्या योजनांच्या अंमलबजावणीत सुसूत्रीकरण आणि सुनियोजित समन्वय राखण्यासाठी दिल्ली येथे एक स्वतंत्र विभाग स्थापन करण्याची आवश्यकता या विषयावर डॉ.सुधीर तांबे,ॲड.उषाताई दराडे, सर्वश्री माणिकराव ठाकरे, विक्रम काळे,सुभाष चव्हाण, श्रीमती विद्या चव्हाण, सर्वश्री अशोक उर्फ भाई जगताप, जयवंतराव जाधव, एस.क्यू.जमा, दिप्ती चवधरी, सर्वश्री जैनुद्दीन जव्हेरी, मोहन जोशी, श्रीमती अलका देसाई, वि.प.स.यांचा प्रस्ताव.

डॉ.सुधीर तांबे (नाशिक विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 260 अन्वये पुढील प्रस्ताव मांडतो.

"गेल्या काही वर्षात केंद्र व राज्य शासन यांच्यामार्फत शिक्षण, आरोग्य, ग्रामीण विकास, कृषी तसेच, इतर विभागांतर्गत मागासवर्गीय व समाजातील इतर वंचित घटकांसाठी विविध योजना राबविण्यात येत आहेत. कृषी विकासाच्या अनेक योजना, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार योजना, सर्व शिक्षा अभियान, राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान, पंतप्रधान ग्रामसडक योजना, राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम, राष्ट्रीय ग्रामीण जीवन ज्योती अभियान, राष्ट्रीय आरोग्य विमा योजना, तसेच मनुष्यबळ विकास, विज्ञान व तंत्रज्ञान, पर्यावरण, पर्यटन, सिंचन इत्यादी विविध क्षेत्रांसाठी केंद्राच्या विविध योजना असणे अशा योजनांव्दारे राज्य शासनामार्फत राज्यांना मोठ्या प्रमाणात अनुदान उपलब्ध करुन दिले जाते. परंतु राज्य शासनामार्फत सदर योजनांसाठी प्राप्त झालेला निधी संपूर्णपणे खर्च न होणे, परिणामी राज्यातील लाभार्थी जनता अशा योजनांपासून वंचित राहणे, ही बाब लक्षात घेता, केंद्र व राज्य शासनाकडून सदर योजनांसाठी उपलब्ध होणाऱ्या निधीचा संपूर्ण विनियोग करुन योजनांचा लाभ राज्यातील गोरगरीब जनतेला देण्याबाबत, तसेच योजनांच्या अंमलबजावणीत सुसूत्रीकरण आणि केंद्र व राज्य शासन यांच्यात सुनियोजित समन्वय

श्री.सुधीर तांबे . . . .

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

साधण्यासाठी दिल्ली येथे एक स्वतंत्र विभाग स्थापन करण्याची आवश्यकता व त्यासाठी तातडीने करावयाची उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

यानंतर श्री.अ.शिगम . . . .

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.विनायक मेटे)

डॉ.सुधीर तांबे...

सभापती महोदय, गेल्या काही वर्षात केंद्र सरकारच्या माध्यमातून विशेषत: मूलभूत गोष्टींच्या संदर्भात शिक्षण, आरोग्य या बाबत देशात खूप मोठे प्रकल्प आखले गेले. रोजगाराच्या बाबतीत देखील कायदा करण्यात आला. महाराष्ट्रातील रोजगार हमी योजनेच्या धर्तीवर केंद्र सरकारने महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना घेतली. त्याच प्रमाणे शिक्षणासाठी सर्व शिक्षा अभियान योजना राबविली. जवळपास 1 लाख 27 हजार कोटी रुपयांची ही योजना तीन वर्षात राबवावयाची आहे. आरोग्याच्या संदर्भात राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य योजना राबविण्यात आली. केंद्र शासनाच्या माध्यमातून राज्यात अशा अनेक योजना राबविल्या जातात. तेव्हा या सर्व योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याची आवश्यकता आहे. गेल्या काही वर्षात एकूणच या सर्व योजनांची व्याप्ती खूप वाढलेली आहे. या योजनांवर होणारा खर्च देखील फार मोठा आहे. याबाबत केंद्र शासनाचे अभिनंदन केले पाहिजे. कारण मागील सात-आठ वर्षामध्ये पंतप्रधान डॉ.मनमोहन सिंग यांनी देशाचा कारभार हाती घेतल्या नंतर देशाची आर्थिक स्थिती भक्कम झालेली आहे. सन 1991 मध्ये देशाची अवस्था वाईट होती हे आपणा सर्वांना माहीत आहे. त्यावेळी आंतरराष्ट्रीय नाणे निधीकडे सोने गहाण ठेवावे लागले होते. परंतु 20 वर्षानंतर व विशेषत: मागील आठ वर्षात देशाने इतकी प्रगती केलेली आहे की, आपला देश आंतरराष्ट्रीय नाणे निधीला कर्ज देऊ शकतो. देशामध्ये असा आर्थिक बदल झालेला असल्यामुळे केंद्र सरकारने विशेषत: जे वंचित व गरीब घटकांसाठी शिक्षण आणि आरोग्य विषयक विविध योजना हाती घेतल्या आहेत. केंद्र सरकारकडून राज्याला अधिकाधिक निधी मिळण्यात काही तांत्रिक अडचणी येत असतील विशेषत: महात्मा गांधी ग्रामीण रोजगार हमी योजना ही केंद्राची योजना आहे तर राज्याची रोजगार हमी योजना होती..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ.सुधीर तांबे यांनी नियम 260 अन्वये जो प्रस्ताव मांडलेला आहे त्या प्रस्तावाला कोणत्या विभागाचे मंत्री उत्तर देणार आहेत ? कारण शिक्षण, आरोग्य, ग्राम विकास, कृषी, पंतप्रधान ग्रामसडक योजना असे विविध विषय या प्रस्तावामध्ये आहेत. या प्रस्तावाला कोण उत्तर देणार आहेत हे आम्हाला समजले पाहिजे. कारण सभागृहात संबंधित विभागाचे मंत्री महोदय उपस्थित नाहीत.

तालिका सभापती (श्री.विनायक मेटे) : सन्माननीय सदस्यांनी त्यांचे भाषण पुढे सुरु ठेवावे. माननीय सभापतींना विचारुन मी आपणास अवगत करतो.

(विरोधी पक्षातील काही सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात)

सन्माननीय सदस्य सर्वश्री केशवराव मानकर व रामनाथ मोते यांना सांगू इच्छितो की, आपण एकाच वेळी बोलू नये. या प्रस्तावामध्ये दोन-तीन विषय आहेत. या ठिकाणी मंत्री महोदय उपस्थित आहेत ते आपल्या मुद्यांची नोंद घेत आहेत. संबंधित विभागाचे मंत्री उत्तर देतील.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, मंत्री महोदय त्यांच्या विभागाच्या स्कीम विषयी माहिती देतील काय ? माननीय मुख्यमंत्री किंवा माननीय उप मुख्यमंत्री या प्रस्तावाचे उत्तर देणार काय ?

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, सर्व संबंधित विभागाचे मंत्री या प्रस्तावावरील चर्चेस उत्तर देतील.

यानंतर श्री.बरवड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हेमंत टकले : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत साहेब यांनी या ठिकाणी जो प्रश्न उपस्थित केला तो महत्वाचा आहे. नियम 260 अन्वयेचा हा ठराव जरी सत्ताधारी पक्षाकडून आलेला असला तरी तो सभागृहाच्या दृष्टीने अतिशय महत्वाचा आहे. त्यामुळे सन्माननीय सदस्यांनी जी काळजी व्यक्त केली तशी काळजी मला वाटते की, आमच्या समोरच्या विरोधी पक्षाच्या बाकांवर कोण बसलेले आहेत, त्यांना या ठरावाचे गांभीर्य किती वाटते ? याबद्दल सुध्दा आपण थोडे लक्ष द्यावे. या ठिकाणी विरोधी पक्ष नेत्यांनी, गट नेत्यांनी उपस्थित असले पाहिजे.

डॉ. दीपक सावंत : माननीय विरोधी पक्ष नेत्यांना माननीय उप सभापतींनी बोलविल्यामुळे ते त्यांच्याकडे गेलेले आहेत.

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, हे सभागृह अनाथ आहे की काय अशी शंका येते.

तालिका सभापती (श्री. विनायक मेटे) : असे अजिबात नाही. हे सभागृह अनाथ नाही. या ठिकाणी दोन कॅबिनेट मंत्री उपस्थित आहेत.

डॉ. नीलम गोऱ्हे : याचे पालकत्व कोणाकडे आहे ?

तालिका सभापती : माननीय मंत्री महोदयांनी शासनाच्या वतीने असे सांगितले आहे की, संबंधित खात्याचे मंत्री चर्चेला उत्तर देतील. सन्माननीय सदस्य डॉ. सुधीर तांबे यांनी आपले भाषण पुढे सुरु करावे.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. सुधीर तांबे : सभापती महोदय, मी हा मुद्दा मांडत होतो की, एकंदरीत देशाच्या अर्थव्यवस्थेकडे पाहिले तर देशाची अर्थव्यवस्था नजीकच्या काही वर्षांमध्ये अतिशय भरभक्कम झालेली आहे. माननीय पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांनी या देशामध्ये जी काही अर्थनीती अवलंबिली त्यामुळे जगाच्या पाठीवर अनेक आर्थिक संकटे आणि मंदीची लाट येत असताना आपल्या देशाची आर्थिक स्थिती अतिशय भक्कम राहिली. निश्चितपणे या सर्व योजनांच्या पाठीमागे केंद्राच्या असलेल्या भक्कम अर्थव्यवस्थेमुळे केंद्र सरकार इतक्या मोठ्या प्रमाणावर योजना आणत आहे. त्याबद्दल निशितपणे या ठिकाणी केंद्र शासनाचे अभिनंदन केले पाहिजे.

सभापती महोदय, या चर्चेच्या माध्यमातून ज्या वेगवेगळ्या योजनांचा उल्लेख केलेला आहे त्या योजनांचा मी अभ्यास करण्याचा प्रयत्न केला. या सभागृहामध्ये सुध्दा अनेक वेळा त्या बाबत चर्चा झालेली आहे. अर्थसंकल्पावर चर्चा करीत असताना विरोधी पक्षाच्या अनेक सन्माननीय सदस्यांनी याच भावना मांडल्या की, या सर्व केंद्राच्या योजना आहेत. राज्य राबवित असलेल्या या ज्या योजना आहेत त्यातील बहुतांश योजना या केंद्राच्या आहेत, असे त्यांनी सुध्दा या ठिकाणी सांगितले आणि एक प्रकारची सहमती दर्शविलेली आहे. त्यामुळे हा एक अत्यंत महत्वाचा विषय आहे की, या सर्व योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी होणे गरजेचे आहे. या ठिकाणी या योजना मांडत असताना यामध्ये काही ठराविक योजनांचा उल्लेख केलेला आहे परंतु केंद्राच्या जवळजवळ 185 योजना अशा आहेत की ज्यांची राज्य शासनाला आपल्या राज्यामध्ये वेगवेगळ्या पध्दतीने अंमलबजावणी करता येते. म्हणून या योजनांची अंमलबजावणी प्रभावी कशी होईल हा खरा उद्देश हा प्रस्ताव मांडण्यामागे आहे. या योजनांची प्रभावी अंमलबजावणी झाली पाहिजे.

सभापती महोदय, मी मघाशी सांगितले की, आपल्याकडे रोजगार हमी योजना आहे तसेच केंद्र शासनाने सुध्दा महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना सुरु केलेली आहे. ही योजना आपली असल्यामुळे इतर राज्याच्या तुलनेत आपल्या राज्याला काही वर्षे खूप कमी अनुदान केंद्र शासनाकडून मिळाले होते. त्यामध्ये राज्य शासनाने निश्चितपणे काही बदल करण्याचे ठरविलेले आहे. दुसरी योजना म्हणजे सर्व शिक्षा अभियान. आपण शिक्षणाचा हक्क कायदा लागू केला आणि संपूर्ण देशामध्ये या माध्यमातून प्रत्येक बालकाला शिक्षण मिळाले पाहिजे, शिक्षण

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. सुधीर तांबे ....

सर्वदूर पोहोचले पाहिजे, समाजाच्या सर्व घटकांपर्यंत शिक्षण पोहोचले पाहिजे, या अर्थाने ही योजना सुरु करण्यात आलेली आहे. प्राथमिक विभागासाठी या योजनेचा फार मोठा फायदा आपल्या राज्यामध्ये झालेला आहे परंतु जेव्हा केंद्र शासनाने ही योजना माध्यमिक विभागासाठी सरु केली तेव्हा आपल्या असे लक्षात येते की, माध्यमिकमध्ये ही योजना राबवित असताना त्यामध्ये काही तांत्रिक अडचणी निर्माण झालेल्या आहेत.

आपल्याकडे माध्यमिक शिक्षण हे 90 टक्के खाजगी संस्थांतर्फे दिले जाते आणि इतर राज्यामध्ये हे शिक्षण सरकारी संस्थांतर्फे किंवा सरकारतर्फे दिले जाते. त्यामुळे आपल्याकडील ज्या संस्थांना आपण खाजगी शिक्षण संस्था म्हणतो त्या खऱ्या अर्थाने सेवाभावी शिक्षण संस्था आहेत, एन.जी.ओ. आहेत आणि त्यांच्यावर सरकारचे पूर्ण नियंत्रण आहे. सर्व वेतन शासनामार्फत दिले जाते. वेळप्रसंगी शासन त्या ठिकाणी प्रशासक नेमू शकते. त्यामुळे या संस्थांना शासकीय संस्था म्हणून संबोधले गेले पाहिजे.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.सुधीर तांबे....

ही भूमिका आपण केंद्र शासनाला पटवून दिली पाहिजे. सर्वशिक्षा अभियानसाठी केंद्र शासनाने 20 हजार कोटींची तरतूद केलेली आहे. देशाच्या तुलनेमध्ये राज्याच्या लोकसंख्येचा विचार केला तर कोणत्याही योजनेसाठी तरतुदीच्या 10 टक्के निधी महाराष्ट्र राज्याला मिळणे आवश्यक आहे. असे सर्वसाधारण सूत्र असण्यास हरकत नाही. कारण देशाची लोकसंख्या 120 कोटी आहे. महाराष्ट्राची लोकसंख्या 11 कोटी इतकी आहे. त्या प्रमाणामध्ये राज्याला खूपच कमी निधी मिळतो. राज्य सरकारच्या वतीने केंद्र सरकारला ही बाजू पटवून देणे आवश्यक आहे.

माध्यमिक शिक्षण देणाऱ्या संस्था खाजगी असल्या तरी त्या शासनाच्या नियंत्रणाखाली काम करतात. त्यामुळे त्यांना शासनाने मदत करणे आवश्यक आहे. कारण एकीकडे शासन त्यांना वेतनेतर अनुदान देऊ शकत नाही. दुसरीकडे ग्रामीण भागामध्ये दर्जेदार शिक्षण द्यावयाचे आहे. म्हणून या योजनेची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी वेगळ्या पध्दतीने प्रयत्न करणे गरजेचे आहे.

राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान ही एक केंद्र सरकारची योजना आहे. या योजनेद्वारे राज्यात अनेक योजना सुरु आहेत. या योजनेच्या माध्यमातून अनेक राज्यांनी मोठ्या प्रमाणावर लाभ घेतलेला आहे. प्रत्येक ठिकाणी ग्रामीण आरोग्य केंद्रे उभी केली जात आहेत. राष्ट्रीय स्वास्थ्य विमा योजना नावाचा केंद्र सरकारचा उपक्रम आहे. ही खूप चांगली योजना आहे. विशेषत: गरिबांना खाजगी रुग्णालयात गेल्यावर चांगली आरोग्य सेवा मिळू शकते. उदा.नाशिक जिल्ह्यामध्ये जिल्हाधिकाऱ्यांकडे गेल्या दोन वर्षांपासून पाठपुरावा करीत आहे. परंतु ती योजना दोन वर्षांपासून लागू केलेली नाही. काही तरी तांत्रिक अडचणी निर्माण केल्या जातात. लेबर मिनिस्ट्रीकडे हा प्रश्न प्रलंबित आहे. आम्ही लेबर कमिशनरची दोन वेळा भेट घेऊन ही योजना लागू करण्याची मागणी केलेली आहे. दारिद्रय रेषेखालील लोकांसाठी ही योजना आहे. हे लोक दोन वर्षापासून एका चांगल्या योजनेच्या लाभापासून वंचित राहिलेले आहेत.

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KTG/

डॉ.सुधीर तांबे...

नॅशनल मेडिसिनल प्लॅन बोर्ड नावाची औषधी वनस्पतींसाठी केंद्र शासनाची ही योजना आहे. या योजनेसाठी केंद्र सरकारने 950 कोटींची तरतूद केलेली आहे. या योजनेसाठी राज्यासाठी किमान 100 कोटी रुपये तरी आले पाहिजेत. महाराष्ट्रामध्ये कृषी खात्याच्या अंतर्गत पुणे येथे या योजनेचे कार्यालय आहे. त्या कार्यालयात आम्ही वारंवार संपर्क साधलेला आहे. या औषधी वनस्पतीची लागवड वन क्षेत्रात करता येईल किंवा शेतीमध्ये सुध्दा लागवड करता येईल. अशी ही चांगली योजना आहे. केवळ अधिकाऱ्यांच्या अनास्थेमुळे ती योजना राज्यामध्ये प्रभावीपणे राबविता येत नाही. आम्ही सातत्याने पाठपुरावा केल्यानंतर केवळ 5-6 कोटींची तरतूद यावर्षी करण्यात आली आहे. या योजनेसाठी मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध झाला असता, परंतु तो होऊ शकला नाही.

सिंचनाच्या बाबतीत अनेक सन्माननीय सदस्य सभागृहात चिंता व्यक्त करीत असतात. केंद्र शासनाने वेगवर्धित सिंचन योजना सुरु केलेली आहे. त्या योजनेंतर्गत राज्याला या वर्षी 2600 कोटी रुपयांचा निधी प्राप्त होणार आहे. आपल्याला माहीत आहे की, राज्यात 750 सिंचन प्रकल्पांची कामे सुरु आहेत. हे प्रकल्प पूर्ण करण्यासाठी राज्याला 75 हजार कोटींची गरज आहे. त्यापैकी विदर्भात 277 प्रकल्प आहेत, मराठवाड्यात 183 व उर्वरित महाराष्ट्रात 287 प्रकल्प सुरु आहेत. एवढ्या मोठ्या प्रमाणातील प्रकल्प पूर्ण करणे हे सरकारसमोर एक आव्हान आहे. म्हणून केंद्र सरकारकडून अधिकाधिक निधी कसा प्राप्त करुन घेता येईल यासाठी शासनाने प्रयत्न केला पाहिजे.

सभापती महोदय, पर्यटन स्थळ व परिमंडळ पायाभूत विकास ही सुध्दा केंद्र शासनाची योजना आहे. केंद्र शासनाने गरिबांसाठी अनेक योजना आखलेल्या आहेत. उदा.आम आदमी विमा योजना आहे. ही योजना छोटीशी असली तरी त्या गरीब माणसासाठी ही योजना खूप मोठी आहे. एका वर्षासाठी 200 रुपये भरणे आवश्यक आहे. त्यापैकी त्याने 100 रुपये लाभार्थ्याने आणि शासनाने 100 रुपये भरावयाचे आहेत. त्याच्या घरातील सदस्याचा अपघाती मृत्यू झाला तर शासनाकडून त्याला 75 हजार रुपये मिळणार आहेत. एखाद्या सदस्याला अपंगत्व आले तर 30 हजार रुपये मिळणार आहेत. अशा एकूण 185 योजना आहेत. या योजनांचा लाभ घ्यावयाचा असेल तर त्याचे प्रस्ताव राज्य शासनामार्फत पाठवावे लागतात.

यानंतर श्री.शिगम....

अशोधित प्रत / शीघ्रलिपी नोंद

त्या शिवाय सेवाभावी संस्थांसाठी वेगवेगळया योजना आहेत या योजनासुध्दा राज्य शासनाला केन्द्राकडे सादर कराव्या लागतात.

या योजना साधारणपणे 30 सप्टेंबर पर्यन्त केन्द्राकडे जाव्यात अशी अपेक्षा असते. डिसेंबर पर्यन्त या योजना सादर केल्या जातात. जानेवारी महिन्यामध्ये सप्लीमेंटरी डिमांडच्या बाबतीत मिटींग होत असते आणि त्यामध्ये या योजनांसाठी थोडाफार निधी उपलब्ध होतो. या योजनांचे प्रस्ताव राज्य शासनामार्फत केन्द्राला सादर करावयाचे असतात. या योजनांच्या बाबतीत प्रशासनातील सर्व खात्यांचे कोऑर्डिनेशन असले पाहिजे. एकेका सचिवांकडे दोन-तीन खात्याची जबाबदारी दिल्याचे आपण ब-याच वेळा पहातो. या योजना राज्यामध्ये प्रभावीपणे कशा राबविता येतील या दृष्टीने प्रयत्न व्हावयास पाहिजेत. केन्द्रस्तरावर राज्याचे एक आयुक्त कार्यालय आहे. तरीही या योजना राज्यात तातडीने आणि प्रभावीपणे राबविण्यासाठी राज्य शासनाने पावले उचलण्याची गरज आहे. त्याच प्रमाणे या योजनांची माहिती लोकप्रतिनिधींना देखील दिली पाहिजे. लोकप्रतिनिधींना या योजनांची माहिती झाली तर ते आपापल्या विभागामध्ये या योजना चांगल्या त-हेने राबवू शकतील. निधीच्या बाबतीत राज्य शासनाला अनेक अडचणी असतात. या योजनांसाठी केन्द्राकडून निधी मिळतो. मुंबई ही राज्याची आर्थिक राजधानी आहे. या मुंबईतून केन्द्राला कराडो रुपये टॅक्सच्या माध्यमातून दिले जातात, त्या रकमेतील वाटा राज्याला मिळाला पाहिजे आणि त्यासाठी केन्द्राच्या सर्व योजना राज्यात प्रभावीपणे राबविल्या गेल्या पाहिजेत. त्यासाठी या योजनांचा आढावा घेणारी, पाठपुरावा करणारी एक स्वतंत्र यंत्रणा निर्माण करण्याची गरज आहे. सभापती महोदय, हा प्रस्ताव मांडण्याची मला अनुमती दिली त्याबद्दल मी आपले आभार मानतो आणि माझे भाषण संपवितो.

प्रस्ताव प्रस्तुत झाला.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरुण गुजराथी (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ.सुधीर तांबे आणि सन्माननीय सदस्या ॲड. उषा दराडे यांनी नियम 260 अन्वये आणलेल्या प्रस्तावावर माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, हा अत्यंत व्यापक असा प्रस्ताव आहे. या प्रस्तावामध्ये जवळ जवळ 16 विभागांचा संबंध आलेला आहे. त्यामध्ये शिक्षण, आरोग्य, ग्रामीण विकास, कृषी, रोजगार हमी योजना, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार योजना, सर्व शिक्षा अभियान, राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान, पंतप्रधान ग्रामसडक योजना, राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम, राष्ट्रीय ग्रामीण जीवन ज्योती अभियान, राष्ट्रीय आरोग्य विमा योजना, मनुष्यबळ विकास, विज्ञान व तंत्रज्ञान, पर्यावरण, पर्यटन, सिंचन असे विषय आहेत.

झोपडीलाही असते काळीज, मातीलाही असते मोल
फाटक्याच्या स्वप्नाला असते विकासाची ओढ

आज जो फाटका माणूस आहे, उपेक्षित माणूस, दलित माणूस, वंचित माणूस, दुर्लक्षित माणूस, तळागाळातील शेवटचा माणूस आहे त्याच्यासाठी केन्द्र शासनाच्या माध्यमातून विविध प्रकारच्या 185 योजना राबविण्यात येत आहेत. मी या निमित्ताने राज्य शासनाला विनंती करतो की, या योजनांचे एक पुस्तक काढून ते सन्माननीय सदस्यांना द्यावे जेणेकरुन सन्माननीय सदस्यांना केन्द्राच्या या योजनांची माहिती होऊ शकेल आणि या योजना ते आपापल्या भागामध्ये प्रभावीपणे राबवू शकतील.

सभापती महोदय, राज्याची जी वार्षिक योजना आहे ती मागितली होती त्यापेक्षा जास्त मोठी योजना आहे. 41 हजार 500 कोटीची योजना मागितली होती. वृत्तपत्रातून त्या बाबतीत "छप्पर फाडके" असे मथळे छापून आले होते. 42 हजार कोटीची योजना मंजूर करुन दिलेली आहे. फार मोठी योजना मंजूर झालेली आहे. परंतु त्या प्रमाणात खर्च होत नाही. हे आकडे अधिकृत आहेत असे मी म्हणणार नाही. कारण शासनाकडून हे आकडे उपलब्ध झालेले नाहीत. मी काही आकडेवारी वाचून दाखवतो.

...नंतर श्री. भोगले...

अशोधित प्रत / शीघ्रलिपीसाठी नाही

श्री.अरुण गुजराथी.....

नगरविकास विभाग 17.64 टक्के, महसूल व वन विभाग 29.50 टक्के, विधी व न्याय विभाग 0 टक्के, अन्न व नागरी पुरवठा विभाग 24.98 टक्के, गृहनिर्माण विभाग 23.29 टक्के, वैद्यकीय शिक्षण विभाग 27.85 टक्के, रोजगार व स्वयंरोजगार विभाग 27.68 टक्के, मराठी भाषा विभाग 50.25 टक्के म्हणजे राज्याचा 40 टक्के निधी पडून राहणार आहे. माननीय मुख्यमंत्र्यांसह काँग्रेस पक्षाच्या मंत्र्यांच्या खात्याचा खर्च अवघा 30 टक्के आहे. खाते कोणत्या पक्षाच्या मंत्र्यांचे आहे हा महत्वाचा विषय नाही. परंतु एकूण निधी 50 टक्क्यापेक्षा जास्त खर्च करु शकलेलो नाही. हा 50 टक्के निधी केंद्र शासनाच्या अनुदानाशी संबंधित आहे. तेवढे अनुदान आपल्याला कमी मिळाले असण्याची शक्यता आहे. या दृष्टीकोनातून राज्य शासनाने जास्तीत जास्त प्रयत्न केला पाहिजे. जेणेकरुन केंद्र शासनाकडून अधिक निधी प्राप्त होऊ शकेल.

सभापती महोदय, या ठरावात देखील दिल्ली येथे स्वतंत्र विभाग स्थापन करण्याची आवश्यकता असल्याचे नमूद केले आहे. मागील वर्षी अर्थसंकल्पावर बोलत असताना मी या गोष्टीचा उल्लेख केला होता आणि माननीय वित्त राज्यमंत्र्यांनी देखील चांगल्या पध्दतीने उत्तर दिले होते. दिल्ली येथे केवळ एक विशेष आयुक्त नेमून चालणार नाही. पाच ते सहा सचिव दर्जाचे आयएएस अधिकारी नेमून त्यांच्याकडे प्रत्येकी पाच ते सहा विभागांची जबाबदारी सोपविण्यात येऊन अधिकाधिक केंद्राचा निधी आणण्याचा प्रयत्न करावा. मध्यंतरीच्या काळात बिहार राज्याला केंद्र शासनाने मोठया प्रमाणात आर्थिक मदत दिली होती. हजारो कोटी रुपये केंद्र शासनाकडून त्यांनी मिळविले. मी विधानसभेचा अध्यक्ष असताना लोकसभेचे अध्यक्ष हे आंध्रप्रदेशचे होते. त्यांच्या पक्षाने केंद्र सरकारला पाठिंबा दिला होता. त्यांनी केंद्र सरकारला स्पष्टपणे सांगितले की, आमच्या पक्षाला केंद्रीय मंत्री पदे नकोत. त्या बदल्यात त्यांनी मोठया प्रमाणात केंद्र सरकारचा निधी आंध्रप्रदेश राज्याला मिळवून दिला.

सभापती महोदय, आज दिल्ली येथील एका विशेष आयुक्ताकडे 35 विभागांची जबाबदारी दिलेली आहे. त्याऐवजी पाच ते सहा सचिव दर्जाचे अधिकारी नेमण्यात यावेत व त्यांच्याकडे पाच ते सहा विभागांची जबाबदारी वाटून द्यावी. 10 टक्के केंद्र सरकारचा हिस्सा आणि 90 टक्के राज्य सरकारचा हिस्सा तसेच 90 टक्के केंद्र सरकारचा हिस्सा आणि 10 टक्के राज्य सरकारचा हिस्सा असलेल्या अनेक योजनांचा संदर्भ या प्रस्तावामध्ये आलेला आहे. सिंचनाच्या संदर्भात

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरुण गुजराथी.....

माननीय सदस्य डॉ.सुधीर तांबे यांनी चांगली माहिती दिली आहे. सिंचन योजना पूर्ण करण्यासाठी 75 हजार कोटी रुपये लागणार आहेत. एआयबीपी योजनेच्या माध्यमातून जास्तीत जास्त निधी राज्य शासनाने आणलेला आहे. त्याबद्दल राज्य शासनाचे निश्चितपणे अभिनंदन करतो. यापेक्षा जास्त निधी कसा मिळेल जेणेकरुन योजना पूर्ण करता येतील या दृष्टीकोनातून प्रयत्न झाले पाहिजेत. मोठया सिंचन योजना केंद्र शासनाची योजना म्हणून आणण्याचा प्रयत्न झाला पाहिजे. गोसीखूर्द प्रकल्पाबाबत दोन वर्षापूर्वी असा प्रयत्न झाला. विदर्भातील माननीय सदस्यांना याची अधिक माहिती आहे. गोसीखूर्द प्रकल्प यापुढे राज्य सरकारचा न राहता केंद्र सरकारचा असणार आहे. याच पध्दतीने पाच-सहा मोठे प्रकल्प केंद्र सरकारकडे दिले तर हजारो कोटी रुपये केंद्र सरकारच्या माध्यमातून राज्य शासनाला मिळणार आहेत. त्यामुळे सिंचनाच्या प्रश्नाकडे शासनाने अत्यंत गांभीर्याने पाहिले पाहिजे. अधिक निधी कसा उपलब्ध होईल यासाठी राज्य शासनाने प्रयत्न केला पाहिजे.

सभापती महोदय, समाजकल्याण विभागाची निर्मिती 1972 मध्ये झाली. पर्यटन विभाग गृह खात्याकडे 27 एप्रिल, 1993 रोजी वर्ग करण्यात आला. महिला व बालकल्याण विभागाची निर्मिती 24 जून, 1999 रोजी झाली. या सर्व विभागांसाठी केंद्र शासनाकडून फार मोठया प्रमाणात निधी येत असतो. शैक्षणिक योजनांतर्गत भारत सरकारकडून उच्च शिक्षणासाठी किती विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळाली याची माहिती मिळावी. माननीय मंत्री महोदयांनी आम आदमी विमा योजना सुरु करण्याचे जाहीर केले होते. 200 रुपये प्रिमियम भरले तर 30 हजार रुपये मिळू शकतील. मी मध्यंतरी मंत्री महोदयांना विनंती केली होती.

नंतर श्री.खर्चे...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरुण गुजराथी.....

आपण प्रत्येक माणूस या योजनेत कव्हर करु शकतो असे मी म्हणालो होतो. त्यासाठी फक्त फॉर्म भरुन त्याची सही त्यावर घेणे आवश्यक आहे. या योजनेसाठी 100 रुपये राज्य शासन आणि 100 रुपये केंद्र शासनाने भरावयाचे असून त्यातून अपघाती मृत्यू झाला असेल तर 75 हजार रुपये आणि नैसर्गिक मृत्यू ओढवला तर 30 हजार रुपये एवढी मदत मिळेल, अशा प्रकारे चांगली योजना असून आपल्या राज्यात ती राबविण्याचा प्रयत्न झाला पाहिजे.

महोदय, इंदिरा गांधी राष्ट्रीय वृध्दापकाळ निवृत्ती योजना देखील केंद्र शासनाच्या वतीने राबविण्यात येत असून त्यातून दरमहा 200 रुपये केंद्र शासनाचे आणि राज्य शासनाचे 300 असे मिळून 500 रुपये निवृत्ती वेतन मिळू शकते. अर्थात या महागाईच्या काळात 500 रुपयात काहीच होत नाही तरी देखील हमखास उत्पन्न म्हणून दरमहा 500 रुपये मिळू शकतात. तसेच राष्ट्रीय कृटुंब लाभ योजनेअंतर्गत केंद्र शासनाकडून आर्थिक सहाय्य मिळते. त्यानंतर सुवर्ण जयंती ग्राम स्वयंरोजगार योजना ही दारिद्र्य निर्मूलनाची योजना असून त्यात केंद्र शासनाचा 75 टक्के हिस्सा आणि राज्याचा 25 टक्के हिस्सा आहे. यातून दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांना दरमहा 2 हजार रुपये उत्पन्न मिळण्याची एक चांगली योजना आहे. अशा प्रकारे सर्व योजनांचा लाभ घेतला तर किती तरी कोटी रुपये केंद्र शासनाच्या माध्यमातून आपल्याला मिळू शकतील.

महोदय, केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री ग्राम सडक योजना ही देखील 100 टक्के अनुदानाची योजना आहे. हा विषय ऑगस्ट, 2001 पासून ग्रामविकास व जलसंधारण खात्याकडे वर्ग करण्यात आलेला आहे. आपले कार्यक्रम अंदाजपत्रक पाहिले तर फक्त ऑगस्ट, 2009 मध्ये टप्पा क्र.8 पीएमजीएसवाय अंतर्गत प्रकल्प किंमत 771 कोटी, प्राप्त निधी 258 कोटी आणि खर्च 236 कोटी. रस्त्यांची मंजूर लांबी 2769 किलोमीटर, पूर्ण झालेले रस्ते फक्त 706 किलोमीटर अशी परिस्थिती आहे. लोकवस्तीची संख्या 408 घेतली होती पण फक्त 115 ठिकाणच्या रस्त्यांचे काम झालेले आहे. एकूण मंजूर रस्ते 456 असून त्यापैकी फक्त 58 रस्ते पूर्ण झाले आणि 15 टक्के काम झालेले आहे हा सरकारी आकडा आहे. यापूर्वी मी सांगितलेली आकडेवारी वर्तमान पत्राच्या आधाराने सांगितली होती. मी या निमित्ताने शासनाला विनंती करतो की, जितक्या मोठ्या प्रमाणात केंद्राकडून आपल्याला निधी आणता येईल तेवढा जास्तीत जास्त लाभ गरिबांना मिळणार आहे.

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरुण गुजराथी .....

महोदय, अवर्षणप्रवण क्षेत्र विकास कार्यक्रमाच्या बाबतीत बोलावयाचे तर आजच सभागृहात दुष्काळावर चर्चा सुरु आहे व उर्वरित चर्चा उद्या सकाळी ठेवलेली आहे. दुष्काळी परिस्थितीत ज्या उपाययोजना करावयाच्या असतात त्यात केंद्र शासनाच्या हिश्श्याचे प्रमाण 75 टक्के आणि राज्य शासनाचा हिस्सा फक्त 25 टक्के आहे. मग अशा योजनेचा फायदा जास्तीत जास्त घेता यावा म्हणून आपल्या राज्यातील अवर्षण प्रवण तालुक्यांमध्ये वाढ करुन त्या तालुक्यांना हा फायदा देण्याचा विचार झाला पाहिजे. आजच्या परिस्थितीत राज्यात जवळपास 70-71 तालुके हे कायमस्वरुपी अवर्षण प्रवण क्षेत्रात येतात. माझी अशी सूचना आहे की, गेल्या 10 वर्षात सातत्याने किती तालुक्यांमध्ये दुष्काळ पडला, मागील पाच वर्षात कोणत्या तालुक्याला दुष्काळाचा सामना करावा लागला किंवा गेल्या तीन वर्षात एक तालुका दुष्काळी परिस्थितीत होता अशा पध्दतीने सातत्याने दुष्काळी परिस्थिती उद्‌भवणारे तालुके केंद्र शासनाला कळवावेत व त्यांना मिळणारे 75 टक्के अनुदान आपल्या राज्याने घ्यावे अशी विनंती करतो.

महोदय, पर्यटन विकासासाठी तर केंद्र शासनाची 100 टक्क्याची योजना आहे. राज्याला त्यात आपला हिस्सा टाकण्याची गरज नाही. प्रकल्पासाठी जास्तीत जास्त 25 कोटी आणि परिमंडळ विकासासाठी 50 कोटी रुपये या योजनेच्या माध्यमातून मिळू शकतात. त्यासाठी फक्त शासनाने डीपीआर तयार करुन पाठविणे आवश्यक असते. हा डीपीआर केंद्राकडे पाठविल्यानंतर वर उल्लेख केलेली रक्कम आपल्याला मिळणार आहे, यादृष्टीनेही विचार करावा.

तसेच ग्रामीण स्वच्छता कार्यक्रमासाठी आणि दारिद्र्यरेषेखालील अपंग लाभार्थ्यांना वैयक्तिक शौचालये बांधण्यासाठी 60 टक्के अनुदान, सार्वजनिक शौचालयांसाठी 60 टक्के अनुदान तसेच शालेय अंगणवाड्यांमध्ये स्वच्छतागृह बांधावयाची असतील तर त्यासाठी 100 टक्के अनुदान मिळू शकते. एकीकडे आपण सतत सांगतो की, अनेक शाळांमध्ये स्वच्छता गृहे नाहीत. मग अशा चांगल्या योजनांच्या माध्यमातून केंद्राकडून हा भरीव निधी आपल्याला मिळविता येईल, याचाही विचार करणे आवश्यक आहे. त्याचबरोबर प्रशासकीय खर्च, देखभाल दुरुस्तीसाठी ग्रामीण स्वच्छता कार्यक्रमांतर्गत 80 टक्के रक्कम अनुदान म्हणून मिळते. घन कचरा व्यवस्थापन सारख्या योजना राबविण्यासाठी खास करुन शहरी भागात याचा चांगला लाभ होऊ शकतो, त्यासाठी 60

....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरुण गुजराथी .....

टक्के अनुदान मिळू शकते. अशा प्रकारे मी आपल्या मार्फत शासनाला विनंती करुन इच्छितो की, सन्माननीय सदस्य डॉ. सुधीर तांबे यांनी 16 विभागांच्या माध्यमातून राबविल्या जात असलेल्या ज्या विविध 186 योजनांबाबतचा प्रस्ताव आणला आहे त्यांचा विचार शासनाने गांभीर्याने करावा व जास्तीत जास्त अनुदान आपल्या राज्यात कसे आणता येईल यासाठी प्रयत्न करावा अशी विनंती करतो आणि माझे भाषण पूर्ण करतो.

यानंतर श्री. जुन्नरे ....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत (मुंबई विभाग पदवीधर) : सभापती महोदय, नियम 260 अन्वयेचा प्रस्ताव सन्माननीय सदस्य डॉ. सुधीर तांबे यांनी मांडलेला असून त्यावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे. या प्रस्तावाचे स्वरुप बघून हा प्रस्ताव खऱ्या अर्थाने विरोधी पक्षाने द्यावयास पाहिजे होती परंतु तो सत्ताधारी पक्षाने दिलेला आहे. खरे म्हणजे या प्रस्तावाच्या अनुषंगाने सत्ताधारी पक्षाच्या वेदना व्यक्त झालेल्या आहेत.

सभापती महोदय, पंतप्रधान ग्राम सडक योजना, राष्ट्रीय ग्रामीण जीवन ज्योती अभियान, राष्ट्रीय आरोग्य विमा योजना, मनुष्यबळ विकास, विज्ञान व तंत्रज्ञान, पर्यटन, पर्यावरण तसेच सिंचन योजनेचा समावेश या प्रस्तावामध्ये करण्यात आलेला आहे.

सभापती महोदय, केंद्रशासनाच्या खूप योजना चांगल्या असतात. परंतु या योजनांचा लाभ शेवटच्या धटकांपर्यंत पोहचतात का हा संशोधनाचा भाग आहे. त्यामुळेच या योजना यशस्वी होत नाहीत. केंद्र सरकारच्या मार्फत एवढया चांगल्या योजना राबवून यातून जो पॉझीटीव्ह रिझल्ट मिळावयास पाहिजे असतो तो कधीच मिळत नाही ही वस्तुस्थिती आहे. ग्यानबाची नेमकी मेख कोठे आहे ? केंद्राच्या योजना सर्वसामान्य माणसांपर्यंत का पोहचत नाही ?

सभापती महोदय, सर्व शिक्षा अभियानामध्ये विद्यार्थ्यांना वहया, पुस्तके, शालेय उपयोगी वस्तू असे सर्व काही देत असतो परंतु या सर्व वस्तू विद्यार्थ्यांपर्यंत पोहचतात का ? आजही ग्रामीण भागातील तिसरीच्या मुला-मुलींना लिहिता-वाचता येत नाही. आपल्या राज्यात आजही एक शिक्षकी शाळा किती तरी आहेत. शाळा असली तर इमारत नाही, इमारत असली तर शौचालय नाही, न्हाणी घरे नाही यासंदर्भात अनेक वेळा या सभागृहात चर्चा केली जाते. त्यामुळे या योजनांमधील करोडो रुपये नेमके कोठे जातात ?

सभापती महोदय, शिक्षण खात्यामध्ये या योजनेसाठी जे करोडो रुपये येतात त्यातील एक रुपया तरी शेवटच्या मुलांपर्यंत जातो काय ?

सभापती महोदय, या ठिकाणी माननीय मंत्री श्री. सुरेश शेट्टी साहेब उपस्थित आहेत त्यांना मी विचारु इच्छितो की, आपल्याकडे विद्यार्थी अपघात योजना सुरु झाली होती त्यामध्ये विद्यार्थ्यांचा चष्मा फुटल्यापासून ते विद्यार्थ्याला दुखापत झाली, हृदयविकाराचा आजार झाला तर पैसे मिळत

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत .....

होते. एवढेच नाही तर विद्यार्थ्यांची सायकल हरवली तरी सुध्दा पैसे मिळत होते त्यामुळे या योजनेचा फायदा किती विद्यार्थ्यांना झाला याची माहिती माननीय मंत्री महोदयांनी देण्याची आवश्यकता आहे.

अर्थसंकल्पीय तरतूद आहे. या योजनेतील 50 टक्के वाटा हा राज्यशासनाचा असून 50 टक्के वाटा केंद्र सरकारचा आहे. एवढे पैसे खर्च करुनही आज आपल्याकडे टीडीआर व एमडीआर टी.बी.चे रुग्ण आढळतात. आपली डॉट सिस्टीम अयशस्वी ठरलेली आहे.

यानंतर श्री. भारवि...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत...

यात मंत्रिमहोदय आपली चूक नाही. डॉक्टर्स, पॅरा मेडिकल स्टाफ हे या योजना राबवितात. हे लोक या योजना गांभीर्याने घेत नाहीत. या योजना आपल्या समोर फक्त कागदावर मांडतात. म्हणूनच आज या योजना अयशस्वी झालेल्या आहेत.

राष्ट्रीय हिवताप व हत्ती रोग नियंत्रण कार्यक्रम 50 टक्केच झाला आहे. हत्ती रोगाचे उच्चाटन व्हायला पाहिजे होते. पण तसे झाले नाही. या कार्यक्रमासाठी सन 2010-2011 मध्ये 993 लाख रूपये दिले आणि 1726.54 लाख रकमेची अर्थसंकल्पीय तरतूद केली. पण हिवतापाचे पैसे भलतीकडेच वापरले जातात. एडसचे पैसे हिवतापासाठी वापरले जातात. एडस निर्मूलन योजना ही 100 टक्के केंद्र पुरस्कृत आहे. मग त्याचे पैसे हिवतापाकडे का वळविले जातात ? हा मूलभूत प्रश्न आहे. याची उत्तरे या चर्चेच्या माध्यमातून मिळणे आवश्यक आहे.

आज आपण मलेरियावर नियंत्रण आणले नाही. सन 2007 ते 2009 या वर्षासाठी केंद्र सरकारने जी काही तरतूद केली होती ती खर्च न झाल्यामुळे पुढच्या वर्षामध्ये बजेट कमी केले. त्यामुळे ती योजना अर्धवट राहिली. पैसेच आले नाही. 200 कोटी रूपये आपल्याला कमी येत आहेत.

राष्ट्रीय कुष्ठ रोग नियंत्रण कार्यक्रम ही देखील 100 टक्के केंद्र पुरस्कृत योजना आहे. तरी देखील आपण त्याकडे लक्ष देत नाही. जिल्ह्या जिल्ह्यामध्ये कुष्ठ रोगाचे प्रमाण वाढते आहे म्हणून सन्माननीय सदस्यांनी आज प्रश्न देखील उपस्थित केला होता. त्यामुळे केंद्राचा जो पैसा येतो तो जातो कुठे ? तो पैसा कुठे झिरपला, कोणाच्या खिशात गेला. हा प्रश्न आपण खालच्या लोकांना विचारला पाहिजे. कारण आपल्याकडे उत्तरदायित्व शिल्लक राहिलेले नाही. आपण कोणाकडे हिशोब मागत नाही. सन 2010-2011 मध्ये 360 लाख रूपये आले होते. आज आपल्या राज्यात कुष्ठरोग्यांची संख्या किती आहे ? सन 2011-12 मध्ये फक्त 36 लाख रूपये आले होते. ही तरतूद कमी का झाली ? कुष्ठ रोग वाढत असताना केंद्रा कडून 36 लाख रूपये का आले ? सन 2010-2011 मध्ये 360 लाख रूपये आले होते. ते खर्च झाले नाहीत. त्यामुळे केंद्राने कट लावला.

==2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत...

राष्ट्रीय अंधत्व निवारण कार्यक्रम देखील 100 टक्के केंद्र पुरस्कृत आहे. सन 2010-2011 मध्ये 150 लाख रूपयाची तरतूद करण्यात आली होती. सन 2011-12 मध्ये फक्त 34 लाख रूपयांची तरतूद करण्यात आली. आज आपल्याकडे 1 लाख अंध आहेत. त्यांना कॉर्नियाची गरज आहे. कॅट्रॅक्टची ऑपरेशन्स होत आहेत, असे आपण सांगतो. मग या कार्यक्रमांच्या तरतुदीमध्ये कपात का करण्यात आली ? डॉ.तांबे साहेब ही विचार करण्या सारखी गोष्ट आहे. केंद्राच्या योजना चांगल्या असल्यामुळे आपण त्याचे स्वागत केले. पण राज्य शासन या योजना व्यवस्थितरितीने राबवित नाही. हे आकडेवारी सिद्ध करते. हे आकडे अर्थसंकल्पीय तरतुदी मधीलच आहेत.

मध्यवर्ती अन्न प्रयोग शाळेसाठी देखील 100 टक्के केंद्राची तरतूद आहे. पण याच्या चाचणीसाठी प्रयोग शाळाच नाही. गेले तीन महिने आदिवासी मुलांना धान्य दिले गेले पण त्याची चाचणी होऊ शकली नाही. रिपोर्ट इज पेंडींग असे सांगण्यात आले.

राष्ट्रीय आयोडिन न्यूनता विकार नियंत्रण कार्यक्रम देखील केंद्राचा आहे. राष्ट्रीय गलगंड नियंत्रण कार्यक्रमाचे नाव बदलून राष्ट्रीय आयोडिन न्यूनता विकार नियंत्रण असे नाव ठेवले आहे. यासाठी 25 लाख रूपये येतात. आयोडिन युक्त मीठ वापरायला पाहिजे याची आपण जाहिरात बघतो. पण पैसे खर्च होत नाही.

कुटुंब कल्याण कार्यक्रमासाठी सर्वात जास्त निधी येतो. सन 2010-11 मध्ये रूपये 12905 लाख एवढी तरतूद होती. खर्च मात्र रूपये 10539 लाख एवढा झाला आहे. म्हणजे आपल्याकडे आलेले पैसे देखील खर्च होत नाही. सन 2011-12 मध्ये 12402 रूपयांची तरतूद आहे. यामध्ये अनेक कार्यक्रम घेतले जातात. या संबंधातील माहिती माननीय मंत्रिमहोदय आपल्या उत्तरात सांगतील.

यानंतर श्री.सरफरे....

अशुद्धीत मत / शुद्धीपत्र नाही

डॉ. दीपक सावंत....

सभापती महोदय, कुटुंब कल्याण योजनेंतर्गत अनेक कार्यक्रम राबविले जातात याबाबत मंत्री महोदय आपल्या उत्तराच्या भाषणामध्ये उल्लेख करतील. त्यामध्ये सहाय्यक परिचारिका, प्रसविका, बहुद्देशीय कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण इत्यादी कार्यक्रम आहेत. आज आपल्याकडे परिचारिकांची कमतरता आहे. आपल्याकडे बहुद्देशीय कर्मचारी कुठे आहेत? कित्येक उप केंद्रे परिचारिकांशिवाय आहेत. त्यासाठी केंद्र शासनाकडून निधी मिळतो सन 2010-11 मध्ये सहाय्यक परिचारिका, प्रसाविका आणि एलएमडब्लू म्हणजेच लोअर मेडिकल वर्करचे पद निर्माण करण्यासाठी 32 हजार 197 लाख रुपये आले. त्यापैकी 32 हजार 197 लाख रुपये खर्च देखील झाले. असे असतांना आपल्या विभागामध्ये पदांची निर्मिती कां झाली नाही, आपल्याला परिचारिका कां मिळाल्या नाहीत? त्याबाबतची ओरड नेहमी या सभागृहामध्ये होत असते. सभापती महोदय, सन 2011-12 मध्ये 35 हजार 132.11 लाख रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. ही आकडेवारी मी आपल्यासमोर ठेवली आहे. केंद्र शासनाच्या 100 टक्के आणि 50 टक्के असलेल्या योजनांसाठी आलेला हा निधी आहे. तरीसुध्दा आपण या योजना पूर्णपणे राबवू शकलो नाही. जरी तो पैसा योजनांसाठी खर्च झाला असला तरी तो कॉमन मॅनपर्यन्त म्हणजेच शेवटच्या माणसापर्यन्त पोहोचला नाही.

सभापती महोदय, अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीसाठी कितीतरी योजना आहेत याची आपल्याला देखील माहिती आहे. परंतु त्या लोकांपर्यन्त शासनाचे किती पैसे पोहोचतात? आज मागासवर्गीय विद्यार्थ्यांची वैद्यकीय शिक्षण फी आपण भरीत नाही. पालकांनी आपल्या मुलाला इंग्रजी माध्यमाच्या शाळेत घातले तर हे राज्य शासन त्या मुलाच्या फीचे पैसे देत नाही. त्यावरुन सामाजिक न्याय व आदिवासी विकास विभागामध्ये भांडण सुरु आहे. आदिवासी मुलांसाठी केंद्र सरकारच्या आणि राज्य सरकारच्या अनेक योजना आहेत, परंतु त्या आदिवासी मुलांपर्यन्त 100 रुपयातील एक रुपया तरी पोहोचतो काय? अधिकाऱ्यांच्या माध्यमातून हे पैसे मधल्या मध्येच खाल्ले जातात. कामांची कंत्राटे आपल्याच माणसांना दिली जात असल्यामुळे हे पैसे शेवटच्या माणसापर्यन्त कसे पोहोचतील?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ MMP/ KTG/

डॉ. दीपक सावंत....

सभापती महोदय, आजच्या इंडियन एक्सप्रेस दैनिकामध्ये "पीच एनआरएचएम बद्दल जे म्हटले आहे त्याचे शीर्षक आपल्या परवानगीने वाचून दाखवितो. "NRHM monitors failed to furnish audited accounts to the centre." हे केंद्र शासनाबद्दल म्हटले असले तरी यापेक्षा आपल्या राज्यामध्ये वेगळी परिस्थिती नाही. मंत्री महोदय, रोगी कल्याण समितीच्या कार्यक्रमाचे पैसे कुठे जातात याचा आपण शोध घेतला आहे काय? जर एनआरएचएमचे पैसे व्यवस्थितपणे खर्च होत असतील तर आज प्रत्येक पीचवर सौर ऊर्जेचे दीप लागले पाहिजेत. कोणत्याही प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये अंधार दिसता कामा नये. जर लाईट गेली असली तरी ऑपरेशन थिएटर सुरु राहिले पाहिजे. परंतु एनआरएचएमच्या माध्यमातून ही कामे झालेली नाहीत. प्रत्येक प्राथमिक आरोग्य केंद्राची डिस्पेन्सरी औषधाच्या साठयांनी परिपूर्ण असली पाहिजे. आज तर साधे पॅरासिटेमॉलचे सिरप सुध्दा आपल्याकडे उपलब्ध नाही. हे औषध एनआरएचएमच्या रेट कॉंट्रॅक्टवर नाही किंवा आपल्या राज्याच्या रेट कॉंट्रॅक्टवर नाही असे आपण सांगणार काय? म्हणून मला आपल्याला विचारावयाचे आहे की, एनआरएचएम योजनेचा हिशेब आपण कधी तरी या सभागृहाच्या पटलावर ठेवणार आहात काय? सभापती महोदय, या एनआरएचएम योजनेमध्ये सर्व कॉंट्रॅक्टवर लोकांची भरती करण्यात आलेली आहे. फक्त एनआरएचएम योजनेचे प्रमुख हे राज्य सरकारने नेमलेले आहेत. परंतु कॉंट्रॅक्टवर नेमण्यात आलेल्या सर्व लोकांना या राज्याशी काहीही देणे-घेणे नाही. एनआरएचएम योजनेसाठी या राज्यामध्ये केंद्र शासनाकडून करोडो रुपये येतात ते शेवटच्या माणसापर्यन्त पोहोचविण्याची अकांऊटिबिलिटी या लोकांमध्ये नाही.

सभापती महोदय, जीवनदायी योजनेबाबत सांगू इच्छितो की, या योजनेमध्ये जी उपकरणे वापरली जातात ती रेट कॉंट्रॅक्टमध्ये न घेता बाहेरुन खरेदी करुन वापरली जातात. ही उपकरणे जे.जे. हॉस्पिटलसारख्या मोठ मोठया हॉस्पिटलमध्ये वापरली जातात, ती लोकांना लाखो रुपयांच्या भावाने दिली जातात याची आपण एकदा तरी सी.आय.डी.मार्फत चौकशी करावी. याकरिता समन्वय समिती स्थापन करण्याची केलेली मागणी रास्त असून तिला माझा पाठिंबा दर्शवितो व ती समन्वय समिती आपण स्थापन केली पाहिजे.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

अशोधित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तसेच केंद्र शासनाकडून निधी येतो, तो योग्य त्या कारणासाठी खर्च झालेला आहे काय किंवा त्याची अकाऊंटिबिलिटी परत केंद्र शासनाकडे पाठवून केंद्र सरकारकडून राज्य शासनाकडे कशा प्रकारे जास्त निधी उपलब्ध होईल याकडे लक्ष देणारी एक कमिटी असावयास पाहिजे आणि त्याठिकाणी एक उत्तम मॉनेटरींग सिस्टीम पाहिजे असे सांगून मी माझे दोन शब्द संपवितो. जय हिंद जय महाराष्ट्र.

. . .. 3 ओ-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विक्रम काळे (औरंगाबाद विभाग शिक्षक) : सभापती महोदय, आम्ही अतिशय अभ्यासपूर्ण विचार करुन हा प्रस्ताव येथे मांडलेला आहे.

सभापती महोदय, दरवर्षी केंद्र शासनाच्या माध्यमातून या देशातील प्रत्येक राज्यांना विविध योजनेच्या स्वरुपामध्ये मोठा निधी दिला जातो. परंतु तो देत असताना आणि त्याचे वाटप होत असताना मला एक सांगावयाचे आहे की, या योजना एवढ्या आहेत की त्या वाचून मी सदनाचा वेळ घेणार नाही. परंतु प्रामुख्याने सर्वांगीण विकासासाठी मग तो सामाजिक असेल, आर्थिक असेल तर अशा वेळी जर त्याचा मुख्य गाभा हा शिक्षण आहे. म्हणून शिक्षणाच्या बाबतीत देखील विकास व्हावा या दृष्टीकोनातून सर्व शिक्षा अभियान ही केंद्र शासन पुरस्कृत योजना संपूर्ण देशभरामध्ये गेल्या कित्येक वर्षापासून राबविली जात आहे.सभापती महोदय, याठिकाणी कोणी नोटस् घेत आहेत काय ?

तालिका सभापती (श्री.विनायक मेटे) : याठिकाणी नोटस् घेतल्या जात आहेत.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, या प्रस्तावामध्ये जो विषय आहे, तो एकाच खात्याशी संबधित नाही. यामध्ये शिक्षण विभाग, सामाजिक न्याय विभाग इ.विविध विभाग आहेत.

तालिका सभापती : मी सन्माननीय सदस्य श्री.विक्रम काळे यांना सांगू इच्छितो की, सन्माननीय सदस्यांच्या भाषणाचा प्रत्येक शब्द लिहिला जात आहे.सन्माननीय सदस्य श्री.विक्रम काळे यांनी आपले भाषण सुरु करावे.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, सर्व शिक्षा अभियानाच्या माध्यमातून आज मोठ्या प्रमाणात प्रत्येक राज्याला निधी दिला जात आहे. जेव्हा या राज्यामध्ये पहिल्यांदा सर्वशिक्षा अभियान आले, तेव्हा इंग्रजीमध्ये त्याचे डी.पी.ए.पी.असे नाव होते. मग कालांतराने त्यात बदल झाला. आता तर महाराष्ट्र शासनाने व केंद्र शासनाने सुध्दा गेल्या दोन वर्षापूर्वी या देशात 6 ते 14 वयोगटातील मुला-मुलींना दर्जेदार शिक्षण द्यावयाचे असून तसे ते देणे सक्तीचे असावे यासाठी कायदा सुध्दा आणलेला आहे. या कायद्याच्या माध्यमातून आज अनेक योजनांची अंमलबजावणी केंद्र शासन आणि राज्य शासनाकडून करण्यात येणार आहे. परंतु या अगोदर सर्वशिक्षा अभियानाच्या माध्यमातून शिक्षण घेण्यासाठी ज्या-ज्या ठिकाणी शाळा सुरु करण्यासाठी खोल्या नसतील मग जिल्हा परिषदेच्या शाळेमध्ये खोल्या नसतील तर त्या बांधण्यात याव्यात अशा प्रकारचा एक धडक कार्यक्रम राज्यामध्ये घेण्यात आलेला आहे. अशा वेळी जिल्हा परिषदेतील बांधकाम विभागाकडून सक्षमपणे या खोल्यांचे बांधकाम होत असताना त्यांना बाजूला ठेऊन हे काम ग्राम शिक्षण समिती म्हणजे त्या

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री.विक्रम काळे . . . .

गावातील सरपंच व त्या गावातील जिल्हा परिषदेच्या शाळेचे मुख्याध्यापक यांची संयुक्त समिती एकत्रितपणे हे काम पूर्ण करील असे यासंबंधतील आदेशामध्ये म्हटलेले आहे आणि त्यानुसार या समितीच्या माध्यमातून बांधकाम होणार आहे. परंतु शिक्षकांनी मुलांना शिकवावयाचे की बांधकामाकडे पहावयाचे आणि त्या बांधकामावर पाणी मारावयाचे आणि विटा किती आल्या, वाळू किती आली किंवा ती धुवावयाची इ. गोष्टींकडे पहावयाचे हा प्रश्न आहे. सभापती महोदय, शाहू-फुले-आंबेडकरांच्या राज्यामध्ये हे काय सुरु आहे? एवढेच नव्हेतर अहमदनगर मधील आमच्या शिक्षकाला आत्महत्या करावी लागली.

यानंतर श्री.अ.शिगम . . . .

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विक्रम काळे..

या विषया संदर्भात मी आज लक्षवेधी सूचना देखील उपस्थित केली होती. परंतु माननीय मंत्री महोदयांना खालच्या सभागृहात उपस्थित राहणे आवश्यक असल्यामुळे ही लक्षवेधी सूचना आज होऊ शकली नाही. परंतु ही लक्षवेधी सूचना नंतर चर्चेसाठी येईल. त्यावेळी मी तो विषय सविस्तर मांडेन.

सभापती महोदय, आमचा शिक्षक रोज सकाळी उठतो, शाळेत जातो आणि विद्यार्थ्यांना प्रामाणिकपणे शिकवतो. जादा तास घेतो आणि पुन्हा घरी येतो. एवढेच त्याचे जीवन मर्यादित आहे.

सभापती महोदय, आता मुख्याध्यापकांवर शाळा खोल्यांच्या बांधकामाची जबाबदारी सोपविली आहे. या कामासाठी मिळणारा निधी हा मुख्याध्यापक आणि सरपंच यांच्या संयुक्त नावाने बँकेत असल्यामुळे सरपंच मुख्याध्यापकांवर दबाव आणून बँकेतून पैसे काढायला सांगतात. अशा दबावातूनच अहमदनगर जिल्ह्यातील अकोला तालुक्यातील मौजे पिंपळगाव येथील मुख्याध्यापकाने आत्महत्या केली. या संदर्भातील सविस्तर माहिती "स्टार माझा" या वृत्त वाहिनीने दिली होती. आम्ही ही बाब शासनाच्या निदर्शनास आणली. आता अधिवेशन सुरु आहे. परंतु अजून पर्यंत त्या बाबत निर्णय झालेला नाही. अशी घटना घडूनही मुख्याध्यापकांकडून बांधकामाची जबाबदारी काढून घेण्यात आलेली नाही.

सभापती महोदय, मी महत्वाच्या प्रश्नावर शासनाचे लक्ष वेधीत आहे. या ठिकाणी आम्ही उपस्थित केलेल मुद्दे लिहून घेण्यासाठी शिक्षण विभागाशी संबंधित मंत्री महोदय किंवा राज्य मंत्री महोदय नाहीत ही खंत व्यक्त करुन मी बोलत आहे. या ठिकाणी माननीय मंत्री श्री.सुरेश शेट्टी उपस्थित आहेत. आम्ही उपस्थित केलेल्या मुद्यांची ते नोंद घेत आहेत. माझी मागणी आहे की, मुख्याध्यापकांकडून बांधकामाची जबाबदारी काढून घेतली पाहिजे. आपण शिक्षकांना आणखी किती कामे करायला लावणार आहात ?

सभापती महोदय, आपण मराठवाड्यातील प्रश्ना विषयी येथे सातत्याने व कळकळीने प्रश्न मांडता. परंतु मराठवाड्यातील कळंब गावातील एका शिक्षकाने बांधकाम पूर्ण केले नाही म्हणून त्याची चौकशी करण्याचे ठरविले. नवरा-बायको शिक्षक मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना जाऊन भेटले आणि सांगितले की, सर्व काही अध्यक्षांनी केले, यामध्ये आमची काहीही चूक नाही. आमच्या

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विक्रम काळे..

शिक्षकाचा जीव किती लहान असतो पहा. सभापती महोदय, आपणाला देखील एका चांगल्या शिक्षकाने घडविले आहे. सन्माननीय सदस्या श्रीमती अलका देसाई आपण अभ्यासू व्यक्तीमत्व असल्यामुळे आपल्या पक्षाने आपणास विधानपरिषदेवर पाठविले आहे.

श्रीमती अलका देसाई : सभापती महोदय, मी अभ्यासू व्यक्तीमत्व आहे म्हणूनच सन्माननीय सदस्यांना विचारु इच्छिते की, आपण कोणत्या विषयावर बोलत आहात ?

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, मी केंद्र शासनाच्या सर्व शिक्षा अभियान योजनेवर बोलत आहे. मी सांगत होतो की, ते नवरा-बायको शिक्षक मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना जाऊन भेटले आणि सांगितले की, यामध्ये आमची काही चूक नाही. जेवढी थकबाकी आहे तेवढी रक्कम आम्ही उद्या भरतो. त्यांनी लगेच जिल्हा बँकेतून दोन लाख रुपयांचे कर्ज काढले. परंतु सायंकाळी घरी आल्यावर पाहतो तो काय गट शिक्षण अधिकाऱ्यांनी त्यांच्यावर पोलीस स्टेशनमध्ये एफआरआय नोंदविला होता. तेव्हा मी पुन्हा एकदा विनंती करतो की, शिक्षकांकडून बांधकामाचे काम काढून घेण्यात यावे.

सभापती महोदय, शालेय विद्यार्थ्यांना खिचडी देण्याची एक योजना आहे. योजनेचा उद्देश चांगला आहे. केंद्र शासन अतिशय विचार करुन योजना राबविते ही गोष्ट खरी असली तरी राज्य शासनाने सुध्दा त्या योजनेचा आपल्याला किती उपयोग आहे याचा विचार करण्याची गरज आहे. केंद्र शासनाकडून निधी मिळतो म्हणून कोणतीही योजना घेऊ नये. मुंबई, पुणे शहरामध्ये खिचडीची योजना राबविली जाते. परंतु मुंबई-पुणे सारख्या भागात कोण खिचडी खाते ? ही योजना दुर्गम, डोंगरी भागामध्ये, आदिवासी भागामध्ये, जेथे कुपोषण आहे, जेथे शिक्षण पोहोचलेले नाही अशा भागात ही योजना राबविली पाहिजे. पंरतु जेथे कोणताही विद्यार्थी खिचडी खात नाही तेथे विनाकरण ही योजना राबविली जाते, त्यामुळे विनाकारण पैसे का खर्च करता असा माझा सवाल आहे.

यानंतर श्री.बरवड..

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विक्रम काळे .....

आमच्या शिक्षकांना आचारी करुन टाकले आहे. एका शाळेमध्ये पाच-पाच हजार विद्यार्थी आहेत. सभापती महोदय, आपण जाताना शाळेत डोकावून पाहात असाल की, एका शाळेमध्ये पाच हजार विद्यार्थी आहेत. पाच हजार विद्यार्थ्यांना जेवायला घालणे ही गोष्ट एका लग्नाची पंगत उठविण्याच्या पलीकडचे काम आहे. एखादा मुलगा खिचडी खाऊन गेल्यानंतर दुसऱ्या दिवशी तो शाळेत येईपर्यंत त्या शिक्षकाच्या जीवामध्ये जीव नसतो. यामध्ये काही डकाईत सुध्दा बसलेले असतात. आपण वर्तमानपत्रात वाचतो की, कोठे अळ्या निघाल्या, कोठे साप निघाला, कोठे पाल निघाली, अशा घटना घडलेल्या आहेत. आपण कशाला या विद्यार्थ्यांच्या जीवाशी खेळतो ? ज्या ठिकाणी गरज आहे, ज्या ठिकाणी कुपोषण आहे, ज्या ठिकाणी दुर्गम भाग आहे, डोंगरी भाग आहे, आदिवासी भाग आहे त्या ठिकाणी खिचडी द्यावी आणि यातील जे पैसे वाचणार आहेत त्या पैशातून लांबून येणाऱ्या विद्यार्थ्यांना सायकल द्यावी, त्यांना घालण्यासाठी दोन गणवेश द्यावेत, त्यांना पुस्तके आणि सर्व शैक्षणिक साहित्य द्यावे. अशा प्रकारे चांगल्या पध्दतीने ही योजना राबवू शकतो. या योजनेमध्ये शासनाने सुधारणा केली पाहिजे अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, केंद्र शासनाच्या माध्यमातून प्रधानमंत्री ग्राम सडक योजना आणलेली आहे. या राज्यात आणि या देशात एकही गाव पक्क्या रस्त्यापासून वंचित राहता कामा नये यासाठी ही योजना आणलेली आहे. आपण स्व. यशवंतराव चव्हाण यांचा जन्म शताब्दी सोहळा साजरा करीत आहोत. आपल्या राज्यामध्ये आज सुध्दा 267 गावे पक्क्या रस्त्यापासून वंचित आहेत. मला कळवळा होता म्हणून हा बिल्ला लावून आम्ही फिरतो. ज्या दिवशी कार्यक्रम झाला त्या दिवसापासून हा बिल्ला माझ्या छातीवर आहे. स्व. यशवंतराव चव्हाण यांची जन्म शताब्दी साजरी करीत असताना तरी शासनाने याचा विचार केला पाहिजे. दैनिक 'लोकमत' या वर्तमानपत्राने प्रसिध्द केलेल्या बातमीनुसार आजही महाराष्ट्रामध्ये 267 गावे पक्क्या रस्त्यापासून वंचित आहेत, ही अत्यंत खेदाची बाब आहे. माझी विनंती आहे की, स्व. यशवंतराव चव्हाण यांच्या जन्म शताब्दी सोहळ्याच्या निमित्ताने एक धडक कार्यक्रम शासनाने घ्यावा. या राज्यातील एकही गाव पक्क्या रस्त्यापासून वंचित राहता कामा नये अशी माझी विनंती आहे. सभापती महोदय, मुद्दे अनेक आहेत. आपण मला बोलण्यासाठी वेळ दिला त्याबद्दल आपल्याला धन्यवाद देऊन मी माझे भाषण संपवितो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भगवान साळुंखे (पुणे विभाग शिक्षक) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ. सुधीर तांबे यांनी नियम 260 अन्वये एका चांगल्या विषयावर या ठिकाणी चर्चा उपस्थित केलेली आहे. केंद्र सरकारच्या माध्यमातून अनेक योजना राज्य स्तरावर येतात. या योजना पायाभूत स्वरुपाच्या असतात. केंद्र शासनाकडून येणाऱ्या योजना दोन प्रकारच्या आहेत. काही योजना निरंतर स्वरुपाच्या असतात. त्या योजना केंद्र सरकार आखून देते आणि त्याचा किती आर्थिक भार आम्ही उचलणार आणि ती योजना राज्यात कशी राबवावयाची याची योजना सुध्दा केंद्र शासन देते. केंद्र शासन काही योजना पाच वर्षाकरिता, काही योजना दहा वर्षाकरिता अर्थसहाय्यित करते आणि तेथून पुढे राज्य शासनाने त्या योजना स्वत:च्या निधीवर कशा चालवाव्यात, का चालवाव्यात याचे निर्देशही देते. परंतु दुर्दैवाने अनुभव असा येतो की, राज्य सरकारकडे केंद्राची योजना येते, निधी येतो, योजना राबविण्याचा प्रयत्न केला जातो परंतु योजना राबविण्यासाठी जी उत्तम प्रकारची इच्छाशक्ती प्रशासकीय पातळीवर आणि शासकीय अशा दोन्ही पातळीवर असावयास पाहिजे ती पहावयास मिळत नाही. त्याचा परिणाम असा होतो की, केंद्र सरकारला अभिप्रेत असणारा जो हेतू आहे त्या हेतूलाच तडा जातो असे अनुभवावयास मिळते.

सभापती महोदय, आमचे मित्र सन्माननीय सदस्य श्री. विक्रम काळे यांनी या ठिकाणी काही योजनांचा परामर्श घेतला. इतर सन्माननीय सदस्यांच्या नजरेतून किंवा मांडणीतून सुटलेल्या काही महत्वाच्या योजनांचा मी या ठिकाणी उल्लेख करतो. निरंतर शिक्षण योजना ही तळागाळातील माणसांसाठी प्रौढ शिक्षणाचा पुढचा टप्पा असलेली योजना महाराष्ट्रामध्ये आजही कार्यान्वित आहे. त्या योजनेसाठी केंद्र शासनाचा निधी येतो. जितका काळ केंद्र शासनाचा निधी येतो आणि जेवढा निधी येतो तेवढी यंत्रणा खाली चालू होते. प्रत्येक खेड्यामध्ये तीन चार लोकसंख्येच्या प्रमाणामध्ये साक्षरोत्तर कार्यक्रम राबविणारा आणि जनजागृती निर्माण करणारा तो कार्यक्रम आहे. खरे म्हणजे तो कार्यक्रम लोकाभिमुख आहे. केंद्र शासनाच्या आणि राज्य शासनाच्या असलेल्या विविध योजना आणि नागरी कर्तव्ये याचे प्रशिक्षण देणारी ती योजना आहे. चांगले सामाजिक मानस निर्माण करणारी ती योजना आहे. केंद्र सरकारची ही अत्यंत उत्कृष्ट योजना आहे.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भगवान साळुंखे....

शालेय शिक्षण विभागाचे प्रशासन उदासीन असल्यामुळे ती योजना राबविली जात नाही. केंद्र सरकारकडून 6 महिन्यांसाठी, 8 महिन्यांसाठी किंवा 1 वर्षासाठी निधी आला की तेवढ्या कालावधीसाठी ती योजना राबविली जाते. पुढच्या काळासाठी निधी प्राप्त करुन घेण्यामध्ये प्रशासकीय दिरंगाई किंवा हलगर्जीपणा होतो. त्यामुळे पुन्हा ती योजना सहा महिने किंवा वर्षभर बंद पडते. त्यानंतर पुन्हा निधी आला की, चला रे पुढे कामाला लागू या उक्तीनुसार योजना चालू होते, पण ती योजना पुनर्जीवित होईपर्यंत त्या योजनेतील प्राणच निघून गेलेला असतो.

सभापती महोदय, त्याचप्रमाणे एमसीव्हीसी नावाची योजना 1988 साली चालू झाली होती. केंद्र सरकारने 1995 ते 2000 सालापर्यंत या योजनेसाठी 100 टक्के अनुदान राज्य सरकारला दिले होते. 2000 सालानंतर ही योजना राज्य सरकारने चालवावी असे केंद्र सरकारला अपेक्षित होते. आजही 2000 सालापासून या संस्थांना वेतनेतर अनुदान मिळत नसल्यामुळे तेथे असलेल्या लेथ मशिन्स, तेथे असलेली सर्व साधनसामग्री धूळ खात पडलेली आहे. उच्च माध्यमिकमधील विद्यार्थ्यांनी स्वत:च्या पायावर उभे राहण्यासाठी शिक्षण घेण्याकरिता अकरावी व बारावीचे शिक्षण दिले जाते. हे राज्याचे शैक्षणिक धोरण 1986 साली निर्धारित केले आहे. त्यातून एक मोठा उच्च शिक्षित वर्ग सोडून बाकीचा वर्ग स्वयं रोजगार करणारा आहे. या रोजगारासाठी त्याला व्यावसायिक प्रशिक्षण देणे हा मुळात अधिक दोन म्हणजे दहावी नंतर अकरावी व बारावीच्या नंतरच्या टप्प्याचा महत्वाचा हेतू होता. हा हेतू केंद्र सरकारने सुरुवातीला निर्धारित करुन दिला होता, त्यासाठी निधीही उपलब्ध करुन दिला होता. त्यानंतर राज्य सरकारने स्वत:च्या निधीतून ही योजना कशा प्रकारे राबवावी याचेही निर्देश सरकारला दिले होते. दुर्दैवाने 2000 सालापासून ती योजना तशीच रखडत चालू आहे. त्याचे दुष्परिणाम असे दिसून येत आहेत की, एमसीव्हीसी शिकून बाहेर पडणाऱ्या विद्यार्थ्याला भवितव्य रहात नाही, त्याची गुणवत्ता नीट तयार होत नाही. तेथील प्राध्यापकांना साधनांच्या विवंचनेत शिकवावे लागते, आहे त्या परिस्थितीत विद्यार्थ्यांना थिअरॉटिकल ज्ञान द्यावे लागते, प्रॅक्टीकल ज्ञान देता येत नाही. त्यांना कशी तरी वेळ मारुन न्यावी लागते. ही दुरवस्था राज्यात पहावयास मिळते. एका बाजूला विद्यार्थ्यांचा व्यावसायिक शिक्षणाकडे कल वाढत असताना दुसऱ्या बाजूला राज्य सरकारची उदासिनता पहावयास मिळत आहे. तेथे त्या विद्यार्थ्यांचे वाढत्या वयामध्ये प्रचंड प्रमाणात खच्चीकरण होत आहे.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भगवान साळुंखे....

माहिती तंत्रज्ञान या विषयाबाबत तशीच परिस्थिती आहे. माहिती व तंत्रज्ञान उच्च माध्यमिकसाठी सुरु केले आहे. केंद्र सरकारने सुरुवातीला या योजनेसाठी अर्थसहाय्य दिले होते. खरे तर अनुदानित असलेल्या उच्च माध्यमिकमधील सहावा विषय असल्यामुळे शासनावर आर्थिक बोजा पडण्याचे कारण नाही. कोणता तरी एक विषय विद्यार्थ्याला सोडण्याची मुभा होती. परंतु तो कायम विना अनुदानितसाठी आहे. राज्यात सुमारे 1500 शिक्षक असे आहेत की, त्यांच्या हाताखाली शिकलेले विद्यार्थी 5 लाख रुपयाचे पॅकेज घेऊन काम करीत आहेत. परंतु एमसीव्हीसी किंवा माहिती तंत्रज्ञान या विषयाचे शिक्षक मात्र 3 हजार, 4 हजार रुपये इतका पगार घेऊन आयुष्य कंठत आहेत. त्यांना कोणतेही भवितव्य राहिलेले नाही. याचे कारण केंद्र शासनाने सुरु केलेल्या योजनेकडे राज्य शासनाचा उदासीन दृष्टीकोन हे आहे. अशा अनेक योजनांबाबत घडत आहे.

वरिष्ठ महाविद्यालयांमध्ये वेतनापोटी 80 टक्के रक्कम केंद्र शासन देत असते. ॲक्रिडिएशन झाल्यानंतर प्रत्येक कॉलेजसाठी पायाभूत सुविधांसाठी, ग्रंथालयासाठी कोट्यवधी रुपयांचा निधी दिला जातो. हा निधी वापरण्यासाठी, त्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी राज्य सरकारकडे आजही कोणतीही यंत्रणा नाही. केंद्र सरकार व राज्य सरकार यांच्यामध्ये जिल्हाधिकारी हा एकच दुवा आहे. जिल्हाधिकारी हे केंद्र सरकारचे प्रतिनिधी असले तरी त्यांना राज्य शासनाच्या योजनांमध्ये गुरफटून ठेवले जाते. केंद्र शासनाच्या योजनांची अंमलबजावणी करणारी चांगली समांतर यंत्रणा प्रत्येक टप्प्यावर व प्रत्येक विभागात निर्माण करण्याची आवश्यकता आहे. यासंबंधी स्व.राजीव गांधींनी केलेले विधान फार महत्वाचे आहे. ते असे म्हणाले होते की, दिल्लीतून दिलेल्या एक रुपयापैकी गल्लीपर्यंत 10 पैसे पोहोचतात. 90 पैसे वाटेत कोठे तरी मुरतात. नुकत्याच उत्तर प्रदेशामध्ये झालेल्या निवडणुकीच्या वेळी प्रचाराची रणधुमाळी झाली होती. त्या प्रचारामध्ये एक मुद्दा येऊन गेला होता. केंद्र सरकारकडून दिला जाणारा पैसा खालपर्यंत पोहोचत नाही असे बोलले जात होते. या मुद्याचे निवडणुकीत काय झाले ते सन्माननीय सदस्यांच्या लक्षात आले असेलच.

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भगवान साळुंखे....

मी सर्व सन्माननीय सदस्यांना असे सांगेन की, थोडेसे राजकीय अभिनिवेषाच्या पलीकडे जाऊन यावर विचार केला पाहिजे. तुमच्या, आमच्या सगळयांच्या निढळाच्या घामाचा पैसा केंद्र सरकारला व राज्य सरकारला निरनिराळ्या कराच्या माध्यमातून दिला जातो.

यानंतर श्री.शिगम....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भगवान साळुंखे..

केन्द्र आणि राज्य सरकार हे त्यांच्या त्यांच्या तत्वज्ञानाच्या मर्यादेत राहून निरनिराळया प्रकारच्या योजना तयार करीत असतात आणि राबवत असतात. एक गोष्ट अतिशय वाखाणण्यासारखी आहे, स्वीकारण्यासारखी आहे ती म्हणजे आजकाल केन्द्र सरकार अत्यंत जागरुकपणे निरनिराळया प्रकारच्या योजना तयार करते, निधी उपलब्ध करुन देते आणि योजना राबविण्याची जबाबदारी मात्र राज्य सरकारवर टाकते. खरे म्हणजे या योजनांची अंमलबजावणी किती प्रभावीपणे होत आहे याची तपासणी करणारी यंत्रणा केन्द्रस्तरावर दिसून येत नाही. राज्य सरकारची देखील तशा प्रकारची यंत्रणा अस्तित्वात नाही. या प्रस्तावावरील चर्चा सरकारला अंतर्मुख करणारी आहे असे मी मानतो. जेव्हा राज्य सरकार अंतर्मुख होऊन केन्द्राच्या योजनांची राज्यात काटेकोरपणे अंमलबजावणी करील तेव्हा या प्रस्तावाला अर्थ प्राप्त झालेला आहे असे मी म्हणेन या योजना राबविण्याच्या बाबतीत स्थलकालपरत्वे काही अडचणी असतील तर केन्द्र सरकारशी चर्चा करुन त्या दूर केल्या पाहिजेत. केन्द्राच्या या योजना राज्यात कशा प्रभावीपणे राबविता येतील यादृष्टीने शासनाने प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे. माझे मित्र डॉ. सुधीर तांबे यांनी अतिशय चांगला प्रस्ताव या ठिकाणी आणला त्याबद्दल मी त्यांना धन्यवाद देतो आणि माझे भाषण संपवितो.

--

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती अलका देसाई (नामनियुक्त) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ. सुधीर तांबे यांनी नियम 260 अन्वये मांडलेल्या प्रस्तावावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभी आहे.

सभापती महोदय, मी थोडक्यात काही महत्वाचे मुद्दे मांडणार आहे. केन्द्र सरकार वेगवेगळया राज्यांना वेगवेगळया योजना राबविण्यासाठी अनुदान देत असते. साधारणपणे 15 विभागांचा या प्रस्तावामध्ये अंतर्भाव आहे. सर्वच विभागांवर मी भाष्य करणार नाही. कारण मी मुंबई शहरामध्ये काम करणारी कार्यकर्ती आहे. केन्द्र सरकार पुरस्कृत मध्यम आकाराच्या एकात्मिक विकास योजनांचे जाळे 10व्या पंचवार्षिक योजनांमध्ये 70 शहरामध्ये केन्द्र शासनाने पाठविले. मुंबई शहरामध्ये मुंबई नागरी परिवहन प्रकल्प, मध्यरेल्वे विकास महामंडळ इत्यादीच्या माध्यमातून जे काम केलेले आहे, जे पूल ठाणे आणि ठाण्याच्या पुढे होत आहेत त्या संदर्भातील सर्व योजनांना केन्द्र सरकारने आपले योगदान दिलेले आहे. त्या योगदानातून आपण शहराचा विकास त्या त्या वेळच्या अधिका-यांच्या मार्फत किंवा त्या त्या वेळच्या राज्यकर्त्यांच्या मार्फत आपण करु शकलो आहोत हे आपल्याला नाकारता येणार नाही.

एकात्मिक बालविकास योजनेच्या संदर्भात सदनातील अभ्यासू सन्माननीय सदस्य बोलले आहेत. त्यामुळे त्यावर मी भाष्य करणार नाही. जी राष्ट्रीय विमा योजना आहे तिचा लाभ दारिद्र्य रेषेखालील लोकांना आणि अन्य समाजातील लोकांना व्हावा यादृष्टीने केन्द्र सरकार प्रयत्न करीत आहे. या केन्द्राच्या योजनांची अंमलबजावणी आपल्या राज्यात प्रभावीपणे होते की नाही असा कुणी प्रश्न विचारला तर त्याचे उत्तर "नाही" असेच द्यावे लागेल. याचे कारण असे की, या योजनांचा लाभ घेण्यासाठी जेव्हा सर्वसामान्य माणसे अधिका-यांकडे जातात त्यावेळी त्या अधिका-यांमध्ये उदासीनता दिसून येते. योजना राबविण्याच्या बाबतीत, सामान्य लोकांना योजनेचा लाभ देण्याच्या बाबतीत त्या अधिका-यांना काही देणेघेणे नसते. मघाशी सन्माननीय सदस्यांनी सांगितल्या प्रमाणे या योजना प्रभावीपणे राबविण्यासाठी काही यंत्रणा राज्य सरकार उभारणार आहे की नाही ? योजनांमध्ये सुसूत्रता आणणार आहे की नाही ? या योजना राबविण्यासाठी केन्द्र सरकार कोटयवधी रुपये देत असताना जर त्याबाबतीत अधिका-यांनी उदासीनता दाखवली तर त्या योजनांचा लाभ लोकापर्यन्त पोहोचविण्यासाठी आपण कुठेतरी कमी पडत आहोत. या योजनांच्या बाबतीत केन्द्राने त्यांचा विभाग जरुर करावा. ..

...नंतर श्री. भोगले...

अशोधित प्रत / मुद्रणासाठी नाही

श्रीमती अलका देसाई.....

परंतु महाराष्ट्र शासनाचे हे दायित्व राहील. या सगळ्या कामकाजासाठी विभागाचे मंत्री व विभागाचे सचिव यांच्यासमवेत ज्या लोकप्रतिनिधींना काम करण्यामध्ये आनंद वाटतो त्यांना सोबत घेऊन समिती स्थापन करावी आणि योजनांचा फायदा सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी प्रयत्न करावा.

सभापती महोदय, माननीय सदस्य डॉ.सुधीर तांबे यांनी एका चांगल्या विषयावर चर्चा करण्यास आम्हाला प्रवृत्त केले त्याबद्दल मी त्यांना धन्यवाद देते. सध्या केंद्राच्या योजना राबविण्यामध्ये इतकी उदासिनता का दिसून येते हे देखील शोधून काढण्याची गरज आहे. केंद्र शासनाच्या योजनांपासून बाजूला न जाता त्या लोकांपर्यंत पोहोचविण्यासाठी प्रयत्न केला पाहिजे. पंतप्रधान ग्रामसडक योजना, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना, सर्व शिक्षा अभियान, विज्ञान व तंत्रज्ञान योजनांचा फायदा राज्यातील सर्वसामान्य जनतेला झाला पाहिजे. माननीय आरोग्यमंत्र्यांना मी धन्यवाद देते. त्यांनी जीवनदायी आरोग्य योजनेबरोबर विभागाच्या इतर योजना लोकांपर्यंत पोहोचविण्यासाठी उपक्रम राबविले. या उपक्रमांना सगळ्यांनी हातभार लावला पाहिजे.

सभापती महोदय, मी मध्यंतरी मुंबई उपनगर जिल्हाधिकारी यांच्या वांद्रे येथील कार्यालयातीन सातव्या मजल्यावर ज्या कक्षामार्फत शासकीय योजना राबविल्या जातात त्या ठिकाणी योजनांची माहिती पुस्तिका घेण्यासाठी गेले होते. परंतु तेथे चौकशी केल्यानंतर उत्तर द्यायला अधिकाऱ्यांना वेळ नव्हता. शासनामार्फत कर्मचाऱ्यांच्या मागण्या, पगारवाढ मान्य करीत असताना त्यांनी योजना राबविण्यामध्ये उदासीनता दाखवू नये. शासकीय योजना सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. शासकीय यंत्रणा म्हणजे केवळ चेहरे पाहण्यासाठी आहे का? गृहनिर्माण मंडळामध्ये अधिकारी वर्गाकडून सामान्य लोकांची अडवणूक केली जाते. त्याचे तंत्र त्यांना अगदी बरोबर उमगले आहे. म्हणून शासकीय यंत्रणेच्या उदासीनतेबाबत एक समिती नेमून सर्वसामान्यांच्या कामाला प्राधान्य द्यावे एवढी विनंती करुन माझे भाषण संपविते.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.दिलीपराव सोनवणे (नाशिक विभाग शिक्षक) : सभापती महोदय, माननीय सदस्य डॉ.सुधीर तांबे व इतर सन्माननीय सदस्य यांनी नियम 260 अन्वये मांडलेल्या प्रस्तावावर माझे विचार मांडण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, माननीय सदस्य डॉ.सुधीर तांबे यांनी व्यापक अशा विषयावर चर्चा घडवून आणल्याबद्दल मी त्यांना धन्यवाद देतो. केंद्र आणि राज्य शासनाच्या माध्यमातून शिक्षण, आरोग्य, ग्रामविकास, कृषी, मागासवर्गीय समाजातील वंचित घटकांसाठी विविध योजना राबविल्या जातात. या योजनांपैकी काही योजनांमध्ये केंद्र शासनाचा 90 टक्के व राज्य शासनाचा 10 टक्के हिस्सा असतो, काही योजनांमध्ये केंद्र शासनाचा 75 टक्के व राज्य शासनाचा 25 टक्के हिस्सा असतो, तर काही योजनांमध्ये 50:50 टक्के आणि काही योजनांमध्ये केंद्र शासनाचा 100 टक्के हिस्सा असतो. अशा प्रकारच्या योजनांमधून केंद्रामार्फत राज्य शासनाला मोठया प्रमाणात निधी मिळत असतो. तो निधी समाजाच्या शेवटच्या घटकापर्यंत पोहोचतो का, त्या निधीचा पूर्णपणे विनियोग होतो का, योजनांच्या अंमलबजावणीमध्ये सुसूत्रीकरण आहे का?

नंतर श्री.खर्चे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिलीपराव सोनावणे .....

या गोष्टींचा विचार केला पाहिजे.

अनेक वेळा आपण केंद्राकडून मिळणाऱ्या निधीपासून वंचित राहतो त्यामागे काय कारणे आहेत यांचा शोध घेतला पाहिजे. त्यात प्रामुख्याने असेही सांगता येईल की, अशा प्रकारचा निधी मिळावा म्हणून राज्य शासनाच्या वतीने केंद्राकडे जे प्रस्ताव पाठविणे आवश्यक असतात ते विहित मुदतीत पाठविले जात नाहीत. खास करुन 30 सप्टेबरच्या आत असे प्रस्ताव केंद्राकडे एनजीओज च्या माध्यमातून पाठविले जाणे आवश्यक असते परंतु आपले प्रस्ताव नोव्हेंबर-डिसेंबर महिन्यात जातात त्यामुळे आपल्याला हा कोट्यवधीचा निधी मिळत नाही. मला निश्चित आनंद वाटेल की, माननीय मुख्य मंत्री व माननीय उप मुख्यमंत्री यांच्या माध्यमातून व त्यांच्या प्रयत्नांमुळे राज्याला केंद्राकडून चांगला निधी यावेळेस मिळाला आहे. माननीय उप मुख्यमंत्र्यांनी शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसाठी कोट्यवधीचा निधी राज्याला मिळवून दिला आहे. तसेच इतर मंत्री महोदयांनी व विभागांकडून जे प्रस्ताव केंद्राकडे पाठवावयाचे असतात त्यासाठी संबंधित मंत्र्यांनी केंद्राशी संपर्क साधून, बैठका घेऊन किंवा भेटी घेऊन खूप निधी आपल्या राज्यात आणता येईल. त्यासाठी त्या त्या मंत्र्यांचा आपल्या खात्यातील अधिकाऱ्यांवर वचक असला पाहिजे हे देखील तितकेच महत्वाचे आहे. याचे मुख्य कारण म्हणजे विभागाच्या वतीने लवकर प्रस्ताव जात नाहीत म्हणून आपल्याला केंद्राचा निधी मिळत नाही याकडे खास करुन लक्ष देण्याची गरज आहे.

महोदय, उदाहरण द्यावयाचे झाले तर महात्मा गांधी ग्रामीण रोजगार हमी योजना मजुराअभावी राबविता येत नाही, त्याकडे प्रकर्षाने लक्ष दिले पाहिजे. त्याचप्रमाणे रस्ते, जिल्हा मार्ग विशेष करुन राज्य मार्गांची परिस्थिती तर अतिशय बिकट झालेली आहे. त्याचा परिणाम म्हणून सामान्य माणसांच्या गाडीचे चाक निखळणे, पाठीच्या मणक्याला दुखापत होण्याचे प्रकार होत असतात. अशा रस्त्यांसाठी सीआरएफ किंवा पंतप्रधान ग्राम सडक योजनेच्या माध्यमातून केंद्र शासनाचा निधी जिल्हा परिषदेच्या माध्यमातून मिळविता येईल काय हे लक्षात घेतले पाहिजे. या निमित्ताने मी शासनाला अशी विनंती करु इच्छितो की, अशा प्रकारे केंद्राकडून सर्व प्रकारचा निधी उपलब्ध करुन तो राज्यातील सर्वसामान्य व गरिबांपर्यंत, तळगाळातील माणसापर्यंत पोहचविण्याच्या दृष्टीने योजना राबवावयाच्या असतील तर त्यासाठी स्वतंत्र विभाग निर्माण करावा. या विभागाच्या माध्यमातून केंद्र शासनाच्या संपूर्ण योजनांचा निधी सर्वसामान्यांपर्यंत पोहचविण्याचा प्रयत्न केला तर

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिलीपराव सोनावणे .....

खऱ्या अर्थाने या चर्चेच्या माध्यमातून उपयोग होईल. तसेच आजच्या अतिशय महत्वाच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने सुधारणा करुन जास्तीत जास्त निधी राज्यात आणला तर त्याचा जनतेला फायदा होईल, यादृष्टीने प्रयत्न करावा अशी विनंती करतो व मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल पुन्हा आपले आभार व्यक्त करुन माझे भाषण पूर्ण करतो.

.....3

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हेमंत टकले (विधानसभेने निवडलेले) : महोदय, सन्माननीय सदस्य डॉ. सुधीर तांबे, ॲड. उषाताई दराडे व इतर सन्माननीय सदस्यांनी अतिशय महत्वाच्या पण गुंतागुंतीच्या विषयाच्या निमित्ताने सभागृहात चर्चा घडवून आणली, त्या चर्चेत सहभाग घेण्यासाठी मी उभा आहे.

महोदय, माझ्या अगोदर काही सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे या संपूर्ण प्रस्तावामध्ये अनेक विभागांचा संबंध आहे. राज्य शासन व केंद्र शासनाचाही संबंध असून जवळपास 150 प्रकारच्या विविध योजना समाविष्ट केलेल्या आहेत. या सर्व गोष्टींचा एकत्रितपणे आढावा घेण्याची वेळ का यावी हे या चर्चेतून बाहेर येईल. एक गोष्ट मात्र निश्चित आहे की, दर पाच वर्षानंतर ज्याप्रमाणे निवडणुका होत असतात, काही पक्ष मिळून सत्तेवर येतात तर काहींना विरोधी बाकावर बसावे लागते, हा लोकशाहीचा एक भाग आहे. परंतु आज हा विषय उपस्थित करण्याचे महत्वाचे कारण मला वाटते असे आहे की, आघाडी शासनाने सन 2009 मध्ये या राज्याची सूत्रे हाती घेतल्यानंतर निम्मा कालावधी पार पडलेला आहे....

यानतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हेमंत टकले....

कोठे तरी एखाद्या टप्प्यावर राज्याच्या एकूण प्रगतीचा सगळयाच विभागांचा मागोवा घेता आला तर सन 2009 साली आपण राज्य कारभार हाती घेतल्यानंतर जी काही उद्दिष्ट डोळयासमोर ठेवली होती व त्या उद्दिष्टांची सिध्दता होण्यासाठी आपण किती पावले टाकली किंवा आपण कोठे कमी पडत आहोत यासंदर्भात आढावा घेण्याचीही आवश्यकता असते. यामध्ये कोणावर टीका करावी किंवा काही तरी चुकले याच्या पलीकडे जाऊन देशाच्या अर्थव्यवस्थेचा राज्याच्या अर्थव्यवस्थेशी असलेली सांगड महत्वाची असते. जसे देशामध्ये प्रगतीचा कुठला तरी दर निश्चित केला जातो. आपण फक्त माध्यमांकडून ऐकतो की, आपल्या अर्थव्यवस्थेचा दर अमुक अमुक टक्के वाढणार आहे, परंतु ते टार्गेट आता कमी करण्यात आलेले आहे, जगभर परिस्थिती बिकट झालेली असतांना आपली भारतीय अर्थव्यवस्था मजबूत राहिलेली आहे. देशाची चांगली अर्थव्यवस्था एकीकडे निर्माण करीत असतांना केंद्रातील व राज्यातील शासनाचा जो काही दृष्टिकोन असतो तो समाजातील वंचित घटकांपर्यंत शिक्षणाच्या, आरोग्याच्या इतर सुखसोयीसाठी योजना राबविल्या गेल्या तर शेवटच्या घटकांचा दर आपल्याला निश्चितपणे सुधारलेला बघावयास मिळेल. हा प्रयोग एकीकडे सुरु असतांना दुस-या बाजूने सत्तेच्या विकेंद्रीकरणाचा प्रयोग पंचायत स्तरापर्यंत राहणाऱ्या लोकांना आपला विकास कसा घडवून आणावयाचा आहे व त्यासाठी काय केले पाहिजे हे समजून घेतले पाहिजे. शेवटच्या माणसांपर्यंत विकास पोहचण्यामध्ये लोकप्रतिनिधींनी सहभागी व्हावे, चांगल्या योजना स्वत:च तयार कराव्यात, स्वत: राबवाव्यात आणि याच उद्देशाने अधिकाराचे विकेंद्रीकरण खालच्या पातळीपर्यंत नेण्याचा आपण प्रयत्न करीत आहोत.

सभापती महोदय, या देशाची एकूण लोकसंख्या, ग्रामीण व शहरी वर्गीकरण, आर्थिक संपन्नता याचा अभ्यास करण्यासाठी नियोजन मंडळ असून त्यामध्ये अनेक तज्ज्ञ मंडळी काम करीत असतात. वर्तमान पत्रातून वाचल्यानंतर आपल्याला असे वाटते की, एका माणसाला जगण्यासाठी त्याचे उत्पन्न किती असावे यासंदर्भात एखादा आकडा बाहेर येतो त्यावेळेला आपण सर्व आश्चर्य चकीत होतो. इतक्या कमी पैशात माणसाचे पोट भरेल असे नियोजन मंडळाला वाटलेच कसे ? यामध्ये त्यांचा काही तरी निश्चित असा अभ्यास असतो, त्यासंदर्भात कारणमिमांसा दिलेली असते.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हेमंत टकले....

या सर्व परिवर्तनासाठी ज्या अनेक योजना आहेत मग त्या शिक्षणाच्या असतील, गरिबीतून वर येण्याच्या असतील, दारिद्रय रेषेखालील लोकांचे जीवन अधिक सुसहय करण्याच्या असतील अशा अनेक योजना केंद्र शासनातर्फे जाहीर करण्यात येत असतात. विशिष्ट वर्गाचा मागासलेपणा दूर करण्यासाठी असतील, अल्पसंख्यांकासाठी असतील अशा अनेक प्रकारच्या योजनेचे दहा कलमी कार्यक्रम, पंधरा कलमी कार्यक्रम असतील त्या प्रमाणे आपण मांडणी करीत असतो व त्यामध्ये आपल्या सर्वांची निश्चित अशी प्रामाणिकता असते. अर्थशास्त्रात म्हटल्या प्रमाणे नेहमी दोन पातळयांवर या सर्व गोष्टींचा विचार करावा लागतो. मॅक्रो लेव्हल व मायक्रो लेव्हलवर काम करावे लागते. एखाद्या गावातील प्रायमरी हेल्थ सेंटर पासून ते आपण मुंबईमध्ये 750 कोटी रुपये खर्चून आरोग्याची भव्य योजना राज्य शासन राबविणार आहे हा तेथपर्यंतच्या नियोजनाचा भाग असतो. ग्रामीण भागातील छोटया प्राथमिक आरोग्य केंद्रापर्यंत आपण जोपर्यंत पोहचत नाही व त्यांच्यासाठी पायाभूत सुविधांची सोय करीत नाही तोपर्यंत शेवटच्या माणसाला त्याचा फायदा होणार नाही. आरोग्याचा स्थर आपण कशा प्रकारे वाढविणार आहोत असा विषय निर्माण होत असतो.

सभापती महोदय, जी गोष्ट आरोग्याची आहे तीच गोष्ट शिक्षणाची सुध्दा आहे तसेच इतरही सामाजिक समस्यांची तशीच परिस्थिती आहे. त्याच बरोबर बदलत्या काळाप्रमाणे वेळोवेळी जे आर्थिक बदलच नाही तर फार मोठे सामाजिक बदल होत असतात व त्याच बरोबर नव्या समस्याही निर्माण होत असतात. आपला विकास होत गेला की, आपल्याला कशावर तरी पाणी सोडावे लागत असते.

यानंतर श्री. भारवि...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(सभापती स्थानी माननीय उप सभापती)

श्री.हेमंत टकले...

शहरे मोठ्या प्रमाणावर वाढत आहेत. नोकऱ्यांसाठी लोकांचे लोंढे शहराकडे येत आहेत. त्यामुळे मोठ्या नागरी वस्त्यांचे प्रश्न अधिक गंभीर होत आहेत. त्यातून पर्यावरणाचा प्रश्न निर्माण होत आहे.

आपल्या राज्यामध्ये आणि देशामध्ये काही सामाजिक प्रश्न देखील पुढे यायला लागले आहेत. यात स्त्री भ्रूण हत्येचा विषय देखील आहे. स्त्री-पुरूष संख्येमध्ये विषमता निर्माण होत आहे. यासाठी आपल्याकडे मोठी उद्दिष्टे आहेत. आपण 50 टक्के महिला आरक्षणाचा मुद्दा देखील घेतला आहे. अशा पद्धतीने आपण एका बाजूने सक्षमता आणत आहोत. राज्य चालवताना केंद्र सरकारच्या उपलब्ध निधीमधून त्यांच्या सगळ्या योजना प्रभावीपणे राबविण्यासाठी त्यांच्याकडून अधिकाधिक निधी मिळविणे आवश्यक आहे. ती एक प्राथमिक गरज म्हणून त्याकडे पाहता येईल. ती प्राथमिक गरज भागवायची असेल तर सर्व शासन यंत्रणेचा या योजनेकडे बघण्याचा दृष्टीकोन बदलला पाहिजे. केंद्राच्या कुठल्या योजनेतून आपल्याला निधी मिळतो त्यात आपला सहभाग किती टक्के असावा हे पाहिले पाहिजे. तसेच, त्यासाठी आपली तयारी आहे किंवा नाही हे पाहून आपले नियोजन केले पाहिजे. त्या योजनेसाठी आपण वारंवार पाठपुरावा केला पाहिजे. तसेच या योजना कार्यान्वित करून त्या पुढे निश्चितपणे नेऊ शकतो किंवा नाही हे ही तपासण्याची वेळ आलेली आहे म्हणूनच सर्व खात्यांना एकत्रित करून आपण आढावा घ्यावा. त्यासाठी आपली उद्दिष्टे आपल्या नजरे समोर पक्की ठेवावीत.

सर्वसामान्यांचा, उपेक्षितांचा, वंचितांचा जीवनस्तर वाढवून त्यांना आर्थिकदृष्ट्या अधिक सबल करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. तसेच जे काही सामाजिक प्रश्न निर्माण झाले असतील मग ते पर्यावरणाचे प्रश्न असतील, दुष्काळ, महापूर सारखे नैसर्गिक आपत्तीचे प्रश्न असतील या सगळयांचा साकल्याने विचार केला पाहिजे व सगळयांमध्ये समन्वय घडवून आणण्यासाठी दिल्लीमध्ये राज्य शासनाच्या मार्फत एका वेगळ्या सक्षम यंत्रणेची उभारणी करण्याची आवश्यकता आहे. ती राज्य शासनाने लवकरात लवकर करावी. जेणे करून ह्या योजना आपल्याला अधिक लाभदायी होतील, असे मला वाटते. ..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले....

सन्माननीय सदस्य डॉ.सुधीर तांबे, सन्माननीय सदस्या श्रीमती उषाताई दराडे यासह सर्व माननीय सदस्यांनी एक अतिशय चांगला विषय सभागृहा समोर आणल्या बद्दल मी त्यांना मनापासून धन्यवाद देतो. या प्रस्तावावर आम्हा सर्वांना मत प्रदर्शन करण्याची संधी मिळाल्याबद्दल आपले आभार व्यक्त करून मी येथेच थांबतो.

....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.केशवराव मानकर (विधान सभेने निवडलेले) : सभापती महोदय, म.वि.प.नियम 260 अन्वये जो प्रस्ताव मांडण्यात आला आहे त्याचे समर्थन करण्याकरिता मी उभा आहे. सन्माननीय सदस्य डॉ.सुधीर तांबे यांचे अभिनंदन करायला पाहिजे. त्यांनी उत्कृष्ट प्रस्ताव येथे मांडलेला आहे. जवळ जवळ 16 विभाग या प्रस्तावाशी संबंधित आहेत. या प्रस्तावाद्वारे त्यांनी अनेक विषयांना स्पर्श केला आहे. त्यावर अनेक सन्माननीय सदस्यांनी आपले विचार व्यक्त केले आहेत.

आपण दिलेल्या निदेशानुसार मी अत्यंत अल्प वेळेत पंतप्रधान ग्राम सडक योजने बद्दल माझे विचार व्यक्त करणार आहे. पंतप्रधान ग्राम सडक योजना माननीय पंतप्रधान श्री.अटल बिहारी वाजपेयी यांनी देशाला दिली. त्यांनी या योजनेला स्वत:चे नाव दिले नाही. पंतप्रधान ग्राम सडक योजना म्हणून या योजनेची प्रचिती सर्वांना आली. सुरूवातीला मोठ्या लोकसंख्येची गावे जोडण्यासाठी, नंतर हजार संख्येची गावे जोडण्यासाठी सदर योजना हाती घेण्यात आली आहे. आता तर 500 व 200 लोकसंख्या असलेल्या वाड्या रस्त्याने जोडण्याससाठी सदर योजनेच्या माध्यमातून काम करण्यात आले आहे. शेतकऱ्यांना दळणवळणाचे साधन उपलब्ध होऊन त्यांचा माल बाजार केंद्रांपर्यंत पोहचावा व त्याला त्याचा फायदा मिळावा हा एकमेव उद्देश या योजने मागचा होता. पण आज या योजनेतील रस्त्यांची अवस्था काय झाली आहे ? सुरूवातीला बांधण्यात आलेले रस्ते चांगले होते. या रस्त्यांची कामे निकषा प्रमाणे करण्यात आली होती. पण आज त्या रस्त्यांची अतिशय दुर्दशा झाली आहे. त्या रस्त्यांवर खड्डे पडले असून तेथून चालणे सुद्धा मुश्कील झाले आहे.

आज या रस्त्यांची दुरवस्था झाली आहे. या रस्त्याची दुरूस्ती करणे आवश्यक झाले आहे. पंतप्रधान सडक योजनेमध्ये अट आहे. पाच वर्षे त्या रस्त्याची देखभाल ठेकेदाराने केली पाहिजे. पण महाराष्ट्रामध्ये असे दृश्य कुठेही दिसत नाही. ठेकेदाराचे एकदा बिल निघाले की, पंतप्रधान सडक योजने अंतर्गत बांधण्यात आलेल्या रस्त्याकडे कोणाचेही लक्ष नसते म्हणून मी शासनाचे याकडे लक्ष वेधत आहे.

यानंतर श्री.सरफरे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. केशवराव मानकर....

सभापती महोदय, रोजगार हमी योजनेचा सदस्य म्हणून मी या समितीबरोबर राज्यातील 16 जिल्ह्यांचा दौरा केला आहे. या दौऱ्यामध्ये मला अनेक अनुभव पहावयास मिळाले आहेत. जेव्हा राज्यामध्ये रोजगार हमी योजना कार्यान्वित होती त्यावेळी अधिकारी वर्ग खूप सक्रियतेने काम करीत असे. त्यावेळी कामावर मोठया संख्येने मजूर येत होते. परंतु राज्यामध्ये एमआरईजीएस लागू झाल्यापासून आपल्या अधिकाऱ्यांना मजूर मिळत नाहीत. या योजनेच्या मजुरांच्या मजुरीमध्ये 117 रुपयांवरुन 151 रुपये इतकी वाढ करण्यात आली. या मजुरांचे पेमेंट हे पोस्टामधून किंवा बॅकेमधून होत असल्यामुळे अधिकाऱ्यांना त्यामधून कोणताही लाभ मिळत नाही. त्यामुळे अधिकाऱ्यांचे या योजनेकडे लक्ष नसते. ही योजना ग्रामपंचायतीच्या किंवा जिल्हा परिषदेच्या स्तरावर राबविण्यात येते त्यामध्ये अनेक प्रकारचा गोंधळ माजलेला आहे. या राज्यामध्ये मजुरांची संख्या अत्यंत कमी होती त्यासाठी आम्ही अनेक प्रयत्न करुन ही संख्या 7 लाखापर्यन्त आणलेली आहे. या योजनेकरिता मजूर मिळत नाहीत म्हणून आम्ही अधिकाऱ्यांची वारंवार कान उघाडणी केली. या योजनेकरिता केंद्र सरकारकडून मोठया प्रमाणात निधी मिळतो. या योजनेच्या माध्यमातून ग्रामीण पातळीवर विकास करावयाचा असेल तर आपण ही योजना निश्चितपणे या राज्यामध्ये प्रभावीपणे राबविली पाहिजे. त्याकरिता आपल्या अधिकाऱ्यांकडून फार मोठया सहयोगाची अपेक्षा आहे. या योजनेची चांगल्या प्रकारे होत नसल्यामुळे आपल्या अंमलबजावणी यंत्रणेवर नियंत्रण ठेवण्यासाठी कायद्यामध्ये तरतूद करण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, रोजगार हमी योजनेमधून प्रत्यक्ष मजुरांना कामावर लावून कामे करण्यात आली. परंतु आजकाल मशिनरी वापरुन बोगस मजुरांची संख्या दाखवून पेमेंट उचलण्याचे प्रकार सुरु आहेत. या करिता या योजनेवर कायद्याचा अंकुश ठेवला गेला पाहिजे. राज्यात जी औद्योगिक शहरे आहेत त्यांच्या आजूबाजूला रोजगार हमी योजनेवर काम करण्याकरिता मजूर मिळणे शक्य नाही. याचे उदाहरण सांगावयाचे झाल्यास पुणे शहराच्या आजूबाजूला आपल्याला मजूर मिळत नाहीत. तेथील औद्योगिक क्षेत्रामध्ये काम करणाऱ्या मजुरांना जवळपास 300 रुपयापर्यन्त मजुरी मिळते. असे असतांना 150 रुपये मजुरीवर काम करण्यासाठी आपल्याला मजूर मिळणार आहेत काय? जर आपल्याला औद्योगिक परिसरामध्ये एमआरईजीएसची कामे करावयाची असतील तर शासनाने मजुरांच्या मजुरीमध्ये वाढ केली पाहिजे व त्या माध्यमातून त्या परिसराचा विकास झाला पाहिजे अशी मला सूचना करावयाची आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

भ्री. केशवराव मानकर....

सभापती महोदय, आपल्याला सिंचनाची अत्यंत गरज आहे. शेतकऱ्याला सिंचन,रस्ते व त्यांच्या शेतमालाला उत्पादन खर्चावर आधारीत भाव या तीन गोष्टी मिळाल्या पाहिजेत. सभापती महोदय, शासनाने दिलेल्या महाराष्ट्राची पाहणी अहवालामध्ये सिंचनावर 70 हजार कोटी रुपये खर्च केल्यानंतर फक्त एक टक्का सिंचन निर्माण झाल्याचे म्हटले आहे. केंद्र शासनाने जर गोसीखूर्द सारख्या मोठया प्रकल्पाला हातभार लावून मोठया प्रमाणावर सिंचन विकास केला तर महाराष्ट्रामध्ये सिंचनाचे मोठे क्षेत्र निर्माण होऊ शकते या संदर्भात माननीय सदस्य श्री. अरुण गुजराथी यांनी व्यक्त केलेल्या मताशी मी सहमत आहे.

सभापती महोदय, कृषी क्षेत्रासंबंधी बोलावयाचे झाले तर राज्य शासनाने खतासाठी फक्त 12 कोटी रुपयांची तरतूद केली आहे. केंद्र सरकार मोठया प्रमाणात खताला सबसिडी देत असल्यामुळे तिचा फायदा शेतकऱ्यांना मिळाला पाहिजे. बीएमपीसारखे खत पूर्वी 500 रुपयांना मिळत होते त्याचा भाव 1 हजार रुपये इतका दुप्पट झालेला आहे. जर आपल्याला काळाबाजार रोखावयाचा असेल आणि केंद्र सरकारच्या सबसिडीचा फायदा शेतकऱ्यांना द्यावयाचा असेल तर या योजनेमध्ये राज्य शासनाने फक्त सहा महिन्यांकरिता पैसे गुंतविण्याची आवश्यकता आहे. या करिता महाराष्ट्रामध्ये असलेल्या खताच्या लोकेशनमध्ये शासनाने पैसे गुंतवून त्याचा लाभ शेतकऱ्यांना दिला पाहिजे.

सभापती महोदय, वेळेअभावी मला अनेक महत्वाच्या मुद्दयांवर बोलता येणार नाही. परंतु एका महत्वाच्या मुद्याचा उल्लेख मला करावयाचा आहे. दिल्ली येथे शासनाने स्वतंत्र विभाग निर्माण करण्याची आवश्यकता आहे. त्याचप्रमाणे महाराष्ट्रामध्ये सुध्दा एक स्वतंत्र विभाग निर्माण केला पाहिजे. या विभागामार्फत केंद्र सरकारकडून आलेल्या निधीपैकी किती निधीचे वाटप झाले, किती निधी खर्च करण्यात आला, किती निधी शिल्लक राहिला व त्यापैकी किती निधी परत गेला याचे विवेचन दरवर्षी झाले पाहिजे. त्या विभागामार्फत दर तीन महिन्यांनी त्याबाबत पाठपुरावा करण्यात आला पाहिजे. आपल्या राज्यामध्ये आदिवासी लोकांसाठी, शेतकऱ्यांसाठी, मजुरांसाठी योजना राबविल्या जातात, त्या योजनांसाठी वापरला जाणारा पैसा हा केंद्र सरकारकडून आलेला आहे की, राज्य शासनाच्या बजेटमधून दिला गेला आहे, ही योजना केंद्र शासनाची आहे की राज्य शासनाची आहे याची माहिती सर्वसामान्य माणसापर्यन्त पोहोचत नाही. याकरिता सामान्य, गरीब व

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. केशवराव मानकर....

मध्यमवर्गीय माणसांना या योजनांची माहिती मिळाली पाहिजे. ही माहिती होण्याकरिता ज्या ज्या ठिकाणी योजनांची कामे सुरु आहेत त्या ठिकाणी सदरची योजना केंद्र शासनाची आहे की राज्य शासनाची आहे हे दर्शविणारे फलक लावण्यात आले पाहिजेत.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.केशवराव मानकर . . ..

एमआरईजीएसच्या योजनेमध्ये कुठेही याबाबतीत फलक लावल्याचे दिसत नाही. आम्ही प्रत्येक बैठकीमध्ये संबंधितांना निर्देश देतो की, याबाबतीत बोर्ड लावले पाहिजेत. पण अधिकारी वर्ग त्याचे पालन करीत नाही.नियम 260 अन्वये सन्माननीय सदस्य डॉ.सुधीर तांबे यांनी जो प्रस्ताव आणलेला आहे त्याचे मी समर्थन करीत असताना एक शेवटची मागणी करतो की, या विषयाशी संबंधित 16 विभाग असून या विभागांकडे किती निधी प्राप्त झाला, किती खर्च झाला या संबंधीची माहिती श्वेतपत्रिकेच्या माध्यमातून सदनाला देण्यात यावी. सभापती महोदय, आपण मला वेळ दिल्याबद्दल धन्यवाद.

---

3 वाय-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती विद्या चव्हाण (नामनियुक्त) : सभापती महोदय, आपण मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल मी आभारी आहे.

सभापती महोदय, आपण मला मघाशी दुष्काळाच्या विषयाबाबत बोलावयास दिले नाही. पण आपण मला या सदनामध्ये सांगितलेले आहे की, जरी उद्या यासंबंधातील चर्चा संपणार असली तरी आपण मला परवा बोलण्यासाठी संधी देणार आहात याची मी आपल्याला आठवण करुन देत आहे.

सभापती महोदय, याठिकाणी नियम 260 अन्वये जो प्रस्ताव मांडला आहे, त्याबाबत सांगावयाचे तर केंद्र शासनाकडून राज्यामध्ये राबविण्यासाठी ज्या योजना येतात, त्याविषयी मी जास्त बोलणार नाही. फक्त मला या बाबतीत ज्या सूचना कराव्याशा वाटतात त्याबाबत सांगणार आहे. याठिकाणी आता सदनामध्ये जी काही चर्चा झाली आहे, त्यामध्ये सगळयांनीच असे मत व्यक्त केले की, या योजना अस्तित्वात आहेत पण त्या संबंधितांपर्यंत पोहोचत नाहीत.राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान आहे परंतु आपण जेव्हा ग्रामीण भागामध्ये जातो तेव्हा तेथील जी आरोग्य केंद्रे आहेत, तेथे कोणत्याही प्रकारच्या सुविधा नाहीत,डॉक्टर नाहीत,औषधेही नाहीत तसेच तेथे आरोग्य सेविका सुध्दा नाहीत असे दिसून येते.पंतप्रधान ग्राम सडक योजना आहे पण ग्रामीण भागात रस्त्यांची जी दुर्दशा पहावयास मिळते,त्यावरुन ही योजना किती यशस्वी झालेली आहे हे आपल्याला कळून येते.

सभापती महोदय, राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम असून ग्रामीण भागात किंवा इतर शहरांमध्ये सुध्दा पिण्याच्या पाण्याची काय दुर्दशा आहे हे आपण तेथील परिस्थितीवरुन समजू शकतो. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार योजना आहे. आपल्याकडे आतापर्यंत रोजगार हमी योजना सुरु होती त्यामध्ये एवढ्या मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार होत होता की, धुळे जिल्ह्यामध्ये लोकांचे हाताच्या अंगठ्याचे ठसे घेऊन झाल्यानंतर पायाच्या अंगठ्याचे सुध्दा ठसे घेतले जात होते एवढे खुलेआम सर्वकाही सुरु आहे.

सभापती महोदय, सर्वशिक्षा अभियनामध्ये शिक्षण घेण्यासाठी बऱ्याच योजना आहेत. परंतु तेथील मुलांना देण्यात येणाऱ्या पोषक आहाराबाबत पाहिले तर त्यांना जी खिचडी दिली जाते ती खाल्ल्यामुळे अनेक शाळांमधील मुलांना विषबाधा झालेली आहे.मग मुंबईसारख्या ठिकाणी सुध्दा सुगंधी दूध दिल्यामुळे किंवा इडली दिल्यामुळे किंवा खिचडी दिल्यामुळे तेथील मुलांचे आरोग्य चांगले होण्यापेक्षा ते आणखी बिघडण्याचे किंवा यातून काही अपाय होण्याची सुध्दा शक्यता निर्माण झालेली आहे. तसेच सिंचनाचा किंवा पर्यटनाचा विषय किंवा पर्यावरणाचा विषय असू दे, परंतु या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती विद्या चव्हाण . . ..

सर्व योजनांच्या बाबतीत जो बोजवारा उडालेला आहे तो आपण सर्वजण पहात आहोत.

सभापती महोदय, प्रत्येक योजनेशी संबंधित माननीय मंत्री महोदयांपासून उच्चस्तरीय जे अधिकारी आहेत आणि अगदी पंचायत समिती, जिल्हा, तालुका पातळीवरील जे अधिकारी आहेत आणि सदरहू योजना कोणाकोणाच्या अंतर्गत आहेत आणि याठिकाणी कोणी का पोहोचू शकत नाही याची आपल्याला माहिती आहे मग अशा वेळी आपण त्या संबंधितांना जबाबदार का धरत नाही असा प्रश्न मला या ठिकाणी उपस्थित करावासा वाटतो. कारण आपण जोपर्यंत कोणाला तरी जबाबदार धरत नाही तोपर्यंत काही होणार नाही.कारण प्रशासन एवढे निर्ढावलेले आहे की हाताच्या बोटाचे ठसे घेऊन झाले की पायाच्या बोटांचे ठसे घेतले जातात आणि मग त्यांच्या नावाचे जे पैसे आहेत ते सर्रासपणे गिळंकृत करा. तसेच मला याठिकाणी दुसरी बाब मांडावयाची आहे की,शहरामध्ये सुध्दा झोपडपट्टीवासियांसाठी अनेक योजना आहेत पण त्या संबंधित लोकांपर्यंत पोहोचत नाहीत.

यानंतर श्री.अ.शिगम . . ..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती विद्या चव्हाण...

सभापती महोदय, संजय गांधी निराधार योजना ही वृध्दांसाठी योजना आहे.परंतु ही योजना त्यांच्या पर्यंत पोहोचत नाही. लाभार्थ्यांपर्यंत योजना पोहोचविण्याचे काम शासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांचे आहे. राज्य शासनाने शासकीय कर्मचाऱ्यांना पाचवा व सहावा वेतन आयोग लागू केला. त्याशिवाय त्यांना घर बसल्या निवृत्ती वेतन देते. तेव्हा सर्व शासकीय योजनांची माहिती संबंधित लाभार्थ्यांपर्यंत पोहोचविण्याची जबाबदारी शासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांची आहे. जर अधिक्कारी आणि कर्मचारी हे काम करीत नसतील तर त्यांच्यावर जबाबदारी निश्चित करुन कारवाई केली पाहिजे.

सभापती महोदय, राजीव गांधी म्हणायचे की, एक रुपया खर्च होतो त्यातील 15 पैसे सुध्दा खालच्या लोकापर्यंत पोहोचत नाहीत. आपण सर्वजण म्हणतो की, हे कोणामुळे घडते ? भ्रष्ट अधिकाऱ्यांमुळे खालच्या लोकांपर्यत योजना पोहोचत नाही. तेव्हा अशा अधिकाऱ्यांवर कडक कारवाई केली पाहिजे. तेव्हा शासन त्या दृष्टीने पावले टाकणार आहे काय ? आपण अधिकाऱ्यांवर कारवाई केली तर काही तर फरक पडू शकतो अन्यथा आपण येथे चर्चा करुन काहीही उपयोग होणार नाही. एवढे बोलून माझे दोन शब्द पूर्ण करते.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती दिप्ती चवधरी (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ.सुधीर तांबे, ॲड.उषा दराडे व अन्य सन्माननीय सदस्यांनी नियम 260 अन्वये एका महत्वाच्या विषयाला वाचा फोडली त्याबद्दल मी त्यांना धन्यवाद देते.

सभापती महोदय, केंद्र शासन आणि राज्य शासनामार्फत अनेक लोकोपयोगी योजना राबविल्या जातात. केंद्र शासनाकडून जेएनएनयुआरएम अंतर्गत राज्याच्या विकासासाठी कोट्यवधी रुपये मिळतात. शहरी भागातील झोपडपट्टीयवासियांचे जीवनमान उंचावण्यासाठी तसेच झोपडपट्टीतील लोकांच्या आरोग्य विषयक उपाय योजनांसाठी जेएनएनयुआरएम अंतर्गत मोठा निधी राज्य शासनाला मिळतो. तेव्हा या निधीचा सदुपयोग अधिकाऱ्यांनी केला पाहिजे.

सभापती महोदय, मुंबई, पुणे सारख्या महानगरांमध्ये एक सर्व्हे झाला होता. त्यामध्ये असे दिसून आले होते की, 50 टक्केपेक्षा जास्त लोक महानगरामध्ये राहतात. तर ग्रामीण भागातील ओघ मोठ्या प्रमाणावर शहरांकडे येत असल्यामुळे झोपडपट्ट्यांमध्ये राहणाऱ्या लोकांचे प्रमाण खूप मोठ्या प्रमाणावर आहे. झोपडपट्टीवासियांचे जीवन उंचावण्यासाठी विकास योजना आहेत परंतु नियोजनाचा अभाव असल्यामुळे काही सुधारणा होत नाही. काही ठिकाणी नवीन झोपडपट्टया वसताना दिसतात अशी परिस्थिती आहे. झोपडपट्टयांमध्ये जी घरे आहेत त्यामध्ये एकसूत्रीपणा नाही. कोणीही कशाही प्रकारे घर बांधत आहे, कोणी एक मजली घर बांधतो तर कोणी दोन मजली घर बांधतो. अशा प्रकारे एक नवीन झोपडपट्टी उदयाला येत आहे असे मला वाटते. जेएनएनयुआरएम अंतर्गत शासनाला निधी मिळतो त्याचा अधिकाऱ्यांनी चांगल्या प्रकारे विनियोग केला पाहिजे आणि ही जबाबदारी अधिकाऱ्यांची आहे. अधिकाऱ्यांनी एक चांगला विकास आराखडा करुन महानगरांचा विकास केला पाहिजे. परंतु आज अनेक ठिकाणी नवीन झोपडपट्टी उदयाला येताना दिसत आहे त्याला आळा घालण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, मी आपणास एका अधिकाऱ्याचे उदाहरण देते.पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेमध्ये श्री.आशिष शर्मा नावाचे आयुक्त होते. त्यांनी मोठ्या प्रमाणावर केंद्रातून निधी आणला होता. त्यासाठी त्यांनी एका स्वतंत्र अधिकाऱ्याची नेमणूक केली होती. त्यांनी पिंपरी-चिंचवडमध्ये उड्डाणपूल तसेच वेगवेगळ्या योजनांच्या माध्यमातून सुधारणा घडवून आणल्या आहेत. नागपूर शहराचा विकास कसा झाला हे आपणास माहीत आहे. अधिकाऱ्यांची इच्छा शक्ती असेल तर विकास जरुर होतो. ..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती दिप्ती चवधरी....

सभापती महोदय, शहरी भागातील सिव्हरेज ट्रीटमेंट प्लांट असेल, नदी सुधारणा प्रकल्प असेल, वाहतूक कोंडीचा त्रास कमी व्हावा म्हणून उड्डाणपूलासारखे मोठे प्रकल्प असतील, मेट्रो प्रकल्प असतील या सर्व कामांसाठी केंद्र सरकारकडून मोठ्या प्रमाणावर निधी मिळतो. तेव्हा त्या अनुषंगाने शासनातर्फे केंद्रात प्रस्ताव पाठवावयाचे असतील तर त्या बाबत अधिकाऱ्यांमध्ये खूप उदासीनता दिसून येते.

यानंतर श्री.बरवड..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उप सभापती : सभागृहाच्या कामकाजाची वेळ सायंकाळी 6.00 वाजता संपत आहे. सभागृहाच्या कामकाजाची वेळ सायंकाळी 7.00 वाजेपर्यंत वाढविण्यात येत आहे.

श्रीमती दिप्ती चवधरी : सभापती महोदय, फास्ट ट्रॅक पध्दतीने जर याची अंमलबजावणी झाली तर या योजना मार्गी लागू शकतील. संजय गांधी निराधार योजना ही फार जुनी योजना असून सर्वांना माहीत आहे. परंतु या योजनेचा फायदा किती लोकांना मिळतो याचा विचार केला तर फार कमी लोकांना याचा फायदा मिळतो असे दिसून येईल. आपण कोठे तरी लोकांपर्यंत जाण्यामध्ये कमी पडत असतो. केंद्र शासनाच्या 185 योजना आहेत अशी माहिती या ठिकाणी सन्माननीय सदस्यांनी दिली. माझ्या ज्ञानामध्ये ही नवीन भर पडलेली आहे. सन्माननीय सदस्य डॉ. सुधीर तांबे यांनी आपल्या भाषणामध्ये ही बाब निदर्शनास आणून दिलेली आहे. या 185 योजनांच्या संदर्भात महाराष्ट्र शासनाने एक एकत्रित पुस्तिका काढावी आणि त्या संदर्भातील सपूर्ण माहिती त्या पुस्तिकेत द्यावी. जर ती पुस्तिका आम्हा सर्वांपर्यंत पोहाचविली तसेच तळागाळतील माणसांपर्यंत पोहोचली तर जी माणसे ज्या योजनेमध्ये बसत असतील त्यांना त्या योजनेचा फायदा घेण्यासाठी निश्चितपणे त्याचा उपयोग होईल असे मला सांगावेसे वाटते.

सभापती महोदय, वसतिगृहांची जी योजना आहे त्यामध्ये माझ्या माहितीप्रमाणे केंद्र शासनाकडून अनुसूचित जमातीच्या 35 वसतिगृहांसाठी मान्यता आलेली आहे. परंतु याचे प्रमाण फार कमी आहे. साडेचार ते पाच हजार विद्यार्थ्यांना त्याचा फायदा होणार आहे असे माझ्या वाचनामध्ये आले आहे. या योजनेची फार प्रभावीपणे अंमलबजावणे होणे गरजेचे आहे. कारण जी मोठमोठी शहरे आहेत त्या ठिकाणी विद्यार्थ्यांच्या राहण्याचा प्रश्न फार अवघड झालेला आहे. अनेक विद्यार्थी ग्रामीण भागातून शहरामध्ये येतात. त्यांच्या राहण्याचा प्रश्न फार भयानक झालेला आहे. आपण कोठे राहावे असा प्रश्न त्यांच्या समोर असतो. म्हणून या योजनेचा विचार करुन महाराष्ट्र शासनाकडून मोठ्या प्रमाणावर केंद्र शासनाकडे प्रस्ताव गेले तर केंद्र शासनाकडून त्याला मान्यता मिळू शकेल व जास्तीत जास्त प्रस्ताव मंजूर होऊन येतील. सभापती महोदय, आपण मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल आपल्याला धन्यवाद देऊन मी माझे भाषण संपविते.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मनिष जैन (जळगाव स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, नियम 260 अन्वये सभागृहासमोर मांडण्यात आलेल्या प्रस्तावावर बोलण्याची आपण मला संधी दिली त्याबद्दल मी आपल्याला धन्यवाद देतो. माझे मित्र सन्माननीय सदस्य डॉ. सुधीर तांबे तसेच इतर सन्माननीय सदस्यांनी हा जो विषय या ठिकाणी मांडलेला आहे तो खूप इंटेलिजेंट विषय आहे. या विषयावर खरोखर चर्चा झालीच पाहिजे. कारण त्यामध्ये महाराष्ट्राचा आणि आपणा सर्वांचा फायदा आहे. मी जास्त विषयांवर बोलणार नाही कारण सर्व सन्माननीय सदस्यांनी अनेक विषय या ठिकाणी मांडलेले आहेत. मी थोडक्यात माझे विषय मांडणार आहे. आदिवासी विकास विभाग, इंदिरा आवास योजना, स्वर्ण जयंती ग्रामीण योजना, अवर्षणाच्या संदर्भातील योजना, आम आदमी विमा योजना, जिल्हा ग्रामीण विकास योजना, अल्पसंख्यांकासाठी योजना अशा प्रकारच्या शासनाच्या अनेक योजना आहेत. त्यामध्ये प्रामुख्याने आपली जी सिंचनाची योजना आहे त्यासाठी आपल्याला केंद्र शासनाकडून निधी मिळतो. परंतु महाराष्ट्रामध्ये जवळपास 75 हजार कोटी रुपयांच्या निधीची कमतरता आहे. सकाळी आपण दुष्काळाच्या संदर्भात चर्चा केली. दुष्काळावरील चर्चा अजून पूर्ण झालेली आहे. त्या चर्चेसाठी आपण उद्या सकाळी वेळ दिलेला आहे. सन्माननीय सदस्य त्यामध्ये विषय मांडणार आहेत. आपण प्रत्येक सन्माननीय सदस्यांना संधी देणार आहात.

सभापती महोदय, आपल्याला वेगळ्या विभागाची आवश्यकता का आहे ? हा विषय फार महत्वाचा आहे. वेगळा विभाग तसेच आपल्याला केंद्र शासनाकडे पाठपुरावा करण्यासाठी काय करावयास पाहिजे याचा विचार केला पाहिजे. या संदर्भात माझी सूचना आहे त्याबाबत कार्यवाही करावी. माननीय वित्त राज्यमंत्री या ठिकाणी उपस्थित आहेत तसेच माननीय आरोग्य मंत्री श्री. सुरेश शेट्टी साहेब सुध्दा उपस्थित आहेत. माननीय सभापती महोदयांनी जर निर्देश दिले तर यासाठी एक विशेष मंत्रालय सुध्दा उघडले पाहिजे. त्या खात्यासाठी मंत्री दिला पाहिजे. त्या मंत्र्यांच्या हाताखाली सचिव दिले पाहिजेत. कारण वेगवेगळ्या मंत्रालयांमध्ये पाठपुरावा करण्यासाठी जर दिल्लीमध्ये आपण कमिशनर, सचिव ठेवले तर ते पाठपुरावा करु शकतील.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मनिष जैन.....

त्यासाठी स्वतंत्र मंत्री असावयास पाहिजेत असे मला वाटते.

पंतप्रधान ग्राम सडक योजना ही एक योजना आहे. या योजनेसाठी राज्य शासनाला 100 टक्के अनुदान मिळते. परंतु केंद्र सरकारकडून राज्य सरकार 100 टक्केही अनुदान घेऊ शकत नाही, त्या निधीतून राज्यामध्ये रस्त्यांची कामे मार्गी लागत नाहीत. या रस्त्याची पडताळणी होत नाही, रस्त्यांची कामे नीट होत नाहीत असे अनेक सन्माननीय सदस्यांनी सांगितले आहे.

अवर्षणामुळे शेतीमध्ये कोणतेच पीक घेणे शक्य होत नाही. त्यामुळे शेतकऱ्यांना आपली जनावरे विकण्याची वेळ येते, त्यांच्या मुलांना नीट शिक्षण घेता येत नाही, मुलांची उपासमार होते. राज्यामध्ये एकूण 149 तालुक्यांमध्ये ही परिस्थिती सातत्याने उद्‌भवते. यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली आहे, त्यासाठी केंद्र सरकारकडून कशा प्रकारे व किती मदत घेतली जाते याबाबतची माहिती शासनाने कोठेच स्पष्टपणे दिलेली नाही.

सभापती महोदय, राज्यामध्ये 85 सिंचनाचे मोठे प्रकल्प सुरु आहेत, 181 मध्यम प्रकल्प व 1126 लघु प्रकल्प अपूर्ण आहेत. राज्यातील सिंचन क्षमता वाढण्यासाठी शासन कोट्यवधी रुपये खर्च करीत आहे. परंतु या खर्चाकडे शासनाचे दुर्लक्ष झालेले आहे. हे प्रकल्प लवकर पूर्ण होण्यासाठी आवश्यक ते व्यवस्थापन केले नाही तर त्याचे दुष्परिणाम पुढील काळामध्ये भोगावे लागतील.

सभापती महोदय, एकीकडे महाराष्ट्र राज्य पुरोगामी आहे, राज्य प्रगतीशील आहे, देशामध्ये क्रमांक एक वर आहोत असे म्हटले जाते. सर्वशिक्षा अभियान या केंद्र शासनाच्या योजनेकडे मी सभागृहाचे लक्ष वेधू इच्छितो. सन्माननीय सदस्य डॉ.सुधीर तांबे हे जळगाव जिल्ह्याचे प्रतिनिधीत्व करीत आहेत. जळगाव जिल्ह्यामध्ये जवळपास 1 लाख 9 हजार 957 विद्यार्थी आहेत. या विद्यार्थ्यांच्या गणवेशासाठी केंद्र सरकारकडून 3 कोटी 35 लाख 33 हजार 186 इतका निधी महाराष्ट्र शासनाकडे आला होता. अंदाजे 1.50 लाख मीटर इतके कापड होते. या गणवेशाची शिलाई स्थानिक स्तरावर होणे आवश्यक होते. गणवेशाचे कापड मंजूर होते ते कापड आले नाही, आलेले कापड दुसऱ्याच विद्यार्थ्यांना देण्यात आले. त्यासाठी दबाव वापरण्यात आला. त्याबाबत

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मनिष जैन....

वर्तमानपत्राच्या माध्यमातून चर्चा झालेली आहे. जळगाव जिल्ह्यातील विद्यार्थ्यांच्या गणवेशाची शिलाई औरंगाबाद जिल्ह्यात झाली आहे. कागदोपत्री महिला बचत गटाकडून शिलाई करुन घेतल्याचे दाखविण्यात आले. प्रत्यक्षात बचत गटांनी गणवेशाची शिलाई करुन दिलेली नाही. म्हणजे कोट्यवधी रुपयांचे घोटाळे सुरु आहेत. हे विद्यार्थी म्हणजे उद्याचे राज्याचे भविष्य आहे त्यांच्या जीवाशी आपण खेळत आहोत. अशा प्रकारच्या विषयांची शासनाने चौकशी करणे आवश्यक आहे. हे विषय सोडून देता कामा नये.

सभापती महोदय, राज्याच्या विविध योजना चालू राहण्यासाठी राज्य शासनाकडून व्यापारी, बागायतदार, कारखानदार, नोकरदारांकडून व्यवसाय कर घेतला जातो. या कराच्या माध्यमातून गोळा होणारा पैसा कोणत्या तरी कार्यक्रमासाठी बाजूला ठेवला जातो. परंतु ज्या कार्यक्रमासाठी हा निधी राखीव ठेवला जातो तो कार्यक्रम नीट राबविला जात नाही. त्यामुळे कार्यक्रमाचा उद्देश सफल होत नाही.

मुंबई ही देशाची आर्थिक राजधानी आहे. या मुंबईतून आयकर, विक्री कर आणि सीमा शुल्क कर अशा विविध कराच्या माध्यमातून केंद्र सरकारकडे पैसा जातो. या वर्षाच्या अर्थसंकल्पीय भाषणामध्ये केंद्र सरकारकडून राज्य सरकारला किती निधी मिळणार आहे त्याचा कोठेही उल्लेख करण्यात आलेला नाही. राज्यातून आयकराद्वारे जमा झालेला पैसा संपूर्ण देशामध्ये जातो. त्यामुळे लोकसंख्येच्या प्रमाणामध्ये राज्याला निधी मिळाला पाहिजे. परंतु केंद्र सरकारकडून राज्याला पुरेसा निधी मिळत नाही. शासनाने केंद्र सरकारच्या योजना प्रभावीपणे राबविल्या तर शासनाला अतिरिक्त निधी मिळू शकतो. केंद्राच्या अनेक योजनांमध्ये राज्य शासनाचा हिस्सा म्हणून 10 टक्के, 20 टक्के, 25 टक्के रक्कम द्यावी लागते. काही योजनांसाठी तर केंद्र सरकारकडून 100 टक्के निधी मिळतो. म्हणून केंद्र शासनाच्या योजनांबाबत राज्य शासनाने वेळेवर कार्यवाही केली तर कधीच अडचण येणार नाही.

आदिवासी विकास विभागाच्या योजना, शेळी-मेंढी महामंडळाकडे बघावे, कामगार विभागाच्या योजना बघाव्या, अनेक विभागांच्या योजनांसाठी केंद्र सरकारकडून निधी येतो. त्या निधीचा योग्य विनियोग झाला पाहिजे हा मुख्य विषय आहे. या विषयावरच अनेक सन्माननीय

3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मनिष जैन....

सदस्यांनी आपली मते मांडली आहेत. सभापती महोदय, आपण मला बोलण्याची संधी दिली त्याबाबत मी आपले आभार मानतो आणि माझे भाषण संपवितो. धन्यवाद, जय हिंद, जय महाराष्ट्र.

यानंतर श्री.शिगम....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रमेश शेंडगे (नामनियुक्त) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ. सुधीर तांबे, सन्माननीय सदस्या ॲड. उषा दराडे आणि अन्य सन्माननीय सदस्यांनी नियम 260 अन्वये जो प्रस्ताव या ठिकाणी आणलेला आहे त्यावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, हा प्रस्ताव आणल्याबद्दल मी सर्वप्रथम सन्माननीय सदस्यांना धन्यवाद देतो. या प्रस्तावाच्या माध्यमातून त्यांनी केन्द्राच्या विविध योजनांची चर्चा करण्याची संधी सन्माननीय सदस्यांना दिलेली आहे. तसेच त्या योजना प्रभावीपणे राबविण्याच्या दृष्टीने विविध उपाययोजना करण्याची संधी शासनाला दिलेली आहे. मुंबई ही देशाची आर्थिक राजधानी असून ती महाराष्ट्र राज्याची राजधानी आहे. या मुंबई शहरातून विविध करांच्या माध्यमातून केन्द्र सरकारला 40 ते 50 हजार कोटी रुपये दिले जातात. संपूर्ण महाराष्ट्र राज्यातून विविध कराच्या माध्यमातून केन्द्राला जवळ जवळ 65 हजार कोटी रुपये दिले जातात. एवढ्या मोठ्या प्रमाणावर केन्द्र सरकारला राज्याकडून कराच्या माध्यमातून निधी जात असताना त्यापैकी किती निधी राज्याच्या वाट्याला परत मिळतो आणि मिळालेल्या निधीपैकी किती निधी खर्च केला जातो हे कटाक्षाने पाहिले पाहिजे. केन्द्राकडून मिळणारा निधी पूर्णपणे खर्च होत नाही. त्याची कारणे अनेक आहेत. ती तपासणे गरजेचे आहे. आपल्या राज्यातील लोक रात्रंदिवस कष्ट करुन केन्द्राला जो कर देतात त्यातील किती रक्कम परत राज्याला मिळते याचा विचार केला पाहिजे.

सन 2009-10साठी केन्द्र सरकारने सर्वशिक्षा अभियानांतर्गत 13 हजार 100 कोटीचे नियोजन केले होते. सन 2011-12 साठी महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार योजनेसाठी जवळ जवळ 40 हजार कोटीचे नियोजन केले होते. आतपर्यन्त जवळ जवळ 1 लाख 56 हजार 791 कोटीचे नियोजन केन्द्र सरकारने केलेले आहे. सन 2011-12 साठी इंदिरा आवास योजनेअंतर्गत 10 हजार कोटीचे नियोजन केले होते. या योजनेअंतर्गत सन 2007 पासून 2012 पर्यंत जवळ जवळ 4150 कोटीचे नियोजन केले होते. सन 2011-12 साठी पंतप्रधान ग्रामसडक योजनेसाठी जवळ जवळ 20 हजार कोटी रुपये, एनआरएचएमसाठी 17,804 कोटी रुपये, आयसीडीसीसाठी 10 हजार कोटी रुपये, टोटल सॅनिटेशनसाठी 1650 कोटी रुपये, अेआयबीपीसाठी 12650 कोटी, जेएनएनयूआरएम अंतर्गत शहरांच्या विकासासाठी 13700 कोटी रुपये आणि शंभर टक्क्याच्या राष्ट्रीय ग्रामीण विकास योजनेसाठी 7810 कोटी रुपयाचे नियोजन केन्द्र सरकारने केलेले आहे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रमेश शेंडगे....

सभापती महोदय, आपण दुष्काळाला सामोरे जात आहोत. ग्रामीण भागातील पाण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी केन्द्राची जी राष्ट्रीय ग्रामीण पेयजल योजना आहे त्या योजनेसाठी गेल्यावर्षी जवळ जवळ 9350 कोटीचे नियोजन केलेले आहे. आतापर्यन्त या योजनेंतर्गत जवळ जवळ 49777.97 कोटी रुपयाचे नियोजन केलेले आहे. हे आकडे या ठिकाणी वाचून दाखविण्याचे कारण असे की, केन्द्र सरकार वेगवेगळया योजनांसाठी वेगवेगळया राज्यांसाठी हजारो कोटी रुपयांचे नियोजन करीत असते. यापैकी आपण राज्याच्या विकासासाठी किती निधी आणतो, त्या निधीपैकी किती टक्के निधी खर्च केला जातो आणि जो खर्च होऊ शकला नाही त्याची कारणे काय आहेत, आपण केन्द्राकडे जे प्रस्ताव पाठवितो ते वेळेत पाठवतो का ह्या सर्व गोष्टी पहाणे गरजेचे आहे. खरे म्हणजे 30 सप्टेंबरपर्यन्त केन्द्राकडे प्रस्ताव गेले पाहिजेत. परंतु ब-याच वेळा असे दिसून येते की आपले प्रस्ताव हे 31 डिसेंबर पर्यन्त दिल्लीमध्ये पोहोचतात आणि त्यानंतर केन्द्राकडून निधीची अपेक्षा करतो. तोपर्यन्त इतर राज्यांना त्या निधीचे वाटप झालेले असते.

मला शासनाला विनंती करावयाची आहे की, विविध योजनांच्या माध्यमातून जो निधी केन्द्राकडून आपण आणतो त्याबाबतीत चांगल्या प्रकारचे नियोजन केले पाहिजे. आपण राज्यातील ग्रामीण भागातून 31 मे पर्यन्त प्रस्ताव मागवून घ्यायला पाहिजेत, 30 जून पर्यन्त हे प्रस्ताव दिल्लीला गेले पाहिजेत. केन्द्र सरकारने 31 सप्टेंबर ही प्रस्ताव सादर करण्याची अंतिम तारीख दिलेली आहे. त्या तारखेपर्यन्त आपले प्रस्ताव सर्व बाबींची पूर्तता करुन गेले पाहिजेत. ब-याच वेळा असे निदर्शनास येते की, प्रस्ताव वेळेत सादर न झाल्यामुळे आपल्याला निधी मिळू शकलेला नाही.

मी एक उदाहरण देतो. सन 2010-11साठी सांगली जिल्ह्याचा पंतप्रधान ग्रामसडक योजनेचा 65 कोटीचा प्रस्ताव पाठवला होता. प्रस्ताव योग्य प्रकारे गेला की नाही हे मला माहीत नाही. परंतु त्या योजनेअंतर्गत आम्हाला फक्त 15 कोटी रुपये मिळाले. सन 2012-13साठी आम्ही 77 कोटीचा प्रस्ताव दिल्लीला पाठविलेला आहे. त्यापैकी किती मिळतील हे माहीत नाही. सांगण्याचा हेतू हा आहे की, आपण मागितलेले पैसे आल्यानंतर त्या पैशाचे योग्य प्रकारे नियोजन झाले पाहिजे. इंदिरा आवास योजनेअंतर्गत केन्द्राकडून कोटयवधी रुपये येतात. परंतु ब-याच वेळा त्यातील शेकडो कोटी रुपये परत गेलेले दिसतात.

...नंतर श्री. भोगले...

अशोधित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रमेश शेंडगे.....

निकष ठरविले आहेत ते निकष सुध्दा बदलण्याची गरज आहे. हे निकष काही वर्षापूर्वी ठरविले गेले आहेत. या निकषाच्या आधारेच आपण लाभार्थ्यांची संख्या पूर्ण करीत आलो आहोत. परंतु काही ठिकाणी योजनांसाठी लाभार्थी मिळत नाहीत अशी देखील परिस्थिती निर्माण झालेली आहे. म्हणून मला विनंती करावयाची आहे की, 100 टक्के योजना पूर्ण होत नाहीत, कारण प्रशासनाला त्यामध्ये अडचणी येत असतात, त्यामुळे योजनांचे निकष बदलण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, सिंचन हा अतिशय महत्वाचा विषय आहे. देशात काही राज्यांनी 40 टक्के सिंचन क्षमता गाठली आहे. हरियाणा राज्याने 85 ते 90 टक्क्यापर्यंत सिंचन क्षमता गाठली आहे. आपल्या राज्यामध्ये मात्र आपण 17 ते 17.5 टक्क्यापुढे जाऊ शकलो नाही. सिंचनाबाबत गेल्या वर्षी जवळजवळ 1200 कोटी रुपये राज्याला मिळाले होते. माननीय केंद्रीय कृषी मंत्री श्री.शरद पवार यांचा माढा हा लोकसभा मतदारसंघ दुष्काळी पट्ट्यामधील आहे. त्या भागातील टेंभू, ताकारी म्हैसाळ सारख्या योजना असतील, अर्बन योजना असतील त्या पूर्ण करण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले आणि त्या माध्यमातून 1200 कोटी रुपये राज्याला वेगवेगळया प्रकल्पांसाठी उपलब्ध झाले. तो पूर्ण निधी दिला गेला. असे असताना सिंचन प्रकल्प राबवित असताना या राज्यामध्ये आपण सिंचन वाढविण्यामध्ये फार प्रगती केली असे म्हणता येणार नाही. माननीय मुख्यमंत्री, माननीय उप मुख्यमंत्री यांनी दुष्काळी भागाचा दौरा केला. दौरा करीत असताना होपरळून निघालेल्या भागांची पाहणी केली आणि अभ्यास केला. काही तालुके राज्यात कायम दुष्काळी तालुके आहेत. प्रत्येक वर्षी त्यांना दुष्काळाचा सामना करावा लागतो. महाराष्ट्राचा विचार करुन अनुशेष भरुन काढण्याचा प्रयत्न करतो त्यावेळी या तालुक्यांचा प्रामुख्याने विचार झाला पाहिजे. जे तालुके कायम दुष्काळी आहेत त्यांच्यासाठी अग्रक्रमाने निधी खर्च केला पाहिजे.

सभापती महोदय, राष्ट्रीय कृषी विकास कार्यक्रमांतर्गत जो निधी उपलब्ध होतो त्या निधीचा विनियोग योग्य पध्दतीने केला जात नाही. बऱ्याच वेळेला निधी परत गेलेला आम्ही अनुभवतो. अहिल्यादेवी शेळी मेंढी विकास महामंडळाला 10 कोटी रुपये निधी मंजूर करण्यात आला. परंतु आयुक्तांकडून मार्गदर्शक सूचना डिसेंबर महिन्यामध्ये प्राप्त झाल्या. जानेवारी महिना उजाडल्यानंतर मार्चपर्यंत निधी खर्च केला पाहिजे असे सांगण्यात आले. मार्चपर्यंत निधी खर्च करु शकत नाही हे त्यांनीच ठरविले आणि 10 कोटी रुपयांपैकी 9 कोटी रुपये काढून घेण्यात आले. ते

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रमेश शेंडगे.....

9 कोटी रुपये दुसऱ्या ठिकाणी खर्च केले गेले. आमच्याकडून पूर्ण रक्कम खर्च करण्याची तयारी केलेली होती, त्यादृष्टीने नियोजन केलेले होते. परंतु प्रशासनाच्या योजनाच नसल्यामुळे हे घडले. त्यामुळे केंद्र शासनाचा निधी राज्यामध्ये व्यवस्थितपणे खर्च होण्यासाठी पाच ते सहा आयएएस दर्जाचे अधिकारी नेमण्यात यावेत. सध्या एक आयुक्त दिल्लीमध्ये आहेत त्याच धर्तीवर एक आयुक्त महाराष्ट्रामध्ये नेमण्यात यावेत आणि सर्व विभागवार योजनांचा आढावा घेण्याची जबाबदारी त्यांच्याकडे सोपविण्यात यावी.

सभापती महोदय, राज्यात राज्यसभेचे 19 आणि लोकसभेचे 48 खासदार आहेत. त्यांच्याकडे देखील काही प्रमाणात जबाबदारी सोपविण्यात यावी. योजनांचे प्रस्ताव केंद्र शासनाकडे पाठविण्यात आल्यानंतर राज्याच्या खासदारांनी त्या प्रस्तावांचा पाठपुरावा केला पाहिजे. संबंधित विभागाचे मंत्री आणि त्यांच्या त्यांच्या विभागात जाऊन प्रस्तावांचा पाठपुरावा केला गेला तर केंद्राकडून येणारा निधी पूर्णपणे खर्च होऊ शकतो आणि अधिक निधी उपलब्ध करुन घेता येऊ शकतो, त्या निधीबाबत नियोजन करता येऊ शकते व ग्रामीण भागातील जनतेला याचा उपयोग होईल एवढे बोलून माझे भाषण संपवितो. जय हिंद, जय महाराष्ट्र.

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेंद्र मुळक (वित्त राज्यमंत्री) : सभापती महोदय, माननीय सदस्य डॉ.सुधीर तांबे व इतर यांनी नियम 260 अन्वये मांडलेल्या प्रस्तावावरील चर्चेला उत्तर देण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे.

या प्रस्तावावरील चर्चेत भाग घेत असताना माननीय सदस्य डॉ.सुधीर तांबे, डॉ.दीपक सावंत, सर्वश्री अरुण गुजराथी, विक्रम काळे, भगवानराव साळुंखे, श्रीमती अलका देसाई, सर्वश्री हेमंत टकले, केशवराव मानकर, श्रीमती विद्या चव्हाण, श्रीमती दीप्ती चवधरी, सर्वश्री मनिष जैन, रमेश शेंडगे यांनी आपले विचार मांडताना अत्यंत चांगल्या सूचना केलेल्या आहेत. राज्याच्या बजेटमध्ये राज्याला आवश्यक असणारा निधी राज्य शासनाच्या माध्यमातून प्राप्त होत असतो.

नंतर श्री.खर्चे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेंद्र मुळक .....

त्यात विक्री कर किंवा उत्पादन शुल्क सारख्या स्त्रोतांचा समावेश असेल त्यातून साधारणपणे राज्याचे बजेट आपण निर्माण करतो. त्याचप्रमाणे केंद्र शासनाकडून देखील विविध योजनांच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात निधी आपल्याला येत असतो. या चर्चेच्या माध्यमातून सन्माननीय सदस्य श्री. अरुण गुजराथी व इतर सन्माननीय सदस्यांनी केंद्राकडून निधी मिळविण्याच्या दृष्टीने अनेक चांगल्या सूचना केल्या. त्यात प्रामुख्याने राज्य शासनाचा एक प्रतिनिधी केंद्राच्या योजनांच्या माध्यमातून निधी मिळविता यावा यासाठी नियुक्त करावा अशी सूचना केली. या निमित्ताने मी सदनाला सांगू इच्छितो की, राज्य शासनाने केंद्र शासनासोबत समन्वय ठेवण्यासाठी गुंतवणूक व राज शिष्टाचार अधिकारी वर्ग-1 अशा अधिकाऱ्याची नियुक्ती दि. 2.3.2006 पासून ऑलरेडी केलेलीच आहे. तसेच आपला एक रेसिडेन्ट कमिशनर आपण दिल्लीत कार्यरत ठेवलेला आहे, अशा प्रकारे दोन अधिकाऱ्यांच्या नियुक्त्या केंद्राकडून निधी प्राप्त करण्याच्या उद्देशानेच आपण केलेल्या आहेत, ही बाब मी सभागृहाच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो.

महोदय, आपण साधारणत: मागील आर्थिक वर्षाचा विचार केला तर अनेक योजनांच्या माध्यमातून केंद्र शासनाकडून निधी प्राप्त केला आहे. त्यात राष्ट्रीय कृषी विकास योजना ही 100 टक्के केंद्र पुरस्कृत योजना आहे. त्यातून 727.67 कोटी रुपये आपण सन 2011-12 मध्ये प्राप्त केले आहेत. तसेच नॅशनल हॉल्टिकल्चर मिशन ही योजना केंद्र शासनाचा 85 टक्के हिस्सा आणि राज्य शासनाचा 15 टक्के हिस्सा असलेली योजना आहे. या योजनेच्या माध्यमातून आपण 77.95 कोटी रुपये प्राप्त केले आहेत. तसेच नॅशनल रुरल हेल्थ मिशनच्या माध्यमातून 1296 कोटी रुपये मिळविले आहेत. नॅशनल रुरल एम्प्लॉयमेंट गॅरंटी स्कीम (नरेगा) च्या माध्यमातून जलसंधारणाच्या योजनांसाठी आपण 732.14 कोटीचा निधी प्राप्त केला.

प्रधान मंत्री ग्राम सडक योजना ही देखील 100 टक्के केंद्र पुरस्कृत योजना असून तिच्या माध्यमातून 788 कोटीचा निधी आपण प्राप्त केला आहे. इंदिरा आवास योजना, नॅशनल सोशल असिस्टन्स प्रोग्रॅम, बॅकवर्ड रिजन गॅरंटी फंड अशा योजनांच्या माध्यमातून देखील आपण भरीव निधी प्राप्त केला आहे. जेएनएनयुआरएम सारख्या योजनेच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात निधी मिळविला असून देशाच्या पातळीवर विचार केला तर सर्वात जास्त निधी मिळविणारे राज्य म्हणून आपल्याच राज्याचे नाव 2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेंद्र मुळक .....

घेतले जात आहे. सोबतच एआयबीपी कार्यक्रमाच्या माध्यमातून सन 2010-11 मध्ये निधी मिळविणारे महाराष्ट्र राज्य हे सर्वात आघाडीवरील राज्य होते. तसेच सर्व शिक्षा अभियान मधून 1029.65 कोटी एवढा निधी आपण प्राप्त केला. त्यानंतर नॅशनल प्रोग्रॅम फॉर न्युट्रिशनल सपोर्ट टू प्रायमरी एज्युकेशन (मिड-डे मिल) म्हणजेच मध्यान्ह भोजन सारख्या योजनेच्या माध्यमातून 691.77 कोटीचा निधी आपण प्राप्त केला आहे. एआयबीपी कार्यक्रमातून 651.94 कोटी, आयसीडीएस ही केंद्र शासनाचा 90 टक्के आणि राज्याचा 10 टक्के हिस्सा असलेली योजना असून त्यातून 1406 कोटीचा निधी आपण प्राप्त केला आहे. अशा सर्व योजनांमधून या आर्थिक वर्षात एकंदरित 9830.21 कोटीचा निधी आपण प्राप्त केला आहे. मागील वर्षाची तुलना केली तर आपण 8532.30 कोटी रुपये प्राप्त केले होते पण या 31 मार्च, 2012 पर्यंतच्या आर्थिक वर्षात सन 2011-12 ची तुलना करता 1297 कोटी एवढी अधिकची रक्कम आपण प्राप्त केली आहे.

यानंतर श्री. जुन्नरे ....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेंद्र मुळक .....

सभापती महोदय, साधारणत: केंद्राचा आणि राज्याचा हिस्सा बजेटेड हिशोबाने चेक केला तर केंद्रशासनाचे बजेटेड पैसे 9124.60 कोटी रुपये आतापर्यंत प्राप्त झाले आहेत. या सर्व योजनेमध्ये आपल्या राज्याचा हिस्सा 90-10, 80-20 किंवा 85-15 टक्के आहे असा धरुन हिशोब केला तर आपल्याला केंद्राकडून यासाठी 6195 कोटी रुपये प्राप्त झाले असून एकदंर विचार केला तर 15319.65 कोटी रुपये केंद्र आणि राज्याचे बजेटेड झाले आहे. यासंदभात मी सर्व सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, प्राप्त निधीच्या खर्चाशी तुलना केली तर आतापर्यंत आपण 98.63 टक्के प्राप्त निधीमधील पैसे खर्च केलेले आहेत. अनेक सन्माननीय सदस्यांनी केंद्रशासनाच्या योजना राज्यात याव्यात, केंद्रशासनाच्या विविध कार्यक्रमात आपण मोठया प्रमाणात सहभागी व्हावे मोठया स्वरुपात केंद्राचा निधी राज्यात आला पाहिजे अशा प्रकारच्या सूचना केलेल्या आहेत. मी यासंदर्भात सांगू इच्छितो की, अनेक वर्षापासून आपली स्वत:ची रोजगार हमी योजना होती परंतु आता नरेगामध्ये सर्व राज्ये सहभागी झाली असून आपण या वर्षी नरेगाच्या माध्यमातून केंद्रशासनाकडून निधी प्राप्त केलेला आहे. राज्याचे सन्माननीय मुख्यमंत्री श्री.पृथ्वीराज चव्हाण हे केंद्राच्या पंतप्रधान कार्यालयात राज्यमंत्री म्हणून कामकाज करीत होते. त्यांच्या गुड ऑफिसेसचा वापर करुन आपल्या राज्याचे उपमुख्यमंत्री तसेच मंत्री मंडळातील अनेक ज्येष्ठ सदस्य वारंवार केंद्राच्या सर्व खात्याशी संपर्क ठेवून जास्तीत जास्त निधी राज्याला कसा मिळू शकतो यासाठी सातत्याने प्रयत्न करीत असतात.

अनेक सन्माननीय सदस्यांनी सिचंनाच्या संदर्भात तसेच अनेक बाबीच्या संदर्भात उल्लेख केलेला आहे. एआयबीपीच्या माध्यमातून आपण मोठया स्वरुपात केंद्र सरकार कडून अर्थसहाय्य प्राप्त करीत असतो. एआयबीपीचा कार्यक्रम आपल्या राज्यात अत्यंत यशस्वीपणे सुरु आहे. मागील वर्षात एआयबीपीच्या माध्यमातून मोठया प्रमाणात केंद्राकडून निधी प्राप्त झाला असून आपल्या स्वत:च्या बजेटमधून जे काही प्रकल्प अपूर्ण आहेत त्या सर्व प्रकल्पांवर हा निधी खर्च करण्याचा प्रयत्न केला गेला आहे. या चर्चेमध्ये अनेक सन्माननीय सदस्यांनी एआयबीपी आणि केंद्र शासनाकडून प्राप्त निधीच्या संदर्भात चांगल्या सूचना केल्या असून त्या सूचनांची अंमलबजावणी या आर्थिक वर्षात करण्यासाठी सरकार कटीबध्द राहील एवढे मी या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेंद्र मुळक .....

प्रसंगी सांगू इच्छितो.

या चर्चेच्या माध्यमातून मी सर्व सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, केंद्राचा आणि राज्याचा समन्वय व्यवस्थित रहावा यासंदर्भात सन्माननीय सदस्य श्री. अरुण गुजराथी तसेच इतर सन्माननीय सदस्यांनी ज्या काही सूचना केलेल्या आहेत त्याबाबत मी एवढेच सांगू इच्छितो की, केंद्रामध्ये आपण रेसीडन्स कमिशनर म्हणून आयएएस दर्जाच्या अधिका-याची नेमणूक केली असून यदाकदाचित त्यांना अधिकचे बळ देण्याचा प्रयत्न करावयाचा असेल किंवा अजून काही अधिका-यांची गरज असेल तर त्यासंदर्भात निश्चितपणे विचार केला जाईल. अधिकचा निधी या आर्थिक वर्षामध्ये कसा येऊ शकतो यासंदर्भात निश्चितपणे प्रयत्न केला जाईल एवढे बोलून मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

धन्यवाद.

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुरेश शेट्टी (सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री) : सभापती महोदय, नियम 260 अन्वये सन्माननीय सदस्य डॉ. सुधीर तांबे तसेच इतर सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी प्रस्ताव मांडला आहे. आरोग्य विभागाच्या चर्चेमध्ये खास करुन सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत तसेच सन्माननीय सदस्य श्री. अरुण गुजराथी यांनी भाग घेतला आहे.

यानंतर श्री. भारवि...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

BGO/ जुन्नरे.. 18:30

श्री.सुरेश शेट्टी....

मी आपल्या माध्यमातून सभागृहाला सांगू इच्छितो की, केंद्र सरकारकडून एनआरएचएमसाठी आपल्याला निधी प्राप्त होत आहे. तसेच, एक-दोन छोट्या कार्यक्रमासाठी आपल्याला निधी प्राप्त होत आहे. येथे टी.बी.आणि मलेरिया कार्यक्रमा संबंधी सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी आपले मत व्यक्त केले आहे. या दोन्ही रोगावर नियंत्रण ठेवण्यासाठी केंद्र सरकारकडून आपल्याला मेडिसीनचा सपोर्ट मिळतो. केंद्र शासनाकडून दोन कोटी रूपयांची औषधे येतात. ते रोख स्वरूपात दोन कोटी रक्कम देत नाही. सन 2008-2009 मध्ये आपण एकूण 70.59 टक्के एवढ्या रकमेचा वापर केला आहे. त्यानंतर सन 2009-2010 मध्ये एनआरएचएमसाठी पीआयपी ॲप्रुव्ह झाले होते. त्याची डिटेल फिगर मी देत नाही. त्याचे युटीलायझेशन 81.56 टक्के झाले आहे. सन 2010-11 मध्ये त्याचे युटीलायझेशन 88.29 टक्के झाले. या वर्षी म्हणजे सन 2011-12 मध्ये 1460.58 कोटी रूपये पीआयपी होता. त्याचे मार्च पर्यंत 90 प्लस युटीलायझेशन केले आहे हे मी डॉ.दीपक सावंत यांना सांगू इच्छितो. ही फार आनंदाची गोष्ट आहे. आपला सन 2011-12 मधील परफॉर्मन्स बघून दिनांक 31.3.2012 रोजी केंद्र शासनाने स्वत:हून प्रस्ताव पाठवून आपल्याला 70 कोटी रूपये अतिरिक्त दिले आहेत. हा निधी आपण 34 न्यू बॉर्न केअर युनिटसाठी, 8 सर्कलमध्ये 8 मेडिसीन वेअर हाऊस उभे करण्यासाठी वापरणार आहोत. तसेच डिस्ट्रीक्ट हॉस्पिटल आणि ट्रायबल डिस्ट्रीक्ट हॉस्पिटल मधील डॉक्टर्स आणि नर्सेसच्या क्वार्टर्स बांधण्यासाठी या निधीचा वापर करणार आहोत.

सभागृहात आपण धोरणात्मक घोषणा केली होती. प्रत्येक जिल्ह्यामध्ये आपण स्टेट ऑफ हार्ट ब्लड बँक करणार आहोत. सुरूवातीला आपण 10 स्टेट ऑफ हार्ट ब्लड बँक करणार आहोत. त्यासाठी हा 70 कोटीचा निधी वापरणार आहोत. येथे स्टाफचा प्रश्न देखील उपस्थित झाला. केंद्र शासन संपूर्ण देशात कार्यक्रम राबवित आहे. केंद्र शासन प्रत्येक राज्यात सोसायटी स्थापन करून तो कार्यक्रम राबविण्याचा प्रयत्न करत असते. जास्त पारदर्शकता यावी म्हणून ते असे करतात. त्याची अंमलबजावणी पंचायत लेव्हलवर, ब्लॉक लेव्हलवर, जिल्हा लेव्हलवरील स्थानिक लोकांचा सहभाग घेऊन करण्याचा प्रयत्न करत असते. यात मिशन ऑफिसर आणि एक-दोन टॉप लेव्हलचे अधिकारी हे राज्य शासनाच्या सेवेतील आयएएस दर्जाचे असतात. खालचे सर्व अधिकारी हे

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुरेश शेट्टी....

कंत्राटी पद्धतीवरचे असतात. आपल्याकडील डॉक्टर्स, नर्सेस, पॅरामेडिकल स्टाफ, ऑफिस स्टाफ हे सगळे कंत्राटी पद्धतीवर घेण्यात आले आहेत. आपल्याकडे एनआरएचएम मध्ये 22527 कर्मचारी कंत्राटी पद्धतीवर आहेत. त्यापैकी 19200 पोस्ट आपण फिल केल्या आहेत. कारण एनआरएचएम कार्यक्रम चार वर्षांचा होता. या कार्यक्रमाला पुन्हा एकदा चार वर्षांची मुदतवाढ देण्यात आली आहे.

गेल्या 2-3 वर्षामध्ये आपण जे फ्लॅशी प्रोग्रॅम हाती घेतले आहेत त्यासंबंधी माहिती सांगू इच्छितो. आपल्या राज्यात मोबाईल युनिटचा कार्यक्रम घेतला आहे. त्यासाठी 40 डिस्पेन्सरी व्हेईकल आणि त्याला 1 सपोर्टींग व्हेईकल घेतले आहे. प्रत्येक जिल्ह्यातील एका एनजीओंना आपण अत्याधुनिक असे मोबाईल युनिट दिले आहे. नंदूरबार, गोंदिया आणि गडचिरोली हे आदिवासी जिल्हे आहेत. नंदूरबार जिल्ह्यासाठी 2, गोंदिया जिल्ह्यासाठी 2 आणि गडचिरोली जिल्ह्यासाठी 3 मोबाईल युनिट देण्याची योजना राबविण्याचे हाती घेतले आहे.

यानंतर श्री.सरफरे...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुरेश शेट्टी.....

सभापती महोदय, दुसरे असे की, संपूर्ण देशामध्ये पहिल्या प्रथम आपल्या राज्यामध्ये एपिलेप्सी कॅम्प सुरु करण्यात आले आहेत. आपल्या राज्यातील या योजनेचे एक्सपरिमेंट पाहून केंद्र सरकारने राष्ट्रीय पातळीवर एपिलेप्सीचा कार्यक्रम राबविण्यास सुरुवात केली आहे. प्रत्येक जिल्ह्यामध्ये एनआरएचएममार्फत शिबीर आयोजित करुन एपिलेप्सी पेशंटना संपूर्ण औषधे मोफत दिली जात आहेत. मागील रविवारी पालघर येथे एक शिबिर आयोजित करण्यात आले होते त्यापूर्वी मी स्वत: अमरावतीला कॅम्प आयोजित करण्यासाठी गेलो होतो. त्याचप्रमाणे पुणे येथे हेल्थ ॲडव्हाईस सेल निर्माण करण्यात आला असून त्या ठिकाणी प्रत्येक डिपार्टमेंटच्या आठ स्पेशालिस्ट डॉक्टर्सची 24 तास नेमणूक करण्यात आली आहे. आपण पहातो की जिल्ह्याच्या ठिकाणी पी.एच.सी सबसेंटर, ग्रामीण रुग्णालय, महिलांकरिता असलेले रुग्णालय या ठिकाणी डॉक्टर, नर्सेस आणि पॅरामेडिकल स्टाफ काम करीत आहे. या स्टाफला काही विशिष्ट आजाराच्या रुग्णांवर कशाप्रकारचे उपचार करणे आवश्यक आहे याची माहिती नसते. अशावेळी त्यांना मार्गदर्शनाची गरज असल्यामुळे त्याकरिता 104 हा टोल फ्री नंबर तयार करण्यात आलेला आहे. या नंबरवर त्या आठ स्पेशालिस्ट डॉक्टर्सशी संपर्क साधून त्यांच्याकडून मार्गदर्शन प्राप्त करुन घेता येऊ शकते. ही सुविधा फक्त सार्वजनिक आरोग्य विभागाच्या डॉक्टर्सकरिता उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यामध्ये एएनएम वर्कर्स, एनजीओ यांचाही समावेश करण्यात आला आहे.

सभापती महोदय, त्याचप्रमाणे आपण सिकलसेलकरिता कार्यक्रम राबवीत आहोत. त्याचप्रमाणे आपण टेलि-मेडिसीनचा कार्यक्रम दोन वर्षापासून राबवीत आहोत. तसेच, ईमर्जन्सी मेडिकल सर्व्हिसची सुध्दा आपण घोषणा केली आहे. या कार्यक्रमामध्ये केंद्र सरकार आणि राज्य सरकारचा सहभाग आहे. या योजनेकरिता केंद्र सरकार आपल्याला एनआरएचएममधून निधी देते. ही योजना गुजरात, आंध्रप्रदेश इत्यादी दहा ते बारा राज्यांमध्ये सुरु झाली आहे. पाच वर्षापूर्वी आपल्या राज्यात हा कार्यक्रम विदाऊट टेंडर कंपनीला देऊन राबविण्याबाबत मंत्री मंडळाने निर्णय घेतला होता. परंतु ज्या कंपनीला हे काम द्यावयाचे ठरविले होते ती कंपनी नंतर बंद झाली. त्यानंतर पुन्हा मंत्री मंडळाने जागतिक पातळीवर निविदा मागविण्याचा निर्णय घेतला असून त्यासंबंधीची निविदा प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे. तसेच, या योजनेचा लाभ केवळ ग्रामीण

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/

श्री. सुरेश शेट्टी.....

भागापुरता मर्यादित न ठेवता मुंबई,पुणे,ठाणे,औरंगाबाद, नागपूर या शहराच्या ठिकाणी ही सुविधा उपलब्ध करुन देण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे. नागरी भागामध्ये या योजनेची सुविधा फक्त राज्य सरकारच्या निधीमधून उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. ग्रामीण भागामध्ये सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी केंद्र सरकारच्या एकत्रित निधीमधून आपल्याला निधी मिळणार आहे. त्यासंबंधीची निविदा प्रक्रिया आता अंतिम टप्प्यामध्ये आहे. जागतिक पातळीवरील इतकी मोठी निविदा प्रक्रिया असल्यामुळे त्या विरुध्द काही पार्टीज कोर्टामध्ये गेल्या असून 17 एप्रिलला त्यांचे हियरींग होणार आहे. न्यायालयाकडून या बाबतीत लवकर निर्णय लागल्यानंतर ही योजना संपूर्ण राज्यभर राबविण्यात येणार आहे.

सभापती महोदय, शासनाने मलेरिया निर्मूलन कार्यक्रमाचे पैसे डायव्हर्ट केल्याचे या ठिकाणी सांगण्यात आले. आपण एड्स कार्यक्रमाचे पैसे डायव्हर्ट केले नाहीत. आपल्याला केंद्र सरकारकडून मलेरिया निर्मूलन कार्यक्रमासाठी रोखीने निधी मिळत नसून तो औषधाच्या स्वरुपात मिळतो. अशाप्रकारे केंद्र सरकारने या कार्यक्रमासाठी 2 कोटींची औषधे पाठविली आहेत व त्यामध्ये राज्य सरकारने 2 कोटींच्या औषधांचा समावेश करुन एकूण 4 कोटींची औषधे या कार्यक्रमासाठी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहेत. त्याचप्रमाणे कॉग्निजेबल डिसीजसाठी उपलब्ध असलेल्या निधीमधून एमबीआर म्हणजेच क्षयरोग निर्मूलनाच्या कार्यक्रमासाठी मुंबई महानगरपालिकेला आर्थिक सहाय्य देण्यासाठी 2.4 कोटी रुपये उपलब्ध करुन देण्यात आले आहेत. केंद्र सरकारकडून क्षय निर्मूलन कार्यक्रमासाठी राज्याला 5 कोटींचे अनुदान मिळते त्यामध्ये राज्य सरकारने 5 कोटींचा आपला हिस्सा घातलेला आहे.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुरेश शेट्टी . . . .

महाराष्ट्र सरकार की तरफ से महानगरपालिका को दिया. क्योंकि हमारे दोनों सभागृहों में मुंबई के आमदार बहुत सक्षम हैं. इसलिए देना पड़ा. मैं भी तो मुंबई का ही आमदार हूं.

सभापती महोदय, सोलर फोटो वॉल्टीक सिस्टमच्या संबंधात सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी सांगितले की, एनआरएचएम चा कार्यक्रम सुरु असल्याचे कुठे दिसत नाही. तो फक्त आदिवासी भागासाठी आहे. आपण 2008-2009 मध्ये 65 ठिकाणी सुविधा उपलब्ध करुन दिल्या असून 2009-2010 मध्ये 6 ठिकाणी 2010-2011 मध्ये 105 ठिकाणी आणि आता 95 पीएचसी शिल्लक आहेत आणि ते आपण 2011-2012 मध्ये पूर्ण करणार आहोत. सभापती महोदय, मी आपल्याला सांगू इच्छितो की, केंद्र शासन आज एनआरएचएमच्या परफॉर्मन्स् नुसार महाराष्ट्र राज्याची टॉप-5 मध्ये गणना करते. तसेच सन्माननीय सदस्यांनी रुग्ण कल्याण समितीबाबत सांगितले. त्या समितीच्या बाबतीत माझ्याकडे टोटल डॉक्युमेंटल प्रुफ असून ते मी सदनाच्या पटलावर ठेवता. त्यावरुन लक्षात येईल की, त्याठिकाणी ॲडव्हायझरी कमिटीच्या, एक्झीक्युटीव्ह कमिटीच्या एकंदर किती बैठका होतात आणि त्यामध्ये टोटल ऑडीट सिस्टीम एकदम ट्रान्सफरन्ट केलेली असून तीन-तीन प्रकारचे ऑडीट होत आहेत.कॉन्करंट ऑडीट हे इंटर्नल ऑडीटर करीत आहेत, इयरली ऑडीट करण्यासाठी आपण लोकल ऑडीटर नेमत आहोत आणि स्टेट लेव्हलवर सर्व पी.एच.सी.चे स्टॅट्युटरी ऑडीट केले जात आहे अशा प्रकारे तीन वेळा ऑडीट होत आहे. तसेच इतर राज्यांप्रमाणे आपल्या राज्यामध्ये तसे काही प्रकार होत नाहीत. आपल्या येथे ट्रान्सफरंट काम होत आहे.

सभापती महोदय, रग्ण कल्याण समितीमध्ये जिल्हा परिषदेचे, पंचायत समितीचे सन्माननीय सदस्य आहेत आणि बाकीचेही लोकप्रतिनिधी आहेत. त्यांच्यामध्ये अजून थोडा अवेअरनेस क्रिएट करुन त्यांनी यामध्ये जास्त सहभाग धेण्यासाठी आम्ही प्रयत्न करीत आहोत आणि या वर्षासाठी जे पी.एच.सी. होणार आहेत, त्याबाबतीत आपल्याला या राज्यामध्ये काम करण्यासाठी आरोग्य विभागाला 1700 कोटी रुपयांचा निधी मिळेल त्याबाबत मला खात्री आहे की, एवढेच मी यानिमित्ताने सांगू इच्छितो. धन्यवाद.

---

4 आय-2 . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत पाटील (ग्रामविकास मंत्री) : सभापती महोदय,सन्माननीय सदस्या श्रीमती उषाताई दराडे यांनी मांडलेल्या विषयाबाबत सन्माननीय सदस्या श्रीमती वंदना चव्हाण, सन्माननीय सदस्य सर्वश्री केशवराव मानकर, विक्रम काळे, आदरणीय अरुण गुजराथीसाहेब या सर्व सन्माननीय सदस्यांनी पंतप्रधान . . ..

उप सभापती : माननीय मंत्री महोदय, अर्ध्या तासाच्या चर्चेबाबत उत्तर देत आहेत काय ?

श्री.जयंत पाटील : सभापती महोदय, मी नियम 260 अन्वये जो प्रस्ताव मांडण्यात आला होता, त्याबाबत उत्तर देत आहे. यासंबंधातील काही मुद्दे राहिलेले आहेत, त्याबाबत सांगावयाचे आहे.

उप सभापती : ठीक आहे.

श्री.जयंत पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ.सुधीर तांबे आणि सन्माननीय सदस्या श्रीमती उषाताई दराडे तसेच सन्माननीय सदस्य सर्वश्री.माणिकराव ठाकरे, विक्रम काळे, सुभाष चव्हाण या सर्व सन्माननीय सदस्यांनी जो प्रस्ताव मांडलेला आहे त्यावर बोलताना पंतप्रधान सडक योजनेबाबत बऱ्याच सन्माननीय सदस्यांनी उल्लेख केल. सन्माननीय सदस्य श्री.अरुण गुजराथी साहेबांनी 771 कोटीच्या प्रस्तावापैकी 258 कोटी रुपये मंजूर झाले आणि 236 कोटी रुपये खर्च झाले असे म्हटलेले आहे.

श्री.अरुण गुजराथी (खाली बसून) : आपल्या बजेटमध्ये तसे आहे.

श्री.जयंत पाटील : सभापती महोदय, टप्पा-8 मध्ये 771 पैकी 760 कोटी रुपये मंजूर झाले आणि त्यापैकी 645 कोटी रुपये खर्च झाले. मात्र या टप्प्यातील काही कामे अजून पूर्ण झालेली नाहीत. तो टप्पा डिसेंबर 2012 पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे. एकूण मंजूर कामे 456 होती, त्यापैकी 341 कामे पूर्ण झाली आहेत.सन्माननीय सदस्य श्री.विक्रम काळे यांनी काही मुद्दे मांडले. पंतप्रधान सडक योजना ही राज्यातील सगळ्या गावांना लागू नाही.त्यासाठी काही निकष आहेत. 1000 पेक्षा जास्त लोकसंख्या असली पाहिजे. आदिवासी भागामध्ये 500 पेक्षा जास्त लोकसंख्या असणाऱ्या गावांना बारमाही जोडणारा एक रस्ता असावा ही त्यातील कल्पना आहे.

यानंतर श्री.अ.शिगम . . . .

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत पाटील....

सन 2000 मध्ये केंद्रात एनडीएचे सरकार होते त्यावेळी ही योजना आली. ही योजना लागू करण्यापूर्वी देशातील सर्व राज्यांकडून रस्त्यांची माहिती मागविण्यात आली. आपल्या राज्याने माहिती देताना रोजगार हमी योजने अंतर्गत झालेल्या रस्त्यांचीसुध्दा एकत्रित करुन माहिती दिली. त्यामुळे केंद्र सरकारने असा विचार केला की, महाराष्ट्रामध्ये एवढे रस्ते झालेले आहेत. त्यामुळे बिहार, मध्य प्रदेश, राजस्थान, उत्तर प्रदेश या राज्यांच्या तुलनेत आपल्याला कमी संख्येने रस्ते मंजूर झाले.

सभापती महोदय, सन 2000 मध्ये पंतप्रधान ग्राम सडक योजना आली. टप्पा क्रमांक 1 ते 9 अंतर्गत एकूण 5 हजार 382 कोटी रुपयांचे प्रस्ताव मंजूर झाले. त्यामध्ये 23 हजार 206 कि.मी. लांबीचे उद्दिष्ट ठरविण्यात आले होते. मार्च 2012 पर्यंत केंद्र शासनाकडून 5 हजार 582 कोटी रुपयांपैकी 5 हजार 206 कोटी रुपये प्राप्त झाले. त्यातील 4 हजार 825 कोटी रुपये खर्च झाले. 23 हजार 206 कि.मी. पैकी 21 हजार 347 कि.मी.रस्त्यांची कामे पूर्ण झालेली आहेत. उर्वरित रस्त्यांची कामे सुरु आहेत.

सभापती महोदय, मी सभागृहाच्या एक बाब निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, केंद्र सरकारकडे जे प्लान मंजुरीसाठी पाठविले त्यामध्ये आणखी काही रस्ते मंजूर व्हावेत यासाठी आपण सतत प्रयत्न करीत आहोत.

सभापती महोदय, मी या ठिकाणी एवढ्या करीता उभा राहिलेला आहे की, पंतप्रधान ग्राम सडक योजने अंतर्गत आपल्या राज्यातील प्लान मंजूर होण्यासाठी सर्वच राज्ये प्रयत्न करीत असतात. ग्राम विकास विभागाचा मंत्री म्हणून मी देखील केंद्रातील मंत्री महोदयांना वेळोवेळी भेटलो आहे. मग आपल्या राज्यातील माननीय श्री.विलासराव देशमुख साहेब असतील, त्यांच्या अगोदर श्री.सी.पी.जोशी साहेब असतील, आताचे मंत्री महोदय असतील यांच्याकडे सतत पाठपुरावा केलेला आहे.

सभापती महोदय, या देशातील अति मागासलेल्या राज्यांमध्ये पहिल्यांदा रस्त्याने जोडणी करण्याची आवश्यकता असणारी अजून गावे आहेत. आपल्या रेकॉर्डप्रमाणे अशा गावांना दुष्काळात आणि नंतर रोहयोच्या माध्यमातून रस्ते जोडलेले आहेत. त्यामुळे महाराष्ट्र, कर्नाटक, तामिळनाडू,

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत पाटील....

गुजरात या प्रगतशील राज्यांमध्ये नवीन रस्ते मंजूर करण्याचे प्रमाण कमी झालेले आहे.

सभापती महोदय, मध्यंतरी आम्ही केंद्र सरकारकडे मिसिंगलिंकचे प्रस्ताव मंजुरीसाठी पाठविले होते. म्हणजे पूर्वी मंजूर झालेले रस्ते परंतु मध्ये छोटा नाला आला आणि आपण तडजोड म्हणून तसाच रस्ता केला. त्या ऐवजी आता तेथे छोटासा पूल करावा असे मिसिंगलिंकचे प्रस्ताव केंद्र सरकारकडे पाठविले. त्या प्रस्तावास केंद्र सरकारने मंजुरी दिलेली आहे. त्यानंतर आपण जवळपास 700 ते 800 कोटी रुपयांचे मिसिंगलिंकचे प्रस्ताव मंजुरीसाठी पाठविले आहेत.

सभापती महोदय, आपण केंद्र सरकारकडे रस्ते असल्याचा रेकॉर्ड पाठविला परंतु त्यातील अनेक रस्त्याची अवस्था अतिशय वाईट आहे तर बऱ्याच गावात रस्तेच शिल्लक नाहीत. तेव्हा ते रस्ते घ्यावेत अशी केंद्र सरकारला विनंती केली. त्यावर केंद्राने सांगितले की, आम्ही असे रस्ते अपग्रेडेशनमध्ये घेऊ. पण केंद्रापुढे असा प्रश्न निर्माण झाला की,एका राज्याला अपग्रेडेशनचे रस्ते द्यायला लागलो तर दुसऱ्या राज्यांना काय उत्तर द्यायचे ? म्हणून केंद्र सरकारने सांगितले की, आम्हाला समान न्यायाचे धोरण स्वीकारणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, दोन दिवसांपूर्वी केंद्रीय ग्राम विकास मंत्री सातारा जिल्ह्यामध्ये आले होते त्यावेळी मी त्यांच्या सोबत होतो. त्यावेळी मी त्यांना सांगितले की, अपग्रेडेशनच्या बाबतीत आमच्या सारखी इतर राज्ये वेगळी करायची असतील तर त्यासाठी एक तडजोड करु. केंद्र शासनाकडून मिळणाऱ्या निधीमध्ये राज्य शासन स्वत:चा 20 ते 25 टक्के निधी समाविष्ट करेल. तेव्हा आपण केंद्रीय मंत्रिमंडळासमोर प्रस्ताव मांडावा की, "ज्या राज्यांमध्ये अपग्रेडेशन करायचे आहे, ती राज्ये त्यांचा शेअर घालू इच्छितात." जर आपणास योजनेसाठी पाच हजार कोटी रुपये द्यावे लागत असतील तर त्याऐवजी आपणास दीड ते दोन हजार कोटी रुपये द्यावे लागतील. आपण असे केल्यास आम्हाला इतर राज्यांपेक्षा वेगळी ट्रीटमेंट देता येईल. त्यांनी मला तेथेच तोंडी सांगितले की, मला हे मंजूर आहे. त्यानंतर त्यांनी राज्यातील सचिवांची बैठक बोलाविली. त्या बैठकीत त्यांनी माझ्या नावाचा उल्लेख करुन सांगितले की, महाराष्ट्र राज्याच्या मंत्र्यांनी जी सूचना केलेली आहे त्या प्रमाणे आम्ही तसे करायला तयार आहोत,

यानंतर श्री.बरवड..

यानंतर श्री.बरवड..

अशुद्धीत प्रत / शीघ्रलिपीसाठी नाही

श्री. जयंत पाटील .....

तुमची सगळ्यांची तयारी आहे का ? इतर राज्यांनी त्यासाठी थोडाफार होकार दिलेला आहे. त्यामुळे हा प्रस्ताव जर मंत्रिमंडळामध्ये मान्य झाला, आताच तो होणार नाही कारण तो कॅबिनेटपुढे जाणार, पण मला असा विश्वास आहे की, ज्या पध्दतीच्या गतीने ते काम करीत आहेत त्यावरुन या वर्षी केंद्राची जी अर्थसंकल्पीय तरतूद आहे त्याच्या शेवटच्या काळात कदाचित आपल्याला अपग्रेडेशनसाठी आणखी मोठ्या संख्येने रस्ते मंजूर झाल्याशिवाय राहणार नाहीत. 22 मार्चला दिल्लीला एक बैठक झाली. त्यामध्ये त्यांनी 463 कोटी रुपयांच्या प्रस्तावाला मान्यता दिली. त्यातील 389 कोटी रुपये पुलांसाठी आणि काही रक्कम नवीन रस्त्यांसाठी दिलेली आहे. आता 12 एप्रिलला त्यांनी विशेष बैठक ठेवलेली आहे. आपण 734 कोटी रुपयांचा प्रस्ताव दिलेला आहे. त्यातील 303 कोटी रुपये पुलाचे आहेत आणि 400 कोटी रुपये रस्त्यांचे आहेत. 12 तारखेला त्यांनी विशेष बैठक ठेवलेली आहे. त्यात तो प्रस्ताव बऱ्यापैकी मंजूर होईल. जो आपल्याला मेरीटने मिळणे आवश्यक आहे असाच प्रस्ताव पाठविलेला आहे आणि त्याला लवकर मंजुरी मिळेल असे मला वाटते.

सभापती महोदय, या निमित्ताने पंतप्रधान ग्राम सडक योजनेची अवस्था बरोबर नाही किंवा मेन्टेनन्सच्या कॉन्ट्रॅक्टची बरोबर अंमलबजावणी होत नाही असे सन्माननीय सदस्य श्री. केशवराव मानकर यांनी सांगितले. तसेच सन्माननीय सदस्या श्रीमती चव्हाण ताईंनी सुध्दा सांगितले की, अवस्था बिघडलेली आहे. यामध्ये दोन महत्वाच्या गोष्टी आहेत. या ग्रामीण रस्त्यावर त्याचा लोड फॅक्टर विचारात घेऊन आपण ढोबळ मानाने, स्टॅण्डर्ड मेथडप्रमाणे, लोड फॅक्टरप्रमाणे त्या रस्त्याचे डिझाईन करतो. प्रत्यक्षात अलीकडे ग्रामीण भागामध्ये हेवी ट्राफीक वाढलेले आहे आणि विशेषत: वाळूची वाहतूक वाढलेली आहे. आपण जर कोठे दौऱ्यावर गेलात आणि रस्ता का खराब झाला याची बारकाईने चौकशी केली तर त्यातील किमान 70 टक्के रस्त्यांच्या बाबतीत त्या रस्त्यावर वाळूची वाहतूक मोठ्या प्रमाणावर झाली असे उत्तर येईल. जर एखादा रस्ता एखाद्या लोड फॅक्टरप्रमाणे डिझाईन केलेला असेल आणि जर त्यापेक्षा जास्त हेवी ट्राफीक सतत त्या रस्त्यावर आले तर कोणताही रस्ता टिकत नाही. ग्रामीण भागात बऱ्याच ठिकाणी काळ्या मातीतील

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB

श्री. जयंत पाटील .....

रस्ते असतील तर ते लवकर खराब होतात. एक तर रस्त्याचे बांधकाम करताना त्या कामाला त्रिस्तरीय व्हिजिट्स होतात. केंद्र सरकारची एक व्हिजिट होते. कधी ना कधी तरी ती व्हिजिट त्या रस्त्याच्या वाट्याला येतेच. तसेच राज्य सरकारची व्हिजिट होते आणि लोकल व्हिजिट होते. लोकल आणि राज्य सरकारची टेस्टींग 100 टक्के होते. केंद्र सरकारची व्हिजिट निवडक रस्त्यांना होते पण त्या व्हिजिट्स एवढ्या वेळा होतात की, जवळपास त्या रस्त्याला कधी ना कधी व्हिजिट होतेच. तीन टेस्टमधून तो रस्ता पास होतो. त्यामुळे काम करताना क्वॉलिटीच्या बाबतीत जर कोणत्या कॉन्ट्रॅक्टरने घोटाळा केला तर परत पुढच्या मेन्टेनन्सच्या काळात देखील त्याला पाच वर्षे ते काम करावयाचे असते. त्यामुळे त्याला त्यातून सुटता येत नाही. पाच वर्षे जो मेन्टेनन्स करतो त्यालाही पुन्हा हेच नॉर्म्स आहेत. त्या ठिकाणी स्थानिक पातळीवरचे आणि राज्य पातळीवरचे इन्स्पेक्शन्स सतत होत असतात.

सभापती महोदय, सर्वसाधारणपणे सभागृहाची अशी भावना झालेली आहे की, पंतप्रधान ग्राम सडक योजनेचे रस्ते बरोबर होत नाहीत. जर रस्ते बरोबर होत नसतील किंवा जर कमी दर्जाचे रस्ते होत असतील तर त्या ठिकाणी झालेल्या व्हिजिटनंतर करेक्टिव मेझर्स घेतल्याशिवाय त्यांचे पेमेंट होत नाही. ती फार पारदर्शक मेथड आहे. कोणत्याही सदस्याला जर यामध्ये स्वारस्य असेल तर त्यांना मी आपल्या कार्यालयात बोलवून ती पारदर्शकता कशी आहे हे दाखवितो. पण त्यानंतर जे मेन्टेनन्सचे काम आहे त्यावर होणारा खर्च, त्या संदर्भात या ज्या तीन एजन्सीज आहेत त्यातील खालच्या ज्या दोन एजन्सीज आहेत त्यांच्याकडून सतत त्या ठिकाणी व्हिजिट्स करुन त्याची तपासणी किंवा टेस्टींग केली जाते. आता पंतप्रधान सडक योजनेमध्ये ई-टेंडरींगनेच कामे दिली जातात. ते कोणी मॅनिप्युलेट करु शकतो अशी परिस्थिती राहिलेली नाही. ई-टेंडरींगमध्ये मॅनिप्युलेशन कमी होतात. पण ज्यावेळी दर्जा कमी असण्याचा भास होतो त्यामध्ये जे ओव्हर लोडींग होते त्याचा भाग जास्त आहे. त्यामुळे आपल्या जर असे निदर्शनास आले आणि जर आपण सांगितले की, हा रस्ता तपासून द्यावा तर त्या रस्त्याची सगळी टेस्ट आपण करु शकतो. रस्ता झाला की कॉन्ट्रॅक्टर मोकळा असा गैरसमज आपल्या मनात राहू नये. आपण जर मला स्पेसिफिक उदाहरणे् दिली की, अमुक हा रस्ता तपासून द्यावा तर ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उप सभापती : आपल्याला आणखी किती वेळ लागणार आहे ? त्याप्रमाणे सभागृहाची वेळ वाढवावी लागेल.

श्री. जयंत पाटील : माझे उत्तर 7.00 वाजेपर्यंत संपावयास हवे पण जास्तीत जास्त 7 वाजून 5 मिनिटांपर्यंत माझे उत्तर संपेल.

उप सभापती : ठीक आहे. हा प्रस्ताव संपेपर्यंत सभागृहाची वेळ वाढविण्यात येत आहे.

श्री. जयंत पाटील : सभापती महोदय, आपल्याला जर असे वाटले की, अमुक रस्त्याच्या बाबतीत आमची तक्रार आहे आणि जर माझ्याकडे स्पेसिफिक तक्रार दिली तर त्या ठिकाणी जाऊन आपल्याला इन्स्पेक्शन घेता येईल. इन्स्पेक्शन म्हणजे केवळ नजरेने बघून रस्ता चांगला आहे की वाईट हे ठरवावयाचे असे नाही तर त्यामध्ये त्यांनी किती डांबर घातले, त्यांनी खाली कोणत्या प्रकारचा भराव केला या बाबतीत डिझाईनमध्ये आणि त्यांनी केलेल्या कामामध्ये किती फरक आहे हे कळू शकते.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत पाटील...

ते कोणीही लपवू शकत नाही. त्यामुळे सन्माननीय सदस्यांनी तशी माहिती मला दिली तर ती तपासून घेण्यात येईल. त्यामध्ये जे दोषी आढळतील त्यांच्यावर कारवाई केल्याशिवाय शासनाचा वचक राहणार नाही. लोकप्रतिनिधी या नात्याने एखादे विधान केले असेल तर ते आलेल्या अनुभवातून केले असावे. सन्माननीय सदस्यांना तसा अनुभव आला असेल तर माझ्याकडे रस्त्यांची नावे द्यावीत. त्या रस्त्यांची पुन्हा विशेष पथकामार्फत तपासणी करुन घेऊ.

जिल्हा परिषदांमध्ये जाणीवपूर्वक ई-टेंडरिंग सिस्टिम सुरु केलेली आहे. मध्यंतरीच्या काळात जिल्हा परिषदांच्या निवडणुका झालेल्या आहेत. जिल्हा परिषदांमधील मागील बॉडीचा अधिकार गेल्यानंतर आणि नवीन बॉडी अस्तित्वात असताना मागील दीड-दोन महिन्यामध्ये राज्यातील सर्व जिल्हा परिषदांमध्ये ई-टेंडरिंगची प्रॅक्टीस चालू करण्याचे आदेश दिले आहेत. नवीन बॉडी पदावर आल्यानंतर ई-टेंडरिंगची प्रॅक्टीस सुरु करु देईल की नाही असा प्रश्न समोर होता. कदाचित ई-टेंडरिंगला विरोध होण्याची शक्यता गृहित धरुन ई-टेंडरिंगची अंमलबजावणी सर्व जिल्हा परिषदांमध्ये सुरु करण्याच्या सूचना दिल्या होत्या. मला सांगण्यास आनंद वाटतो की, ई-टेंडरिंगची प्रॅक्टीस सर्व ठिकाणी सुरु आहे. त्यामुळे टेंडरिंगमध्ये पारदर्शकता आली आहे. बीड जिल्ह्यातील कंत्राटदाराला घरामध्ये बसून औरंगाबादच्या कामाचे टेंडर भरले तरी त्याला ते मिळू शकते. अशी व्यवस्था जिल्ह्यांसाठी केलेली आहे. ही पध्दत चांगल्या प्रकारे रुजू झाल्यावर सहा महिन्यानंतर कोणी कोठेही टेंडर भरण्याची पध्दत सुरु केली जाणार आहे. त्याचे कारण असे आहे की, स्थानिक लोकांचा व्हेस्टेड इंटरेस्ट खूप असतो. टेंडर कोणी भरले पाहिजे आणि साईटवर कोणी काम करावयास पाहिजे याबाबत सुध्दा काही लोकांचा वचक असतो. त्यामुळे सहा महिन्यांनी पारदर्शकतेमध्ये आणखी भर घातली जाणार आहे.

सभापती महोदय, मजूर संस्था हा एक मोठा विषय आहे. 34 टक्के कामे कंत्राटदाराला दिली जातात, 33 टक्के कामे सुशिक्षित बेकारांना दिली जातात आणि 33 टक्के कामे मजूर संस्थांना दिली जातात. एस्टिमेट होतात त्या रेटला ही कामे वाटली जातात. माझा या गोष्टीला थोडासा आक्षेप आहे. त्यामुळे मी सर्व यंत्रणांना ही गोष्ट बरोबर नाही असे कळविलेले आहे. यामध्ये पारदर्शकता आली तर राज्य सरकारचे 7-8 टक्के पैसे वाचतील. त्या कामासाठी स्पर्धा

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/

श्री.जयंत पाटील....

होऊन चांगले रस्ते मिळतील. त्यामुळे ई-टेंडरिंगच्या या पहिल्या टप्प्याला काही लोकांनी विरोध केला आहे. सुशिक्षित बेकाराला काम देत असताना एखाद्या बेरोजगाराकडे पदवी असेल तर त्याला सोबत घेऊन उप अभियंत्यामार्फत एस्टिमेट केले जाईल. एखाद्या ए टू बी या रस्त्याचे 10 लाख रुपयांचे काम त्या सुशिक्षित बेरोजगारांकडे दिले जाईल. त्या रस्त्याची किंमत 10 लाख होती की 8 लाख होती याचे कधीही ऑडिट होत नाही. पण स्पर्धा झाली तर 10 लाखाच्या कामापैकी इतर 15 टक्के खर्च वाचविला तर राज्यात फार मोठी सेवा ग्रामीण भागातील रस्त्यांच्या कामासंबंधी होईल. म्हणून शासनाने हे जाणीवपूर्वक पाऊल टाकलेले आहे.

सुरुवातीला या बेरोजगारांना 5 लाखाची कामे ई-टेंडरिंगद्वारे दिली जाणार आहेत, मोठ्या कामासाठी रकमेची मर्यादा घातलेली नाही. 5 लाखापेक्षा कमी रकमेच्या कामांचे तुकडे करु नये असे मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना आदेश दिलेले आहेत. जर 5 लाखाच्या आतील रकमेच्या कामाचे तुकडे केल्याचे निदर्शनास आले तर त्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना जबाबदार धरण्यात येईल. 5 लाखाची पध्दत सेट झाल्यानंतर ही मर्यादा 3 लाखापर्यंत खाली आणली जाईल. 3 लाख रुपयांमध्ये ग्रामपंचायतीद्वारे शाळेच्या खोल्या गावातच बांधल्या जातात. त्यामुळे टप्प्याटप्प्याने खाली जाऊ अशी शासनाची कल्पना आहे. सगळयांना ही पध्दत मानसिकदृष्टया पेलवेल असे नाही, पण शासनाने हे धोरण स्वीकारलेले आहे. हळूहळू त्यामध्ये समाविष्ट करावे व त्यात पारदर्शकता आणावी असा प्रयत्न केला जात आहे.

सभापती महोदय, इंदिरा आवास योजनेचे पैसे परत गेले आहेत असा सन्माननीय सदस्यांनी उल्लेख केला असल्यामुळे त्याची माहिती देणे आवश्यक आहे. सन 2011-12 या वर्षासाठी 681 कोटींची तरतूद केली होती. त्यासाठी 799 कोटी रुपये प्राप्त झाला. हे पैसे वापरण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्यामुळे निधी परत झाल्याचा गैरसमज सभागृहाचा होऊ नये असे मला म्हणावयाचे आहे. इंदिरा आवास योजनेचा पैसा आल्यानंतर लाभार्थ्यांची नावे निश्चित झाल्यावर त्यांच्या कामासाठी पैसा खर्च केला जातो. इंदिरा आवास योजनेचा पैसा परत जाण्याची तरतूद नाही.

यानंतर श्री.शिगम....

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखाचा नाही

श्री. जयंत पाटील...

सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी ग्रामविकास विभागाच्या संदर्भात अनेक मुद्दे मांडलेले आहेत. मला येथे प्रामुख्याने सांगावयाचे आहे की, ग्रामविकास विभागात ॲडमिनिस्ट्रेटीव्ह सुधारणा करण्याचा प्रयत्न आम्ही केलेला आहे. आपल्या राज्यापेक्षा केरळ राज्य हे नेहमी पुढे असते. केरळमध्ये विकेन्द्रीकरणाची व्यवस्था जास्त चांगली आहे. या बाबतीत आपल्या राज्याला देशामध्ये तिस-या क्रमांकाचे बक्षीस मिळत होते. त्यामध्येही सुधारणा झालेली आहे. मागच्या वेळी केन्द्र सरकारने एक-एक कोटीचे बक्षीस दिले होते. विकेन्द्रीकरणाच्या बाबतीत अधिक चांगले काम केल्यामुळे दोन वेळा तिस-या क्रमांकाचे बक्षीस घेण्यासाठी मी दिल्लीला गेलो होतो. आता ग्रामीण भागामध्ये गुड गव्हर्नन्ससाठी देशात राज्याचा दुसरा क्रमांक आलेला आहे...(अडथळा).. आपणाला पहिल्या क्रमांकाचे बक्षीस देखील मिळू शकेल. परंतु दुस-या क्रमांकाचे बक्षीस मिळाल्याबद्दल सन्माननीय सदस्य श्री. विक्रम काळे यांना आनंद झाला असेल अशी मी अपेक्षा व्यक्त करतो.

सभापती महोदय, मी परवा या ठिकाणी सांगितले की, ग्रामपंचायतीमध्ये आपण संगणकीकरण केलेले आहे. मागील आर्थिक वर्षातील नोव्हेंबर ते मार्चपर्यन्तचे 72 लाखाचे व्यवहार संगणकाच्या माध्यमातून झालेले आहेत. केन्द्र सरकारने प्रिया सॉफ्टवेअर दिलेले आहे. तुम्ही घरात बसून गावातील कोणत्या योजनेवर किती खर्च झालेला आहे, कोणत्या योजना चालू आहेत हे संगणकावर पाहू शकता. आपण 11 सॉफ्टवेअर लोड करणार आहोत. देशामध्ये परवा 40 हजार कोटीची आवक झाली आणि 42 हजार कोटी खर्च झाल्याची नोंद संगणकावर झालेली आहे. देशातील इतर राज्यामध्ये 500 कोटी, 700 कोटी या प्रमाणे ट्रान्झॅक्शन्स झालेली आहेत. आपल्या आणि अन्य राज्यामध्ये याबाबतीत 10 पटीने फरक आहे. म्हणजे एवढ्या मोठया प्रमाणावर राज्यात संगणकीकरणाची व्यवस्था आपण केलेली आहे. यामध्ये पारदर्शकता आहे.

सभापती महोदय, तालुका स्तरावर सेतू नावाची व्यवस्था आहे ती व्यवस्था हळूहळू गावामध्ये आणावी अशी विभागाची भूमिका असून त्यादृष्टीने प्रयत्न होत आहेत. माझी सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की, त्यांनी ग्रामपंचायतींना भेट देऊन त्यांच्या अडचणी समजून घ्याव्यात. पुन्हा या ग्रामविकास विभागाच्या संदर्भात अशा प्रकारची मोकळेपणाने चर्चा झाली तर ती अधिक उपयुक्त ठरेल. ग्रामविकास विभाग हा अतिशय महत्वाचा विभाग आहे. खेडेगावातील माणसाला

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत पाटील...

शहरातील माणसाच्या दर्जाचे समतुल्य असे जीवनमान देण्याचा प्रयत्न आपण करु या. ग्रामविकास विभागाला आपण विशेष महत्व दिले त्याबद्दल मी सर्वांचे मन:पूर्वक आभार मानतो.

सभापती महोदय, शाळा बांधकाम आणि आत्महत्या हा महत्वाचा विषय आहे. शाळा बांधकामाची जबाबदारी मुख्याध्यापकावर सोपविलेली आहे. मुख्याध्यापक हा त्यामधील तज्ज्ञ नसतो. शाळांच्या बांधकामामध्ये काही आत्महत्येची प्रकरणे झाली. यामधून मुख्याध्यापकाला वाचविण्यासाठी या शाळा बांधकामाची जबाबदारी मुख्याध्यापकावर न टाकता ती पंचायत समित्याच्या उप अभियत्यांवर टाकवी असे केन्द्राला सांगितलेले असून संबंधित मंत्री महोदयांशी मी बोललो आहे. त्याबाबतीत निश्चितच चांगला निर्णय होईल अशी मला अपेक्षा आहे. धन्यवाद.

--

...नंतर श्री. भोगले...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नितीन राऊत (रोजगार हमी योजना मंत्री) : सभापती महोदय, माननीय सदस्य डॉ.सुधीर तांबे, माननीय सदस्या ॲड.उषा दराडे व इतर यांनी नियम 260 अन्वये जो प्रस्ताव या ठिकाणी मांडला त्या प्रस्तावावरील चर्चेला उत्तर देण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजनेचा या प्रस्तावामध्ये समावेश आहे. या सभागृहाचे दीर्घकाळ सभापती म्हणून ज्यांनी काम केले ते स्व.वि.स.पागे या रोजगार हमी योजनेचे जनक होते. राज्याची ही महत्वाकांक्षी योजना केंद्र सरकारने स्वीकारल्यानंतर टप्प्याटप्प्याने 2006 ते 2008 या काळात केंद्र स्तरावर महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजना सुरु झाली. 2009-2010 या काळात 321 कोटी, 2010-2011 या काळात 351 कोटी रुपये या योजनेंतर्गत आपण खर्च केले होते. या विभागाची जबाबदारी माझ्याकडे आल्यानंतर सन्माननीय मुख्यमंत्री श्री.पृथ्वीराज चव्हाण आणि सन्माननीय उपमुख्यमंत्री श्री.अजित पवार यांनी उदार दृष्टीकोन दाखवून अधिक निधी या विभागाला उपलब्ध करुन दिल्यामुळे या वर्षाअखेर जवळपास 1500 कोटी रुपयांपेक्षा अधिक खर्च आपण करु शकलो आहोत. मागील वर्षी रोहयोच्या कामावर जवळपास 1 लाख मजुरांची उपस्थिती होती. यावर्षी जवळजवळ 6.5 लाख मजुरांची रोहयोच्या

(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.परशुराम उपरकर)

कामावर उपस्थिती आहे. केंद्र शासनाकडून जास्तीत जास्त निधी कसा आणता येईल यादृष्टीने आम्ही सातत्याने प्रयत्न केले आहेत. नावीन्यपूर्ण व कल्पक उपक्रम राबविले आहेत. केंद्र शासनाकडून जवळपास 1426 कोटी रुपये या विभागाला प्राप्त झाले आहेत. त्यापैकी 1241 कोटी रुपये 2011-12 दरम्यान आम्ही खर्च करु शकलो आहोत. 2012-2013 या वर्षात आतापर्यंत 185 कोटी रुपये खर्च झालेले आहेत.

सभापती महोदय, ग्रामपंचायतीचे सरपंच आणि तेथील लोकप्रतिनिधींना लेबर बजेट कशा पध्दतीने केंद्र सरकारकडे सादर करायचे याचे ज्ञान नव्हते. एमआयएसवर रिपोर्टिंग करण्याची माहिती नव्हती. त्यामुळे मध्यंतरीच्या काळात अनेक अडचणी निर्माण झाल्या होत्या. या सर्वांवर मात करुन आम्ही योजना सफल केलेली आहे. आम्ही राज्यात रोजगार हमी योजना आयुक्तालय सुध्दा सुरु केले आहे. राज्यामध्ये नरेगा योजनेसाठी राज्याचा फंड नव्हता. राज्याचा फंड सुरु करुन बफर फंड म्हणून खेळते भांडवल ठेवण्याची योजना आणली आहे. येत्या एक दोन महिन्यात ती कार्यान्वित होईल. यापुढे प्रत्येक ग्रामपंचायतीला 40 लाख रुपये आम्ही दिले आणि गावातील

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नितीन राऊत.....

नियोजनावर भर दिला, त्या माध्यमातून गावातील लोकांनी नियोजन केले आणि आपली कामे आणून दिली तर निश्चितपणे तो निधी खर्च करण्यास वाव आहे. मुख्यत्वेकरुन ग्रामीण पातळीवर शौचालये, वैयक्तिक लाभार्थी, शाळा आणि अंगणवाडी येथे शौचालये बांधणे, गावागावात सार्वजनिक शौचालये बांधणे या योजना राबवित असताना नक्षलग्रस्त जिल्हयांमध्ये गाव पातळीवर खेळाचे मैदान तयार करण्याची सुध्दा आमची योजना आहे. गावामध्ये मैदान तयार करण्याची योजना नरेगामध्ये अंतर्भूत करण्याची केंद्र शासनाला शिफारस करणार आहोत. ग्रामपंचायत अंतर्गत सिमेंट कॉंक्रिट ब्लॉक वापरुन सिमेंटचे रस्ते तयार करण्याची योजना सुरु केली आहे.

सभापती महोदय, जून्या रोजगार हमी योजनेत आणि नरेगा योजनेत काय फरक आहे असा प्रश्न उपस्थित केला होता. लेबर मिळत नाहीत असेही सांगण्यात आले. त्याचे उत्तर मी दिलेले आहे. योजना लोकांपर्यंत पोहोचत नाही आणि योजनेबाबतची माहिती मिळत नाही असेही सांगण्यात आले. एमआयएसवर सगळी माहिती उपलब्ध आहे. या योजनेला आणखी बळकटी देण्याबाबत फिडबॅक आणि हेल्पलाईन सुरु केली आहे. केंद्र शासनाला वेळेवर आमचे वर्षाचे जे नियोजन असते ते आम्ही पाठवित असतो. ऑक्टोबरपासून आमचे नियोजनाचे काम सुरु होते. निश्चितपणे यावेळी मागील वर्षाच्या तुलनेत रुपये 1500 कोटीपेक्षा अधिक निधी खर्च केला आहे. मी सभागृहाला खात्री देतो की, चालू वर्षी 2500 कोटी रुपयांपेक्षा अधिक निधी या योजनेमध्ये खर्च होईल. मोठया प्रमाणात मजूर उपलब्ध होतील. मजुरांना मजुरी वेळेवर मिळत नाही, योजनेमध्ये भ्रष्टाचार होतो असे सांगण्यात आले.

नंतर श्री.खर्चे...

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

डॉ. नितीन राऊत .....

परंतु मी सभागृहाला सांगू इच्छितो की, असा कोणताही प्रकार नसून मजुरांना पोस्टामार्फत पगार देण्यात येत होता आणि आता बँकांच्या माध्यमातून तसेच करस्पॉन्डिंग एजंटच्या माध्यमातून हे काम करणार आहोत. तसेच ब्लॉक लेव्हलवर बीसी मॉडेलच्या माध्यमातून हे मजुरी वाटपाचे काम सुरु होणार आहे.

हे खरे आहे की, बऱ्याच ठिकाणी नरेगा योजनेचे बोर्ड लावले गेले नाहीत, त्याची चौकशी करुन हे बोर्ड प्रत्येक ग्राम पंचायतीच्या ठिकाणी लावण्यात येतील अशा सूचना देण्यात आल आहेत. मला खात्री आहे की, सर्व ठिकाणी असे बोर्ड लागलेले दिसतील आणि नरेगाच्या संदर्भात एक चांगल्या प्रकारचे वातावरण राज्यात निर्माण होईल. नरेगा ही एक यशस्वी अशी देशातील योजना असून राज्यात सुध्दा ती यशस्वी झाल्याशिवाय राहणार नाही. या योजनेचे सोशल ऑडिट करण्याच्या संदर्भात सुध्दा आमचा विभाग कार्यरत असून त्यातून मोठ्या प्रमाणात ॲसेट्स निर्मिती होणार आहे व त्याची माहिती सन्माननीय सदस्यांसाठी उपलब्ध करुन दिली जाईल. राज्याची रोजगार हमी योजना आणि केंद्राची नरेगा ही योजना या दोन्ही योजनांची माहिती विभागाच्या माध्यमातून गावाला तसेच प्रत्येक सन्माननीय सदस्यांना पाठविली जाईल, त्याचा उपयोग करुन गावागावात मोठ्या प्रमाणात नियोजन करुन या योजनेचा जास्तीत जास्त फायदा घेतला तर आपण अधिक चांगले काम करु शकू व त्यातून दुष्काळावर मात करु शकू अशी खात्री देऊन माझे भाषण पूर्ण करतो.

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे : महोदय, मंत्री महोदयांनी अतिशय तळमळीने सभागृहाला माहिती दिलेली आहे. या विषयाची अंमल बजावणी कशी करावयाची यासाठी कोट्यवधी रुपये खर्च करावे लागले तरी शासनाची तयारी असल्याचे त्यांनी विशद केले. पण माझा मुद्दा असा आहे की, दुपारी सभागृहात मी औचित्याच्या मुद्याच्या माध्यमातून सभागृहाच्या निदर्शनास आणून दिले होते की, 8 एप्रिल, 2012 रोजी राज्याचे मुख्यमंत्री महोदय सांगली जिल्ह्यातील आटपाडी येथील रोजगार हमी योजनेच्या कामांना भेटी देण्यासाठी गेले होते. त्यावेळी मजुरांना त्यांनी विचारले की, आपण कधीपासून या कामावर आहात, तेव्हा त्या मजुरांनी सांगितले की, आम्ही तीन महिन्यांपासून या कामावर आहोत. माननीय गृह मंत्री व माननीय ग्राम विकास मंत्री जेव्हा गेले तेव्हा या मजुरांना जॉब कार्ड दिले नव्हते अशी माहिती मिळाली म्हणून माननीय मुख्यमंत्र्यांनी ज्या महिलेला विचारले त्या महिलेला कदाचित चुकीचे मार्गदर्शन झाले असावे, कारण त्यानंतर याच कामाला स्टार माझा या वाहिनीचे प्रतिनिधी श्री. मंदार गोंजारे यांनी भेट दिली असता त्याच कामावर एकही मजूर दिसला नाही, फक्त बोर्ड लावलेला दिसला. मग मजूर कामावर नसताना तीन महिन्यापासून काम चालू आहे अशा प्रकारे भासवून माननीय मुख्य मंत्र्यांना भेट देण्यासाठी नेण्यात आले हा एक प्रकारे लोकशाहीचा व या सभागृहाचा अवमान आहे. त्यामुळे सभागृहात लोकशाहीबाबत प्रश्नचिन्ह निर्माण व्हावे असा हा प्रश्न आहे. माझी मागणी आहे की, ज्या संबंधित तहसीलदाराने चालू नसलेल्या कामाला भेट देण्यासाठी नेले त्यांची चौकशी शासन करणार काय ?

डॉ. नितीन राऊत : महोदय, आटपाडी तालुक्यासंबंधीची माहिती सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी दिली तेव्हा मी सुध्दा सभागृहात उपस्थित होतो. त्या अनुषंगाने मी अशी माहिती देऊ इच्छितो की, आटपाडी तालुक्यात टोटल मजूर 1194 अणि सातारा, माण तालुक्यात 2448 तसेच खटाव तालुक्यात 2437 एवढी मजुरांची उपस्थिती आहे. तरी देखील आपण जी माहिती दिली आणि वाहिनीच्या माध्यमातून जी माहिती समोर आली ती निश्चितच खेदजनक आहे. त्याची चौकशी केली जाईल अशी खात्री देऊ इच्छितो.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. सुधीर तांबे : सभापती महोदय, नियम 260 अन्वये या सभागृहात प्रस्ताव सादर केला असून त्या प्रस्तावावर अनेक सन्माननीय सदस्यांनी या प्रस्तावाच्या अनुषंगाने मौलिक सूचना सुचवलेल्या आहेत. या प्रस्तावामध्ये केंद्रशासनाच्या विविध योजना व त्याअंतर्गत राज्याला मिळणारा हिस्सा प्रभावीपणे अधिक कसा मिळवता येईल असा या प्रस्तावाचा मूळ उद्देश होता. हा प्रस्ताव मांडण्याची मला संधी मिळाली त्याबद्दल मी आपला आभारी आहे.

या प्रस्तावाला माननीय मंत्रीमहोदयांनी समाधानकारक असे उत्तर दिलेले आहे. माननीय अर्थराज्यमंत्र्यांनी अतिशय चांगले उत्तर असे दिलेले आहे. त्याच प्रमाणे आरोग्य मंत्री, ग्रामविकास मंत्री व रोजगार हमी योजना मंत्र्यांनी चांगली उत्तरे दिली आहेत. मंत्री महोदयांनी या प्रस्तावाच्या अनुषंगाने फार चांगले उत्तर दिले आहे परंतु तरी सुध्दा मला असे वाटते की, या प्रस्तावाच्या संदर्भात काही प्रश्नांची उत्तरे अनुत्तरित राहिलेली आहेत. केंद्राचा निधी अधिक कसा मिळवता येईल, यासाठी चांगली व्यवस्था कशी निर्माण करता येईल, एखाद्या मंत्रालयाकडे यासंदर्भातील जबाबदारी सोपविता येईल काय, स्वतंत्र भार म्हणून जबाबदारी सोपविता येईल काय अशा प्रकारचे उत्तर माननीय मंत्रीमहोदयांकडून मला अपेक्षित होते.

केंद्र शासनाकडून मिळणारा बराच निधी खर्च झालेला नाही यासंदर्भात वर्तमानपत्रात जी काही माहिती छापून आली होती त्या विषयी या ठिकाणी माहिती देण्यात आली. ठळक योजनांव्यतिरिक्त केंद्रशासनाच्या अनेक योजना असतात. नॅशनल मेडिकल प्लॅट ही योजना 950 कोटी रुपयांची असून त्यामध्ये आपल्याला केवळ 60 कोटी रुपयेच मिळालेले आहेत. वनाच्या संदर्भातही आपण खूप काही काम करु शकतो. आता गरीब आणि श्रीमंत अशी मोठी दरी निर्माण झाली असून सामान्य माणसाला सामाजिक सुरक्षिततेच्या दृष्टीने अधिकाधिक मदत होणे गरजेचे आहे. ही दरी भरुन काढावयाची असेल तर राज्यशासनाला केंद्राकडून अधिकाधिक निधी मिळविण्याची आवश्यकता आहे. हा निधी राज्याच्या पातळीवरच निर्माण होऊ शकतो असे नाही तर केंद्राच्या माध्यमातून हा निधी मिळवावयास पाहिजे. खरे म्हणजे केंद्रशासनाच्या योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी होण्याची आवश्यकता आहे. माननीय मंत्री महोदय श्री. जयंत पाटील यांनी सांगितले आहे की, ग्रामविकासाच्या कारभारात आम्ही पारदर्शकता आणीत आहोत. फार मोठया प्रमाणात प्रशासकीय बदल घडवून आणत आहोत.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. सुधीर तांबे ....

हे जरी सत्य असले तरी देखील विदारक सत्य असे आहे की, योजना राबवित असतांना शेवटच्या घटकांपर्यंत योजना पोहचेपर्यंत त्या योजनेला खूप गळती लागलेली असते.

स्व.यशवंतराव चव्हाण यांचे हे जन्मशताब्दी वर्ष असून साहेबांनी यासंदर्भात जी गोष्ट सांगितलेली आहे ती मी या ठिकाणी सांगू इच्छितो. त्यांनी सांगितले होते की, ते शाळेत शिक्षण घेत होते व त्यांच्या आईने त्यांना लाडवाचा एक डबा पाठविला होता. लाडूचा डबा पोस्टमनजवळ दिला. पोस्टमन लाडवाचा डबा घेऊन चालला होता परंतु पोस्टमनला वाटले की, डब्यातील एखादा लाडू खाऊन पहावा म्हणून पोस्टमनने डबा उघडला. परंतु डब्यात आईने चिठ्ठी ठेवली होती व त्या चिठ्ठीत लिहिले होते की, "मी 20 लाडू पाठविले असून रोज एक लाडू खात जा". पोस्टमनची पंचाईत झाली. पोस्टमनने सर्व लाडू बाजूला काढले व डब्याच्या तळाला लाडवाचा बराच चुरा सापडला तो चुरा पोस्टमनने खाल्ला व पोस्टमनला कल्पना सुचली. पोस्टमनने त्याची सायकल खड्डया-खड्डयातून चालवावयास सुरुवात केली. डबा जोरात आदळावा व लाडवाचा चुरा व्हावा यासाठी पोस्टमन मुद्दाम सायकल खड्डयातून चालवू लागला व त्यामुळे लाडूचा चुरा जास्त तयार होऊ लागला. असे करत करत डबा स्व.यशवंतरावांजवळ पोहचला. स्व.यशवंतरावानी आपल्य आईला कळविले की, "तु पाठविलेले 20 लाडू मला पोहचले परंतु लाडूचा आकार गोटयांसारखा होता". सभापती महोदय, केंद्राच्या हजारो कोटी रुपयांच्या योजना आहेत, प्रत्येक क्षेत्रासाठी योजना आहेत, राज्याच्या देखील योजना आहेत. या ज्या योजना आहेत त्या खरे म्हणजे गरीब माणसांसाठी असून या योजना गरीब माणसांपर्यंत पोहचेपर्यंत प्रभावीपणे पोहचतात यावर विश्वास ठेवणे खूप कठीण आहे.

माननीय जयंत पाटील साहेबानी सांगितले आहे की, शासकीय कामामध्ये आपल्याला अधिकाधिक पारदर्शकता आणावी लागणार आहे. पारदर्शकता संगणीकरणाच्या माध्यमातून कशी आणता येईल किंवा अन्य माध्यमातून कशी आणता येईल हे पाहिले पाहिजे. खरे म्हणजे यावर या सभागृहात एकदा चर्चा झाली पाहिजे. प्रत्येक विभागाने आपापल्या विभागामध्ये ॲडमिनिस्ट्रटीव्ह रिफॉर्म्स कशा पध्दतीने आणता येतील, प्रशासकीय बदल कशा पध्दतीने घडवून आणता येतील, पारदर्शकता कशी आणता येईल, जबाबदारी निश्चित कशी करता येईल याबाबत चर्चा होण्याची

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. सुधीर तांबे .....

आवश्यकता आहे.

अनेक प्रकरणे उघडकीस येतात परंतु त्यामध्ये जबाबदारी निश्चित होत नाही. शेवटी हा पैसा जनतेचा असून तो पैसा चुकीच्या मार्गाने जात असेल तर ते योग्य नाही. मध्यंतरी एका डेप्युटी कलेक्टरकडे 250 कोटी रुपयांची संपत्ती सापडली होती. खरे म्हणजे या भयानक गोष्टी आहेत. आता तर केंद्राकडून थेट ग्रामपंचायतीला पैसे मिळणार आहेत. ग्रामपचांयतीमधील ग्रामसेवक, सरपंच सक्षम आहे का हा आता खऱ्या अर्थाने प्रश्न निर्माण झाला आहे. शेवटी हे लोक सुध्दा कोणाचे तरी अनुकरण करीतच असतात. आपणही इतरांसारखे करावे अशी भावना त्यांच्या मनात निर्माण होणे साहजिक असते. गळक्या माठात पाणी भरले तर माठात कधीच पाणी साठणार नाही अशी अवस्था आपल्या योजनांची आहे असे म्हटले तर ते वावगे होणार नाही.

यानंतर श्री. भारवि...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.सुधीर तांबे....

ज्यांच्यासाठी आपण योजना राबवित आहोत, त्यांचे सक्षमीकरण होत नसेल तर मला असे वाटते की, आपण अनेक योजना राबविल्या तरी त्यातून आपल्याला अपेक्षित यश मिळणार नाही. या निमित्ताने चांगली चर्चा झाली आहे. त्यास सर्व माननीय मंत्री महोदयांनी चांगले उत्तर दिले आहे. त्याबद्दल मी त्यांचेही आभार मानतो. तसेच या चर्चेमध्ये भाग घेतलेल्या सर्व सन्माननीय सदस्यांचे देखील आभार मानतो आणि आपण मला संधी दिल्याबद्दल आपले देखील आभार मानतो. धन्यवाद.

.....

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मनिष जैन : सभापती महोदय, मी जळगाव जिल्हा परिषदेतील गणवेशा संबंधातील प्रश्न उपस्थित केला होता. त्याचे उत्तर मला मिळालेले नाही. माझा प्रश्न सर्व शिक्षण अभियानाशी संबंधित होता. त्यास माननीय ग्रामविकास मंत्र्यांनी उत्तर दिलेले नाही.

श्री.जयंत पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांचा प्रश्न हा शिक्षण विभागाशी संबंधित आहे. माझे भाषण पूर्ण केल्यानंतर मी बाहेर गेलो होतो. त्यावेळी मला पीठासीन अधिकाऱ्यांनी आपला विषय आहे हे सांगितले होते. हा विषय माझ्याशी संबंधित नाही. आपला विषय माझ्या विभागाशी संबंधित नसल्यामुळे मला माझ्या विभागाच्या अधिकाऱ्यांनी देखील ब्रीफिंग केले नाही. सर्व शिक्षण अभियानाच्या संबंधातील आपला प्रश्न आहे. या संबंधातील माहिती मी काढायला सांगतो. याबद्दल काय झाले आहे हे मला काहीच माहित नाही. शिक्षण हा विभाग माझ्याकडे नाही. आपला विषय शिक्षण विभागाशी संबंधित आहे. त्या विभागाचे माननीय मंत्री आता उपस्थित नाही. येथे नियम 260 अन्वये चर्चा उपस्थित केलेली आहे. त्यात महाराष्ट्रातील सर्वच प्रश्नाला स्पर्श केलेला आहे. सर्व व्यापक अशी ही चर्चा आहे. एखादे माननीय मंत्री गैरहजर असतील तर ते आपण समजून घेतले पाहिजे. आपला जो प्रश्न आहे त्या संबंधी आपण उद्या सकाळी 11.00 वाजता माझ्या दालनात उत्तर काढू या.

तालिका सभापती (श्री.परशुराम उपरकर) : अल्पकालीन चर्चा आता संपली आहे.

सभागृहाची बैठक आता स्थगित होत आहे. बुधवार, दिनांक 11 एप्रिल 2012 रोजी सकाळी 10.00 ते 11.45 या वेळेत सभागृहाची विशेष बैठक होईल. या बैठकीत आजच्या कामकाज पत्रिकेवर दर्शविलेल्या म.वि.प.नियम 97 या वरील चर्चा व माननीय मंत्र्यांचे उत्तर होईल. सभागृहाची नियमित बैठक दुपारी 12.00 वाजता पुन: भरेल.

(सभागृहाची बैठक सायंकाळी 7 वाजून 22 मिनिटांनी, बुधवार दिनांक 11 एप्रिल 2012 रोजीच्या सकाळी 10.00 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही